बुधवार
१
एप्रिल २०२६

अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : १९
अंक : ३८४
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com

# अजिंक्य भारत

बातम्यांचा गतिमान पाठलाग



नसीम शाह याला २ कोटी रुपयांचा दंड (पान ७ वर)

## थोडक्यात

### निकिता पोरवाल करणार भारताचे प्रतिनिधित्व



**व्हिएतनाम:** मिस वर्ल्ड २०२६ ची ऐतिहासिक आवृत्ती व्हिएतनाममध्ये आयोजित केली जाईल. ही स्पर्धा ९ ऑगस्ट २०२६ रोजी सुरू होईल आणि ५ सप्टेंबर रोजी अंतिम सोहळ्याने समाप्त होईल. ज्युलिया मॉर्ले यांनी स्थानिक आयोजकांच्या सहकार्याने मिस वर्ल्ड व्हिएतनामच्या अंतिम सोहळ्यादरम्यान ही घोषणा केली. या वर्षीची स्पर्धा आतापर्यंतची सर्वात मोठी असणार असून, त्यात अंदाजे १३० देशांतील स्पर्धक सहभागी होणार आहेत. ख्रिस्टियाना गॉर्डन यांच्यासह केवळ काही मोजक्याच स्पर्धकांची नावे आतापर्यंत निश्चित झाली आहेत. यावर्षी भारताचे प्रतिनिधित्व उज्जैनची फेमिना मिस इंडिया वर्ल्ड २०२४ निकिता पोरवाल करणार आहे.

### शंकर अण्णा धोंडगे यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश

**लोहा :** लोहा-कंधार मतदारसंघातील राजकारणात महत्त्वपूर्ण घडामोड घडली असून माजी आमदार व शेतकरी नेते शंकर अण्णा धोंडगे यांनी २९ मार्च रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत जाहीर रित्या प्रवेश केला. धोंडगे हे शेतकरी चळवळीतील लढाऊ नेतृत्व म्हणून ओळखले जातात. शरद जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी अनेक आंदोलनांत सहभाग घेतला व शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी संघर्ष केला. नंतर शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये कार्य करत त्यांनी किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष पद भूषवले आणि आमदार म्हणून विविध विकासकामे राबवली.


### पॅन कार्ड : नियम आजपासून बदलणार

मुंबई: पॅन कार्ड मिळवण्यासंबंधीचे नियम १ एप्रिल २०२६ पासून बदलणार आहेत; परिणामी, केवळ आधार कार्डच्या आधारे नवीन पॅन कार्ड मिळवणे ही प्रक्रिया यापुढे तितकीशी सोपी राहणार नाही. फसवणूक करणारी किंवा चुकीची माहिती असलेल्या अर्जांना आळा घालण्याच्या उद्देशाने, सरकारने अर्जाच्या प्रक्रियेत अधिक कठोरता आणली असून, त्यासाठी अतिरिक्त कागदपत्रे सादर करणे अनिवार्य केले आहे. आतापर्यंत, व्यक्ती केवळ त्यांच्या आधार कार्डवरील तपशीलांचा वापर करून पॅन कार्डसाठी सहजपणे अर्ज करू शकत होत्या; तथापि, नवीन नियम लागू झाल्यानंतर ही सुविधा उपलब्ध राहणार नाही.

# राज्यात वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या; महाराष्ट्रात मोठा प्रशासकीय फेरबदल!

## अश्विनी भिडे बीएमसीच्या आयुक्तपदी
## तुकाराम मुंढे यांची महसूल वन विभाग येथे बदली





**मुंबई : दि.३१ वृत्तसंस्था**

महाराष्ट्र सरकारने मंगळवारी (३१ मार्च) अनेक वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करून मोठा प्रशासकीय फेरबदल केला. एका सरकारी आदेशानुसार, विविध विभागांमधील महत्त्वाच्या पदांवर नवीन नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. सर्वात महत्त्वपूर्ण बदलामध्ये, १९९३-बॅचचे आयएएस अधिकारी लोकेश चंद्र यांना महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेडच्या अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक पदावरून हटवून मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. दरम्यान, १९९५-बॅचच्या वरिष्ठ अधिकारी अश्विनी भिडे (पान २ वर)

### अधिकारी आणि बदली झालेली ठिकाणे:

- १) विनीत वैद्य सिंगल यांची प्रधान सचिव, मृद आणि जलसंधरण विभाग मंत्रालय येथे बदली झाली आहे.
- २) तुकाराम मुंढे यांची प्रधान सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत आणि पुनर्वसन , महसूल वन विभाग येथे बदली झाली आहे.
- ३) लोकेश चंद्रा यांची मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव मंत्रालय, मुंबई येथे बदली झाली आहे.
- ४) लहू माळी यांची व्यवस्थापकीय संचालक, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित येथे बदली झाली आहे.
- ५) परिमल सिंह यांची सचिव (कृषी), कृषी आणि पदुम विभाग, मंत्रालय येथे बदली झाली आहे.
- ६) विकास चंद्र रस्तोगी यांची अप्पर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग मंत्रालय येथे बदली झाली आहे.
- ७) माणिक गुरसाळ यांची सचिव, दिव्यांग कल्याण विभाग मंत्रालय मुंबई येथे बदली झाली आहे.
- ८) पृथ्वीराज बी.पी यांची महापालिका आयुक्त वसई विरार महानगरपालिका येथे बदली झाली आहे.
- ९) आश्विनी भिडे यांची महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका येथे बदली झाली आहे.

# बिहारमधील मंदिरात चेंगराचेंगरी!

## ८ महिलांचा दुर्दैवी मृत्यू, अनेक जण जखमी; मृतांच्या वारसांना ६ लाख रुपये नुकसान भरपाई

**नालंदा: दि.३१ वृत्तसंस्था**

**बिहारच्या नालंदा जिल्ह्यात नालंदा येथील शीतला देवी मंदिरामध्ये भाविकांची चेंगराचेंगरी झाली आहे. या दुर्घटनेत ९ लोकांचा मृत्यू झाला. गर्दीत दबल्याने ८ महिलांचा जागीच मृत्यू झाला होता, तर एका पुरुषाने रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. या चेंगराचेंगरीत १२ हून अधिक जण जखमी झाले आहेत. मंगळवारी शीतला अष्टमीच्या निमित्ताने मोठ्या संख्येने भाविक या मंदिरात पोहोचले होते. तिथे जत्राही भरली होती.**





मिळालेल्या माहितीनुसार, दर मंगळवारी शीतळा देवी मंदिरात दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी जमते. आज चैत्र महिन्याचा शेवटचा मंगळवार असल्याने गर्दी आणखी वाढली होती. अचानक चेंगराचेंगरी झाली, त्यामुळे लोक पळून जाऊ लागले मात्र यामुळे अनेक महिला चिरडून मरण पावल्या आहेत. मंदिराच्या मर्यादित जागेत क्षमतेपेक्षा जास्त लोक जमल्यामुळे गोंधळ निर्माण झाला. गर्दीवर नियंत्रण मिळवणे कठीण झाल्याने अचानक चेंगराचेंगरी सुरू झाली. यामध्ये अनेक महिला भाविक खाली पडल्या आणि गर्दीच्या पायाखाली चिरडल्या गेल्या. घटनास्थळी उपस्थित लोकांनी सांगितले की, गर्दी नियंत्रणात आणण्यासाठी पुरेसे बंदोबस्त नव्हते. दर्शनाच्या घाईत धक्काबुक्की झाली. गोंधळात अनेक लोक गर्दीत दबले गेले. मोठ्या संख्येने लोक जखमीही झाले आहेत. दुर्घटनेनंतर मंदिर आणि जत्रा बंद करण्यात आली आहे. दुर्घटनेत मृत पावलेल्या ६ लोकांची ओळख पटली आहे. यात रीता देवी (५०), कांती देवी (५०), आशा देवी (६५), देवंती देवी (३५), अनुष्का देवी (४०) आणि रेखा देवी (४५) यांचा समावेश आहे. मृतांपैकी ६ नालंदा येथील रहिवासी आहेत. एक नवादा येथील, एक पटना येथील आहे, तर एकाची ओळख पटलेली नाही.अपघातानंतर (पान २ वर)

### शीतला अष्टमीला पारंपरिक इतिहास

मिळालेल्या माहितीनुसार, बिहार शरीफपासून सुमारे ५ किलोमीटर अंतरावर असलेल्या मघरा गावात, शीतला अष्टमीच्या दिवशी घरातील चूल न पेटवण्याची आणि आदल्या दिवशी तयार केलेले थंड (शिळे) अन्न देवीला नैवेद्य म्हणून अर्पण करण्याची पारंपरिक प्रथा आहे. अष्टमीच्या दिवशी मंदिरात लांबच लांब रांगा लागतात, ज्यामुळे प्रचंड गर्दी होते आणि चेंगराचेंगरीचा धोका निर्माण होतो. बिहारमधील नालंदा मध्ये ही घटना घडली. यामुळे भाविकांसाठी हळहळ व्यक्त केली जात आहे.

# शुद्धीकरणाच्या नावाखाली मतदारांना वगळण्याचा घाट-ममता बॅनर्जी

**कोलकाता: दि.३१ वृत्तसंस्था**

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांनी मंगळवारी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना खरमरीत पत्र लिहून निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

मतदार यादी शुद्धीकरण (एसआयआर) प्रक्रियेच्या नावाखाली बंगालमधील खऱ्या मतदारांचा मतदानाचा हक्क हिरावला जाण्याचा धोका निर्माण झाला असल्याचे त्यांनी या पत्रात नमूद केले आहे. ममता बॅनर्जी यांनी आपल्या तीन पानी पत्रात असा आरोप केला आहे की, निवडणूक आयोगाकडून घेतले जाणारे निर्णय लोकांचे लोकशाही आणि मूलभूत अधिकार कमकुवत करणारे आहेत. एखाद्या घटनात्मक संस्थेकडून ज्या निपक्षपातीपणाच्या (पान २ वर)

# अर्जुन खोतकर यांना हायकोर्टाचा मोठा दिलासा!

## कैलास गोरंट्याल यांची याचिका फेटाळली



**मुंबई : दि.३१ वृत्तसंस्था**

०२४ च्या विधानसभेच्या निवडणुकीत शिवसेनेचे आमदार अर्जुन खोतकर यांच्या निवडीला आव्हान देणारी याचिका काँग्रेसचे कैलास गोरंट्याल यांनी दाखल केली होती. मुंबई उच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली आहे.या याचिकेत कोणताही कायदेशीर आधार नसल्याचे नमूद करत, औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती किशोर सी. संत यांनी ही याचिका फ ेटाळली आहे. गोरंट्याल यांनी याचिकेत नमूद केले होते की, खोतकर हे जालना कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती असल्याने ते निवडणूक लढवण्यास अपात्र होते. गोरंट्याल हे जालना विधानसभा मतदारसंघातून खोतकर यांच्या विरोधात निवडणूक लढले होते आणि त्यांना ३१,००० हून अधिक मतांनी पराभव स्वीकारावा लागला होता. गोरंट्याल यांनी उच्च न्यायालयात धाव (पान २ वर)

# शिवसेनेच्या विभागीय संपर्कप्रमुखांची घोषणा

## पश्चिम विदर्भातील जिल्ह्यांसाठी संजय राठोड विभागीय संपर्कप्रमुख




### विदर्भातील संपर्कप्रमुख

पूर्व विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया या जिल्ह्यांकरिता विभागीय संपर्क प्रमुख म्हणून माजी मंत्री दिपक सावंत यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली आहे. तर पूर्व विदर्भातील वर्धा, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्हांकरिता विभागीय संपर्कप्रमुख पदी आमदार डॉ. मनीषा कायंदे यांची निवड करण्यात आली आहे. पश्चिम विदर्भातील अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ आणि बुलढाणा जिल्ह्यांसाठी मंत्री संजय राठोड यांची विभागीय संपर्कप्रमुख तर पराग पिंगळे यांची विभागीय सह संपर्कप्रमुख म्हणून निवड करण्यात आल्याचे शिवसेनेने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

**मुंबई : दि.३१ वृत्तसंस्था**

शिवसेनेने राज्यातील विभागीय संपर्कप्रमुख आणि सह संपर्कप्रमुखांची घोषणा केली आहे. यात मंत्री भरत गोगावले, मंत्री प्रकाश आबिटकर आणि मंत्री संजय राठोड, आमदार डॉ. मनीषा कायंदे, आमदार किरण सामंत यांच्यावर पक्षाने महत्वाची जबाबदारी सोपवली आहे. माजी आमदार दगडू सकपाळांची पश्चिम महाराष्ट्राच्या विभागीय संपर्कप्रमुख पदी निवड करण्यात आली आहे.
हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे यांच्या आशीर्वादाने शिवसेना मुख्य नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार शिवसेना विभागीय जिल्हा संपर्कप्रमुख आणि सह संपर्कप्रमुखांची घोषणा केल्याचे निवेदन पक्षाने जारी (पान २ वर)

# नरहरी झिरवाळ व्हिडिओ प्रकरणात मोठा ट्विस्ट





## तृतीयपंथी व्यक्तीची थेट पोलीस ठाण्यात धाव

**मुंबई : दि.३१ वृत्तसंस्था**

विधानसभेचे उपाध्यक्ष, मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या कथित व्हिडिओ प्रकरणामुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणात आता नवा ट्विस्ट आला आहे. नरहरी झिरवाळ यांच्यासोबत दिसणारी तृतीयपंथी व्यक्तीने स्वत:च्या भावाविरूद्धच मुंबई पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. संबंधित व्यक्तीने मुंबईतील कफ परेड पोलीस ठाण्यात भावाविरोधात ब्लॅकमेलिंगचा आरोप केला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा या प्रकरणाला नवे वळण लागले आहे.
तृतीयपंथी व्यक्तीच्या भावाने तिला ब्लॅकमेल करण्यासाठी मूळ व्हिडीओ जाणीवपूर्वक एडिट करून सोशल मीडियावर व्हायरल केला, असा आरोप तृतीयपंथी व्यतीने केला आहे. या प्रकरणी पोलिसांनी भारतीय दंड संविधानांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. गोपनीयतेचा भंग आणि बदनामी केल्याचा आरोप आहे. दुसरीकडे नरहरी झिरवाळ यांनीदेखील हा व्हिडीओ बनावट असून, तो अनेक क्लिप्स जोडून तयार केल्याचा दावा केला आहे. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सल्ल्यानुसार त्यांनी कायदेशीर पावले उचलली आहेत. सध्या पोलीस या प्रकरणाचा तांत्रिक तपास सुरू असून, व्हायरल व्हिडिओचा मूळ स्त्रोत शोधण्याचे काम सुरू आहे. पण या नव्या ट्विस्टमुळे झिरवाळ यांच्यासाठी हा मोठा दिलासा असल्याचे बोलले जात आहे. चार-पाच दिवसांपूर्वी नरहरी झिरवाळ यांचा कथित आक्षेपार्ह व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहेत. या व्हिडीओमध्ये एक मंत्री (पान २ वर)

# शिर्डीतील प्रकरण: अशोक खरातच्या बायकोला अटक होणार?

**मुंबई : दि.३१ वृत्तसंस्था**

लैंगिक अत्याचार प्रकरणात आधीच अटकेत असलेल्या भोंदू अशोक खरात याच्या कुटुंबावर आता नवा गंभीर आरोप समोर आला आहे.
शिर्डी परिसरातील एका सामान्य शेतकऱ्याची कोट्यवधी रुपयांची जमीन सावकारीच्या नावाखाली बळकावल्याच्या प्रकरणी अशोक खरात, त्याची पत्नी आणि आणखी तीन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिर्डी पोलिसांनी या प्रकरणात दोघांना अटक केली असून, खरातच्या पत्नीला लवकरच अटक होण्याची शक्यता आहे. रावसाहेब गोंदकर या सामान्य शेतकऱ्याला सावकारीच्या जाळ्यात अडकवून अशोक खरात याने त्याची मोठ्या प्रमाणात जमीन बळकावल्याचा आरोप आहे. या प्रकरणी आज पहाटे शिर्डी पोलीस स्टेशनमध्ये फसवणूक आणि सावकारी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्यात अशोक खरात, त्याची पत्नी आणि तीन इतर आरोपी असा एकूण पाच जणांचा समावेश आहे. पोलिसांनी यापैकी दोघांना ताब्यात घेतले आहे. या दोघांना राहाता न्यायालयात हजर केल्यानंतर न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. अशोक खरात सध्या नाशिक पोलिसांच्या कोठडीत आहे. पोलिसांनी त्यालाही न्यायालयाच्या परवानगीने ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. भोंदू अशोक खरात याच्या कृत्यांमुळे (पान २ वर)



# शिवसेना पक्ष आणि चिन्ह प्रकरणाची सुनावणी २३ एप्रिलला

**नवी दिल्ली : दि.३१ वृत्तसंस्था**

**शिवसेना पक्ष आणि चिन्ह प्रकरणी पुढील सुनावणी आता २३ एप्रिल रोजी होण्याची शक्यता आहे. यापूर्वी या सुनावणीसाठी १ एप्रिल ही तारीख सर्वोच्च न्यायालयाच्या वेळापत्रकात दर्शवण्यात आली होती. मात्र १ एप्रिलच्या पूर्वसंध्येला ही सुनावणी आणखी एकदा पुढे ढकलण्यात आली आहे. दीर्घकाळ हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे.**




१२ मार्च रोजी संबंधित प्रकरणासाठी १ एप्रिल ही तारीख दर्शवण्यात आली होती. मात्र आता सुनावणी पुढे ढकलल्यामुळे ठाकरे गटाचा पुन्हा एकदा हिरमोड झाला आहे. दरम्यान, या प्रकरणात अंतिम युक्तिवाद बाकी आहे. २३ एप्रिलला सुनावणी झाल्यास शिवसेना ठाकरे गट सर्वप्रथम बाजू मांडण्याची शक्यता आहे. सूत्रांच्या माहितीनुसार ठाकरे गटाला युक्तिवादासाठी दीड तासांचा वेळ मिळू शकतो. त्यानंतर शिवसेना शिंदे गट त्यावर आपले मत मांडेल. केंद्रीय निवडणूक आयोगाने फ ेब्रुवारी २०२३ मध्ये एकनाथ शिंदे यांच्या पक्षाला शिवसेना नाव आणि चिन्ह दिले होते. पक्ष नाव आणि चिन्ह यासाठी शिवसेनेच्या ठाकरे आणि शिंदे गटात गेली तीन वर्षांहून अधिक काळ न्यायालयीन लढाई सुरु आहे. शिवसेना ठाकरे गटाने जुलै २०२५ मध्ये सर्वो च्च न्यायालयात पक्ष नाव आणि चिन्हा निर्णयासंदर्भात अंतरिम अर्ज केला होता. यामध्ये महाराष्ट्रात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शिवसेना शिंदेगटाला पक्षाचे नाव शिवसेना आणि चिन्ह धनुष्यबाण चिन्ह गोठविण्यात यावे, अशी मागणी केली होती.

## आरोग्य

### महिला-बाल विकास विभाग, चिल्ड्रन्स इन्व्हेस्टमेंट फंड फाउंडेशन यांच्यात सामंजस्य करार

# राज्यातील कुपोषणाच्या समस्येवर होईल मात: मुख्यमंत्री

**मुंबई : दि.३१ वृत्तसंस्था**

राज्यातील कुपोषणाच्या समस्येवर मात करुन महिला व बालकांच्या आरोग्य आणि पोषणात लक्षणीय सुधारणा घडवून आणण्याच्या दिशेने महाराष्ट्राने महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. महिला व बाल विकास विभाग आणि चिल्ड्रन्स इन्व्हेस्टमेंट फंड फाउंडेशन यांच्यात महिला व बालकांच्या पोषणा संदर्भात पाच वर्षांसाठी सामंजस्य करार करण्यात आला असून, या भागीदारीमुळे माता व बाल पोषण निर्देशांकात मोठी उंची गाठली जाईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.
महिला व बाल विकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव यांच्या उपस्थितीत हा करार झाला.



यावेळी चिल्ड्रन्स इन्व्हेस्टमेंट फंड फाउंडेशनच्या कार्यकारी संचालक मंजुला सिंग, डायरेक्टर स्ट्रॅटेजिक इनिशिएटिव्ह्ज अँड पार्टनरशिप्स अखिल पाळीअथ आणि अन्य वरिष्ठ प्रतिनिधी उपस्थित होते. या कराराअंतर्गत कुपोषणावर प्रभावी नियंत्रणासाठी विशेष भर देण्यात येणार आहे. प्रधानमंत्री मातृवंदना योजना सारख्या थेट लाभ हस्तांतरण योजनांचा लाभ अधिकाधिक पात्र महिलांपर्यंत पोहोचवून त्यांचा प्रभावी वापर सुनिश्चित केला जाणार आहे. सुरुवातीच्या टप्प्यात पालघर, जालना, नंदुरबार, गडचिरोली आणि अमरावती या जिल्ह्यांमध्ये यासंदर्भातील अंमलबजावणी करण्यात येणार असून, राज्यस्तरावरही तांत्रिक साहाय्य दिले जाणार आहे. तसेच, सीआयएफएफ कडून पोषण व सार्वजनिक आरोग्य तज्ज्ञांची नियुक्ती करून प्रभावी जनजागृती आणि संदेशवहनाला चालना दिली जाणार आहे. गर्भधारणेपासून बालकाच्या आयुष्यातील पहिल्या १००० दिवसांदरम्यान योग्य पोषण आणि आरोग्य सवयी रुजवण्यासाठी व्यापक मोहीम राबविण्यात येणार आहे. पुराव्यावर आधारित उपाययोजना, तांत्रिक साहाय्य आणि क्षेत्रीय कर्मचाऱ्यांच्या क्षमता विकासाच्या माध्यमातून सेवा अधिक सक्षम केली जाईल. कार्यक्रमांचे रिअल-टाइम निरीक्षण, डेटाआधारित निर्णय प्रक्रिया आणि सक्षम मॉनिटरिंग प्रणालीमुळे योजनांची गुणवत्ता आणि परिणामकारकता वाढविण्यात येणार आहे.

### सक्षम भविष्यास नवी दिशा



या भागीदारीमुळे सेवा वितरण यंत्रणा अधिक बळकट होऊन महिला व बाल विकास विभागाच्या योजनांची पोहोच आणि गुणवत्ता वाढेल. परिणामी, महाराष्ट्रातील माता व बालकांच्या आरोग्यपूर्ण आणि सक्षम भविष्यास नवी दिशा मिळणार असल्याची माहिती महिला व बालविकास विभागामार्फत देण्यात आली आहे.

# पान 1 वरून...

## राज्यात वरिष्ठ आयएएस...

यांची मुख्यमंत्र्यांच्या अतिरिक्त मुख्य सचिव पदावरून बदली करून मुंबई महानगरपालिकेच्या (बीएमसी) महानगरपालिका आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. आता बृहन्मुंबई महानगरपालिकेवर (बीएमसी) महिलांचे राज्य असेल. बीएमसीच्या इतिहासात पहिल्यांदाच एका महिलेची आयुक्तपदी नियुक्ती झाली आहे. अश्विनी भिडे या बीएमसीच्या पहिल्या महिला आयुक्त बनतील. यापूर्वी भाजपच्या रितू तावडे यांची महापौरपदी नियुक्ती झाली होती. हे पद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात मोठ्या संघर्षाचे कारण ठरले आहे. दरम्यान, अश्विनी भिडे या एकनाथ शिंदे यांच्या जवळच्या आयएएस अधिकारी मानल्या जातात. त्या भूषण गागराणी यांची जागा घेतील, ज्यांचा कार्यकाळ ३१ मार्च २०२६ रोजी संपत आहे. भिडे या पायाभूत सुविधा प्रकल्पांमधील त्यांच्या कार्यासाठी, विशेषतः मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या (एमएमआरसीएल) माजी व्यवस्थापकीय संचालक म्हणून त्यांच्या भूमिकेसाठी ओळखल्या जातात. संजय मुखर्जी आणि असीम गुप्ता यांच्यासारख्या अनेक वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांचा विचार केला गेला असला तरी, अश्विनी भिडे यांना पसंती देण्यात आली.

## शुद्धीकरणाच्या नावाखाली...

दर्जाची अपेक्षा असते, तसा दर्जा सध्याच्या प्रक्रियेत दिसत नाही, अशा शब्दांत त्यांनी आपली नाराजी व्यक्त केली. या प्रक्रियेमुळे राज्यातील हजारो वैध मतदारांची नावे यादीतून वगळली जाण्याची भीती त्यांनी व्यक्त केली. राज्यात २३ आणि २९ एप्रिल रोजी दोन टप्प्यांत मतदान होणार असून ४ मे रोजी निकाल जाहीर होणार आहेत. या पार्श्वभूमीवर, आयोगाने घटनात्मक तत्त्वांचे पालन करून मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका सुनिश्चित कराव्यात, असे आवाहन बॅनर्जी यांनी पत्राद्वारे केले आहे. निवडणुकांच्या तोंडावर ममता बॅनर्जी यांनी घेतलेल्या या भूमिकेमुळे बंगालमधील राजकीय वातावरण अधिकच तापण्याची शक्यता आहे.

## बिहारमधील मंदिरात चेंगराचेंगरी!...

पटना आयुक्तांना बिहार शरीफ येथे पाठवण्यात आले आहे. मुख्यमंत्र्यांनी मुख्य सचिवांना चौकशीचे निर्देश दिले आहेत. सरकारने मृतांच्या वारसांना ६ लाख रुपये नुकसान भरपाई देण्याची घोषणा केली आहे. तर केंद्र सरकारने २ लाख रुपयांच्या नुकसान भरपाईची घोषणा केली आहे.
या घटनेची माहिती मिळताच, उपविभागीय दंडाधिकारी (एसडीपीओ) आणि जिल्ह्याचे वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. चैत्र महिन्याच्या शेवटच्या मंगळवारमुळे पाटणा आणि आसपासच्या भागातूनही दर्शनासाठी आले होते. यामुळे गर्दी खूप वाढली. मंदिर परिसर लहान होता. गर्दी नियंत्रित करण्याची व्यवस्था नव्हती. लोकांमध्ये आधी दर्शन घेण्याची चढाओढ लागली. मंदिराचे गर्भगृहही लहान आहे. लोक लवकर दर्शन घेण्यासाठी एकमेकांच्या पुढे जाण्याचा प्रयत्न करत होते. कोणीही रांगेत उभे राहून पूजा करू इच्छित नव्हते. लोक रांगेत उभे राहण्याऐवजी पुढे जाण्याचा प्रयत्न करू लागले. यामुळे चेंगराचेंगरीची परिस्थिती निर्माण झाली. अनेक लोक गर्दीखाली दबले. दुसऱ्या भाविकाने सांगितले, 'सुरक्षेची कोणतीही व्यवस्था नव्हती. मंदिराच्या आत प्रचंड गर्दी होती. पोलिसांचा जवान आत तैनात नव्हता. गर्दीला वळवण्यासाठी किंवा दोन रांगांमध्ये विभागण्यासाठी कोणतीही व्यवस्था नव्हती. मंदिराचे पुजारीच लवकर-लवकर दर्शन घेऊन बाहेर पडायला सांगत होते. याच दरम्यान एका महिलेला चक्कर आली आणि ती तिथेच पडली. काही लोक तिला सावरू लागले आणि गर्दीला मागे हटवण्याचा प्रयत्न केला. याच वेळी चेंगराचेंगरी झाली. घटनास्थळी उपस्थित लोकांनी सांगितले की अपघातानंतर पोलीस आणि रुग्णवाहिका पोहोचायलाही उशीर झाला. मीडिया रिपोर्टनुसार,अपुरी सुरक्षा व्यवस्था आणि पोलिसांचा अपुरा फौजफाटा यामुळे भाविक जास्त घाबरले आणि पळू लागले. चेंगराचेंगरी झाल्यानंतर पोलीस आणि प्रशासकीय कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. या घटनेमध्ये ९ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. घटनेमध्ये जखमी झालेल्या भाविकांना उपचारासाठी मॉडेल रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. हा भीषण अपघात चैत्र महिन्याच्या कृष्ण पक्षातील अष्टमीला (शीतला अष्टमी), शेवटच्या मंगळवारी घडला. आजच्या दिवशी मंदिरात भाविकांची मोठी गर्दी जमली होती.

## नरहरी झिरवाळ व्हिडिओ...

झिरवाळ मांस आणि दारुचे सेवन करताना दिसत आहे. त्याहून धक्कादायक बाब म्हणजे झिरवाळ एका महिलेसोबत आक्षेपार्ह अवस्थेत दिसत आहेत. हा संपूर्ण प्रकार मंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानी झाला असल्याचे बोलण्यात आले. या व्हिडिओमध्ये झिरवाळ यांच्यासोबत असलेल्या व्यक्तीचे नाव पवन यादव असे असून तो तृतीयपंथी असल्याचा दावा केला जात आहे. या प्रकारानंतर राजकीय वर्तुळातून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. प्रसारित झालेली ही चित्रफीत सुमारे सात महिन्यांपूर्वीची असल्याचे बोलले जात आहे. शासकीय निवासस्थानातील या दृश्यांमध्ये तृतीयपंथी पवन यादव हा झिरवाळ यांच्यासोबत बिछान्यावर बसलेला दिसत आहे. तसेच त्यांच्या शेजारी खाद्यपदार्थ आणि मद्याच्या बाटल्याही दिसून येत आहेत. एका लोकप्रतिनिधीच्या शासकीय निवासात गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेली व्यक्ती अशा परिस्थितीत दिसल्याने नैतिकतेचा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## शिर्डीतील प्रकरण: अशोक खरातच्या...

आता त्याचे संपूर्ण कुटुंब अडचणीत आले आहे. शेतकऱ्याची जमीन बळकावण्याच्या प्रकरणात पोलिसांनी कठोर कारवाई सुरू केली असून, न्याय मिळवण्यासाठी तक्रारदार शेतकरी रावसाहेब गोंदकर यांना आशा वाटू लागली आहे. या प्रकरणाचा तपास पुढे कसा पुढे जातो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आरोपी अरविंद भावके यांचे वकील व्यंकटेश खिस्ते यांनी सांगितले की, आरोपी अरविंद भावके यांचा या व्यवहाराशी प्रत्यक्ष संबंध आढळला नाही. कोर्टासमोर विसंगती आणि त्रुटी सादर केल्या गेल्या. पोलिसांनी ७ दिवसांची पोलीस कोठडी मागितली होती, पण कोर्टाने फक्त गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन २ दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे.

## शिवसेनेच्या विभागीय संपर्कप्रमुखांची...

केले आहे. उत्तर कोकण विभागीय संपर्क प्रमुखपदी मंत्री भरत गोगावले यांची तर सह संपर्कप्रमुख पदी प्रदीप खाडे यांची नियुक्ती केली आहे. पश्चिम महाराष्ट्र विभागीय संपर्क प्रमुखपदाची जबाबदारी दगडू सपकाळ यांच्यावर तर सह संपर्कप्रमुख पदाची जबाबदारी हनुमंत जगदाळे यांच्यावर सोपवली आहे. दक्षिण कोकण विभागीय संपर्कप्रमुख पदी आमदार किरण सामंत यांची नियुक्ती केल्याचे निवेदनात म्हटले आहे. मराठवाडा विभागीय संपर्कप्रमुख पदी मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यावर जबाबदारी देण्यात आली आहे. या घोषणेनुसार, भरत गोगावले यांची उत्तर कोकण विभागीय संपर्कप्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तर दगडू सकपाळ यांच्याकडे पश्चिम महाराष्ट्र विभागीय संपर्कप्रमुख पदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

## अर्जुन खोतकर यांना हायकोर्टाचा...

घेतली होती. त्यांनी भारतीय निवडणूक आयोग आणि संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांना याचिकेत प्रतिवादी बनवले होते आणि खोतकर यांच्या निवडीवर आक्षेप नोंदवला होता. बाजार समितीचे सभापती म्हणून पदभार सांभाळताना खोतकर हे लाभाचे पद धारण करत होते. त्यामुळे निवडणूक लढवण्यास ते अपात्र ठरतात, असा युक्तिवाद त्यांनी केला होता. तसेच, खोतकर यांनी आपल्या उमेदवारी अर्जासोबत सादर केलेले प्रतिज्ञापत्र विहित नमुन्यात नव्हते, असा दावाही त्यांनी केला होता. खोतकर यांच्या वतीने ॲड. एस. बी. देशपांडे यांनी न्यायालयात युक्तिवाद केला. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, कथित माहिती लपवण्याचा प्रकार हे काही महत्त्वाचे तथ्य नव्हते. त्यामुळे अपात्रतेची कारवाई लागू होत नाही. याचिकेत उपस्थित केलेले आक्षेप हे किरकोळ आणि केवळ तांत्रिक स्वरूपाचे होते. तसेच, अशा प्रकारे माहिती लपवल्यामुळे मतदारांची दिशाभूल झाली असावी, हे सिद्ध करणारा कोणताही पुरावा उपलब्ध नव्हता. समजा काही माहिती लपवली गेली असली, तरीही त्याचा निवडणुकीच्या निकालावर कोणताही महत्त्वपूर्ण परिणाम झाला नाही, असा निष्कर्ष न्यायालयाने काढला.

# शिवसेनेकडून लोकसभा संपर्कप्रमुखांची घोषणा

### बुलडाणा संजय सोनार; अकोला राजन साळवी; अमरावती किशोर अप्पा पाटील; यवतमाळ वाशिम प्रिती बंड

**मुंबई , दि. ३१ वृत्तसंस्था**

लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने शिवसेनेने आतापासूनच कंबर कसली आहे. शिवसेना मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने पक्षाने राज्यातील ४८ लोकसभा मतदार संघांसाठी संपर्कप्रमुखांची घोषणा केली आहे. यात मुंबईत सहा लोकसभा मतदार संघ आणि ठाणे लोकसभेची जबाबदारी शिवसेनेचे संसदीय पक्षाचे नेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्यावर सोपवण्यात आली आहे. भिवंडी व कल्याण लोकसभेच्या संपर्कप्रमुखपदी खासदार नरेश म्हस्केंची निवड करण्यात आली आहे.

शिवसेनेकडून राज्यातील सर्व लोकसभा मतदार संघांसाठी संपर्कप्रमुखांची घोषणा केली आहे. यात मुंबई उत्तर, मुंबई उत्तर पश्चिम, मुंबई उत्तर मध्य, मुंबई दक्षिण मध्य, ईशान्य मुंबई व दक्षिण मुंबई या मुंबईतील सर्व सहा लोकसभा मतदार संघांच्या संपर्कप्रमुख पदाची खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांना जबाबदारी सोपवण्यात आली आहे. खासदार डॉ. शिंदेंसोबत मंत्री योगेश कदम, आमदार निलेश राणे, माजी





खासदार राहुल शेवाळे यांच्यावर मुंबईच्या लोकसभा मतदार संघांची जबाबदारी असेल. तसेच ठाणे लोकसभेचे संपर्कप्रमुखपद देखील खासदार डॉ. शिंदेंकडे सोपवण्यात आले आहे, असे पक्षाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

१) मुंबई उत्तर, मुंबई उत्तर पश्चिम, मुंबई उत्तर मध्य, मुंबई दक्षिण मध्य, ईशान्य मुंबई व दक्षिण मुंबई खासदार डॉ. श्रीकांत शिंदे
२) ठाणे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे
३) भिवंडी व कल्याण खासदार नरेश म्हस्के
४) नंदुरबार माजी आमदार शिरीष चौधरी
५) धुळे व दिंडोरी शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी
६) जळगाव आमदार दिलीप लांडे
७) रावेर आमदार तुकाराम काते
८) बुलडाणा संजय सोनार
९) अकोला माजी आमदार राजन साळवी
१०) अमरावती आमदार किशोर अप्पा पाटील
११) वर्धा आमदार डॉ. मनीषा कायंदे
१२) रामटेक अनिल कोकीळ
१३) नागपूर माजी खासदार संजय निरुपम
१४) भंडारा-गोंदिया विलास चावरी
१५) गडचिरोली- चिमूर माजी मंत्री जगदीश गुप्ता
१६) चंद्रपूर आमदार कृपाल तुमाने
१७) यवतमाळ वाशिम शिवसेना उपनेत्या प्रिती बंड
१८) हिंगोली शिवसेना उपनेते आनंदराव जाधव
१९) नांदेड दत्ता दळवी
२०) परभणी भास्कर आंबेकर
२१) जालना खासदार संदिपान भुमरे
२२) छत्रपती संभाजी नगर विलास पारकर
२३) नाशिक आमदार सुहास कांदे
२४) पालघर पांडुरंग पाटील
२५) रायगड अनिल नवघरे
२६) कोल्हापूर, मावळ व पुणे लोकसभा मंत्री उदय सामंत
२७) बारामती किरण लांडगे
२८) शिरुर आमदार शरद सोनवणे
२९) अहिल्यानगर शिवसेना सचिव राम रेपाळे, ३०) शिर्डी खासदार डॉ. ज्योती वाघमारे,
३१) बीड मनोज शिंदे
३२) धाराशिव माजी खासदार उन्मेष पाटील
३३) लातूर मंगेश कुडाळकर
३४) सोलापूर खासदार धैर्यशील माने
३५) माढा चंद्रहार पाटील
३६) सांगली योगेश जानकर
३७) सातारा शरद कणसे
३८) रत्नागिरी राजेश मोरे, नगरसेवक
३९) सिंधूदुर्ग बाळा चिंदरकर
४०) हातकणंगले आमदार सुहास बाबर

## अशोक खरात प्रकरणामुळे २ मंत्र्यांची खुर्ची धोक्यात

**मुंबई :** राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठी खळबळ उडाली असून, मंत्रिमंडळात फेरबदल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पक्षातील दोन बड्या मंत्र्यांवर नाराज असल्याची माहिती सूत्रांकडून समोर येत आहे. नाशिकमधील अशोक खरात प्रकरणामुळे सत्ताधारी पक्षाला मोठा फटका बसल्याचे मानले जात आहे. या प्रकरणात अनेक राजकीय नेत्यांची नावे समोर आल्याने विरोधक आक्रमक झाले आहेत. विशेषतः आमदार दीपक केसरकर यांच्यावरही आरोप होत असल्याने राजकीय दबाव वाढला आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, नुकत्याच झालेल्या २०२६ च्या जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये अपेक्षित यश न मिळाल्यामुळेही नाराजी वाढली आहे. काही जिल्ह्यांत पक्षाची घसरलेली ताकद लक्षात घेता शिंदे हे मंत्रिमंडळात बदल करण्याच्या तयारीत असल्याची चर्चा आहे.
दरम्यान, खरात प्रकरणामुळे आधीच रुपाली चाकणकर यांना महिला आयोगाच्या अध्यक्षपदासह पक्षातील पदाचा राजीनामा द्यावा लागला आहे.

# दादर-भुसावळ एक्स्प्रेस आता कायमस्वरूपी धावणार

**मुंबई , दि. ३१ वृत्तसंस्था**

जळगावसह खान्देशातील रेल्वे प्रवाशांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. गेल्या काही दिवसांपासून विशेष गाडी म्हणून धावणारी दादरभुसावळ एक्सप्रेस आता कायमस्वरूपी करण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला आहे. ही गाडी आता नव्या १९०४७/४८ या क्रमांकाने नियमितपणे धावणार आहे. खासदार स्मिता वाघ यांनी याबाबत माहिती दिली.
मात्र, आता नियमित गाडीचा दर्जा मिळाल्यामुळे तिकिट दरात तब्बल २० ते २५ टक्क्यांपर्यंत कपात होण्याची शक्यता व्यक्त होत असून सामान्य प्रवाशांचा आर्थिक भार कमी होऊ शकतो. प्राप्त माहितीनुसार, या गाडीला प्रवाशांचा सातत्याने चांगला प्रतिसाद मिळत असल्यामुळेच तिला कायमस्वरूपी चालविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रवासी संख्या, मागणी आणि सोयी सुविधांचा विचार करून हा निर्णय घेतल्याचे सांगण्यात येत आहे. जळगावच्या खासदार स्मिता



वाघ यांनीही या निर्णयाचे स्वागत करत खान्देशातील नागरिकांच्या दीर्घकाळापासून असलेल्या मागणीला न्याय मिळाल्याने समाधान व्यक्त केले आहे. या सुविधेमुळे प्रवास अधिक सुलभ, किफायतशीर आणि सुरक्षित होईल. पश्चिम रेल्वे प्रशासनाकडून तूर्त दादरभुसावळ (०९०४९) आणि भुसावळ-दादर (०९०५०) दरम्यान आठवड्यातून एक दिवस दर शुक्रवारी धावणाऱ्या साप्ताहिक विशेष गाडीचा कालावधी तीन एप्रिलपासून ३१ जुलै २०२६ पर्यंत वाढविण्यात आला आहे. याशिवाय, दादर-भुसावळ (०९०५१) आणि भुसावळदादर (०९०५२) दरम्यान आठवड्यातून तीन दिवस सोमवार, बुधवार आणि शनिवारी धावणाऱ्या त्रिसाप्ताहिक विशेष रेल्वे गाड्यांचा कालावधी २९ जुलै २०२६ पर्यंत वाढविण्यात आला आहे.

# महाराष्ट्र मत्स्य निर्यातीत देशात नंबर २

### कोकणच्या कोळंबीचा रुबाब सातासमुद्रापार!

**मुंबई, दि. ३१ वृत्तसंस्था**

भारताच्या नीलक्रांतीमध्ये महाराष्ट्राने पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले असून, मत्स्य उत्पादनांच्या निर्यातीत राज्याने मोठी ऐतिहासिक कामगिरी बजावली आहे. गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्राच्या समुद्री उत्पादनांच्या निर्यातीत दुपटीने वाढ झाली असून, २०२४-२५ या आर्थिक वर्षात राज्याने ७ हजार ३४३ कोटी ४० लाख रुपयांची विक्रमी निर्यात नोंदवली आहे. भारताच्या मत्स्य व्यवसायात महाराष्ट्राने मोठी झेप घेतली असून, गेल्या पाच वर्षांत राज्याच्या मत्स्य निर्यातीत कमालीची सुधारणा झाली आहे. २०२०-२१ मध्ये ३ हजार ६८४ कोटी रुपये असणारी ही निर्यात आता थेट दुप्पट होऊन २०२४-२५ या वर्षात ७ हजार ३४३ कोटी ४० लाख रुपयांवर पोहोचली आहे. केवळ आर्थिक उलाढालच नव्हे, तर निर्यातीच्या परिमाणातही मोठी वाढ झाली असून राज्याची वार्षिक निर्यात आता २.२७ लाख मेट्रिक टन इतकी




झाली आहे. विशेषतः कोकण किनारपट्टीवरील मत्स्यव्यवसायाने जागतिक बाजारपेठेतील मागणी पूर्ण करण्यात सिंहाचा वाटा उचलला आहे. केंद्र सरकारच्या ताज्या आकडेवारीनुसार, या प्रभावी कामगिरीमुळे महाराष्ट्र आता मत्स्य निर्यातीत देशात दुसऱ्या क्रमांकाचे अग्रगण्य राज्य बनले असून, राज्याच्या अर्थव्यवस्थेला यातून मोठी चालना मिळाली आहे.
महाराष्ट्राच्या सागरी किनाऱ्यावरील चविष्ट मासळीने आता जागतिक बाजारपेठ काबीज केली असून, प्रामुख्याने कोकणच्या कोळंबीला परदेशी खवय्यांची मोठी पसंती मिळत आहे. राज्यातून होणाऱ्या एकूण मत्स्य निर्यातीत कोळंबी आणि गोठवलेल्या मासळीचा वाटा सर्वाधिक असून, अमेरिका आणि चीन यांसारख्या बलाढ्य देशांमध्ये महाराष्ट्रातील उत्पादनांची मोठी मक्तेदारी निर्माण झाली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील किमतींचे चढ-उतार आणि वाढता उत्पादन खर्च यांसारखी आव्हाने समोर असतानाही, महाराष्ट्राने गुजरात आणि आंध्र प्रदेश या राज्यांच्या स्पर्धेत आपले स्थान भक्कम राखले आहे. भारताच्या एकूण निर्यातीचा विचार करता, अमेरिका (२२,७२३ कोटी रुपये) आणि युरोपियन युनियन (९,४२९ कोटी रुपये) या मुख्य बाजारपेठा ठरल्या आहेत. यामध्ये कोकण किनारपट्टीवर मोठ्या प्रमाणात उत्पादित होणाऱ्या कोळंबीला सर्वाधिक मागणी असून, या विदेशी पाहुण्यांच्या पसंतीमुळे राज्याच्या मत्स्य व्यवसायाला सुवर्णकाळ आला आहे.
**भारतीय मासळीचा जगभर डंका :** भारतीय सागरी उत्पादनांनी जागतिक बाजारपेठेत आपली मोहोर उमटवली असून अनेक देशांमध्ये भारतीय मासळीला विक्रमी मागणी मिळत आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या आकडेवारीनुसार, भारतीय मत्स्य उत्पादनांसाठी अमेरिका ही सर्वात मोठी आणि फायदेशीर बाजारपेठ ठरली असून, एकट्या अमेरिकेला २२ हजार ७२३ कोटी रुपयांची निर्यात झाली आहे. दुसरीकडे, परिमाणाच्या बाबतीत चीनने आघाडी घेतली असून ३.९६ लाख मेट्रिक टन मासळीची आयात केली आहे, ज्याचे मूल्य १० हजार ६६८ कोटी रुपये इतके आहे. केवळ अमेरिका किंवा चीनच नव्हे, तर युरोपियन युनियन (९,४२९.६ कोटी), दक्षिण-पूर्व आशिया (८,१७२.२ कोटी) आणि जपान (३,४५२.९ कोटी) यांसारख्या प्रमुख जागतिक बाजारपेठांमध्येही भारतीय मासळीने आपली चव पोहोचवली आहे. या वाढत्या मागणीमुळे भारतीय मत्स्यव्यवसाय क्षेत्राला आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठी उभारी मिळाली आहे.

# खरात प्रकरणामुळे संतापाची लाट

**मुंबई , दि. ३१ वृत्तसंस्था**

भोंदू अशोक खरात प्रकरणामुळे राज्यात संतापाची लाट आहे. खरातला कठोरातली कठोर शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी जोर धरु लागली आहे. अशातच काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी महिला व बालकल्याण विकास मंत्री आदिती तटकरे यांच्यावर बोचरा निशाणा साधत चार सवाल उपस्थित केले आहेत.
गेल्या काही दिवसांपासून राज्यात ज्या प्रकरणामुळे खळबळ उडवून दिली ते नाशिकचे भोंदू बाबा कॅप्टन अशोक खरात प्रकरण. या प्रकरणाची व्याप्ती खूप मोठी आहे. अनेक राजकीय नेते या प्रकरणामुळे रडारवर असल्याची चर्चा आहे.
अशोक खरातवर महिलांचे लैंगिक शोषणाचे गंभीर आरोप आहेत. या प्रकरणात आता आर्थिक फसणूक, गैरव्यवहार, खंडणी यांसारख्या




गुन्ह्यांचा देखीस समावेश झाला आहे. एसआयटीकडून प्रकरणाची सखोल चौकशी केली जात आहे.
राजकीय वर्तुळात देखील या प्रकरणामुळे खळबळ उडवून दिली आहे. या पार्श्वभूमीवर नराधम अशोक खरात याने केलेल्या घृणास्पद कृत्याप्रकरणी त्याला कठोरातील कठोर शिक्षेची मागणी सर्वच स्तरातून केली जात आहे.
खरातसोबत राजकीय नेत्यांची देखील चौकशी करण्याची मागणी विरोधकांनी केली आहे. अशातच आता काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सोशल मीडियावर विचार करायला लावणारी पोस्ट शेअर केली आहे.
पोस्टमधून त्यांनी राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्यावर निशाणा साधत चार सवाल उपस्थित केले आहेत.
आपल्या महिला व बालविकास मंत्री बेपत्ता आहेत. या सर्व घटनांवर काही एक प्रतिक्रिया आपण त्यांची ऐकलीय का ? किंवा या प्रकरणानंतर याबाबत त्यांच्या खात्याअंतर्गत यावर एखादी बैठक घेतली काय ? याबाबत राज्यातील पोलिस महासंचालकांना त्या भेटल्यात का ? राज्यातील पिडीत महिलांना न्याय मिळेल, असा विश्वास देणारं ट्विट किंवा पोस्ट तरी त्यांनी केलीय का ? असे सवाल उपस्थित केले आहेत. त्यांनी केलेल्या या प्रश्नांना आदिती तटकरे उत्तर देणार का? हे पाहावे लागणार आहे.
या आहेत आपल्या राज्याच्या महिला व बालविकास मंत्री ना. आदिती तटकरे. राज्य सरकारमधील महिलांचा आवाज किंवा महिलांची जबाबदारी असलेल्या खात्याच्या त्या मंत्री आहेत. मागील काही दिवसांमध्ये खरात प्रकरण असो, यात यांच्या खात्याअंतर्गत येणाऱ्या महिला आयोगाच्या अध्यक्षांवर झालेले आरोप असो, हृषीकेश वैद्य, काल समोर आलेलं नवी मुंबईतील आदर्श म्हात्रे प्रकरण असो. रोज राज्यातील महिला भगिणींसोबत अत्याचार झाल्याच्या बातम्या, प्रकरणं समोर येत आहेत.

## सिलेक्टिव्ह व्हिडिओ लिक करण्यामागे गृहविभागाचा कुटील डाव : आरोप

**मुंबई : दि.३१ वृत्तसंस्था**

भोंदू अशोक खरात प्रकरणाने राज्यातील महायुती सरकार पोखरले आहे. महिलांच्या लैंगिक शोषणाचे ५८ व्हिडिओ असल्याचे सांगितले जात असेल तरी त्यांची संख्या मोठी आहे. पण गृहविभागाकडून काही सिलेक्टिव्ह व्हिडिओच लिक केले जात आहेत, त्यामागे मोठे षडयंत्र आहे. खरातच्या सीएकडे मोठ्या प्रमाणात घबाड सापडल्याच्या बातम्या येत आहेत, हा पैसा नेमका कोणाचा? असा प्रश्न काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी विचारला आहे.
काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या अध्यक्षतेखाली टिळक भवन येथे वरिष्ठ नेते, जिल्हाध्यक्ष व संघटन सृजन अभियानाचे समन्वयक यांची बैठक पार पडली. बैठकीनंतर प्रसार माध्यमांशी संवाद साधताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पुढे म्हणाले की, देशभरात



संघटन सृजन अभियान सुरु झाले असून महाराष्ट्रात २७ मार्चपासून हे अभियान सुरु झालेले आहे. १ मे पर्यंत या संदर्भातील (पान २ वर) शिफारशींचा अहवाल पूर्ण होईल व त्यानंतर जिल्हाध्यक्षांच्या नियुक्त्या केल्या जातील. राज्यात ७२ जिल्हाध्यक्ष व ७५० तालुका अध्यक्ष असतील. संघटना गावस्तरापर्यंत पोहचवण्यासाठी ग्रामशाखा सुरु केल्या जाणार आहेत. याबरोबरच युवक काँग्रेस, महिला काँग्रेस. एससी, एसटी, ओबीसी विभागाचे जिल्हाध्यक्ष व तालुकाध्यक्षांचीही नियुक्त्या केल्या जाणार आहेत.

**नवजीवन** | पती शिवदीप लांडेंकडून कौतुकाची थाप

# बापासाठी लेक झाली ढाल! शिवतारेंना मुलीकडून किडनीदान

**मुंबई , दि. ३१ वृत्तसंस्था**

पुरंदरचे आमदार आणि शिवसेनेचे ज्येष्ठ नेते विजय शिवतारे यांना त्यांची कन्या डॉ. ममता शिवतारे यांनी स्वतःची किडनी दान करून नवजीवन दिले आहे.
मुंबईतील एका नामांकित रुग्णालयात ही शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. शस्त्रक्रियेनंतर विजय शिवतारे आणि डॉ. ममता शिवतारे या दोघांचीही प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. गेल्या काही काळापासून विजय शिवतारे गंभीर किडनी आजाराने त्रस्त होते. त्यांच्या दोन्ही मूत्रपिंडांचे कार्य निकामी झाल्याने त्यांना नियमित डायलिसिस घ्यावा लागत होता. प्रकृती खालावत असताना मुलगी ममता यांनी पुढाकार घेत वडिलांना नवजीवन देण्यासाठी स्वतःची किडनी दान करण्याचा




निर्णय घेतला. वडिलांसाठी मुलीने केलेल्या या त्यागाची सर्वत्र चर्चा होत आहे. ममता यांचे पती माजी आयपीएस अधिकारी शिवदीप लांडे हे आहेत.
पत्नीने घेतलेल्या या निर्णयानंतर शिवदीप लांडे यांनी एक पोस्ट शेअर केली आहे. ज्यात त्यांनी ममता यांच्या बद्दल अभिमान व्यक्त करत त्यांचे कौतुक केले आहे.
गौरी, आयुष्यात अनेक अडचणी आल्या, संकटांनी वेढलं, प्रतिकूल परिस्थितीही अनेकदा समोर उभी राहिली; पण मी कधीच डगमगलो नाही. मात्र तुझ्या एका निर्णयाने फक्त एका निर्णयाने मला आतून हादरवून टाकलं. आपल्या वडिलांना नवजीवन देण्यासाठी तू स्वतःची किडनी दान करण्याचा घेतलेला निर्णय तुझं वडिलांप्रती असलेलं निःस्वार्थ प्रेम, त्याग आणि जिद्द पाहून मी नतमस्तक झालो आहे. खरोखर नतमस्तक. गेल्या तीन महिन्यांत शस्त्रक्रियेसाठी लागणाऱ्या असंख्य वैद्यकीय तपासण्या, कागदपत्रांची मोठी प्रक्रिया, कायदेशीर अडथळे हे सगळं तू एकटीने सांभाळलंस.
आणि मी? फक्त एक मूक साक्षीदार म्हणून तुला पाहत राहिलो. तेव्हा एक प्रश्न मनात आला देव माणसाच्या आयुष्यात मुलगी का देतो? आज त्याचं उत्तर मिळालं. आईचं अस्तित्व आयुष्यात एका टप्प्यापर्यंत असतं, पण तिची उणीव देव मुलीच्या रूपात आयुष्यभर भरून काढतो.
आज मुंबईतील आयसीयूमध्ये, किडनी प्रत्यारोपणानंतर तुझ्या शेजारी बसून तुझ्या निरागस चेहऱ्याकडे पाहताना डोळ्यातून अश्रू थांबतच नाहीत. का थांबत नाहीत हे अश्रू? आज समजलं नात्यांमध्ये भाऊ साथ सोडू शकतो, मुलगा दूर जाऊ शकतो, बहीण वळू शकते, अगदी पत्नीही आयुष्य-मृत्यूच्या या संघर्षात मागे हटू शकते. पण मुलगी? ती निःस्वार्थपणे ठाम उभी राहते स्वतःचं आयुष्य धोक्यात घालूनही. तुझे डोळे मिटलेले आहेत, गौरी पण तुझं प्रेम, तुझा त्याग प्रत्येक वडिलांना शिकवून जातो की मुलगी ही देवाचा सर्वात मोठा आशीर्वाद आहे.
विजय शिवतारे 'बापू' या नावाने प्रसिद्ध विजय शिवतारे हे 'बापू' या नावाने प्रसिद्ध असून ते पुरंदर विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व करतात. २००९ आणि २०१४ मध्ये त्यांनी सलग दोनदा विजय मिळवला होता. त्यांनी राज्य मंत्रिमंडळात जलसंपदा राज्यमंत्री म्हणूनही यशस्वी जबाबदारी सांभाळली आहे. २०१९ च्या निवडणुकीत पराभवाचा धक्का बसल्यानंतरही २०२४ मध्ये त्यांनी पुन्हा जोरदार मुसंडी मारत विजय मिळवला.

## महत्त्वाचे

### पोटगी प्रकरणात मोठा निर्णय!

**नवीदिल्ली:** पोटगी (गुजारा भत्ता) मिळवण्यासाठी पत्नी अनेकदा न्यायालयात पतीच्या मासिक उत्पन्नाचा आकडा वाढवून सांगतात. असे झाले तरी त्यांच्याविरोधात बेट कारवाई करता येत नाही, असे अलाहाबाद उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. न्यायमूर्ती राज बीर सिंह यांनी एका व्यक्तीची याचिका फेटाळलना ही टिप्पणी केली. याचिकाकर्त्या पतीने दावा केला होता की, त्याची पत्नी पोटगी जास्त मिळावी म्हणून त्याचे मास्तिक उत्पन्न वाढवून दाखवत आहे. त्याने सांगितले की, त्याचे खरे उत्पन्न ११ हजार रुपये प्रति महिना आहे, तर पत्नीने ते ८० हजार रुपये दाखवले. न्यायालयाने नमूद केले की, हा वाद अद्याप कुटुंब न्यायालयात प्रलक्षित आहे आणि तेथेच सर्व दावे व पुरावे तपासले जातील, खंडपीठाने म्हटले की, फौजदारी प्रक्रिया संहिता काठ्म १२५ अंतर्गत चालणाऱ्या अशा प्रकरणांत पत्नी पतीचे उत्पन्न वाढवून सांगतात, ही एक सर्वसाधारण धारणा आहे. मात्र अशा दाव्यांवरून त्यांच्या विरोधात कलम ३४० किंवा भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम ३७९ अंतर्गत कारवाई करता येत नाही.

### ट्रम्प यांची धमकी अन् २४ तासांत ॲक्शन सुरु

**वॉशिंग्टन/तेहरान :** मध्यपूर्वेत युद्धाचा भडका उडाला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी स्ट्रेट ऑफ होर्मुझवरुन दिलेल्या इशाऱ्यानंतर २४ तासांत इराणविरोधात मोठी कारवाई करण्यात आली आहे. इराणच्या इस्फाहन शहरावर भयंकर हल्ला झाला असून याचा एक व्हिडिओ देखील ट्रम्प यांनी सोशल मीडियावर शेअर केला आहे. यामुळे संपूर्ण जगभरात खळबळ माजली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी (३१ मार्च) पहाटे इराण च्या इस्फाहन शहरातील दारुगोळ्याच्या कारखान्याला लक्ष्य करण्यात आले आहे. या हल्ल्यात इराणचे मोठे नुकसान झाल्याचा दावा केला जात आहे. या हल्ल्यासाठी अमेरिकेने २,००० पाऊं वजनाच्या शक्तिशाली बंकर बस्टरचा, पेनेट्रेटर बॉम्बचा वापर केला असल्याचे म्हटले जात आहे. हे बॉम्ब थेट जमिनीखाली असलेल्या गुप्त ठिकाणांना उद्ध्वस्त करु शकतात. या हल्ल्यानंतर संपूर्ण परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. पहिल्या हल्ल्यानंतर आफ्टरशॉकही जाणवले आहे. हल्ल्यामुळे रात्रीच्या वेळी आकाशाती आगीचे गोळे उडताना दिसला होते, ज्यामुळे संपूर्ण इस्फाहनमध्ये नारंगी प्रकारश पसरला होता. हा हल्ला ट्रम्प यांनी होर्मुझ मार्ग खुला करण्यावरुन दिलेल्या इशाऱ्यानंतर अवघ्या २४ तासांत झाला आहे. ट्रम्प यांनी इराणला शेवटचा इशारा दिला होता की, स्ट्रेट ऑफ होर्मुझचा मार्ग उघड केला नाही, त्यांच्या उर्जा केंद्रांना नष्ट केले जाईल. तसेच युद्धाच्या अंतासाठी कोणतीही चर्चा न केल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतील असे ट्रम्प यांनी म्हटले होते.

# ‘होर्मुझ’ न उघडल्यास तेल विहिरी आणि पॉवर प्लांट उडवून देण्याची धमकी

## डोनाल्ड ट्रम्प यांची इराणला ताकीद

**नवीदिल्ली : दि.३१ वृत्तसंस्था**



अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाला एक महिना पूर्ण झाला असूनही संघर्षाची तीव्रता कमी होण्याचे चिन्हे दिसत नाहीत. या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला अत्यंत कठोर शब्दांत ताकीद दिली आहे. ‘‘होर्मुजची सामुद्रधुनी व्यापारासाठी त्वरित उघडा, अन्यथा इराणमधील तेल विहिरी, पॉवर प्लांट आणि ‘खार्ग बेट’ पूर्णपणे उद्ध्वस्त करू,’’ अशी थेट धमकी ट्रम्प यांनी दिली आहे.

**‘डील’ न झाल्यास तबाहीचा इशारा**

राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी त्यांच्या ‘ट्रुथ सोशल’ या प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट शेअर करत इराणच्या नव्या प्रशासनाला इशारा दिला आहे. ट्रम्प यांनी म्हटले की, ‘‘लष्करी कारवाई थांबवण्यासाठी इराणच्या नव्या राजवटीशी बोलणी सुरू आहेत आणि त्यात बरीच प्रगती झाली आहे. मात्र, जर काही कारणास्तव लवकरच कोणताही करार झाला नाही किंवा होर्मुजची सामुद्रधुनी व्यापारासाठी खुली करण्यात आली नाही, तर आम्ही इराणमधील सर्व ऊर्जा पायाभूत सुविधा, तेल विहिरी आणि महत्त्वाचे असलेले खार्ग बेट जमीनदोस्त करू. हाच आमचा बदला असेल.’’

**१० हजार अमेरिकन सैनिक मध्यपूर्वेकडे रवाना?**

एकीकडे मुत्सद्दी स्तरावर बोलणी सुरू असल्याचा दावा केला जात असतानाच, दुसरीकडे अमेरिकेने आपली लष्करी ताकद वाढवण्यास सुरुवात केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अमेरिका मध्यपूर्वेतील तणावग्रस्त भागात १०,००० अतिरिक्त सैनिक पाठवण्याच्या विचारात आहे. यामध्ये ५,००० ‘यूएस मरीन’ आणि ८२ व्या एअरबॉर्न डिव्हिजनच्या हजारो पॅराट्रूपर्सचा समावेश आहे. तसेच, ‘यूएसएस त्रिपोली’ या युद्धनौकेवरून ३,५०० सैनिकांची तुकडी आधीच मध्यपूर्वेतील तळावर पोहोचली असून, अमेरिका आता इराणमध्ये ‘ग्राउंड ऑपरेशन’ करण्याची तयारी करत असल्याचे संकेत मिळत आहेत.

**संघर्षाची पार्श्वभूमी आणि सध्याची स्थिती**

२८ फेब्रुवारी रोजी अमेरिका आणि इस्रायलने इराणवर संयुक्त हवाई हल्ले सुरू केले होते. या हल्ल्यांमध्ये इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई यांचा मृत्यू झाल्याचे वृत्त समोर आले होते. तेव्हापासून इराणमधील अनेक वरिष्ठ नेते आणि अधिकारी मारले गेले आहेत. प्रत्युत्तर म्हणून इराणकडून इस्रायलवर क्षेपणास्त्र हल्ले सुरू आहेत, तसेच मध्यपूर्वेतील अमेरिकन लष्करी तळांनाही लक्ष्य केले जात आहे.

**होर्मुजची सामुद्रधुनी का आहे महत्त्वाची?**

होर्मुजची सामुद्रधुनी हा जगातील सर्वात महत्त्वाचा तेल वाहतूक मार्ग आहे. जागतिक तेल पुरवठ्याचा मोठा हिस्सा याच मार्गावरून जातो. इराणने हा मार्ग रोखून धरल्यास जागतिक बाजारपेठेत तेलाचे दर गगनाला भिडण्याची आणि ऊर्जा संकट निर्माण होण्याची भीती आहे. म्हणूनच ट्रम्प यांनी हा मार्ग उघडण्यासाठी लष्करी बळाचा वापर करण्याची धमकी दिली आहे.

# खळबळजनक! पॅलेस्टिनींवर मृत्यूची टांगती तलवार?

## इस्रायलने जारी केल्या मृत्यूदंडाचा नवा कायदा

**जेरसलेम: दि.३१ वृत्तसंस्था**

मध्यपूर्वेतील अमेरिका-इस्रायल विरुद्ध इराण तणाव थांबण्याचे काही नाव घेईना. हे युद्ध अधिकच भयंकर होत आहे. असे असतानाचा इस्रायलने एक मोठा कायदा आमंलात आणला आहे. ज्याला पॅलेस्टिंनीचे डेथ वॉरंट समजले जात आहे. या नव्या कायद्यामुळे जगभरात खळबळ माजली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, इस्रायलच्या संसदेने मृत्यूदंडाचा नवा कायदा आमंलात आणला आहे. या कायद्यांतर्गत दहशतवादी घटनांमध्ये दोषी आढळणाऱ्यांना फाशीची शिक्षा देण्यात येणार आहे. हा वादग्रस्त कायदा मंजूर झाल्याने जगभरात खळबळ उडाली आहे. मीडिया रिपोर्टनुसार, संबंधित गुन्हेगारावर लष्करी न्यायालयात खटला चावला जाईल. यानंतर त्याची शिक्षा मंजूर करण्यात आल्यावर संबंधित आरोपीला ९० दिवसांत फाशीची शिक्षा देण्यात येईल असे नमूद करण्यात आले आहे. आपत्कालीन परिस्थिती फाशी पुढे ढकलली जाऊ शकते. या वादग्रस्त कायद्याला इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू ( ) यांच्यासह ६२ खासदारांना मतदान दिले आहे. याचा उद्देश वेस्ट बँक ऑणि इस्रायलमधील हल्ल्यांना आळा घालणे आणि दहशतवाद्यांविरोधात कठोर कारवाई असा हेतू आहे. विशेष करुन इस्रायली नागरिकांची हत्या करणाऱ्या दहशतवाद्यांसाठी हे विधेयक मंजूर करण्यात आले आहे.

दरम्यान इस्रायलने मृत्यूदंडाचा आदेशाला मंजूरी दिल्यानंतर जागतिक स्तरावर तीव्र पडसाद उमटू लागले आहे. अनेकांनी इस्रायलच्या या कायद्याचा तीव्र निषेध केला आहे. युरोपीय देश आणि मानवाधिकार संघटनांनी याला मानवाधिकारांचे उल्लंघन म्हटले आहे. तर दुसरीकडे अमेरिकेने या कायद्याला पाठिंबा देत इस्रायलच्या स्वसंरक्षण अधिकाराचे समर्थन केले आहे. नेतन्याहूंचा हा निर्णय मध्यपूर्वेतील संघर्षाच्या आगीत तेल ओतण्यासारखा मानला जात आहे.

# माजी टेनिसपटू लिएंडर पेसचा भाजपात प्रवेश

## पश्चिम बंगाल निवडणुकांपूर्वी तृणमूलला मोठा धक्का!

**नवीदिल्ली : दि.३१ वृत्तसंस्था**

पश्चिम बंगाल निवडणुकीत लिएंडर पेसने मोठा प्रभाव पाडला आहे. तृणमूल काँग्रेसला रामराम ठोकून भाजपमध्ये प्रवेश केला आहे. ऑक्टोबर २०२१ मध्ये ममता बॅनर्जी यांच्या उपस्थितीत गोव्यात तृणमूल काँग्रेसमध्ये सामील झालेल्या लिएंडर पेसने अलीकडेच कोलकाता येथे भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांची भेट घेतली. तेव्हापासून त्याच्या भाजपमध्ये सामील होण्याबद्दल जोरदार चर्चा सुरू आहे. असे मानले जाते की भाजप लिएंडर पेस यांना पश्चिम बंगाल निवडणुकीत मोठी जबाबदारी देऊ शकते.

भाजपने बंगालमध्ये पक्षात प्रसिद्ध व्यक्तींना सामील करून घेण्याची रणनीती आखली आहे. समाजात सर्वत्र स्वीकृती मिळवण्यासाठी, पक्ष लेखक, शिक्षणतज्ज्ञ, कलाकार आणि



खेळाडूंना पक्षात सामील करून घेत आहे. लिएंडर पेसचा भाजपमधील प्रवेश याच उपक्रमाचा एक भाग आहे. लिएंडर पेसच्या प्रवेशामुळे क्रीडा वर्तुळात आणि तरुण मतदारांमध्ये पक्षाची लोकप्रियता वाढेल, अशी भाजपला आशा आहे. पेसचे कुटुंब मूळचे कोलकाताचे आहे. टेनिसमधील दिग्गज लिएंडर पेस, ज्यांनी टीएमसी सोडून भाजपमध्ये प्रवेश केला आहे, त्यांनी ऑलिम्पिक पदकासह अनेक ग्रँड स्लॅम विजेतेपदे पटकावली आहेत. आता ते सक्रिय राजकारणात प्रवेश करत आहेत.

२०२० मध्ये व्यावसायिक टेनिसमधून निवृत्त झाल्यानंतर लिएंडर पेसने राजकारणात प्रवेश केला. गोवा निवडणुकीपूर्वी ते टीएमसीमध्ये सामील झाले. त्यांनी गोवा विधानसभा निवडणुकीत टीएमसीसाठी प्रचार केला, परंतु त्यानंतर ते राजकीय व्यासपीठांवर दिसले नाहीत. सूत्रांनुसार, ते पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत भाजपचे स्टार प्रचारक असतील.

लिएंडर पेसच्या नावावर अनेक विक्रम आहेत. लिएंडर पेसला टेनिसमधील महान दुहेरी खेळाडूंपैकी एक मानले जाते. त्याने महेश भूपती आणि मार्टिना नवरातिलोवा यांच्यासोबत अनेक ग्रँड स्लॅम विजेतेपदे जिंकली. त्याने १९९६ च्या अटलांटा ऑलिम्पिकमध्ये कांस्य पदक जिंकले. डेव्हिस कपच्या इतिहासात सर्वाधिक दुहेरी विजयांचा विक्रमही त्याच्या नावावर आहे. त्याच्या कारकिर्दीत आठ पुरुष दुहेरी आणि दहा मिश्र दुहेरी ग्रँड स्लॅम विजेतेपदांचा समावेश आहे.

### ‘होर्मुझवर इराणचा ताबा खपवून घेणार नाही’

**तेहरान/वॉशिंग्टन :** गेल्या एक महिन्यापासून मध्यपूर्वेत प्रचंड तणावाचे वातावरण आहे. या तणावामुळे जागतिक स्तरावर चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. इराणने होर्मुझ सामुद्रधुनीवर ताबा अद्याप सोडला नसल्याचे अमेरिका देखील संतप्त झाली आहे. याच पार्श्वभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला शेवटचा इशारा दिला आहे. तसेच परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी देखील इराणला कडक शब्दात सुनावले आहे. मार्को रुबियो यांनी एका मुलाखतीदरम्यान इराणला कडक शब्दात इशारा दिला आहे. त्यांनी म्हटले की, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प इराणला स्ट्रेट ऑफ होर्मुझ वर कायस्वरुपी नियंत्रण मिळवून देणार नाहीत. तसेच त्यांना कोणत्याही प्रकारे टोलिंग सिस्टम सुरु करु देणार नाहीत असे त्यांनी म्हटले.

# नवजात बाळाला सांभाळण्याची वडीलांचीही जबाबदारी

## राघव चड्ढांनी केली पितृत्व सुट्टीची मागणी

**नवीदिल्ली : दि.३१ वृत्तसंस्था**

आपचे राज्यसभा खासदार राघव चड्ढा यांनी संसदेमध्ये अत्यंत महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. देशामध्ये पितृत्व रजेला कायदेशीर हक्क बनवण्याची मागणी केली जात आहे. हाच मुद्दा खासदार राघव चड्ढा यांनी राज्यसभेमध्ये उपस्थित केला आहे. ज्याप्रमाणे मुलांना जन्म देताना आईला मॅटरनिटी लिव्ह अर्थात मार्तत्व सुट्टी दिली जाते त्याचबरोबर वडीलांना देखील पॅटरनिटी म्हणजेच पितृत्वाची सुट्टी देण्याची मागणी संसदेमध्ये केली आहे.

खासदार राघव चड्ढा म्हणाले की, जेव्हा बाळ जन्माला येते, तेव्हा दोन्ही पालकांचे अभिनंदन केले जाते, परंतु बाळाच्या संगोपनाची जबाबदारी पूर्णपणे आईवर टाकली जाते. त्यांनी याला समाजाचे अपयश म्हटले. आपली व्यवस्था केवळ प्रसूती



रजेला मान्यता देते, तर वडिलांच्या भूमिकेकडे दुर्लक्ष केले जाते.

त्यांनी संसदेत मागणी केली की पितृत्व रजा हा कायदेशीर हक्क बनवला जावा, जेणेकरून वडिलांना आपल्या नवजात बाळाची आणि पत्नीची काळजी घेण्यासाठी नोकरी आणि कुटुंब यापैकी एकाची निवड करावी लागणार नाही. राघव चड्ढा म्हणाले की, ‘‘गर्भधारणेच्या नऊ महिन्यांनंतर आईला सामान्य किंवा सिझेरियन प्रसूतीच्या कठीण प्रक्रियेतून जावे लागते. या काळात तिला औषधोपचारांची, तसेच तिच्या पतीच्या शारीरिक, मानसिक आणि भावनिक आधाराची नितांत गरज असते,’’ असा मुद्दा राघव चड्ढा यांनी उपस्थित केला आहे.

पितृत्व रजा हा कायदेशीर हक्क म्हणून अनेक देशांमध्ये अस्तित्वात आहे, परंतु त्याचा कालावधी, वेतन आणि पात्रता यामध्ये मोठी भिन्नता आहे. सर्वसाधारणपणे, युरोप, लॅटिन अमेरिका आणि आशियाच्या काही भागांमध्ये हा हक्क सर्वाधिक प्रस्थापित आहे. अशाच पितृत्वाच्या सुट्ट्या भारतामध्ये देखील देण्यात याव्या अशी मागणी खासदार चढ्डा यांनी केली. ते म्हणाले की, ‘‘स्वीडन, आइसलँड आणि जपानसारख्या देशांमध्ये, हा कायदेशीर हक्क ९० दिवसांपासून ते ५२ आठवड्यांपर्यंत हमीपूर्वक दिला जातो. भारतात ९० टक्के मनुष्यबळ खाजगी क्षेत्रात आहे. याचा अर्थ असा की, बहुतेक वडिलांना हा हक्क मिळत नाही,’’ असा मुद्दा चड्ढा यांनी राज्यसभेमध्ये मांडला.

# इराणनंतर आता आशियाई देशांमध्ये युद्ध पेटणार?

## जपानने चीनच्या दिशेने तैनाती केली खतरनाक क्षेपणास्त्रे

**टोकीयो/बीजिंग : दि.३१ वृत्तसंस्था**

मध्यपूर्वेतील अमेरिका-इस्रायल विरुद्ध इराण युद्धा नंतर आता आशियातही वादाची ठिणगी पडण्याची शक्यता आहे. जपानने चीनच्या दिशेने केलेल्या शस्त्र तैनातीमुळे मोठी खळबळ उडाली आहे. यामुळे चीन संतप्त होऊन जपानवर हल्लाही करु शकतो. ज्यामुळे आशियाई देशांमध्ये अस्थिरता निर्माण होऊ शकते. याचा जागतिक स्तरावरही गंभीर परिणाम होऊ शकतो.

मिळालेल्या माहितीनुसार, जपानने आपल्या संरक्षण धोरणात मोठा



बदल केला आहे. या धोरणांतर्गत स्वसंरक्षणासाठी चीनच्या दिशेने लांब पल्ल्यांची क्षेपणास्त्र तैनात केली आहे. मध्यपूर्वेतील वाढता धोका आणि आशियाई देशांमधील वाढता प्रादेशिक तणाव पाहता हा निर्णय घेण्यात आला असल्याचे जपानने म्हटले आहे. मात्र जपानच्या या निर्णयाने आशियातील भू-राजकीय समीकरणात मोठा भूकंप आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जपानने पहिली तुकडी चीनच्या दिशेने तैनात केली आहे.

या क्षेपणास्त्रांची मारक क्षमता २०० किमीवरुन थेट १००० किमीपर्यंत वाढवण्यात आली आहे.

या क्षमतेमुळे जपान आपल्या भूमीवर थेट चीनमधील महत्त्वाच्या लष्करी ठिकांणावर प्रहार करु शकतो.


हे जपानचे स्वदेशी बनावटीचे लांब पल्ल्याचे क्षेपणास्त्र आहे. यामुळे जपान आता शत्रूच्या हल्ल्याची वाट न पाहता, संभाव्य हल्ल्यांना प्रत्युत्तर देण्यासाठी सज्ज आहे.

सर्वात महत्त्वपूर्ण बाब म्हणजे, जपानने आपल्या लष्करी क्षमतेत अमेरिकन तंत्रज्ञानाचीही वाढ केली आहे. दपानने अमेरिकन बनावटीच्या १,६०० किमी रेंज असलेल्या क्रूझ क्षेपणास्त्रांचीही तैनाती केली आहे. याशिवाय शक्तिशाली युद्धनौकांचीही तैनाती केली जाणार आहे. पूर्व चीन समुद्रात वाढत्या चीनच्या लष्करी हालचालींच्या पार्श्वभूमीवर जपानने आपल्या संरक्षण धोरणात आक्रमकता स्वीकारली आहे.

जपान आणि चीनमधध्ये पूर्व चीन समुद्रातील सेनकाकू बेटांवरुन वाद सुरु आहे. हे बेट सध्या जपानच्या ताब्यात असून चीनने त्यावर आपला हक्क सांगितला आहे. तसेच चीनने तैवानलाही आपला भाग मानले आहे. जपान तैवानला संरक्षणासाठी उघड पाठिंबा देतो. जपानच्या तैवानवरील भूमिका आणि सेनकाकू बेटावरुन वादामुळे चीनसोबत तणावात आहे. परंतु सध्या या जपानच्या हालचालीमुळे चीन संतप्त होऊन आशियाई देशांमध्येही युद्ध पेटण्याची शक्यता आहे.

# अमेरिकेची नाकेबंदी?

## इराणने होर्मुझवरुन घेतला मोठा निर्णय, इस्रायललाही झटका




**तेहरान/वॉशिंग्टन दि.३१ वृत्तसंस्था**

मध्यपूर्वेतील युद्ध आता अधिक धगधगू लागले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी स्ट्रेट ऑफ होर्मुझवरुन दिलेल्या धमकीनंतर इराणने आक्रमक पवित्रा घेतला आहे. सोमवारी(३० मार्च) इराणच्या संसदेत सुरक्षा समितीने होर्मुझ सामुद्रधुनीच्या व्यवस्थापन योजनेला मान्यता दिली आहे. यामुळे या योजनेअंतर्गत होर्मुझच्या सागरी मार्गावरुन जाणाऱ्या जहाजांकडून शुल्क वसूल केले जाणार आहेत. या योजनेत सुरक्षा व्यवस्था, सागरी सुरक्षा, पर्यावरण संरक्षण, आर्थिक यंत्रणा आणि इराणचे चलन रियाल आधारित टोल प्रणालीची अंमलबजावणी या सर्व तरतुदींचा समावेश आहे.

**अमेरिका-इस्रायलची उडाली झोप**

परंतु इराणने हे स्पष्ट केले आहे की, अमेरिका आणि इस्रायलच्या जहाजांना होर्मुझ सामुद्रधुनीतून जाण्याची परवानगी दिली जाणार नाही. तसेच ज्या देशांनी इराणवर आंतरराष्ट्रीय निर्बंध लादले असतील त्या देशांच्या जहाजांनाही होर्मुझचा मार्ग बंद जाली. यासाठी इराणने ओमानसोबत एक सहकार्यचा प्रस्तावही आखला आहे. हा निर्णय अशा वेळी घेण्यात आला आहे, जेव्हा ट्रम्प यांनी इराण ला होर्मुझ खुला न केल्यास त्यांच्या उर्जा प्रकल्पांवर हल्ल्यांची धमकी दिली होती. यानंतर इराणने अवघ्या काही तासांतच टोलच्या योजनेला मंजुरी दिली.

याच वेळी दुसरीकडे अमेरिकेने इराणच्या सर्वात महत्त्वाचे शहर इस्फाहनवर बंकर बस्टर बॉम्ब डागले असल्याचा दावा केला जात आहे. यामध्ये इराणचे सर्वात जास्त नुकसान झाले असल्याचे म्हटले जात आहे. कारण इस्फाहन इराणचे सर्वात महत्त्वाचे आणि २.७ दशलक्ष लोकसंख्या असलेले शहर आहे. तसेच या शहरात इराणची अनेक लष्करी तळे आहेत, युरेनियमचा संवर्धित साठा असल्याचा दावाही केला जातो. मात्र अद्याप याबाबत इराणकडून कोणतीही पुष्टी नाही.

होर्मुझच्या खाडीचा विस्तार हा १६१ किलोमीटर इतका आहे. या मार्गावरुन जगाच्या एकुणून कच्चा तेलाच्या पुरवठ्यापैकी २० टक्के पुरवठा जागतिक पातळीवर केला जाता. सध्या इराणने या मार्गावर नाकेबंदी केली आहे, ज्यामुळे जागतिक बाजारपेठेत तेल आणि गॅसचा तुटवडा निर्माण झाला आहे. यामुळे जागतिक इंधन दर आणि उर्जा संकट निर्माण झाले आहे. याचा जगाच्याच नव्हे, तर प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेला धक्का बसत आहे.


## आरक्षण — भाजप खासदाराच्या मागणीने नव्या वादाची ठिणगी

# मुस्लिमांना ओबीसी प्रवर्गातून बाहेर काढा!

**नवीदिल्ली : दि.३१ वृत्तसंस्था**

देशातील सरकारी परीक्षांमध्ये मुस्लीम तरुण-तरुणी आपल्या मेहनतीच्या बळावर मोठे यश मिळवतात. या यशावरूच आता नवा राजकीय वाद निर्माण झाला आहे. काही समाजकंटकांकडून या यशाची तुलना ‘जिहाद’सारख्या शब्दांशी करून दिशाभूल केली जात आहे. हा वाद आता संसदेपर्यंत पोहोचला आहे. भाजप खासदार के. लक्ष्मण यांनी राज्यसभेत मुस्लीम आरक्षणाबाबत केलेल्या विधानामुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

के. लक्ष्मण संसदेत बोलताना म्हणाले की, ‘काही राज्यांमध्ये ‘ओबीसी’ आरक्षणाचा धर्माच्या नावावर गैरवापर केला जात आहे. विशिष्ट राज्यांमध्ये मुस्लिमांना या कोट्याचा लाभ दिला जात असून, सरकारने अशा धर्म-आधारित आरक्षणांची समीक्षा करावी आणि मुस्लिमांना या प्रवर्गातून बाहेर काढावे, अशी मागणी त्यांनी केली. पण के लक्ष्मण यांच्या



या विधानावर विरोधी पक्षांनी तीव्र आक्षेप घेत संसदेतून सभात्याग केला.

कर्नाटकमध्ये मुस्लिम समाजाला ओबीसी प्रवर्गात समाविष्ट करून सुमारे ४ टक्के आरक्षण देण्यास त्यांनी विरोध केला. याव्यतिरिक्त, त्यांनी पश्चिम बंगालचाही उल्लेख करत त्यांनी सांगितले की, पश्चिम बंगालमध्ये मोठ्या संख्येने मुस्लिमांचा ओबीसी प्रवर्गात समावेश करण्यात आला आहे, ज्यामुळे खऱ्या अर्थाने मागासलेल्या वर्गांच्या हक्कांवर परिणाम होऊ शकतो.

तसेच, तामिळनाडूतील मुस्लिम समाजासाठी असलेल्या स्वतंत्र आरक्षण प्रणाली राबवली जात आहे. तर केरळमध्ये मुस्लिम समाजाचा ओबीसी प्रवर्गात समावेश करून आरक्षणाची टक्केवारी वाढवण्यात आली.

आरक्षणाबाबत संविधानात स्पष्ट तरतुदी आहेत. त्यानुसार, अनुच्छेद १५(१) आणि १६(२): संविधानातील या कलमांनुसार, राज्य सरकार कोणत्याही नागरिकाशी केवळ धर्म, जात, लिंग किंवा जन्मस्थान या आधारावर भेदभाव करू शकत नाही. केवळ ‘मुसलमान’ या धर्माच्या आधारावर आरक्षण देणे असंवैधानिक मानले जाते.

मागासलेपणाचा निकष: जरी केवळ धर्माच्या नावावर आरक्षण देता येत नसले, तरी मुस्लीम समुदायातील ज्या जाती सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास आहेत, त्यांना ओबीसी प्रवर्गांतर्गत आरक्षणाचा लाभ घेता येतो. अनेक राज्यांमध्ये मंडल आयोगाच्या शिफारशींनुसार मुस्लीम समाजातील विशिष्ट मागास जातींचा समावेश ओबीसी यादीत करण्यात आला आहे.

देशभरातील अनेक राज्यांमध्ये मुस्लिम समाजांना आरक्षण देण्यात आले आहे. यामध्ये आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, बिहार, तेलंगणा, तामिळनाडू आणि झारखंड यांचा समावेश आहे. तसेच, सर्व राज्यांमध्ये धर्माच्या आधारावर आरक्षण दिले जात नाही, तर केवळ मुस्लिमांमधील विशिष्ट मागासलेल्या जातींनाच दिले जाते. बंगालमधील हा मुद्दा गुंतागुंतीचा आहे, कारण २०११ नंतर राज्य सरकारने अनेक मुस्लिम समाजांचा ओबीसी यादीत समावेश केला, ज्यामुळे एकूण मागास जातींमध्ये मुस्लिमांचा वाटा ११८ पेक्षा जास्त झाला. अलीकडेच, कलकत्ता उच्च न्यायालयाने २०१० नंतर समाविष्ट केलेल्या ७७ नवीन जातींचा (बहुसंख्य मुस्लिम) ओबीसी दर्जा रद्द केला, परंतु सर्वोच्च न्यायालयाने या आदेशाला स्थगिती दिली आहे, ज्यामुळे ही प्रमाणपत्रे वैध ठरली आहेत. परिणामी, राज्य सरकार मुस्लिम समाजाच्या मोठ्या भागाला आरक्षणाचे लाभ देत आहे.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले साहित्य या मेलवर पाठवावे. आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## ऊर्जा संकट; अर्थव्यवस्था सावरण्याचे आव्हान!

मध्य पूर्वेकडील युद्धाच्या झळा अधिक तीव्र होत चालल्या असून, जनतेसमोर तसेच सरकारसमोरही अर्थव्यवस्था सावरण्याचे आव्हान कठीण बनत चालले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेत भाषण करताना, सध्याची परिस्थिती चिंताजनक असल्याचे म्हटले होते. भारताची अर्थव्यवस्था, ऊर्जा सुरक्षा यावर त्याचे दूरगामी परिणाम होतील. म्हणूनच कोरोना महामारीच्या काळात भारत जसा सज्ज, सतर्क व एकजूट होता, त्याचप्रमाणे आताही असण्याची गरज आहे, असे आवाहन त्यांनी केले होते. देशात पुन्हा एकदा लॉकडाऊन केला जाणार असल्याचे त्यांनी म्हटले नसले, तरीदेखील समाजमाध्यमांवरून तशा चर्चांना ऊत आला. या गोंधळावर पडदा टाकताना देशात लॉकडाऊन लागू करण्याचा कोणताही विचार नसल्याचे केंद्र सरकारने स्पष्ट केले. अशा अफवा पसरवणे हे चिंताजनक असल्याचे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटले. तर इंधनाची पुरवठासाखळी सुरक्षित असल्याचे स्पष्टीकरण केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीपसिंग पुरी यांनी दिले. अफवांमुळे देशभर ठिकठिकाणी पेट्रोल, डिझेल, सीएनजी व गॅस सिलिंडरकरिता रांगा लागल्या. लोकांपर्यंत योग्य माहिती वेळेवर व प्रभावी पद्धतीने पोहोचवण्यात सरकारचे माहिती व प्रसारण खाते कुठेतरी नक्कीच कमी पडले. एरवी किरकोळ बातमीवरून कारवाईचा बडगा उचलणारी सरकारी यंत्रणा, अफवेचे पीक आले असताना कुठे होती, असा प्रश्न विचारावा लागेल. पश्चिम आशियातील युद्धस्थितीच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधानांनी राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची शुक्रवारी ऑनलाईन बैठक घेतली. आर्थिक-व्यापार स्थैर्य राखणे, उद्योग आणि पुरवठासाखळी मजबूत करणे, तसेच नागरिकांच्या हिताचे संरक्षण करणे हे सरकारचे सर्वोच्च अग्रक्रम आहेत, असे त्यांनी सांगितले आणि साठेबाजी व नफेखोरीविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले. आता या दिशेने राज्यांनी यंत्रणा कामाला लावून आवश्यक तेथे कडक कारवाईची गरज आहे. 'टीम इंडिया' म्हणून एकत्र काम करत, संकटावर मात करण्याचे आवाहनही पंतप्रधानांनी केले. कोरोनाच्या वेळी पूर्ण देशाने एकत्र येत, त्या संकटावर मात केली. परदेशांतील, खास करून पश्चिम आशियातील भारतीय नागरिकांसाठी संबंधित राज्यांनी हेल्पलाईन सुरू करणे, नोडल अधिकारी नियुक्त करणे, जिल्हास्तरावर साह्य यंत्रणा उभारणे यासंबंधीच्या सूचना देण्यात आल्या. आखातातील एक कोटी भारतीयांना सुरक्षितपणे मायदेशी आणण्याची गरज आहे. सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांशी संपर्क ठेवून, त्यांच्या अडीअडचणी दूर करा, असे मोदी यांनी मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत सांगितले. युद्धामुळे कच्चा माल व सुटे घटक मिळण्यात या उद्योगांना अडचणी येत आहेत. त्यामुळे केंद्राच्या मदतीने या अडचणी सोडवणे गरजेचे आहे. कारण, या क्षेत्रात फार मोठ्या प्रमाणात रोजगार आहे. सौर ऊर्जा, जैव इंधन आणि पर्यायी ऊर्जेच्या वापराला चालना देण्याच्या पंतप्रधानांच्या सूचनाही यथायोग्य आहेत. देशांतर्गत तेल व गॅस शोधमोहीम वाढवण्याचे आवाहन सर्वात महत्त्वाचे आहे. जोपर्यंत याबाबतीत आत्मनिर्भर होत नाही, तोपर्यंत अशा जागतिक तणावांच्या वेळी आपत्ती येणारच, हे लक्षात घेतले पाहिजे. अकरा वर्षांपूर्वी केंद्र सरकारने नवी दिल्लीत भरवलेल्या 'ऊर्जा संगम' परिषदेत इंधनावरील परदेशी अवलंबित्व कमी करण्याची घोषणा केली होती. २०३० पर्यंत हे अवलंबित्व ५० टक्क्यांवर आणण्याचे लक्ष्य ठेवले होते. परंतु, प्रत्यक्षात गेल्या अकरा वर्षांत खनिजतेल आयातीचे प्रमाण ७७ टक्क्यांवरून ८८ टक्क्यांवर जाऊन पोहोचले. स्वयंपाकाचा गॅस, म्हणजे एलपीजी ६६ टक्के आणि पीएनजी म्हणजेच घरोघरी नलिकेद्वारे जो गॅस पुरवला जातो, तो ५० टक्के एवढा आयात केला जातो. दरवर्षी इंधन खेरदीसाठी जवळपास १६ लाख कोटी रुपये खर्च केला जातो. देशांतर्गत उत्पादन वाढवल्यास ही रक्कम वाचवता येऊ शकते. सध्या तेलविक्री करणाऱ्या सरकारी कंपन्यांच्या आर्थिक स्थितीवर ताण येत आहे. म्हणूनच केंद्र सरकारने पेट्रोल व डिझेलवरील उत्पादनशुल्कात प्रतिलिटर दहा रुपयांची कपात केली. या दोन्ही इंधनांच्या किरकोळ किमती नियंत्रणात ठेवण्याच्या उद्देशाने हे पाऊल उचलले. पेट्रोलवरील विशेष अतिरिक्त उत्पादनशुल्क १३ रुपयांवरून तीन रुपये प्रतिलिटर ,तर डिझेलवरील शुल्क दहा रुपयांवरून शून्यावर आणले. सध्याच्या संकटकालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी हे उपाय योजणे गरजेचेच होते. युद्धामुळे कच्च्या तेलाच्या किमती प्रतिपिंप ७० डॉलरवरून १०० डॉलरपेक्षा जास्त वाढल्या. दरवाढ ग्राहकांवर टाकणे किंवा उत्पादनशुल्क कमी करून भार स्वतः उचलणे, हे दोन पर्याय सरकारपुढे होते. त्यापैकी दुसरा पर्याय सरकारने निवडला. ज्या देशांमध्ये इंधन बाजार पूर्णपणे खुला आहे, तेथे किमती वेगाने बदलल्या; मात्र जेथे सरकार किमती नियंत्रित करते, तेथे या परिणामाची गती कमी असते. दरवाढीचा सर्वाधिक फटका फिलिपिन्सला बसला, तेथे डिझेल ८१ टक्क्यांनी व पेट्रोल ५४ टक्क्यांनी महागले. नायजेरिया, म्यानमार, कंबोडिया, लाओस यासारख्या देशांत ७० टक्क्यांनी महाग झाले. ऑस्ट्रेलिया आणि अमेरिकेतही हे दर ३० ते ५० टक्क्यांनी वाढले. याबाबतीत युरोपचाही अपवाद नाही. शेजारच्या पाकिस्तान व श्रीलंकेत २५ ते ३० टक्क्यांनी हे दर भडकले. आशियात कमतरता जाणवत असतानाही, भारताने अद्याप दरवाढ केलेली नाही, हे विशेष. सरकारने इंधनदरांवर नियंत्रण ठेवले. पेट्रोल, डिझेल आणि सीएनजीचे दर वाढल्यास, संपूर्ण अर्थव्यवस्थेस फटका बसून भाववाढीच्या फ फाट्यात जनता सापडते, हे लक्षात घेतले पाहिजे. मात्र, ऊर्जा संकटामुळे औद्योगिक उत्पादनावरही परिणाम होऊ लागले असून, यामुळे अर्थगती ०.३ टक्क्यांनी घटण्याची शक्यता आहे. २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी वित्तीय तूट जीडीपीच्या ४.५ टक्क्यांपर्यंत मर्यादित ठेवण्याचे उद्दिष्ट आहे. ऊर्जा संकट लांबल्यास तेही गाठणे कठीण होऊ शकेल. संकटाच्या या काळात जनतेने त्याचबरोबर विरोधकांनीदेखील सरकारला सहकार्य करणे आवश्यक आहे. इंधनाचा वापर कमीत कमी वा काटकसरीने केला पाहिजे. त्याचबरोबर पर्यायी ऊर्जा वापराच्या आणि त्यासाठी निर्मितीच्या साधनांवर भर दिला पाहिजे.



## लक्ष्यभेद

जयदीप सोनखासकर
9890508017

### पुन्हा तारीख

पक्ष कोणाचा चिन्ह कोणाचे
माहित नाही ह्या महाराष्ट्राला
खरे सैनिक ते कोण्या पक्षाचे
एकदा सांगा आम्हा जनतेला

शिवसेना

न्यायालय देत आहेत तारीख
कासावीस झाले आहे सैनिक
निष्ठावंत होत आहे रोज राख
देईल का कोणी खरं मौखिक

न्यायालयाने देऊ नये अशी
शिक्षा कोणत्या ह्या पक्षाला
अनेक जीव येतो तोंडघशी
लाज राहिली नाही नेत्याला

## ॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

नकोच वाजवू
तू तुझी तुतारी ।
आहे ही लाचारी
जाणून घे ॥

अट्टहास का हा
जाणले पाहिजे ।
ऐकले पाहिजे
तुला मित्रा ॥

योग्य वेळ येते
प्रत्येकाची मित्रा ।
व्यर्थ नको मित्रा
चिंता करू ॥

योग्य वेळी तुझी
नक्कीच येणार ।
जग ऐकणार
तुला मित्रा ॥

शाश्वत जगात
विचार अमर ।
तसे तू वावर
जगती या ॥

# तापलेली पृथ्वी: संकट आणि उपाय



'राज'रंग

राजकुमार भीतकर
यवतमाळ, मो.8308800894

**उन्हाळा लागला की आठवण होते सावलीची. सावली देणाऱ्या परोपकारी वृक्षांची. मग आठवतो 'ग्लोबल वार्मिंग'हा शब्द. उन्ह जेव्हा जिवाची लाहीलाही करते, तेव्हा शोध सुरू होतो वाढत्या तापमानाच्या कारणांचा. दरवर्षीच हे उन्ह का वाढते आहे, याला जबाबदार कोण? आदी प्रश्न आपण स्वःतालाच विचारतो. पण, कधी आपण असा विचार करतो का की, सावली देणारे एखादे झाड आपण सुद्धा आपल्या जीवनात लावले पाहिजे. किमान दरवर्षी आपल्या वाढदिवसाला एक झाड लावले आणि ते जगवले तरी या संकटावर आपण 'फुंकर' घालू शकू.**

उन्हाळा सुरू झाला आहे. आजचे तापमान ३५अंश सेल्सिअस आहे. येणाऱ्या दिवसात ते ४५ अंश कधी पार करेल सांगता येत नाही. गेल्या काही वर्षांत तापमानाने उच्चांक गाठला आहे. गेल्या वर्षी मे महिन्यातील सरासरी तापमान ४० ते ४५ अंश सेल्सिअस एवढे होते. ही आपल्यासाठी फार मोठी धोक्याची घंटा आहे. ते एक गंभीर संकटच आहे. तापमानवाढीला विविध नैसर्गिक कारणे असली तरी निसर्गात मानवाचा वाढलेला मोठा हस्तक्षेप हेदेखील एक प्रमुख कारण आहे. वाढते तापमान हे विविध नैसर्गिक आणि सामाजिक संकटांना तोंड देत आहे. यावर योग्यवेळी नियंत्रण मिळविणे गरजेचे आहे. पुढील पिढीच्या सुरक्षित भविष्यासाठी आपल्याला पाउले उचलणे गरजेचे आहे. पृथ्वीचे वातावरणातील हरितगृह वायू (कार्बन डायऑक्साईड, मिथेन) वाढल्याने सूर्याची उष्णता अडवली जाते. त्यामुळे सरासरी तापमान १ डिग्री सेल्सिअसने वाढले जाते. १८८०नंतर हे प्रमाण सतत वाढत आहे. २०३५पर्यंत आणखी ०३. ते ०.७ डिग्री वाढण्याची शक्यता आहे. ओझोन थर कमी होण्याने हानिकारक किरणे थेट पृथ्वीवर पोहोचत आहे, ज्यामुळे पृथ्वी 'तापत'आहे. वाढत्या तापमानामुळे समुद्राची पातळी वाढत आहे. हिमनद्या वितळत आहेत. नैसर्गिक आपत्तीत वाढ होते. प्राणी, वनस्पती आणि मानवी जीवनावर त्याचा प्रतिकूल परिणाम होत आहे. शेतीवर परिणाम होत आहे. पाणीटंचाई निर्माण होत आहे. विविध रोगांचे प्रमाण वाढत आहे. २०१८ हे सर्वाधिक उष्ण वर्ष होते, ज्यामुळे जंगलात अनेक ठिकाणी आगी लागल्या आणि हवामानात तीव्र स्वरूपाचे बदल झाले होते. तापमान वाढीला अनेक कारणे आहेत. औद्योगीकरण, वाहनांची अमर्याद झालेली वाढ, सिमेंट कॉंक्रिटचे बनलेले रस्ते, पृथ्वीला पोखरून काढलेला अमर्यादा कोळसा आणि तेल, जळणासाठी केलेली वृक्षांची तोड आणि औद्योगीकरणासाठी केलेली जंगलतोड



आदी प्रमुख बाबी कारणीभूत आहेत. अलीकडे विकासाच्या नावाखाली जंगले खाली केली जात आहे. त्यात कारखाने आणि सिमेंटचे जंगल उभारले जात आहे. मानवी हस्तक्षेपामुळे ७१टक्के पाणी आणि २९टक्के जमिनीवर परिणाम होत आहे. जसे उन्हाळा आला की आठवण येते ती सावली देणाऱ्या परोपकारी वृक्षांची. मग आठवतो 'ग्लोबल वॉर्मिंग'हा शब्द. ऊन जिवाची लाहीलाही करते. तेव्हा वाढत्या तापमानाचा शोध सुरू होतो. दरवर्षी ऊन का वाढते? याला जबाबदार कोण? असे अनेक प्रश्न विचारले जातात. आपण कधी विचार करतो का? आपण एखादे झाड लावले पाहिजे. वाढदिवसाला झाड लावून ते जगवावे. तरच या संकटावर फुंकर बसेल. गेल्या काही वर्षांत अणुचाचण्या वाढल्या. जगात अनेक ठिकाणी युद्ध सुरू आहे. त्यात शस्त्रास्त्रे वापरली जात आहेत. अण्वस्त्रांच्या वापरामुळे तापमान वाढत आहे. सिमेंटचे रस्ते मोठ्या प्रमाणात होत आहेत. त्यामुळे उष्णतामान वाढत आहे. एकाऐवजी अनेक घटक कारणीभूत आहेत. वाढत्या तापमानाला अनेक घटक जबाबदार आहेत. हरितगृह वायूंचे उत्सर्जन मोठ्या प्रमाणात होते. कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण सतत वाढत आहे. जंगलांची कत्तल वेगाने सुरू आहे. झाडे कमी झाल्याने प्राणवायू घटला. पाऊस कमी आणि ऊन जास्त झाले. वाहनांची संख्या प्रचंड वाढली आहे. कारखान्यातून विषारी धूर बाहेर पडतो. यामुळे ओझोनचा थर विरळ होतो. सूर्याची किरणे थेट पृथ्वीच्या अंगावर येतात. जागतिक हवामान संस्था (डब्ल्यूएमओ) इशारा देते की पृथ्वीचा पारा धोक्याच्या पातळीवर आहे. शास्त्रज्ञ म्हणतात, 'आता नाही तर कधीच नाही.' संयुक्त राष्ट्राच्या अहवालात धोक्याची घंटा आहे. 'निसर्गाचा कोप मानवाला महागात पडेल.' आंतरराष्ट्रीय संस्था सतत संशोधन करत आहेत. त्यांच्या मते कार्बन उत्सर्जन थांबवणे गरजेचे आहे. भारतीय शास्त्रज्ञही हवामान बदलावर चिंतेत आहेत. ऋतुचक्र पूर्णपणे विस्कळित झाले आहे. या संकटातून सुटण्यासाठी वृक्षारोपण हाच एकमेव मार्ग आहे. 'झाडे लावा, झाडे जगवा' हा मंत्र हवा. यवतमाळसारख्या छोट्याशा शहराने यावर अंमल केला आहे. तत्कालीन जिल्हाधिकारी राजेश देशमुख यांच्या काळात एक ' ऑक्सिजन पार्क'ज्यात ऑक्सिजन देणारी विविध झाडे लावण्यात आली आहेत. तर, 'प्रयास वना'त विविध वनौषधी असलेली नक्षत्रवनापासून गुलाबापर्यंतची बागच फुलविण्यात आली आहे. या दोन्ही ठिकाणी नागरिकांना फिरण्याची आणि



फुकटचे ऑक्सिजन मिळविण्याची मुभा आहे. शिवाय, याठिकाणी आपल्या वाढदिवसाला एक वृक्ष लावण्याची सोय आहे. ते जगविण्याची जबाबदारी या संस्थांनी घेतली आहे. तर शहरात 'ग्रीन यवतमाळ'या प्रकल्पांतर्गत विविध प्रकारची झाडे लावण्याचे अभियान सामाजिक संस्थांनी राबविले आहे. हेच कर्तव्य सर्वत्र होणे आवश्यक आहे. प्रत्येकाने एक तरी झाड लावले पाहिजे. त्याशिवाय ऑक्सिजन निर्मिती होणार नाही. शिवाय, सौर ऊर्जेचा वापर वाढवणे गरजेचे आहे. प्रदूषण कमी करणारे तंत्रज्ञान हवे. पाण्याचा वापर जपून करणे आवश्यक आहे. प्लॅस्टिकचा वापर पूर्णपणे थांबवावा लागेल. निसर्ग आपला सखा आणि सोबती आहे. त्याचे रक्षण करणे आपले कर्तव्य आहे. 'धरेची माया, शीतल छाया' हे विसरून चालणार नाही. मानवाचा हव्यास विनाशाला निमंत्रण देत आहे. आताच जागे होण्याची वेळ आली आहे. पृथ्वी वाचवण्यासाठी सर्वांनी एकत्र यावे. वाढत्या तापमानावर आपण मात करू शकतो. फक्त इच्छाशक्ती आणि कृती हवी. निसर्गाशी मैत्री करणे ही काळाची गरज आहे. तरच पुढची पिढी सुखात राहील.

# अंधश्रद्धेच्या सावटाखालील तरुणाई; अशोक खरात प्रकरणाने दिलेला धोक्याचा इशारा



चर्चा

प्रवीण वानखडे
9022149145

समाज प्रगत होत असल्याचा आपण अभिमान बाळगतो. तंत्रज्ञानाच्या झपाट्याने वाढणाऱ्या युगात आजची तरुणाई माहितीच्या महासागरात पोहत आहे. विज्ञान, तर्क आणि आधुनिक विचारसरणी यांचा पुरस्कार करणारी हीच तरुण पिढी भविष्यातील भारत घडवणार आहे, अशी अपेक्षा व्यक्त केली जाते. परंतु या सर्व प्रगतीच्या गजरात एक अस्वस्थ करणारा प्रश्न ठामपणे उभा राहतोहीच तरुणाई अंधश्रद्धेच्या गर्तेत ओढली जात आहे का? अलीकडील अशोक खरात प्रकरण हे या प्रश्नाचं ठळक आणि अस्वस्थ करणारं उदाहरण ठरलं आहे. या घटनेने केवळ एका व्यक्तीच्या कृतीकडे लक्ष वेधलं नाही, तर संपूर्ण समाजाच्या मानसिकतेवर बोट ठेवलं आहे. विशेषतः, शिक्षित आणि डिजिटलदृष्ट्या सक्षम मानल्या जाणाऱ्या तरुण वर्गाच्या विचारप्रक्रियेबद्दल गंभीर शंका उपस्थित केल्या आहेत.

बदललेली अंधश्रद्धा, बदललेला बळी

अंधश्रद्धेचं स्वरूप आज बदललं आहे. पूर्वी गावकुसात मर्यादित असलेले जादूटोणा, भुताखेतांच्या गोष्टी आणि बुवाबाजी आता डिजिटल अवतारात समोर येत आहेत. सोशल मीडियावर "चमत्कारिक उपाय", "ऊर्जा उपचार", "गुप्त शक्ती" अशा नावाखाली हजारो व्हिडिओ आणि पोस्ट्स व्हायरल होत आहेत. त्यातली भाषा आकर्षक, मांडणी प्रभावी आणि दावे थेट मनाला भिडणारे असतात. अशा वातावरणात तरुणाई अंधश्रद्धेपासून दूर राहील, अशी अपेक्षा ठेवणं केवळ भोळेपणा ठरेल. उलट, ती अधिक वेगाने या जाळ्यात अडकत असल्याचं चित्र अशोक खरात प्रकरणाने स्पष्ट केलं आहे.

शिक्षण असूनही विवेक का हरवतो?

आजचा तरुण शिक्षित आहे, पण तो विवेकी आहे का? हा मूलभूत प्रश्न या प्रकरणाने उपस्थित केला आहे. शिक्षणाने माहिती मिळते, पण विचार करण्याची सवय निर्माण होतेच असं नाही. परीक्षाकेंद्रित शिक्षणपद्धतीत "का?" हा प्रश्न विचारण्यापेक्षा



"काय?" आणि "कसं?" यावर अधिक भर दिला जातो. परिणामी, तर्कशक्ती विकसित होण्याऐवजी अंधानुकरणाची प्रवृत्ती वाढते. याशिवाय, जीवनातील वाढत्या अनिश्चिततानोकरीची अस्थिरता, नात्यांमधील गुंतागुंत, सामाजिक दबावया सर्वांमुळे तरुण मानसिकदृष्ट्या अस्थिर होतो. अशा वेळी तो जलद आणि सोपा उपाय शोधतो. अंधश्रद्धा हीच त्या क्षणी "उपाय" म्हणून समोर येते.

सोशल मीडियाचा 'अदृश्य हात'

या संपूर्ण प्रक्रियेत सोशल मीडियाची भूमिका नाकारता येणार नाही. अल्गोरिदमच्या माध्यमातून वापरकर्त्यांच्या आवडी-निवडी ओळखून त्यांना तशाच प्रकारचा कंटेंट दाखवला जातो. एकदा का एखाद्या "चमत्कारिक" व्हिडिओवर क्लिक केलं, की अशाच प्रकारचे अनेक व्हिडिओ समोर येऊ लागतात. ही डिजिटल इकोसिस्टम व्यक्तीच्या विचारविश्वावर हळूहळू ताबा मिळवते. सत्य आणि असत्य यामधील सीमारेषा धूसर होते. परिणामी, अंधश्रद्धा ही "वास्तव" वाटू लागतेआणि त्याचं भयानक रूप अशोक खरात प्रकरणात दिसून आलं.

अंधश्रद्धा: केवळ वैयक्तिक नाही, सामाजिक संकट (सविस्तर)

अंधश्रद्धा ही केवळ एखाद्या व्यक्तीच्या श्रद्धा-विश्वापुरती मर्यादित राहत नाही, तर ती संपूर्ण समाजाच्या विचारप्रक्रियेवर परिणाम करणारी गंभीर समस्या ठरते. जेव्हा अंधविश्वासाला मान्यता मिळते, तेव्हा सर्वात आधी विचारस्वातंत्र्य बाधित होतं. व्यक्ती स्वतंत्रपणे विचार करण्याऐवजी, भीती आणि परंपरेच्या दबावाखाली निर्णय घेऊ लागते. यामुळे वैज्ञानिक दृष्टिकोन कमकुवत होतो आणि समाज प्रगतीच्या मार्गावरून भरकटू शकतो. याहून गंभीर बाब म्हणजे, अंधश्रद्धा अनेकदा आर्थिक आणि मानसिक शोषणाचं साधन बनते. काही लोक "उपाय" आणि "चमत्कार" यांच्या नावाखाली भोळ्या लोकांची फसवणूक करतात. अशा परिस्थितीत व्यक्ती स्वतःचं नुकसान करून घेत असते, आणि कधी कधी हे प्रकरण गुन्हेगारीपर्यंत पोहोचतं. अशोक खरात प्रकरण याचं ठळक उदाहरण आहे, जिथे अंधविश्वासाने व्यक्तीला टोकाच्या निर्णयाकडे ढकललं. यासाठी केवळ तरुणाईला दोष देणं चुकीचं ठरेल. शिक्षणव्यवस्था, समाज, माध्यमं आणि प्रशासनसर्वांनीच आपली जबाबदारी ओळखण्याची गरज आहे. पुढचा मार्ग म्हणजे विवेकाची पुनर्स्थापनाजिथे प्रत्येक व्यक्ती प्रश्न विचारेल, सत्य पडताळेल आणि तर्कावर आधारित निर्णय घेईल.

प्रगतीचा खरा अर्थ

आपण अंतराळात झेप घेत आहोत, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करत आहोत, डिजिटल क्रांतीचा भाग बनलो आहोतपण जर आपल्या विचारांवर अजूनही अंधश्रद्धेचं सावट असेल, तर ही प्रगती अपुरीच ठरेल. अशोक खरात प्रकरण हे केवळ एक अपवादात्मक उदाहरण म्हणून पाहून चालणार नाही. ते एक इशारा आहेसमाजाच्या अंतर्मनात दडलेल्या अंधश्रद्धेच्या बीजांचा. आज गरज आहे ती केवळ आधुनिक साधनांची नाही, तर आधुनिक विचारांची. कारण, खरी प्रगती ही तंत्रज्ञानात नसतेती विवेकात आणि प्रश्न विचारण्याच्या धैर्यात असते.

# थेंबो-थेंबी प्रेमपत्राचा ओलावा ....



सप्तरंग


डॉ. विनय व. दांदळे
मो. ९८२२२ ३१७६९

धूसर आकाशाच्या कुशीत जेव्हा पहाट अलगद शिरते,
आणि पावसाच्या थेंबांतून निःशब्द भावना झिरपते
तेव्हा निसर्गही शब्द हरवून फक्त अनुभूती बनतो,
आणि प्रत्येक क्षण एक अव्यक्त प्रेमपत्र होऊन जगतो
पावसाळी सकाळ अजून डोळे उघडत नव्हती. तरी तिच्या
पापण्यांच्या कडा ओलावणारे थेंब, तिच्या स्वप्नांना हलकेच
भिजवत होते.
आकाशाने काळ्या रेशमी पांघरुणात स्वतःला गुंडाळले
होतेजणू एखाद्या प्राचीन कवीने आपल्या भावनांचे गडद,
शांत मोती विखुरले असावेत आणि ते आता पृथ्वीच्या
कुशीत अलगद उतरत होते.
पहिला थेंब जेव्हा एका हिरव्या पानावर अलगद विसावला,
तेव्हा तो फक्त पाण्याचा स्पर्श नव्हता; तो एक अबोल,
निरागस प्रेमाचा पहिला शब्द होता.
त्या स्पर्शाने पान थरथरलेजसे एखाद्या लाजऱ्या मनाला
पहिल्या नजरेच्या स्पर्शाने उमटलेली गोड कंपने. प्रत्येक
थेंब जणू अक्षर बनत होता, आणि आकाश आपल्या
अखंड प्रेमाचा दीर्घ, ओलसर पत्र पृथ्वीच्या हृदयावर कोरत
होतेथेंबागणिक, शब्दागणिक.
'मी येतोय'
'मी थांबेन'
'मी तुला नव्याने घडवेन'
झाडांच्या फांद्या मंद लयीत डोलू लागल्या. प्रत्येक पानावरून
झेपावणारा थेंब क्षणभरासाठी चांदण्यासारखा चमकून अदृश्य
होत होता; पण त्याच्या अदृश्य ज
होण्याने पानावर एक ओलसर, चांदीची रेघ उरून राहत
होतीजणू एखाद्या प्रेमिकेने निरोप घेताना अश्रूंनी लिहिलेली
ओळ,
जी काळाच्या पानावर कायमची कोरली जाते.
अशातच, दूरवरून कोकिळेचा स्वर ऐकू आला. तो केवळ
आवाज नव्हता; तो पावसाच्या सरींमध्ये विणलेला एक
नाजूक, रेशमी धागा होता. त्या धाग्याने जणू सगळ्या दिशांना
एकत्र गुंफले होते. जंगल निःशब्द गात होतेशब्दांशिवाय, पण
अर्थांनी भरलेले. प्रत्येक थेंब एक स्वर बनला होता, आणि
कोकिळा त्या स्वरांना जीवन देत होती. दोघे मिळून जणू
एखादा अव्यक्त राग आळवत होतेमनाला भिडणारा, पण
सांगता न येणारा.
दरम्यान, मातीचा सुगंध हळूहळू हवेत पसरू लागला ,
दरवळू लागला. तो सुगंध म्हणजे पृथ्वीने आपल्या अंतः
करणात जपलेले जुने प्रेम पुन्हा अनुभवले होते. कित्येक
दिवसांच्या प्रतीक्षेनंतर आकाशाने तिच्या कपाळावर ओठ
टेकवले होते.
त्या स्पर्शातून उमटलेला सुगंध हा केवळ ओलाव्याचा
नव्हतातो आनंदाचा, नवजीवनाचा, पुनर्जन्माचा श्वास होता.
पृथ्वी जणू कुजबुजत होती
"मी भिजले म्हणून मी पुन्हा जिवंत झाले"
पावसाळी सकाळ अशीच असते
ती काही बोलत नाही, पण सगळे सांगून जाते.
ती काही दाखवत नाही, पण सगळे जाणवून देते.
ती स्पर्श करते, पण जखम करत नाही.
ती फक्त भिजवतेआणि त्या भिजण्यातूनच नव्या जीवनाचा
आरंभ घडवते.
खिडकीत उभा राहून मी स्वतःलाच विचारत होतो
मी पान आहे का, ज्यावर थेंब विसावतात...?
मी थेंब आहे का, जो कुणावर तरी पडतो...?
मी माती आहे का, जी त्या स्पर्शाने सुगंधित होते...?
की मी फक्त एक साक्षीदार आहेज्याला हे सगळं
अनुभवण्याचं भाग्य लाभलं आहे...?
इतक्यात एक थेंब अलगद माझ्या कपाळावर येऊन थांबला
आणि तो जणू कुजबुजला




"विचार करू नकोस. फक्त भिज.
कारण भिजणं म्हणजेच जिवंत असणं
भिजणं म्हणजेच प्रेमात पडणं
आणि भिजणं म्हणजेच खऱ्या अर्थाने जगणं"
त्या क्षणी मी डोळे मिटले.
आणि पहिल्यांदाच जाणवलं
पावसाळी सकाळ ही केवळ ऋतूची घटना नाही.
ती एक प्रार्थना आहे
एक अव्यक्त प्रेमपत्र आहे
एक क्षमा आहेजगाने स्वतःला दिलेली, आणि स्वतः जगाला
अर्पण केलेली.
ती एक आठवण आहे
की जीवन हे थेंब-थेंबांतून उमलतं
आणि थेंब-थेंबांतूनच विरून जातं
कदाचित म्हणूनच, पावसाच्या प्रत्येक थेंबात
एक निडर, निरागस कविता दडलेली असते.
आणि ती कविता वाचण्यासाठी
डोळ्यांची नाही
तर मनाची गरज असते
फक्त ऐकावं लागतं
पानांवर पडणाऱ्या थेंबांचं संगीत
आणि हृदयावर उमटणाऱ्या त्या ओलाव्याचे शब्द
थेंब जरी विरून गेले तरी ओलावा मनात कायम राहतो,
प्रत्येक पावसाळा काहीतरी नवीन गूज सांगून जातो
जीवन म्हणजे हेचक्षणा क्षणांना अलगद कवटाळणे,
आणि भिजत-भिजत स्वतःलाच पुन्हा पुन्हा शोधत राहणे.

# कौटुंबिक हिंसाचारग्रस्त महिलांनो न्यायासाठी जिद्दीने लढा...!



विचारमंथन

डॉ. एम. आर. इंगळे
मो. 9423429060

अलिकडे समाजात नैतिकतेचा ऱ्हास होत असून महिलांवर अत्याचार व कौटुंबिक हिंसाचाराचे प्रमाण वाढले आहे. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत काही सन्माननीय अपवाद सोडले तर अजूनही कुटुंबात स्त्री दुय्यम समजली जाते, त्यामुळे निर्णय प्रक्रियेत तिला फारसे स्थान दिले जात नाही. तसेच स्त्रियांना दुबळी, अबला व परावलंबी समजून तिच्यावर अत्याचार केले जातात. बहुतांश कुटुंबात तर सून म्हणून आलेल्या स्त्रीला मोलकरीण समजून तिचा माणूस म्हणून सन्मानाने जगण्याचा हक्क नाकारला जातो. तिचा हुंड्यासाठी किंवा माहेरून पैसे आणण्यासाठी शारीरिक, मानसिक व आर्थिक छळ केला जातो. त्यातून होणाऱ्या हत्या व आत्महत्यांचे प्रमाण वाढले आहे.

आज आम्ही आधुनिकतेच्या २१ व्या शतकात आणि विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगातही जुन्या रूढी परंपरा व अंधश्रद्धेच्या विळख्यात बंदिस्त आहोत, त्यामुळे स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचार व हिंसाचाराबाबत समाजात संवेदनशीलता दिसत नाही. तसेच स्त्रियांच्या चळवळी देखील याबाबत फारशा जागरूक नाहीत, ही फार मोठी शोकांतिका आहे.

कौटुंबिक हिंसाचार म्हणजे काय? कौटुंबिक हिंसाचार म्हणजे कुटुंबातील किंवा जवळच्या नात्यातील व्यक्तीकडून उदा. पती, नातेवाईक इत्यादींकडून विवाहित स्त्रीवर वर्चस्व गाजवण्यासाठी किंवा तिला नियंत्रित करण्यासाठी केलेले शारीरिक, मानसिक, लैंगिक किंवा आर्थिक अत्याचाराचे कृत्य होय. कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, २००५ नुसार, यात केवळ मारहाण नाही, तर अपशब्द, धमकावणे, आर्थिक पाठबळ रोखणे आणि जबरदस्ती लैंगिक संबंधांचाही समावेश होतो, ज्याचा उद्देश पीडितेला घाबरवणे हा असतो.


कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायद्याचा उद्देश: महिलांवरील वाढते कौटुंबिक हिंसाचार, हुंडा बळी व पैशासाठी होणाऱ्या अनन्वित छळाला प्रतिबंध घालण्यासाठी सरकारने, २००५ साली स्वतंत्र कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा केला. या कायद्याचे उद्देश खालीलप्रमाणे आहेत.

१) संरक्षण देणे: घरगुती हिंसाचारापासून महिला आणि मुलांचे संरक्षण करणे.

२) कायदेशीर उपाय: पीडित महिलेला सामायिकघर, निवारा आणि पोटगी मिळवून देणे.

३) हिंसाचार थांबवणे: शारीरिक, मानसिक, आर्थिक किंवा लैंगिक अत्याचाराच्या विरोधात तातडीने कार्यवाही करून हिंसाचार थांबवणे.

४) व्यापक व्याख्या: कौटुंबिक हिंसाचाराची व्याप्ती विस्तृत करून केवळ शारीरिकच नव्हे, तर भावनिक आणि आर्थिक शोषणास प्रतिबंध करणे.



५) संविधानिक हक्क: संविधानाने दिलेल्या महिलांच्या अधिकारांचे संरक्षण करणे.

भारतात पुरुष प्रधान संस्कृतीत पुरुषी अहंकार मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे स्त्रियांनी पुरुषांच्या पुढे जाणे, त्यांनी आपले अधिकार व्यक्त करणे, आपल्यावरील अन्यायाचा प्रतिकार करणे पुरुषी अहंकाराला ठेच पोहचविते. म्हणूनच स्त्रियांच्या संरक्षणार्थ केलेल्या कायद्यांना मुळातच समाजाचा विरोध दिसतो. कारण कुटुंबात स्त्रीवर हुकूमत गाजविणे किंवा तिला मारहाण करणे हा पुरुषांचा पारंपरिक हक्क समजला जातो. मात्र स्त्रिया जर बरोबरीची आणि हक्काची भाषा करू लागल्या, अन्याय अत्याचाराचा प्रतिकार करण्यासाठी कायद्याचा आधार घेऊन लढायला लागल्या तर ते पुरुषांसह समाजालाही नको असते आणि म्हणूनच मग स्त्रिया त्यांच्या संरक्षणार्थ केलेल्या कायद्याचा दुरुपयोग करतात अशी समाजात ओरड केली जाते. पण स्त्रियांवर अत्याचार होऊ नये, अत्याचार झाल्यास गुन्हेगारांना कठोर शिक्षा व्हावी यासाठी कायद्याची कडक अंमलबजावणी करण्यात यावी यासाठी फारसे कोणीही आवाज उठवितांना दिसत नाही, हे समाजाचे वास्तव आहे. न्यायालयांनी सुद्धा काही प्रकरणांवरून सरसकट स्त्रिया कायद्याचा गैरवापर करतात असे भाष्य करणे आणि कायद्याच्या कडक अंमलबजावणीला स्थगिती देणे म्हणजे कौटुंबिक हिंसाचाराला प्रोत्साहन देणे तर आहेच पण तो कायद्याचा अवमान देखील आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

भारतात कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, २००५ अंतर्गत गुन्हे सिद्ध होण्याचे किंवा शिक्षा होण्याचे प्रमाण अत्यंत कमी म्हणजे अंदाजे १०-१५% पेक्षा कमी आहे. याची विविध कारणे आहेत.

न्यायालयीन दिरंगाई: प्रकरण न्यायप्रविष्ट झाल्यानंतर चालणारी न्यायालयीन प्रक्रिया क्लिष्ट, अतिविलंबाची आहे, त्यामुळे निर्णयास दिरंगाई होते. साक्षीदाराचा अभाव: घरगुती हिंसाचार चार भिंतींच्या आत होत असल्याने प्रत्यक्षदर्शी साक्षीदार मिळत नाहीत, ज्यामुळे दोषसिद्धी कठीण होते.

दबाव: कौटुंबिक हिंसाचार घरगुती असल्यामुळे आणि मुलबाळ असल्यामुळे अत्याचारग्रस्त स्त्रियांवर कौटुंबिक दबाव टाकून प्रकरणात तडजोड केली जाते, ज्यामुळे खटला पुढे चालत नाही. म्हणजे बहुतेक प्रकरणात शिक्षा होत नाही, मग कायद्याचा दुरुपयोग होतो अशी ओरड करण्यात काही तथ्य आहे का? आपल्या देशात "सत्यमेव जयते" असं म्हटलं जातं, म्हणजे अंतिमतः सत्याचाच विजय होतो. मात्र ज्या संस्थांवर हे ब्रीद पूर्ण करण्याची जबाबदारी आहे, त्या संस्थांची वर्तमान स्थिती पाहिल्यास आता "सत्यमेव जयते" ऐवजी "असत्यमेव जयते" अशी म्हण दृढ होत आहे. अशा बिकट परिस्थितीत अत्याचारग्रस्त स्त्रिया हतबल होतात, त्यांच्यात नैराश्य निर्माण होऊन त्यांच्यातील अत्याचाराविरुद्ध लढण्याची हिंमत व उमेद ढासळून जाते व त्या आत्महत्या करतात. ही समाजाची फार मोठी शोकांतिका आहे. परंतु समस्त अत्याचारग्रस्त स्त्रियांनी हे लक्षात ठेवावे की, अत्याचारामुळे जीवन संपवणे हा मार्ग नाही तर त्याविरुद्ध कायदेशीर मार्गाने अविरत संघर्ष करणे हाच खरा मार्ग आहे, कारण "जीवन हे अनमोल आहे आणि "जान है तो जहाँ है" म्हणून कितीही विपरीत परिस्थिती आली तरी न डगमगता न्यायासाठी आपला लढा निकराने लढत रहावा आणि त्यासाठी समाज, कुटुंब, पोलिस, न्यायव्यवस्था आणि सरकार इत्यादींनी आपली नैतिक जबाबदारी म्हणून अत्याचारग्रस्त महिलांच्या पाठीशी उभे राहून "सत्यमेव जयते" हे ब्रीद सत्यात उतरविण्याची जबाबदारी पार पाडावी हीच अपेक्षा.




समीक्षण

संजय डोंगरे, वाडेगावकर
अकोला मो. ९४२०७०४५८०.

# समतेचे सहप्रवासी: समतेचा जयघोषित जागर


समतेचे सहप्रवासी हा शोधनिबंध संग्रह प्रा. दिलीप वानखडे यांनी अभ्यासनीय केला असून या ग्रंथातून विविध साधनसामग्रीचा केलेल्या सखोल व्यासंगाचे नवीनतम मनन चिंतन अंकेक्षण अनोखे दृढ विचारविश्व आपल्यासमोर रचलेले आहे. ग्रंथाची भाषा विद्यापीठीय अॅकॅडमीक आहे. वाचकांना अंतर्मुख करणारे विषय विशेष अंतर्भूत केल्याने विचारशील आणि सुख्यात झाले आहे. कोणतेही विचार आणि भाषा मूल्यात्मकतेतून चिरकाल टिकतात. त्यात होणारे वैचारिक भाषिक सर्जनशील प्रयोग हे निव्वळ कलात्मक नसतात, नसावेत. त्याच्या नोंदी संशोधनांत विदित होत गेल्यास भाषेची आणि विचारांची उपयुक्तता गरजेचे होत जाते. ही एक अनोखी सौंदर्य भूमी लेखनातून दृश्यमान होऊन ती प्रकाशमान झाली आहे. प्रा. दिलीप वानखडे यांनी या पुस्तकात समताधिष्ठित अभियानांची मांडणी करत या संशोधनपर लेखांतून समाज सुधारकांच्या कार्याचा आढावा समाजशील अंत:करणातून अभ्यासरत स्तराहून प्रक्षेपित केला आहेच. तेही पाहण्यासारखे आहे. समतेच्या महामार्गावर जाऊ पाहणारे अनेक सहप्रवासी आपल्याला दिसतात. या प्रवासात प्रवाशांनी आपापल्या पायवाटा निवडलेल्या असल्या तरी ते ज्या हम रस्त्याला येऊन मिळणारे असतात तोच हा समतेचा महामार्ग आहे. त्यांनी हातात हात घेऊन चालले पाहिजे हे अप्रत्यक्षरित्या सांगणे हे या पुस्तकाचे मर्म आहे . प्रस्तावनाकार प्रा. अशोक पळवेकर सरांनी प्रस्तावनेत सर्वांगीण परामर्शित डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधान कार्याचे योगदान आणि जाणिवपूर्तता लक्षात आणून देत प्रा. दिलीप वानखडे यांनी केलेले नैष्ठिक लेखन असल्याचे निर्देशन केले आहे. बुद्धकालीन स्त्रिया एक आंतरवेध घेतांना लेखकाने थेरीगाथेतील बुद्धकालीन स्त्रियांच्या म्हणजे थेरींच्या थेरीकाव्याचे बाबतीत सखोल चिंतन मांडले आहे. सारांशात कौटुंबिक परिचय देत असतानाच मराठीच्या लेखिकांनी महाप्रजापतीच्या कार्याकडे दुर्लक्ष केल्याची नोंद (पृ. १७) घेतली आहे. पी. जी.रायबोले यांच्या ग्रंथाचा उल्लेखनीय आधार घेतला. रायबोलेंनी तर शिल्पांचे परस्पर अंतर मीटरमध्ये दिलेली आहे. समतेचे सहप्रवासी या पुस्तकामध्ये देखील हे परिश्रम आढळून येतात. तथागतांच्या धम्मात प्रत्येक स्त्रीला आपली बौद्धिक क्षमता सिद्ध करण्याचे स्वातंत्र्य असल्याचे जे म्हटले गेलेले आहे (पृ.२४ ) ते सर्वश्रूत आहे. तो खऱ्या अर्थाने खरे तर भारतीय घटनेत अंतर्भूत झालेल्या स्त्रीस्वातंत्र्याचा प्रारंभच आहे.हेही या ठिकाणी नमुद केले पाहिजे. क्रांतिकारक महात्मा बसवेश्वर यांना दक्षिण भारतात प्रती गौतम बुद्ध म्हटले जाणे लक्षात घेतले आणि ते स्वागतार्ह असले तरी त्यातून बसवेश्वरांची महनीयता सांगण्याचा प्रयास आहे. यात काही शंका नाही.ते अप्रस्तुतही नाही. म. फुले यांनी जशी निर्मिकाची निर्मिती केली, तसेच बसवेश्वरांनीही भक्ताला भगवंतापर्यंत जाण्यासाठी कुठल्याही मध्यस्थीची निकड असता कामा नये असे (पृ.३४ ) म्हटले. जातीपातीतला भेदभाव मिटवताना सर्वांना समान संधी दिली.. बसवेश्वरांचे संक्षिप्त चरित्रात्मक ऐतिहासिकत्व विशद करत बुद्धीप्रामाण्यवादी असण्याचे दाखले दिले. कायक ,अनुभव मंटप,दासोह , शरण - शरणी,




इष्टलींग इत्यादी संज्ञा सिद्धांताशी वाचकांसह परिचित होत वारकरी संप्रदायाशी बसवेश्वरांच्या लिंगायत धर्माचा असलेला संबंध स्पष्ट होतो. म्हणजे तो बुद्धापर्यंत जाणारा आहे. क्रांतीबा फुले यांचा सामाजिक दृष्टिकोन हा एक माणूस म्हणून स्त्रीचा विचार करणे. सोबत सावित्रीबाईची खंबीर साथ. प्राथमिक शाळेतील विद्यार्थिनींचा योग्य दिशेने झालेला विकास. राष्ट्रवाद. विधवा पुनर्विवाह. अस्पृश्यांच्या अस्मितेसाठी लढा. विज्ञानवादी बुद्धीप्रामाण्यवादी दृष्टीकोन. शेतकऱ्यांविषयी आस्था. इत्यादी कार्ये ही स्वत्वपूर्वक केली आहेत. ही प्रबोधक मांडणी मुळातून वाचणे रोचक आणि अभ्यासणीय असतांनाच संग्रहणीय आहे. वाचकांनी ते केलेच पाहिजे. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे समाजभान फुलेंनी विशाल केले. मुलींच्या शिक्षणाने सावित्रीबाई त्यांच्या माता झाल्या. त्यांच्या या कार्याची दखल घेत ब्रिटिश शासनाच्या वतीने कॅन्डी यांनी केलेला फुले दांपत्याचा सत्कार.. बालहत्या प्रतिबंधक गृह स्थापन करून ३५ ब्राह्मण विधवा स्त्रियांची केलेली बाळंतपणं.. न्हाव्यांचा संप.. ही आणि अनेकही बहूवीध कार्ये लिखित स्वरूपात दर्शवीता आलेले आहेत.. ही नितीमान तत्वज्ञ मानवता नव्हे काय? लोकराजा छत्रपती शाहू यांनी लोकशाही पद्धतीने राज्यकारभार केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ अशा समर्पक शब्दात शाहू महाराज यांचे वर्णन केले आहे. वी.रा. शिंदे यांनी सर्वांग पूर्ण राष्ट्रपुरुष असे म्हटले. आरक्षणाच्या आवश्यकतेचे उदाहरण महाराजांनी घोड्याची चंदी दाखवून अभ्यंकरांना पटवून दिले. हे भाई माधवराव बागल यांचे उद्धरण जसेच्या तसेच वाचले की वस्तूपाठाच्या गंभीर्यात्मक सौंदर्यात वाढ झाल्याशिवाय राहणार नाही. रा.ब.पी. सी. पाटील हे देखील शाहू महाराजांच्या शिष्यवृत्तीने शिकले पण त्याचे सामाजिक कार्य इतरत्र कुठेही फारसे वाचनात येत नाही. महिलांच्या न्याय्य हक्कांसाठी लढणारे बाबासाहेब आंबेडकर महिलांना प्रगतीच्या मार्गावर जाण्यासाठी आश्वस्त करतात. या दृष्टीने समाजाने दलित स्त्री कष्टकरी मजूर स्त्रियांची ऐकलेली हाक हिंदू कोड बिल आणि संविधानात केलेल्या तरतूदीने दृश्यमान होते. हा सहेतुक निर्देश वाचताना मन भरून येते. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर भाष्य करणारे आंबेडकर.. सरकारच्या कर धोरणावर टीका करणारे आंबेडकर.. खोती मुक्ती आंदोलन, बहुउद्देशीय नदी प्रकल्प, शेतीकडे उद्योग म्हणून पाहण्याचा बाबासाहेबांचा दृष्टिकोन, बाबासाहेबांनी सुचवलेले पूरक धंदे- उद्योगधंदे, एवढे निवडक कार्यांचे जरी वाचन केले तरी ऊर अभिमानाने भरून येतो. पुढे बाबासाहेबांनी सुचवलेल्या उपाययोजनांचे ठळक निर्देश तर आपल्या अंगावर आपल्या महनीय संस्कृतीचे अस्तर शिवतात. बाबासाहेब आंबेडकर हा विषयच असा आहे की कितीही वाचले तरीही न संपणारा.... डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय संविधानातील योगदान भारतमातेला उच्चललामांकित करणारे आहे. बाबासाहेबांचे संविधान सभेवर निवडून जाणे हा प्रसंग न विसरता येणारा.... बाबासाहेबांची विश्वविख्यात विद्वत्ता .जाज्वल्य राष्ट्रप्रेम. निष्कलंक सचोटी. आणि समस्त मानवते प्रती अमर्यादा करूणा मैत्री.. सबंध जगाला दिसली आहे. लेखकालाही दिसली आहे. आपल्यालाही ती पाहता येऊ शकते. या दिसण्यात समतेचा जागर जयघोषित होताना दिसतो. समतेचा प्रारंभ जसा स्वतःच्या घरापासून होतो, तसाच या महापुरुषांनी तो जसाच्या तसाच अधिनियमित केलेला आहे. १) स्त्री २) अस्पृश्य ३) शिक्षण ४)संपत्ती ५) विवाह(आंतरजातीय) ६)पुनर्विवाह ७) घटस्फोट ८) अनिष्ट चालीरीती ९) अंधश्रद्धा अशा सामाजिक प्रश्नांवर हे महामानव लढले.

कालकथीत डॉ. रामदास इंगळे यांचे प्रेरणेशी संवाद असे जे पुस्तक आहे त्यात इंगळे सरांनी संत कबीर यांच्यावर सुद्धा लेख लिहिला आहे. ते सुद्धा समतेचे प्रवाशीच.. माझे परममित्र पँथर भीमराव शृंगारे यांचा सन्माननीय उल्लेख या पुस्तकात लेखकाने केलेला आहे. हा प्रवास ...समतावादी विचार प्रवाहाला समृद्ध करीत बळ देण्याचे सामर्थ्य या पुस्तकात नक्कीच आहे...लेखकाच्या पुढील वाटचालीस हार्दिक मंगल कामना..

# अकोल्यातील दिग्दर्शक महेंद्र बोरकर यांचा 'गल्ली नं. १३' एक भन्नाट सिनेमॅटिक अनुभव!




आरबी सिनेमॅटिक्स, पिकल एंटरटेन्मेंटच्या सहकार्याने सादर करत आहे 'गल्ली नं. १३' हा बहुप्रतिक्षित मराठी चित्रपट. सुरुवातीपासूनच उत्सुकता निर्माण करणाऱ्या या चित्रपटाचे पहिले पोस्टर नुकतेच प्रदर्शित करण्यात आले असून, प्रेक्षकांमध्ये कुतूहलाचे वातावरण निर्माण झाले आहे. पोस्टरमध्ये नायक पाठमोरा उभा असून, त्याचा स्टायलिश लूक आणि मागील बाजूस वीज पडल्याचा इफेक्ट त्याच्या व्यक्तिमत्त्वातील रहस्य अधोरेखित करतो. शहराची पार्श्वभूमी आणि गूढ मांडणी यामुळे चित्रपटाबद्दलची उत्सुकता अधिकच वाढते. या चित्रपटाचे दिग्दर्शन, पटकथा आणि संवाद लेखन अकोल्यातील महेंद्र रामभाऊ बोरकर यांनी केले आहे. मराठी आणि हिंदी मालिकांमध्ये लेखनाचा मोठा अनुभव असलेल्या बोरकर यांची ही एक महत्त्वाकांक्षी कलाकृती मानली जात आहे. त्यांच्या 'ब्युटिफाईंग रिलेशन्स' या पुस्तकाला मिळालेला गोल्डन बुक पुरस्कार त्यांच्या लेखनशैलीची साक्ष देतो. निर्माते रामनाथ बोडके आणि राजश्री बडगुजर यांनी या चित्रपटाची निर्मिती केली असून, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात सक्रिय असलेल्या बोडके यांची ही पहिलीच निर्मिती आहे. 'गल्ली नं. १३' हा चित्रपट तरुणाईवर आधारित असून, कुटुंबसंस्था आणि आजच्या समाजव्यवस्थेतील विविध पैलूंवर भाष्य करणारा आहे. पोस्टरमधून कथानकाचा अंदाज येत नसला तरी, एक वेगळा आणि रोमहर्षक अनुभव प्रेक्षकांना मिळणार यात शंका नाही. मराठी सिनेसृष्टीत आशयघन आणि वेगळ्या धाटणीच्या चित्रपटांच्या परंपरेला पुढे नेत 'गल्ली नं. १३' आपली वेगळी छाप सोडेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# मीनाक्षी शेषाद्रींनी ३८ वर्षांपूर्वीच्या स्वत:च्याच गाण्यावर केला डान्स

बॉलीवूडचे अनेक कलाकार सोशल मीडियावर सक्रिय असतात. ते त्यांचे फोटो, व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर करतात. अनेक जण विनोदी रील्स शेअर करीत चाहत्यांचे मनोरंजन करतात. काही जण गाण्याचे, डान्सचे व्हिडीओ शेअर करतात. तर अनेक जण शूटिंगदरम्यानचे फोटो, व्हिडीओ शेअर करताना दिसतात.

या कलाकारांमध्ये भाग्यश्री, रितेश देशमुख-जिनिलीया देशमुख तसेच मीनाक्षी शेषाद्री यांचा समावेश आहे. मीनाक्षी शेषाद्री यांनी नुकताच एक व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. त्यांच्या या व्हिडीओची चर्चा होताना दिसत आहे. हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. चाहते मीनाक्षी शेषाद्री यांच्यावर कौतुकाचा वर्षाव करत असल्याचे पाहायला मिळत आहे.

मीनाक्षी शेषाद्री यांनी शहेनशहा चित्रपटातील हे यू या गाण्यावर डान्स केला आहे. १९८८ साली प्रदर्शित झालेल्या शहेनशहा सिनेमात अमिताभ बच्चन यांनी प्रमुख भूमिका साकारली होती. विशेष म्हणजे या सिनेमात मीनाक्षी शेषाद्री प्रमुख भूमिकेत दिसल्या होत्या. आता त्यांनी ३८ वर्षांनंतर त्यांच्या स्वत:च्या गाणे



रिक्रिएट केले आहे.

मीनाक्षी शेषाद्री यांनी सुंदर लाल रंगाचा ड्रेस परिधान केला आहे. त्यांच्या डान्स स्टेप्स, चेहऱ्यावरील हावभाव, तसेच त्यांचे हसू या सगळ्यामुळे चाहत्यांना त्यांच्या ८० च्या दशकातील त्यांच्या भूमिकांची, गाण्यांची आठवण येत असल्याचे कमेंट्समध्ये पाहायला मिळत आहेत. हा व्हिडीओ शेअर करताना त्यांनी लिहिले, ''हे यू, हे माझ्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काही गाण्यांपैकी एक आहे. शहेनशहा चित्रपटामुळे मला पहिल्यांदाच अमिताभ बच्चन यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळाली होती. हे गाणे आशा भोसले यांनी गायले आहे. या चित्रपटाचा सेट उत्तम होता. कपडेही छान होते आणि कमल मास्टर यांची कोरिओग्राफी तर कमाल होती.''



आगळे वेगळे

विजय लिमये
मो. 9326040204

# फुलांचा जन्म

आज आपण झाडावर तऱ्हेतऱ्हेची फुले पाहतो. निसर्गाचा एक काळ असाही होता की त्या काळच्या वनस्पतींना फुले येतच नव्हती. उत्क्रांतीची अनेक पर्व झाली व झाडांना फुले येऊ लागली.

पृथ्वीवर कीटकांचा वावर सुरू झाला, आणि त्यांच्या अफाट प्रजनन शक्तीने त्यांची संख्या झपाट्याने वाढू लागली, तसेच अन्न म्हणून त्यांनी वनस्पतींना खायला सुरवात केली होतीच. हा काळ एकंदरीत वनस्पतीच्या लेखी दुर्दैवी काळ म्हणावा लागेल. त्यांचे या ग्रहावर अनभिषिक्त साम्राज्य होते त्यावर पहिला घाव किटकांनी घातला. सत्ता स्थापनेचे एक प्रचंड मोठे युद्ध वनस्पती व किटकांच्यात सुरू झाले, हे आपण पृथ्वीवरचे पहिले जागतिक युद्ध म्हणू शकतो. यात वनस्पतींचा टिकाव लागणे शक्य नव्हते. प्रजनन क्षमतेत वनस्पतींना अनेक मर्यादा होत्या, एक तर त्यांना पाण्याची आवश्यकता होती, त्यावर मात करत कमी पाण्याच्या क्षेत्रात त्यांनी मुळे जरूर रोवली होती पण तिथे फारशी वाढ होणार नव्हती कारण अलैंगिक प्रजनन मुळे दूर दूर जाऊन वस्ती वाढवायची क्षमता नव्हती. हे होताना अचानक किटकांची धाड पडली, त्यांचे गणित चुकले व हरित सृष्टीने सपशेल हार मानली. झाडांना संवेदना असतात हे ही या लेखातून आता सिद्ध होईल. आता हार मानली म्हणजे मांडलिकत्व पत्करणे आलेच. पण मांडलिकत्व पत्करणे म्हणजे आपल्यातील काही बांधवाना किटकांचे भक्ष म्हणून स्वाधीन करणे आलेच, हे किती काळ चालणार? शेवटी त्यांनी किटकांशी तह केला, तहाची बोलणी अश्या रितीने मांडली की वनस्पतींचे पारडे आपसूक जड राहील. तसेही तो पक्ष दुबळा असल्याने किटक विश्वाला काही फारसा फरक पडणार नव्हता. किटकांना जे हवे ते द्यायचे वनस्पतींनी कबूल केले, त्या बदल्यात किटकांनी वनस्पती प्रजाती नष्ट होणार नाहीत याची जबाबदारी घ्यायची. खरं तर हा तह होण्याआधीच वनस्पतींनी आत्मसुरक्षेसाठी आपल्यात जनुकीय बदल घडवून आणण्यास सुरवात केलीच होती. सुरवातीला संरक्षण म्हणून, त्यांनी पानात चीक तयार केला, पाने कडू बनवली, आपल्याकडे किटक आकर्षित न व्हावे म्हणून पाने वाईट चवीची बनवली. किटक वर्ग ही चतुर होता, त्यांनी या सर्व गनिमिकाव्यांना चोख उत्तर देत, वनस्पती विश्वाला सळो की पळो करून सोडले. या गदारोळात अनेक किटकांनी प्रमाणापेक्षा जास्त हरित सृष्टी कमी होऊ लागली हे पाहून किटक विश्वातील इतर जातीच्या किटकांना खायला सुरवात केली ज्यातून त्यांची प्रोटिनची गरज पूर्ण होऊ लागली. जे बदल वनस्पतींनी केले त्याने फारसा फरक पडणार नाही, हे लक्षात आल्यावर व तहाची बोलणी यशस्वी झाल्यावर, परत एकदा जनुकीय बदल घडवून आणले गेले, आता विरोध करण्याऐवजी समेट घडून ''सिमबायोसिस म्हणजे सहजीवन'' या प्रकाराचा जन्म झाला.

इथे या हिरव्या वनस्पतींना पानांच्या सोबत अचानक विविध रंग असलेला नवीन अवयव निर्माण झाला, आज आपण त्याला फुल या नावाने ओळखतो. आता झाडात अनेक जनुकीय बदल वारंवार घडू लागले, सुरवातीला फुले आली पण त्यात मधू किंवा मकरंद नव्हता, नुसतीच रंगी बेरंगी फुले आली. मग त्यात स्त्री व पुंकेसर तयार होऊ लागले, व ओघाने बीज तयार झाले, थोडक्यात उभयलैगिंगतेने जन्म घेण्यास सुरुवात केली, ज्याचा उपयोग करून प्रजनन शक्ती वाढवणे ही योजना होती. इथे वनस्पतींचा खूप मोठा दूरदर्शीपणा आपल्याला



दिसून येतो, आणि त्यांना त्याचा महत्वाचा फायदा होणार होता, तो म्हणजे दूर दूर जाऊन स्वतःच्या प्रजातीची संख्या वाढवणे सहज शक्य होणार होते. हा दुरदर्शीपणा असलातरी यात खूप धोका ही होताच, कारण जनुकीय बदल वारंवार होऊ लागले होते, भविष्यात याचे काय परिणाम होणार याची काहीही कल्पना नव्हती. समजा, एखाद्या वैज्ञानिकाने शोध लावून भला मोठा कारखाना सुरू करण्यासारखाच हा प्रयोग होता. म्हणजे शोध लावताना अनेक अडचणींचा सामना करायचा, त्याहून जास्त अडचणी कारखाना बनवताना, व बनवलेली वस्तू बाजारात विकली जाईलच याची काही शाश्वती नाही, असाच काहीसा हा प्रकार होता. हे बदल घडत असताना अचानक काही वनस्पतींनी माघार घेतली, त्यांना तो बदल रुचला नाही म्हणूया किंवा त्यांना वाटले हा क्रांतिकारक बदल यशस्वी होणार नाही, कशाला नसत्या भानगडीत पडा, जे चाललंय ते सुरळीत चालू आहे तसेच राहूया, थोडक्यात निम्न माध्यमवर्गी विचारसरणी म्हणूया. त्यांनी अलैंगिक प्रजननच चालू ठेवले, इथे माणसासारखी धर-सोड वृत्ती त्यांच्यातही आहे हे स्पष्ट होते. ही स्थिती आपल्याला गुलाब, मोगरा, जास्वंद वगैरे फुल वनस्पतीमध्ये आजही पाहायला मिळते, यामुळे आपण आज पाहतो की अनेक प्रजातीमध्ये फुले आहेत, पण स्त्री व पुंकेसर नीट बनले नाहीत, व पर्यायाने बीज ही तयार होत नाही. काही वनस्पती मात्र धीट होत्या त्यांनी या जनुकीय क्रांतीला साथ दिली व प्रयोग पुढे रेटत नेला. त्यांना कल्पना रुचली होती, व पुढचे प्रयोग करायला सुरवातही केली. तह झालेला होताच हे वर सांगितले आहेच, त्याप्रमाणे किटकांना काहीतरी द्यायचे व आपला कार्यभाग उरकून घ्यायचा ही धूर्त खेळी खेळण्याची वेळ आली. किटकांना जगण्यासाठी ग्लुकोज व प्रोटीन इतकेच हवे असते, हे ओळखून झाडांनी मकरंद बनवला, व तो फुलात अगदी खोलवर ठेवला, जिथून घेताना नकळत किटकांच्या अंगाला पराग कण चिकटतील अशी योजना केली गेली. मकरंद गोड बनवल्यामुळे किटकांना ग्लुकोज मिळू लागले, स्वतंत्ररीत्या साखरेचा पृथ्वीवर उगम येथून झाला असे म्हणूया. किटकांना साखर सहज मिळाल्यावर त्यांची चेतना वाढली, पचायला जटिल व कठीण अश्या पानांना खाण्यापेक्षा मधुरस हा पचायला सोपा व त्वरित ताकद देणारा आहे हे किटकांच्या लक्षात आले. त्यांच्या शरीर रचनेने, आयतं मिळाल्यावर कशाला कष्ट करा या सृष्टीच्या नियमाप्रमाणे आपले पानांच्यावरचे लक्ष हटवले व मध खाण्यावर भर दिला. याला म्हणतात चतुराई. आता अनेक किटक जाती पाने खाणे विसरल्या, व वनस्पतीची पुन्हा झपाट्याने वाढ होऊ लागली. हा पाने न खाण्याचा फायदा अलैंगिक वनस्पतींना पण झाला, त्यामुळे त्याही सुखावल्या. वनस्पतींना मोठ्या प्रमाणात फुले येऊ लागली, फुलात मकरंद तयार होऊ लागला, किटक मकरंद पिऊन तृप्त होऊ लागले, सोबत न कळत परागसिंचन होऊन बीज तयार होऊ लागले. पाने वाचली त्यामुळे वनस्पती टिकाव धरू लागल्या, त्यांची जगण्याची कालमर्यादा वाढू लागली. पुन्हा एकदा पृथ्वीवर संतुलन निर्माण झाले.

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 352

आकारणे
इजाबिजा
करवला
गवगवा
जगबुडी
जपमाळ
जमानत
टमाटर
तकलादू
दानवता
नामावली
नायगरा
पुनर्वसु
पुरचुंडी
बहुतेक
मधुकर
मणगट
यजमान
रामायण
लुटमार
सामाईक

**पाच अक्षरी**

गणेशवात
पारिजातक
भगवा झेंडा
मनमोडणे
लाभकारक
स्वप्नी नसणे

**अन्य अक्षरी**

जगत पालक
जवळ जवळ
मोरुची मावशी
मनी वसे ते स्वप्नी दिसे
(उत्तर पुढील अंकी)

**संकेत शब्द:—**

**दोन अक्षरी**

अधु
कस
खुजा
गय
गर
गवा
जप्त
झोत
तमा
तव
तवा
तह
दिया
नग
नया
नाद
नाला
पत
पाट
पार
पोत
रग
रवा
रिता
लतवाव
शत
शनी
साल
हुत

**तीन अक्षरी**

आलय
कराची
करार
खडावा
खलाशी
गवत
जवान
झालर
झेंगट
टपाल
टवाळ
तगर
तपन
तरल
दरड
द्वादशी
नवस
पाईक
पावली
पोहरा
बुरशी
मावशी
माहुत
रगड
रहाट
वतन
वऱ्हाडी
शीतल
सताड
साकार
सुदामा
स्वागत
हायसे

**चार अक्षरी**

अलबत
अलगुजा

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स | मा | वे | श | | वि | त | र | क | | स | मु | द्र | मं | थ | न |
| मा | | | र | म | ज | न | | र | क्ष | क | | वि | | क | र |
| ज | ल | कुं | भ | | र | स | द | | मा | ळी | | भ | ग | वा | |
| क्र | | भ | | अ | | खे | | भा | | क | ला | व | ती | | शी |
| र्य | | मे | ज | वा | नी | | रा | ज | स्व | | ज | न | | पा | व |
| | म | ळ | | स्त | | आ | | क | त्य | | हे | | चि | त्र | |
| | दि | | प | व | न | च | क्री | | वि | रा | म | चि | न्ह | | भा |
| बा | रा | ख | डी | | स | म | | आ | रा | स | | ता | | ए | क |
| बा | | ज | त | क | | न | | घा | म | | गौ | री | शं | क | र |
| आ | ई | ना | | द | मा | | पा | त | | पा | र | | क्र | ल | |
| म | | | क्र | | न | क्र | र | | हि | र | व | ळ | | कें | ब |
| टे | ब | ल | टे | नि | स | | स | ड्ढा | | द | | | घो | ख | |
| | ल | | के | | स | | म | | द | र्श | | चा | | | भा |
| धुं | वा | धा | र | | रो | हि | णी | | शा | क | | म | त | दा | र |
| मा | न | व | | ग | व | त | | पा | न | | भा | र | वा | ह | क |
| रा | | क | ला | | र | | उ | प | न | य | न | | ना | | स |

Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 733

**—: आडवे संकेत :—**

1) सदोदीत नैराश्याच्या गोष्टी करणारा, मनात नैराश्य भरलेला
5) निस्वार्थपणे दुसऱ्यांवर केलेले उपकार
8) केवळ चेहरा व नाव माहित असणे, अगदी साधी ओळख असणे
11) परमेश्वर (उर्दू)
12) तपाचे आचरण
13) कर, हस्त
14) खेळातील सोबती, घरकाम करणारा नोकर
15) एक तंतू वाद्य
17) लग्न समारंभात आलेली मंडळी
18) जाळण्यासाठी वापरण्यात येणारी इंधन सामग्री
20) कापसाचे सूत कातण्याचा रहाट
22) प्रथम, पूर्वीचा
23) कलाबतूचे
24) अभिनेत्री काजोलची आई
25) ज्याचा कुणीही पालक नाही असा, निराश्रीत
26) पैज, परंतु
28) खारट पदार्थ, मीठ
30) हुरूप, जोश, त्वेष
31अ) जवळीक, एकोपा
31) शिकलेल्या भागाची पुन:पुन: आवृत्ती करणे
32) राख, रक्षण
33) संपलेले, शेवट
34) सर्वात श्रेष्ठ
35) धाक, दरारा, जरब
37) एक मोठे वजनमाप
38) मानव, मनुष्य
39) बारा राशींपैकी एक राशी
41) नंतर, वापस, पाठीमागे
43) ओळ, रेघ (हिं)
46) भविष्यकाळासाठी केलेली आर्थिक तजवीज
49) अनियंत्रित, बंधन नसलेले
51) संस्थेत पैश्यांचे व्यवहार सांभाळणारा
53) कोणत्याही पक्षाची बाजू न घेणारा
54) ताण, पकड
55) महिना, मास
56) लढाऊ जातीचा मनुष्य
58) आपले रूप आपल्यालाच दाखविणारा
59) विशेष ओळख, जवळीक साधणे
60) गर्व, अभिमान (उर्दू)
62) आपले एक भूतपूर्व पंतप्रधान
64) राखड, भस्म
65) फार बारीक व मऊ (कापड)
66) एक संख्या
68) पाताळातील एका मुख्य नागाचे नाव
70) मृत्यूदेवता
71) स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान
75) जनन, उत्पत्ती
76) भय, भीती (हिं)
77) काळजीपूर्वक संगोपन करणे
80) लक्ष चित्त
81) हळूच मान पुढे करून बघणे
82) न मोडता लावणारे

**—: उभे संकेत :—**

1) दूर करणे, परिहार
2) जाणे—येणे, वहिवाट
3) शरीरातील त्रिदोषांपैकी एक
4) दिव्याची ज्योत
5) पृथ्वीभोवतालचे वातावरण
6) ही संज्ञा फार उंच आणि खणखणीत आवाजाकरिता वापरतात
7) सापाने त्यागलेली त्वचा
8) मुखोद्गत घेतलेली परीक्षा
9) प्रवाह
10) मालाची विक्री
14) निकड, आवश्यकता
16) जुळवणी, व्यवस्था
19) दुसरा करतो त्याप्रमाणे करणे, नक्कल
21) माघ शुद्ध सप्तमी
25) अवकाश, फुरसत
27) न्यूनता, कमतरता
29) विष्णू पत्नी
31) मोठ्या अधिकाराच्या किंवा मानाच्या जागी असलेला
36) कारकुनी डावपेचाने दुसऱ्याची मानहानी करणारा
37) मृत्यू
38) अतिशय श्रीमंत मनुष्य
40) नम्र, झुकलेला
42) घोड्यांचे निवासस्थान
44) सर्वांनी मिळून गायिलेले गीत
45) समारोह किंवा संस्थेतील मुख्य व्यक्ती
47) रमलेला, निमग्न
48) अपुरे भांडवल, व्यवसायासाठी पुरेशी नसलेली पुंजी
50) भाजीचा एक कंद प्रकार
52) पुरातनकालीन परशुरामाचे एक विशेषण
55) किंमती जिन्नस
57) युगाचा शेवट
59) समोर, प्रत्यक्ष
61) घाव
62) रामनवमीच्या उत्सवाचे कारण
63) परमुलूखात एकजूट करून राहिलेले लोक
67) पक्ष्यांची किलबिल
68) झाडाच्या बुंध्यापासची जागा
69) दाणा, अंश
72) अत्यंत प्रिय असलेला
73) मुस्लिमांनी केलेली मक्का मदिन्याची यात्रा
74) दौड, पळणे
75) लोक, प्रजा
78) नवीन
79) पोपट, राघु (उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शु | भ | स्य | शी | घ्र | म | | आ | व | र्त | न | | क | र्त | व्य | |
| भ | र | | | | ह | | ठ | | | र्स | | ला | | स्त | व |
| का | ड | वा | त | | त्त | | व | ल | य | | अ | वं | ती | | खा |
| म | | द | | स | म | र्प | ण | | मु | ष्टी | घा | त | | सा | र |
| ना | ता | ळ | | | सा | | | म | ना | | डी | | गो | ठा | |
| | ट | | सा | व | धा | न | | ळ | | शि | सा | री | | | ग |
| बे | वा | र | स | | र | ग | ड | म | ल्ली | | ध | म | का | व | णे |
| | | | र | म | ण | | का | ळ | | उ | णे | | रा | | श |
| वि | का | स | | स | वि | स्त | र | | को | प | | र | वा | ना | |
| क | स | क | स | | भा | र | | घ | स | ट | | म | स | | क |
| णे | | ळी | | रा | ज्य | | व | सा | | सुं | ग | णे | | गा | र |
| | आ | क | र्ष | क | | गो | | रा | | भ | व | | पा | ल | व |
| पा | ड | | | ट | क | म | क | | तां | | ळी | | | प | त |
| र | व | | रे | | रु | | ल्प | | बु | | | वि | रा | ट | |
| द | ळ | ण | व | ळ | ण | | त | ब | ल | जी | | र | ग | | सा |
| | ण | | ती | | | त | रु | | | भ | का | स | | दे | व |

Uday Munde - 8446302691

# काँग्रेसकडून 'हप्ता'वाढीसाठी उद्योगांना विरोध

## वाळू व दारू तस्करीत काँग्रेस नेते, भाजपाकडून घणाघात

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**गडचिरोली, दि. ३१ :** जिल्ह्यातील शेतकरी प्रश्नांच्या नावाखाली काँग्रेसकडून सातत्याने आंदोलन आणि बेछूट आरोप करण्यात येत आहे. यामागे काँग्रेसचा उद्योगांना विरोध करून कंपन्यांकडून 'हप्ता' वसुली करणे, हा एकमेव उद्देश आहे. कोणत्याही पुराव्याशिवाय भाजपच्या नेत्यांवर काँग्रेसकडून भागीदारीचा आरोप करण्यात येत आहे, मात्र, त्यांचेच वरिष्ठ नेते जिल्ह्यात वाळू आणि दारू तस्करीमागचे खरे 'आका' असल्याची टीका भाजपने केली आहे.



चामोर्शी तालुक्यातील भेंडाळा परिसरातील १४ गावांच्या एमआयडीसी भूसंपादनावरून काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केलेल्या आरोपांना भाजपने ३१ मार्च रोजी पत्रकार परिषद घेऊन प्रत्युत्तर दिले. चामोर्शीतील उद्योगांत भाजप नेत्यांची भागीदारी असल्याचा गंभीर आरोपही वडेट्टीवार यांनी केला होता.

या आरोपांचा समाचार घेण्यासाठी भाजपने आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत आमदार डॉ. मिलिंद नरोटे, माजी खासदार अशोक नेते आणि जिल्हाध्यक्ष रमेश बारसागडे यांनी काँग्रेसच्या नीतीवर जोरदार टीका केली. केवळ प्रसिद्धीच्या हव्यासापोटी मुंडण करून घेण्यापेक्षा, काँग्रेसने आजवर शेतकऱ्यांच्या हिताचे नेमके काय केले, याचे उत्तर द्यावे, असे आव्हान डॉ. नरोटे यांनी दिले.

जिल्ह्यात सध्या मोठ्या प्रमाणावर विकासकामे आणि औद्योगिक प्रकल्प सुरू असताना काँग्रेस नेत्यांना तो विकास पाहवत नाही. केवळ स्वतःचे राजकीय महत्त्व टिकवण्यासाठी प्रशासनावर दबाव निर्माण करतात आणि 'हप्ते' वाढवून घेतात. त्यासाठीच हा सर्व खटाटोप आहे. बैठकांचा बनाव रचून शेतकऱ्यांचा विश्वासघात करणे हा काँग्रेसचा जुनाच धंदा आहे. उद्योगांसाठी जमीन घेताना शेतकऱ्यांना विचारल्याशिवाय कुणीही त्यांच्या जमिनीला हात लावणार नाही. तसे केल्यास भाजप सर्वात आधी विरोध करेल.

विकासकामांना विरोध करून काँग्रेस जिल्ह्याला मागे नेण्याचे काम करत असल्याचे नेत्यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेला माजी आमदार डॉ. नामदेव उसेंडी, माजी जिल्हाअध्यक्ष प्रशांत वाघरे, नगराध्यक्षा ॲड. प्रणोती निंबोरकर, ज्येष्ठ नेते रमेश भुरसे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

### वाळू व दारू तस्करीला कुणाचे पाठबळ–आमदार नरोटे

मागील दशकभरापासून गडचिरोली जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात अवैध वाळू तस्करी सुरु आहे. सोबतच दररोज अवैध दारूची खेप जिल्ह्यात येत असते. काही महिन्यांपूर्वी एका कुख्यात दारू तस्कराला पोलिसांनी अटक केली होती. तो तस्कर कुणाच्या व्यावसायिक भागीदार आहे, त्याला सोडवण्यासाठी पोलीस अधिकाऱ्यांवर कोणत्या नेत्याने दमदाटी केली, हे जगजाहीर आहे. सोबत खनिज वाहतूक करणाऱ्या वाहनांत कोणाची भागीदारी आहे, हे जिल्हावासीयांना नव्याने सांगण्याची गरज नाही. त्यामुळे बेछूट आरोप करून अशा नेत्यांना काय साध्य करायचे असते ते सर्वांना चांगलेच ठाऊक आहे. असा आरोप आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांनी केला.

## दैनिक अजिंक्य भारतच्या दणक्याने पंतप्रधान आवास योजनेच्या लाभार्थ्यांचे हप्ते जमा

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**देऊळगाव राजा, दि. ३१ :** पंतप्रधान आवास योजना राबविण्यात येत असतांना मोठा गाजावाजा करून टप्पा क्रमांक एक व दोन अंतर्गत घरकुल पात्र लाभार्थी यांना अनुदान देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती परंतु एक वर्षांपासून केवळ हप्ता आज मिळेल उद्या मिळेल हे आश्वासन दिले जात होते त्यामुळे वैतागून लाभार्थी यांनी पंचायत समिती कार्यालय गाठून १०एप्रिल पर्यंत हप्ते न मिळाल्यास आत्मदहन करण्याचा इशारा दिला होता व दैनिक अजिंक्य भारतने आपल्या २७ मार्चच्या अंकात ''पंतप्रधान आवास योजनेच्या घरकुल लाभार्थ्यांची फरफट सुरुच ,१० एप्रिल पर्यंत घरकुल हप्ते न मिळाल्यास आत्मदनाचा इशारा.''या मंथळ्याखाली वृत्त प्रकाशित करताच सदर त्रस्त घरकुल लाभार्थी यांचे ३० मार्च रोजी दुपारी घरकुल लाभाचे हप्ते जमा होताच त्यांनी दैनिक अजिंक्य भारत वृत्ताचा दणका व दैनिक अजिंक्य भारत चे आभार मानण्यासाठी भ्रमणध्वनी वरून संपर्क साधून आपली समस्या निकाली काढल्याबद्दल आभार मानले.

देऊळगाव राजा पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या पाडळी शिंदे येथील पंतप्रधान आवास योजना घरकुल लाभार्थी याना गेल्या एक वर्षा पूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते ऑनलाईन उपस्थिती दर्शवून जिल्हा परिषद शाळा येथे एका क्लीक वर हप्ते जमा करण्याचे परंतु एक वर्षभरात केवळ खाते के वाय सी नवीन पोस्ट खाते व आधार अपडेट या बाबी प्रशासन लाभार्थी वर्ग याना करण्यासाठी सांगत होते व लाभार्थी यांनी सदर बाबीची पूर्तता करून सुद्दा घरकुल लाभ मिळत नसल्याने सामाजिक कार्यकर्ते यांना घेऊन पंचायत समिती देऊळगाव राजा येथे जाऊन त्या ठिकाणी उपस्थित सहायक गटविकास अधिकारी डॉ सुधाकर वायाळ यांना आपबीती सांगून ही बाब केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांना सुद्दा भ्रमणध्वनी वरून देण्यात आली त्यानंतर तातडीने प्रशासन यांनी हालचाल सुरू केली व त्यास दैनिक अजिंक्य भारतने आपल्या वृत्तातून प्रसारित करताच लगेच ३० मार्चला त्या लाभार्थी वर्गांचे हप्ते जमा झाले लाभार्थी यांनी तातडीने ही बाब अजिंक्य भारत प्रतिनिधी यांना सांगून आभार मानले.

## नातवाप्रमाणेच नातीलाही नोकरीचा हक्क: उच्च न्यायालयाचा प्रकल्पग्रस्तांबाबत महत्त्वपूर्ण निर्णय

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**नागपूर, दि. ३१ :** जमीन संपादनामुळे बाधित कुटुंबांतील नातवाला जर नोकरी देता येते तर नातीला नोकरी नाकारण्याचे काहीही कारण नाही. नात ही सुद्धा नातवाप्रमाणेच कुटुंबातील सदस्य म्हणून समान हक्क आहेत, असे स्पष्ट करत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड (वेकोलि) कडून नातीला नोकरी नाकारण्याचा निर्णय रद्द केला. न्या. अनिल किलोर आणि न्या. राज वाकोडे यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.

नागपूर जिल्ह्यातील पताकाखेडी येथील व्यंकटराव जीवतोडे यांची जमीन कोळसा खाण प्रकल्पासाठी संपादित करण्यात आली होती.




पुनर्वसन व पुनर्स्थापना धोरणानुसार कुटुंबातील एका सदस्याला नोकरी देण्याचा प्रश्न निर्माण झाला. जीवतोडे यांनी आपल्या मुलांना वयामुळे नोकरी स्वीकारणे शक्य नसल्याचे नमूद करत नात रूपाली जीवतोडे हिला नोकरी देण्याची विनंती केली होती.

मात्र, वेकोलि (डब्ल्यूसीएल) प्रशासनाने २०१२ च्या धोरणाचा आधार घेत 'नात' ही कुटुंबाच्या व्याख्येत येत नसल्याचे कारण देत ही मागणी फेटाळली. या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. उच्च न्यायालयाने डब्ल्यूसीएलचा युक्तिवाद फेटाळत नातीलाही नातवाप्रमाणे नोकरीचा अधिकार असल्याचे स्पष्ट केले. उच्च न्यायालयाने यापूर्वी नातवाला अशाप्रकारे नोकरी देता येते, असा निर्णय दिला होता. वेकोलि द्वारा या निर्णयाचा दाखला देत नातवाला नोकरी देण्याची तरतुद आहे, मात्र नातीला नाही असा युक्तिवाद केला. मात्र न्यायालयाचा निर्णय हा लिंगभेद करणारा नसून नातू आणि नाती या दोघांसाठीही लागू होतो, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

न्यायालयाने निर्णयात नमूद केले की, 'कुटुंब' ही संकल्पना संकुचित पद्धतीने न पाहता समावेशक अर्थाने समजली पाहिजे. यापूर्वीच्या निर्णयांमध्ये 'नातू' याला कुटुंबात समाविष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे केवळ लिंगाच्या आधारावर 'नात' हिला वगळणे हा भेदभाव ठरतो. पुनर्वसन धोरणाचा उद्देश जमीन संपादनामुळे विस्थापित झालेल्या कुटुंबांना दिलासा देणे हा आहे. त्यामुळे अशा धोरणाचा अर्थ लावताना व्यापक व न्याय्य दृष्टिकोन ठेवणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. 'नाती'ला कुटुंबाच्या व्याख्येबाहेर ठेवणे हे समानतेच्या तत्त्वाला बाधा देणारे असून अन्यायकारक असल्याचेही न्यायालयाने नमूद केले. या पार्श्वभूमीवर न्यायालयाने वेकोलिकडून जारी करण्यात आलेली नकाराची पत्रे रद्द ठरवली. तसेच रूपाली जीवतोडे हिच्या नावाचा नोकरीसाठी विचार करण्याचे निर्देश देत संबंधित प्रक्रिया आठ आठवड्यांत पूर्ण करण्याचे आदेश दिले.

## राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा पुष्पेंद्र कुलश्रेष्ठ यांच्याकडून अवमान

### उच्च न्यायालयाने दिले कारवाईचे निर्देश!

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**नागपूर, दि. ३१ :** ज्येष्ठ पत्रकार आणि विचारवंत पुष्पेंद्र कुलश्रेष्ठ यांनी नागपुरातील हिंदू संमेलनामध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्याविषयी केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याची ऑडिओ रेकॉर्डिंग व इतर पुरावे विचारात घेऊन कायद्यानुसार पुढील कारवाई करा, असा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने सोमवारी सीताबर्डी पोलिसांना दिला. यासंदर्भात येत्या ८ एप्रिलपर्यंत प्रतिज्ञापत्र सादर करण्यास सांगितले.

राष्ट्रपित्याविषयी अवमानजनक वक्तव्य केल्यामुळे कुलश्रेष्ठ व संमेलन संयोजक निशांत गांधी यांच्याविरोधात बीएनएस कलम ३५३(१)(बी)(सी), ३५३(२) व ३५६ अंतर्गत एफआयआर नोंदवला जावा, याकरिता नागपूर जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अश्विन बैस यांनी याचिका दाखल केली आहे. त्यावर न्यायमूर्तिद्वय अनिल पानसरे व निवेदिता मेहता यांच्यापुढे सुनावणी झाली. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी सिव्हिल




लाइन्समधील चिटणीस सेंटर येथे हिंदू कल, आज और कल विषयावर सकल हिंदू समाज संमेलन आयोजित करण्यात आले होते. या संमेलनात कुलश्रेष्ठ प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

त्यावेळी त्यांनी सार्वजनिक शांतता भंग करण्याच्या व दंगल भडकवण्याच्या उद्देशाने राष्ट्रपित्याविषयी विविध वादग्रस्त वक्तव्ये केली. राष्ट्रपित्याने पंडित लक्ष्मचार्य यांच्या ईश्वर तेरो नाम गाण्याची चोरी केली. त्यामुळे ते या देशाचे राष्ट्रपिता होऊच शकत नाही, असे कुलश्रेष्ठ म्हणाले. परिणामी, २८ फेब्रुवारी रोजी सीताबर्डी पोलिस ठाण्यात आणि त्यानंतर ४ मार्चला पोलिस आयुक्तांना तक्रार दिली. परंतु, पोलिसांनी कोणतीच कारवाई केली नाही, असा याचिकाकर्त्याचा आरोप आहे. याचिकाकर्त्याच्यावतीने ॲड. आकाश मून यांनी बाजू मांडली.

## शेगावात हिमालयीन समर्पण ध्यानयोगाचा महासंगम; १५ हजारांहून अधिक साधकांची उपस्थिती





अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**शेगाव, दि. ३१ :**श्री गजानन महाराजांच्या चरण स्पर्षाने पावन शेगाव नगरीत ३१ मार्च २०२६ ते २ एप्रिल २०२६ या कालावधीत सायंकाळी ६ वाजता स्व. गजानन दादा पाटील मार्केट यार्ड (कॉटन मार्केट) मैदानावर सद्गुरू श्री शिवकृपानंद स्वामीजी यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत 'हिमालयीन समर्पण ध्यानयोग शिबिर' निःशुल्क आयोजित करण्यात आले आहे.

सद्गुरू श्री शिवकृपानंद स्वामीजी हे आत्मसाक्षात्कार प्राप्त ऋषी असून हिमालयीन समर्पण ध्यानयोगाचे प्रणेते आहेत. शेगाव येथील श्री गजानन महाराजांचे समाधीस्थान हे स्वामीजींच्या आध्यात्मिक प्रवासाचे प्रमुख प्रेरणास्थान आहे. बालपणापासूनच आई व आजीसमवेत ते येथे दर्शनासाठी येत असत. त्यांच्या कुटुंबात गजानन महाराजांना गुरु नव्हे, तर साक्षात देव मानले जात असे. याच संस्कारातून 'सद्गुरू हे केवळ व्यक्ती नसून एक चिरंतन तत्त्व आहे' ही गाढ श्रद्धा त्यांच्या मनात दृढ झाली. गजानन महाराजांच्या कृपेने व प्रेरणेने स्वामीजी हिमालयात गेले आणि तेथे तब्बल १६ वर्षे विविध गुरूंच्या सान्निध्यात ध्यानसाधना करून त्यांनी आत्मज्ञानाची अनुभूती प्राप्त केली व सुमारे ८०० वर्षांची प्राचीन समर्पण ध्यानयोग परंपरा समाजात आणली. आधुनिक युगातील वाढत्या ताणतणावामुळे मानसिक शांततेच्या शोधात असलेला मनुष्य ध्यानयोगाच्या माध्यमातून अंतर्मुख होऊन स्वतःच्या दुःखांवर मात करू शकतो, असा संदेश स्वामीजी देत आहेत.शेगावातील या विशेष शिबिरात स्वामीजी अतिशय सहज आणि सोप्या भाषेत प्रवचनाद्वारे मार्गदर्शन करत असून, साधकांना ध्यानाची प्रत्यक्ष अनुभूती देत आहेत. या शिबिराला अनेक प्रतिष्ठित मान्यवरांनीही उपस्थिती लावली; यामध्ये शेगाव येथील माऊली ग्रुपचे अध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर दादा पाटील, बुलढाणा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी डॉ. किरण पाटील, बुलढाणा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. निलेश तांबे, शेगाव येथील इंडियन मेडिकल असोसिएशनचे (आयएमए) अध्यक्ष डॉ. रमेश भुतडा, एरियल मॅपर्सचे संचालक आदित्य हिंगणे (राजमुद्रा ग्रुप), शेगाव बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. दामोदर पुरुषोत्तम पिसे, श्री शिवकृपानंद स्वामी फाउंडेशनचे अंबरीषजी, महेश पटेल, वैभव पारीख आणि श्री. आशिष आशिष कलावार यांचा समावेश होता.

स्वामीजींच्या मते, एकट्याने हजारो दिवस केलेले ध्यान आणि हजारो साधकांच्या सामूहिकतेत एक दिवस केलेले ध्यान यांचा परिणाम समान असतो; मात्र अशा भव्य सामूहिकतेत, श्री गजानन महाराजांच्या आणि सद्गुरूंच्या सान्निध्यात ध्यान करण्याची संधी ही साधकांसाठी खऱ्या अर्थाने 'अद्वितीय त्रिवेणी संगम' ठरत आहे.

## पोलीस होण्याचे स्वप्न बघणाऱ्या पायल शहारेचा बुडून मृत्यू

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**गोंदिया, दि. ३१ :**आयुष्याच्या उंबरठ्यावर उभी असलेली स्वप्नाळू, जिद्दी आणि कर्तृत्ववान तरुणी डोळ्यांत पोलीस होण्याचे स्वप्न, मनात कुटुंबासाठी काहीतरी मोठं करण्याची उमेद मात्र नियतीच्या एका क्रूर वळणाने सगळंच हिरावून नेलं.

अर्जुनी मोर तालुक्यातील मोरगाव येथे १९ वर्षीय पायल वामन शहारे हिचा ईटियाडोह कालव्यात बुडून झालेला मृत्यू संपूर्ण परिसराला हळहळ लावून गेला आहे. सोमवारी (३० मार्च) सकाळी सुमारे आठ वाजताच्या सुमारास नेहमीप्रमाणे घरकामासाठी पायल कालव्याकाठी गेली होती. सध्या रब्बी हंगामामुळे कालव्यात मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात आले असून तो दुथळी भरून वाहत होता. अशा वेळी कपडे धुताना तिचा पाय घसरला आणि क्षणार्धात ती खोल पाण्यात कोसळली. वेगवान प्रवाहाने तिला ओढून नेले आणि काही क्षणांतच ती नजरेआड झाली.

घटनेची बातमी वाऱ्यासारखी पसरताच गावात एकच खळबळ उडाली. नातेवाईक, ग्रामस्थ, पोलीस आणि स्थानिक प्रशासन



घटनास्थळी धावले. सुमारे २० फूट खोल पाण्यामुळे शोधकार्य अत्यंत कठीण बनले होते. परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन ईटियाडोह सिंचन विभागाशी संपर्क साधून कालव्याचे पाणी बंद करण्यात आले. तरीही आशेचा धागा पकडून शोधमोहीम अखंड सुरू ठेवण्यात आली. तब्बल २४ तासांच्या अथक प्रयत्नांनंतर आज ३१ मार्च रोजी मंगळवारी सकाळी साडेसात ते आठच्या दरम्यान पायलचा मृतदेह घटनास्थळापासून सुमारे ५०० मीटर अंतरावर आढळून आला. हा क्षण हृदय पिळवटून टाकणारा होता. कुटुंबीयांचा आक्रोश, आई-वडिलांच्या डोळ्यांतून वाहणारे अश्रू आणि गावकऱ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले दुःख सगळं वातावरण स्तब्ध झालं होतं.

पायल ही केवळ एक मुलगी नव्हती, तर कुटुंबाचा आधारस्तंभ आणि गावाचा अभिमान होती.

## मध्य रेल्वेने कसली कंबर; ४६ अतिरिक्त गाड्यांची घोषणा!

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**नागपूर, दि. ३१ :** मध्य रेल्वेने उन्हाळी सुट्ट्यांच्या काळात प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन ४६ अतिरिक्त विशेष गाड्या चालवण्याची घोषणा केली आहे. मुंबई ते मडगाव आणि मुंबई ते संतरागाछी या दोन प्रमुख मार्गांवर या गाड्या धावणार आहेत.

या उपक्रमामुळे प्रवाशांना दिलासा मिळण्याची अपेक्षा असून, आरक्षणाची ताणतणावपूर्ण परिस्थिती काही प्रमाणात कमी होणार आहे.

पर्यटन, नातेवाईक भेटी तसेच सुट्ट्यांचा आनंद घेण्यासाठी प्रवास करणाऱ्यांसाठी ही सुविधा उपयुक्त ठरणार आहे.

मध्य रेल्वेकडून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते मडगाव




दरम्यान २० साप्ताहिक विशेष गाड्या चालवण्यात येणार आहेत. ट्रेन क्रमांक ०१०१९ ही गाडी ५ एप्रिल ते ७ जून २०२६ या कालावधीत दर रविवारी पहाटे १२.५५ वाजता सुटून त्याच दिवशी दुपारी ३.१५ वाजता मडगाव येथे पोहोचेल. परतीच्या दिशेने ट्रेन क्रमांक ०१०२० ही गाडी मडगावहून दर रविवारी सायंकाळी ४.०० वाजता सुटून दुसऱ्या दिवशी पहाटे ३.५० वाजता मुंबईत पोहोचेल.

या गाड्यांना दादर, ठाणे, पनवेल, रोहा, चिपळूण, रत्नागिरी, कणकवली, सावंतवाडी आणि थिवि यांसारख्या प्रमुख स्थानकांवर थांबे देण्यात आले आहेत. त्यामुळे कोकण पट्ट्यातील प्रवाशांना मोठा फायदा होणार आहे. या गाड्यांमध्ये वातानुकूलित द्वितीय, तृतीय, शयनयान तसेच सामान्य डब्यांचा समावेश असल्याने विविध प्रवासी वर्गांना सुविधा उपलब्ध होणार आहे.

लोकमान्य टिळक टर्मिनस ते संतरागाछी दरम्यान २६ विशेष गाड्या चालवण्यात येणार आहेत. ही गाडी २१ एप्रिल ते १४ जुलै दरम्यान दर मंगळवारी रात्री ८.१५ वाजता सुटेल आणि तिसऱ्या दिवशी सकाळी ५.०० वाजता संतरागाछी येथे पोहोचेल. ही गाडी संतरागाछीहून दर गुरुवारी दुपारी ३.५० वाजता सुटून दुसऱ्या दिवशी रात्री ११.४५ वाजता मुंबईत पोहोचेल.

### विदर्भासह मध्य भारताला दिलासा

या मार्गावरील गाड्यांना नाशिक रोड, भुसावळ, अकोला, नागपूर, गोंदिया, रायपूर, बिलासपूर, राउरकेला आणि टाटानगर अशा महत्त्वाच्या स्थानकांवर थांबे असतील. त्यामुळे विदर्भ आणि मध्य भारतातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. विशेष म्हणजे या गाड्यांमध्ये वातानुकूलित इकॉनॉमी वर्गाचाही समावेश असून प्रवाशांना किफायतशीर पर्याय उपलब्ध होणार आहे. मध्य रेल्वेच्या या निर्णयामुळे उन्हाळी प्रवास अधिक सुलभ आणि आरामदायी होणार आहे.

## नगर परिषद देऊळगाव राजा जि.बुलढाणा
## निविदा सुचना

जा.क्र. नपदे/ ५०९/२६

दि. ३०/०३/२०२६

नगर परिषद देऊळगाव राजा अंतर्गत सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षासाठी खालील नमूद केलेल्या कामे करणे करिता इच्छुक नामांकित कंत्राटदार मार्फत दरपत्रक मागविण्यांत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे तपशील | निविदा फार्म किंमत | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | सन २०२६-२०२७ करिता पाणी पुरवठा पाईपलाईनवरील गळती दुरुस्ती करणे व किरकोळ पाईपलाईन करणे | रुपये २०००/- | रुपये १००००/- |
| २ | सन २०२६-२०२७ करिता साहित्यासह हातपंप दुरुस्ती करणे. | रुपये २०००/- | रुपये १००००/- |
| ३ | सन २०२६-२०२७ करिता alum तुरटी Grade-1 पुरविणे | रुपये २०००/- | रुपये १००००/- |
| ४ | सन २०२६-२०२७ करिता ब्लिचिंग पावडर पुरविणे | रुपये २०००/- | रुपये १००००/- |

टिप :-
१. निविदा फॉर्म विक्री दि. १/०४/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून सुरु होईल.
२. निविदा स्वीकारण्याची अंतिम दि. १०/०४/२०२६ रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत
३. शक्य झाल्यास निविदा दि. १३/०४/२०२६ रोजी उघडण्यात येतील .
४. सविस्तर अटी व शर्ती नगर परिषद देऊळगाव राजा कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.
५. कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

मुख्याधिकारी
नगर परिषद देऊळगाव राजा

## महत्त्वाचे

### कमावता तरुण बुडाला

**नागपूरः** सुटीमुळे केटरिंगची कसलीही ऑर्डर नसल्याने तीन मित्रांसोबत पिटेसूर येथील तलावात पोहायला गेलेल्या तरुणाचा पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने डोहात खोल बुडून मृत्यू झाला. आर्यन चंद्रशेखर पटेल ( १६, रा.सिध्दीकी ले-आऊट, गोधनी, गिट्टीखदान) असे या पाण्यात बुडून दगावलेल्या तरुणाचे नाव आहे. आर्यनल हा केटरिंगच्या व्यवसायात मदतनीस म्हणून काम करत होता. त्याचे वडील चंद्रशेखर पटेल हे देखील स्वयंपाकी म्हणून काम करतात.

### नैराश्यातून लावला गळफास

**नागपूरः** कानात सतत आवाज येऊन कोणीतरी पाठलाग करत असल्याचा भास होत असल्याने नैराश्यातून एकाने गोठ्याजवळच्या पिंपळाच्या झाडाला गळफास लावून आत्महत्या केली. सोनेगाव पोलीस हद्दीतील शिवणगाव येथे ही घटना उघडकीस आली. किशोर झिबल बोरीवार (४०, रा. कोंढाळी) असे झाडाला गळफास लावून आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. किशोर हे शिवणगाव येथील समाधान हिलाल सोळुंके (४१) यांच्या शेतातील गोठ्यावर दुध काढण्याचे काम करत होते.

### पाकिटमार टोळीची धरपकड

**नागपूरः** बसची वाट पाहत उभ्या महिलांच्या गाफीलतेचा फायदा घेत संघटीतपणे दागीन्यांवर डल्ला मारणाऱ्या टोळीतील चौघांची सोनसाखळी चोर विरोधीपथकाने धरपकड केली.मंजु सिध्दार्थ हातागळे (४०), सुहानी विशाल हातागळे (२२), सुरेखा विराज लोंढे (२३ ), सुनिल शेषराव काटोले (५२) अशा या चोरांची नावे आहेत. आरोपींचे ताब्यातून १० ग्रॅम सोने जप्त करण्यात आले.

### खापरखेडातून चार सराईत बदमाश हद्दपार

**नागपूरः** प्राणघातक हल्ले, मोक्याच्या ठिकाणी असलेल्या स्थावर मालमत्तांवर अतिक्रमणे, शस्त्राच्या धाकावर खंडणी वसुली सारखे गंभीर गुन्हे करत कायदा व सुव्यवस्थेला आव्हान देणाऱ्या चार सराईत बदमाशांना पोलिसांनी हद्दपार केले. देवधन उर्फ बोद्धू रज्जूराव तेलंगे (३२, रा. इंदिरानगर आबादी), रितीक सुरेश दुपारे (२६), पवन उर्फ बोडी नरेश नेवारे (३०, रा. कुचक मोहल्ला पिपळा डाकबंगला) आणि मोहम्मद सलमान अनवर अली सलमानी (२४, रा. वलनी) अशी पोलिसांनी हद्दपार केलेल्या चार सराईत गुन्हेगारांची नावे आहेत.

### प्रतिबंधित पाच टन प्लास्टिक कॅरिबॅग जप्त

**नागपूरः**वाडी पोलीस हद्दीतील खडगाव मार्गावरील बालाजी ट्रेडर्सवर छापा टाकत पोलिसांनी प्रतिबंधित कॅरीबॅग जप्त केल्या. प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या सूचनेवरून पोलीस उपायुक्त ऋषिकेश रेड्डी यांच्या पथकाने ही कारवाई केली. यात ५० मायक्रॉनपेक्षा कमी दर्जाच्या एकल वापराच्या २०० पोते पोलिसांनी जप्त केले.

### वैष्णवी कॉन्व्हेंटमध्ये भीषण आग

**भंडारा :** साकोली तालुक्यातील सेंदुरवाफा शहरातील प्रगती कॉलनी परिसरात असलेल्या वैष्णवी कॉन्व्हेंटमध्ये फ्रिजमध्ये झालेल्या स्पार्किंगमुळे भीषण आग लागल्याची घटना घडली. सुदैवाने वेळेत आग लागल्याचे लक्षात आल्याने आणि तत्काळ मदत मिळाल्याने मोठी दुर्घटना टळली. या घटनेत कोणत्याही विद्यार्थ्याला दुखापत झाली नसल्याचे स्पष्ट झाले आहे.ही घटना आज ३० मार्च रोजी दुपारी सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास घडली. वैष्णवी कॉन्व्हेंट हे दीपक रामटेके यांच्या इमारतीमध्ये कार्यरत आहे. अचानक फ्रिजमध्ये स्पार्किंग होऊन आग लागली आणि काही क्षणातच धुराचे लोट संपूर्ण परिसरात पसरू लागले. आगीचा धूर वाढत गेल्याने शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये तसेच परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

महत्त्वाचे

## मुंबई-कोलकाता सामन्यात 'प्रेम फुलले'

**नवी दिल्ली:** आयपीएल स्पर्धेतील दुसऱ्या सामन्यात मुंबई इंडियन्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात सामना पार पडला. या सामन्यात दोन्ही संघांनी २०० पार धावा केल्या. त्यामुळे मैदानात चौकार आणि षटकारांची आतषबाजी झाली हे सांगायला नको. कोलकात्याने प्रथम फलंदाजी करताना २२० धावा केल्या आणि विजयासाठी २२१ धावांचं आव्हान ठेवलं. हे आव्हान मुंबई इंडियन्सने शेवटच्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर ६ गडी राखून पूर्ण केलं. या सामन्यात मैदानात प्रत्येक चेंडूनंतर क्रीडाप्रेमींची हृदयाची धाकधूक वाढत होती. दुसरीकडे, प्रेक्षक गॅलरीत एक प्रेमकथा पुढे सरकत होती. मुंबई इंडियन्सच्या चाहत्याने प्रपोजसाठी हा दिवस निवडला. गर्लफ्रेंड केकेआरची समर्थक होती. दोघंही आपआपल्या आवडत्या फ्रेंचायझीच्या जर्सीत होते. त्यामुळे दोन्ही संघ मैदानात लढत असताना केलेलं प्रपोज उपस्थितांच्या कायम स्मरणात राहील.व्हायरल व्हिडीओनुसार, दोघंही प्रेक्षक गॅलरीत उभे होते.

## मुंबई इंडियन्सच्या ड्रेसिंग रूममधून रिंकू बॅट घेऊन पळाला

**नवी दिल्ली:** आयपीएल २०२६ स्पर्धेतील पहिल्या सामन्यात मुंबई इंडियन्सने विजयी सलामी दिली. २२१ धावांचं लक्ष्य देऊनही कोलकाता नाईट रायडर्सच्या पदरी निराशा पडली. दुसरीकडे, २२१ धावांचा यशस्वी पाठलाग मुंबई इंडियन्सने पहिल्यांदाच केला. या सामन्यानंतर पराभवाचं बरंच विश्लेषण करण्यात आलं. दुसऱ्या डावात ४ षटकानंतर रिंकु सिंहकडे कर्णधारपदाची धुरा आली. त्यावेळी कॅमरून ग्रीनला षटक का दिलं नाही असा प्रश्न विचारला जात होता. त्यावर सामना संपल्यानंतर अजिंक्य रहाणेने स्पष्टीकरण दिलं. असं असताना रिंकु सिंह सामना संपताच मुंबई इंडियन्सच्या ड्रेसिंग रूममध्ये गेला. यावेळी त्याने मुंबई इंडियन्सच्या खेळाडूंशी चर्चा केली. टीम इंडियातील खेळाडू असल्याने त्याला हा ड्रेसिंग रूम काही नवखा नव्हता. पण या दरम्यान रिंकु सिंह ड्रेसिंग रूममधून बॅट घेऊन गेला. त्याचा व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे.

## पीएसएलमध्ये बॉल टेम्परिंग करणे भोवले

# पाकिस्तानच्या फखर जमानवर बंदी

**कराची : दि.३१ वृत्तसंस्था**



पाकिस्तान क्रिकेटला धक्का देणाऱ्या पीएसएल बॉल टेम्परिंग वादात दोषी आढळल्यानंतर, पाकिस्तानचा सलामीवीर फखर जमानवर आज (दि. ३१) दोन सामन्यांची बंदी घालण्यात आली आहे. रविवारी लाहोर कलंदर्स विरुद्ध कराची किंग्स यांच्यातील सामन्यावेळी फखर जमान बॉल टेम्परिंग करताना आढळला होता.पीएसएलने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटले आहे की, ''रविवारी लाहोर कलंदर्स विरुद्ध कराची किंग्स यांच्यात सामना झाला. खेळाडू आणि सपोर्ट स्टाफसाठी असलेल्या आचारसंहितेच्या कलम २.१४ नुसार फखर जमान लेव्हल ३ चा गुन्हा करताना दोषी आढळला. त्यामुळे त्याला पुढील दोन एचबीएल पीएसएल सामन्यांसाठी निलंबित करण्यात आले आहे.'' मॅच रेफरी रोशन महानामा यांनी शिस्तभंग प्रकरणाची सुनावणी घेतली. सर्व पुराव्यांची पडताळणी केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.रविवारी झालेल्या सामन्याच्या दुसऱ्या डावातील १९ व्या षटकाच्या शेवटी हा संपूर्ण वाद सुरू झाला. शेवटच्या षटकात कराचीला विजयासाठी १४ धावांची गरज होती. लाहोरकडून हॅरिस रौफ गोलंदाजी करणार होता.

षटक सुरू होण्यापूर्वी फखर जमान हा हॅरिस रौफ आणि लाहोर कलंदर्सचा कर्णधार शाहीन शाह आफ्रिदी यांच्याशी चर्चा करताना दिसला. त्यानंतर लगेचच पंच फैसल आफ्रिदी यांनी चेंडू तपासण्यासाठी मागवून घेतला.पंच फैसल आफ्रिदी आणि स्क्वेअर-लेग पंच शरफुद्दौला यांच्यात प्रदीर्घ चर्चा झाली. लाहोर कलंदर्सच्या खेळाडूंनी जाणीवपूर्वक चेंडूची स्थिती बदलल्याचा (बॉल टेम्परिंग) निष्कर्ष पंचांनी काढला. शिक्षा म्हणून कराची किंग्सला ५ पेनल्टी धावा बहाल करण्यात आल्या आणि चेंडू तातडीने बदलण्यात आला.या ५ पेनल्टी धावांमुळे कराची किंग्सला शेवटच्या षटकात विजयासाठी केवळ ९ धावांची गरज उरली होती. अष्टपैलू अब्बास आफ्रिदीने हॅरिस रौफच्या चेंडूवर एक चौकार आणि एक षटकार ठोकत कराचीला विजय मिळवून दिला.

## नसीम शाह याला २ कोटी रुपयांचा दंड; पीसीबीने केली कारवाई!

**कराची : दि.३१ वृत्तसंस्था**



पाकिस्तान सुपर लीग २०२६ चा सिझन सध्या सातत्याने चर्चेत आहे. मागील अनेक दिवसांपासून ही लीग सुरू झाल्यापासून सातत्याने वाद पाहायला मिळाले आहेत. पंजाबच्या मुख्यमंत्री मरियम नवाज यांच्या विरोधात ट्विट केल्यामुळे पाकिस्तानचा स्टार वेगवान गोलंदाज नसीम शाहला त्याचे परिणाम भोगावे लागले आहेत. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने त्याच्यावर कारवाई केली आहे. पीसीबीने त्याला २ कोटी पाकिस्तानी रुपयांचा दंड ठोठावला आहे.

पाकिस्तानी क्रिकेटच्या इतिहासात कोणत्याही खेळाडूवर ठोठावण्यात आलेला हा सर्वात मोठा दंड आहे. नसीम शाहने मरियम नवाज यांच्याबद्दल एक पोस्ट केली होती, ज्यामध्ये त्याने त्यांना 'क्वीन ऑफ लॉर्ड्स' म्हटले होते. नसीम पाकिस्तान सुपर लीगमध्ये रावळपिंडी संघाकडून खेळत असून, या पोस्टनंतर त्याला सर्व बाजूंनी तीव्र टीकेला सामोरे जावे लागले होते. नसीम शाह यांच्यावर लादलेला २० दशलक्ष पाकिस्तानी रुपयांचा दंड हा त्यांच्या केंद्रीय करारातील पगाराचा एक मोठा भाग आहे.

## मुंबई इंडियन्स, राजस्थान रॉयल्स आणि आरसीबी विजय आयपीएलसाठी डोकेदुखी



**नवी दिल्ली: दि.३१ वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६ स्पर्धेतील पहिला सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू-सनरायझर्स हैदराबाद, मुंबई इंडियन्स-कोलकाता नाईट रायडर्स, राजस्थान रॉयल्स-चेन्नई सुपर किंग्स यांच्यात रंगला. या तीन सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, मुंबई इंडियन्स आणि राजस्थान रॉयल्सने विजय मिळवला. या तिन्ही संघांचा विजयात फार काही बदललं नाही. विजयाचा पॅटर्न आयपीएलच्या दृष्टीने धोकादायक असल्याचं दिसत आहे. या तीन संघाच्या विजयाने आयपीएल कशी काय अडचणीत येऊ शकतो. कोणत्याही संघासाठी विजय चांगलाच असतो. पण आरसीबी, मुंबई इंडियन्स आणि राजस्थान रॉयल्सच्या विजयाचा सारखेपणा आहे, तो आयपीएलसाठी घातक ठरणारा आहे. आयपीएल स्पर्धेतील पहिला सामना आरसीबी आणि हैदराबाद यांच्यात झाला. या सामन्यात नाणेफेकीचा कौल हा आरसीबीच्या बाजूने लागला आणि प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. हैदराबादने पहिल्या डावात २०१ धावा केल्या आणि विजयासाठी २०२ धावांचं लक्ष्य ठेवलं. हे आव्हान आरसीबीने १५.४ षटकात पूर्ण करत एक विक्रम रचला. आरसीबीने २६ चेंडू आणि ६ गडी राखून एकहाती विजय मिळवला.मुंबई आणि कोलकात्याचा संघ दुसऱ्या सामन्यात समोरासमोर उभे ठाकले होते.


या सामन्यात मुंबईने नाणेफेकीचा कौल जिंकून प्रथम गोलंदाजी स्वीकारली. केकेआरने प्रथम फलंदाजी करताना २० षटकात २२० धावा केल्या आणि २२१ धावांचं आव्हान ठेवलं. हे आव्हान सहज गाठलं. शेवटच्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर विजय मिळवला.आयपीएलमधील तिसरा सामा राजस्थान रॉयल्स आणि चेन्नई सुपर किंग्स यांच्यात झाला. या सामन्यात राजस्थानने कौल जिंकला आणि प्रथम गोलंदाजी स्वीकारली. चेन्नई सुपर किंग्सने प्रथम फलंदाजी करत १२७ धावा केल्या. हा सामना राजस्थानने ४७ चेंडू राखून पूर्ण केला.आतापर्यंत झालेल्या तिन्ही सामन्यात एक साम्य होतं. पहिलं म्हणजे नाणेफेक जिंकणारा संघच सामना जिंकला. दुसरं म्हणजे तिन्ही सामन्यात धावांचा यशस्वी पाठलाग झाला. तिसरं म्हणजे तिन्ही सामन्यात सहज विजय मिळवला. या तीन गोष्टी आयपीएलसाठी त्रासदायक आहेत. कारण क्रिकेट चाहत्यांना अशा पद्धतीने विजयाचा कंटाळा येऊ शकतो. सामने एकतर्फी आणि रटाळ वाटतील. यामुळे लोकप्रियता कमी होऊ शकतो

## राजस्थान रॉयल्सचा चेन्नईवर विजय

**नवी दिल्ली: दि.३१ वृत्तसंस्था**

आज आसाम येथील बरसपारा येथे क्रिकेट स्टेडियमवर चेन्नई सुपर किंग्स विरुद्ध राजस्थान रॉयल्स यांच्यात आयपीएलचा तिसरा सामना पार पडला. राजस्थान रॉयल्सने टॉस जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. दरम्यान राजस्थान रॉयल्सच्या गोलंदाजीपुढे चेन्नईचे फलंदाज ढेपाळले. तर राजस्थाने चेन्नईवर ८ विकेट्सने विजय मिळवला आहे. वैभव सूर्यवंशीने अर्धशतकी खेळी केली.राजस्थान रॉयल्सकडून वैभव सूर्यवंशीने ५२ धावांची अर्धशतकी खेळी केली. तर कर्णधार रियान परागने १४ धावा करून संघाला विजय प्राप्त करून दिला. यशस्वी जयस्वालने नाबाद ३८ धावा केल्या. राजस्थान रॉयल्सने आज गोलंदाजी आणि फलंदाजीमध्ये चांगला खेळ केल्याचे पाहायला मिळाले. ओपनिंग जोडीने चांगली सुरुवात करून दिल्याने विजेचा मार्ग मोकळा झाला. राजस्थान रॉयल्सच्या गोलंदाजांनी देखील चांगली गोलंदाजी केली.चेन्नई सुपर किंग्सकडून प्रथम संजू सॅमसन आणि कर्णधार ऋतुराज गायकवाड खेळण्यासाठी उतरले. संजू सॅमसन केवळ ६ धावा करून बाद झाला. तर कर्णधार ऋतुराज गायकवाड देखील ६ धावा करून बाद झाला. तसेच युवा फलंदाज आयुष म्हात्रे पहिल्याच चेंडूवर बाद झाला. तर मॅथ्यू शॉर्ट केवळ २ धावा करून बाद झाला. तर सरफराज खानने १२ चेंडूत १७ धावा कडून संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. मात्र तो देखील १७ धावा करून बाद झाला. कार्तिक शर्माने १८ धावा केल्या. शिवम दुबेने आल्या आल्या पहिल्याच चेंडूवर षटकार मारला. मात्र चौथ्याच चेंडूवर षटकार मारण्याच्या प्रयत्नांत बाद झाला. मॅट हेनरी केवळ ५ धावा करून बाद झाला.

## कुस्तीतील नव्या वादाने खेळाडूंच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह



**औंध : दि.३१ वृत्तसंस्था**

मैदानी कुस्तीमध्ये वापरल्या जाणाऱ्या 'बकुट' (कसाटा) डावामुळे वादंग निर्माण झाला आहे. मूळतः प्रतिस्पर्ध्याचा तोल बिघडवण्यासाठी आणि नियंत्रणासाठी वापरला जाणारा हा डाव केला जातो.अलिकडे कानाजवळ जोरात केलेल्या चुकीच्या प्रहारामुळे पैलवान मैदानात हातघाईवर येण्याच्या घटना वाढत चालल्या आहेत. कुस्ती क्षेत्रात बकुट डावाबद्दल नियम स्पष्ट करण्याची मागणी जोर धरत आहे. मैदानी पारंपरिक कुस्तीमध्ये अनेक जुने आणि प्रभावी डाव आजही वापरले जातात. त्यापैकी 'बकुट' (कसोटा) हा एक डाव सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. काही जणांच्या मते हा अत्यंत तांत्रिक आणि कौशल्यपूर्ण डाव आहे, तर काहींच्या मते तो खेळाडूंसाठी धोकादायक प्रहार ठरू शकतो.

अलीकडे काही कुस्ती मैदानात खेळाडूंनी कानाजवळ जोरात हात मारणे सुरू केले ''झटका'' ऐवजी ''थप्पड/प्रहार'' केला जात असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे प्रतिस्पर्ध्यांना इजा होण्याच्या घटना सुद्धा घडल्या आहेत. डावाच्या चुकीच्या पद्धतीने वापर होत असल्याने कुस्तीच्या मैदानात वादाचे प्रसंग निर्माण होत आहेत.अगदी नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत देखील याचा प्रत्यय आला आहे. अंतिम फेरीत महेंद्र गायकवाड आणि हर्षवर्धन सदगीर यांच्यातील लढतीत महेंद्रचा संयम सुटल्यामुळे त्याने जोरदार समोरुन प्रहार केला (याला कसाटा म्हणता येणार नाही.) यावर हर्षवर्धन याने चपळाईने त्याचा डाव हाणून पाडला मात्र पंचाकडे याबाबत उद्विग्नता व्यक्त केली होती. मागे सिकंदर शेख विरुद्ध माऊली कोकाटे यांच्या मैदानी कुस्तीत बकुट मारण्यावरुन वादाचा मोठा गदारोळ उठला होता.

नवीन मल्लांना हा डाव अचूक कसा करायचा याचे अद्यावत ज्ञान नसल्याने कुस्ती मैदानात डावाचा चुकीचा वापर केला जात आहे. यामुळे खेळाडूंना चक्कर येणे, किरकोळ दुखापत आणि कुस्ती थांबवावी लागणे अशा घटना समोर आल्या आहेत.

बकुट' हा डाव कुस्तीच्या परंपरेचा भाग असला, तरी त्याच्या सुरक्षिततेबाबत गंभीर विचार करण्याची गरज आहे. परंपरा आणि आधुनिक सुरक्षितता यांचा समतोल साधत, योग्य प्रशिक्षण आणि नियमांच्या माध्यमातून हा वाद सोडवणे आवश्यक असल्याचे हिंदकेसरी विकास जाधव यांनी सांगितले.

## एअरटेल पेमेंट्स बँकेवर ठोठावला ३१.८० लाखांचा दंड

**नवी दिल्ली:** सोमवारी भारतीय रिझर्व्ह बँकेने एअरटेल पेमेंट्स बँक लिमिटेडच्या विरोधात कडक कारवाई केल्याची माहिती समोर आली आहे. आर्थिक व्यवहाराच्या बाबतीत काही तरतुदींचे पालन न केल्याबद्दल, मध्यवर्ती बँकेने या पेमेंट्स बँकेवर ३१.८० लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. बँकिंग नियमन कायदा, १९४९ च्या कलम ४७(१) आणि कलम ४६(४)च्या तरतुदींनुसार ला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून हा दंड आकारण्यात आला आहे.३१ मार्च २०२५ च्या आर्थिक स्थितीच्या आधारे, द्वारे बँकेची तपासणी आणि पर्यवेक्षकीय मूल्यमापन' करण्यात आले होते. तपासणी करत असताना मध्यवर्ती बँकेने स्पष्ट केले की, आर्थिक व्यवहाराच्या बाबतच्या निर्देशांमधील काही तरतुदींचे पालन न केल्यामुळे, ने एअरटेल पेमेंट्स बँक लिमिटेडवर ३१.८० लाख रुपयांचा दंड लावला आहे. च्या निर्देशांचे पालन न केल्याबाबतच्या निष्कर्षांवर आणि या संदर्भातील संबंधित पत्रव्यवहारावर आधारित, बँकेला एक नोटीस बजावण्यात आली होती. या नोटीसद्वारे बँकेला कारणे दाखवा अशी विचारणा करण्यात आली होती; बँकेने नोटीसवर दिलेल्या उत्तराचा, सादर केलेल्या अतिरिक्त स्पष्टीकरणांचा आणि वैयक्तिक सुनावणीदरम्यान मांडलेल्या तोंडी युक्तिवादांचा विचार केल्यानंतर, बँकेवर लावलेला आरोप सत्य असल्याचे ला आढळून आले.

# वाढवणजवळ उभारणार आंतरराष्ट्रीय बाजार

## १२०० एकरवर अत्याधुनिक बाजारपेठ होणार

**नवी दिल्ली: दि.३१ वृत्तसंस्था**



राज्यात सध्या अस्तित्वात असलेल्या बाजार व्यवस्थेपेक्षा अधिक आधुनिक, सुसज्ज आणि जागतिक दर्जाची बाजार साखळी उभारण्याची गरज आहे. यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या मार्गदर्शनात वाढवण पोर्ट परिसरात सुमारे १२०० एकरवर अत्याधुनिक आंतरराष्ट्रीय दर्जाची बाजार समिती उभारण्याचे नियोजन करण्यात येत आहे. ही बाजारपेठ रस्ता, रेल्वे, बंदर आणि विमानतळाशी जोडलेली असेल, ज्यामुळे राज्यातीलच नव्हे तर देशभरातील शेतीमालासाठी महाराष्ट्र जागतिक व्यापार केंद्र म्हणून उदयास येईल, अशी माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी मुंबईत बोलताना दिली.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आणि महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण केंद्र येथे आयोजित शेतकरी उत्पादक संस्थांच्या (एफपीओ) राज्यस्तरीय परिषदेचे उद्घाटन पणन मंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना पणन मंत्री रावल यांनी ही माहिती दिली. बदलत्या परिस्थितीत शेतकरी हा केवळ उत्पादक राहून चालणार नाही, तर तो उत्तम उद्योजक बनला पाहिजे. यासाठी पणन विभागाच्या वतीने आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत.याचबरोबर शेतीमालाच्या उत्पादनासोबतच त्याचे मार्केटिंग, ब्रडिंग, पॅकेजिंग आणि विक्री या सर्व बाबींमध्ये शेतकऱ्यांनी सहभाग घेतला पाहिजे. या प्रक्रियेत शेतकऱ्यांच्या हितासाठी शेतकरी उत्पादक संस्थांच्या माध्यमातून चळवळ उभी राहील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. राज्यात शेतकरी उत्पादक संस्था (एफपीओ) आणि शेतकरी उत्पादक कंपनी (एफपीसी) या केवळ योजना नसून शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणाची मोठी चळवळ आहे.




लहान व सीमांत शेतकऱ्यांना एकत्र आणून त्यांना बाजारपेठेत सक्षमपणे उभे करण्यासाठी या संस्थांची भूमिका महत्त्वाची आहे. एफपीओच्या माध्यमातून उत्पादन ते विक्रीपर्यंत संपूर्ण मूल्य साखळी उभारता येते. यामध्ये लॉजिस्टिक्स, वेअरहाउसिंग, प्रक्रिया, पॅकेजिंग आणि मार्केटिंग या सर्व सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देता येतील, अशी माहिती रावल यांनी दिली.

## चीनच्या नेतृत्वाखालील आयएफडी करार रोखला;भारताने चीनला फटकारले

**नवी दिल्ली: दि.३१ वृत्तसंस्था**



भारताने चीनची एक मोठी योजना हाणून पाडली आहे. जागतिक दबावाला न जुमानता, भारताने कॅमेरूनची राजधानी याउंडे येथे झालेल्या १४ व्या मंत्रीस्तरीय परिषदेत, चीनच्या नेतृत्वाखालील 'इन्व्हेस्टमेंट फॅसिलिटेशन फॉर डेव्हलपमेंट' (आयएफडी) कराराचा डब्ल्यूटीओच्या कायदेशीर चौकटीत समावेश करण्यास रोखले. विशेष म्हणजे, या यादीत चीनला विरोध करणारा भारत हा आता एकमेव देश आहे. यापूर्वी तुर्कीचाही या यादीत समावेश होता, परंतु आता त्यांनी आपला विरोध मागे घेतला आहे.

भारताने असा युक्तिवाद केला की, हा करार या बहुपक्षीय गटाच्या मूलभूत तत्त्वांना कमजोर करणार आणि त्याच्या कार्यक्षेत्राचे उल्लंघन करेल. या मुद्द्यावर, वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर सांगितले की, डब्ल्यूटीओएमसी १४ मध्ये, महात्मा गांधींच्या 'सत्य नेहमीच परंपरेवर मात करते' या तत्त्वज्ञानापासून प्रेरणा घेऊन, भारताने आयएफडी कराराच्या वादग्रस्त मुद्द्यावर एकटे उभे राहण्याचे धाडस दाखवले.त्याला 'ॲनेक्स ४ करार' म्हणून डब्ल्यूटीओ च्या चौकटीत समाविष्ट करण्यास नकार दिला. १२८ डब्ल्यूटीओ देशांनी पाठिंबा दिलेल्या आयएफडीचा उद्देश अधिक पारदर्शकता आणि योग्य प्रक्रियेद्वारे थेट परकीय गुंतवणुकीला (एफडीआय) सुव्यवस्थित करणे आहे. तथापि, भारताचा असा विश्वास आहे की गुंतवणुकीशी संबंधित मुद्द्यांवर डब्ल्यूटीओला अधिकारक्षेत्र नाही.

भारत, दक्षिण आफ्रिका आणि तुर्की यांनी असा युक्तिवाद केला आहे.

## सोन्याच्या दरातील चढउतार सुरूच

**नवी दिल्ली: दि.३१ वृत्तसंस्था**

भारतात ३१ मार्च रोजी २४ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर १४,८२७ रुपये, २२ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर १३,५९१ रुपये आणि १८ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर ११,१२० रुपये आहे. भारतात ३१ मार्च रोजी २२ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,३५,९१० रुपये, २४ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,४८,२७० रुपये आणि १८ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,११,२०० रुपये आहे. भारतात ३१ मार्च रोजी चांदीचा भाव प्रति ग्रॅम २४४.९० रुपये आणि प्रति किलोग्रॅम २,४४,९०० रुपये आहे.भारतात ३० मार्च रोजी २४ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर १४,८०८ रुपये, २२ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर १३,५७४ रुपये आणि १८ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर ११,१०६ रुपये



होता. भारतात ३० मार्च रोजी २२ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,३५,७४० रुपये, २४ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,४८,०८० रुपये आणि १८ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,११,०६० रुपये होता. भारतात ३० मार्च रोजी चांदीचा भाव प्रति ग्रॅम २४४.९० रुपये आणि प्रति किलोग्रॅम २,४४,९०० रुपये होता. दिल्ली आणि चंदीगड या शहरांमध्ये आज २२ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,३६,०६० रुपये, २४ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,४८,४२० रुपये आणि १८ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,११,३५० रुपये आहे. चेन्नई शहरात आज २२ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,३६,०४० रुपये, २४ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,५०,२३० रुपये आणि १८ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,३७,७१० रुपये आहे. नाशिक शहरात आज २२ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,३५,९४० रुपये, २४ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,४८,३०० रुपये आणि १८ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,११,२३० रुपये आहे.सुरत शहरात आज २२ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,३५,९६० रुपये, २४ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,४८,३२० रुपये आणि १८ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,११,२५० रुपये आहे.

# परिवहन विभागाचा ५२४ कोटी ५८ लाखांचा अर्थसंकल्प प्रस्तावित

## बस वाहतुकीची व्याप्ती वाढविणार : मंगला खेकरे

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ३१ : नागपूर महानगरपालिकाच्या परिवहन व्यवस्थापक डॉ. मेघना वासनकर यांनी परिवहन विभागाचा २०२५-२६ चा सुधारित अर्थसंकल्प व २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी ५२४ कोटी ५८ लाख रुपयांचा प्रस्तावित अर्थसंकल्प परिवहन सभापती मंगला खेकरे यांना सादर केला.**



परिवहन विशेष समिती बैठकीला परिवहन समितीचे सदस्य सुधीर राऊत, पूजा पाठक, शैलेश रामसुंदर पांडे, दिनेश यादव, शकील पटेल, अर्चना पडोळे, विजय होले, मंगला मस्के, रुपाली ठाकूर उपस्थित होते. परिवहन व्यवस्थापक डॉ. मेघना वासनकर यांनी अर्थसंकल्प सादर करताना नागपूर शहरात शहर बस वाहतूक बळकट करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांची माहिती दिली. परिवहन विभागाचा २०२६-२७ वर्षात एकूण उत्पन्न ५२४ कोटी ७ लाख रुपये राहण्याची अपेक्षा आहे. या सुरुवातीची शिल्लक ५० लाख २८ हजार रुपयांची आहे. अशी एकूण मिळकत ५२४ कोटी ५८ लाख रुपये राहणार आहे. या आर्थिक वर्षात परिवहन विभागामार्फत ५२४ कोटी ९ लाख रुपये खर्चाची अपेक्षा आहे. सभापती मंगला खेकरे यांनी अर्थसंकल्प स्वीकारल्यानंतर या अंदाजपत्रकावर चर्चा करून स्थायी समितीला त्वरित सादर केला जाईल, असे सांगितले. शहरातील वाहतूक व्यवस्थेची व्याप्ती अधिक वाढविण्यासाठी उपाययोजना केल्या जाईल. तसेच ज्या ठिकाणी अद्यापही शहर बस पोहोचत नाही, अशा ठिकाणी शहर बस वाहतूक देण्याचा प्रयत्न या वर्षात राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. शहर बस ताफ्यात ३८५ ई-बसेस, डिझेलवर धावणाऱ्या १५० मिडी आणि ४५ मिनी बसेस अशा एकूण ५८० बसेसचा ताफा आहे. दररोज सरासरी १ लाख ६१ हजार प्रवाशांची संख्या असल्याचे त्यांनी सांगितले.

### स्वच्छता कामे पूर्ण करण्याचे निर्देश

नागपूर,दि.३१: महानगरपालिकाच्या वतीने शहरात सध्या नदी नाले सफाई अभियान प्रगतीपथावर राबविण्यात येत आहे. या अभियानाचा आढावा घेण्यासाठी मनपा आयुक्त डॉ. विपीन यांनी मंगळवारी पावनगाव येथील पिवळी नदी आणि नाग नदी संगम स्थळाला भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली.

त्यांनी नदी संगम परिसरातील जलपात्रात तातडीने साफसफाई करण्याचे तसेच नदी नाले सफाई अभियानाचे संपूर्ण कार्य येत्या ३० एप्रिलपर्यत पूर्ण निर्देश दिले.मनपाचे मुख्य अभियंता मनोज तालेवार, सहायक आयुक्त विजय थूल, कार्यकारी अभियंता सचिन रक्षमवार, उज्वल धनविजय, तहसीलदार संतोष खंडारे, एनएमआरडीएचे श्री. चिमणकर आणि भूमी अभिलेखचे उपअधीक्षक विनोद मेरखेडे यांच्यासह अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. आयुक्त डॉ. विपीन यांनी नागपूर सुधार प्रन्यास (नासुप्र), एनएमआरडीए आणि मनपाच्या अधिकाऱ्यांना नदी सफाईच्या कामाला गती देण्याच्या सूचना केल्या. पिवळी आणि नाग नदीच्या संगमापुढील भागाची स्वच्छता ३० एप्रिलपूर्वी पूर्ण करावी, असे आदेशसंबंधित अधिकार्यांना दिले

# एमपीएससी परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी अर्थसहाय्य

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ३१ :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) गट-व (अराजपत्रित) सेवा मुख्य परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी व मुलाखतीच्या पूर्वतयारीसाठी उत्तीर्ण उमेदवारांना प्रोत्साहनात्मक अर्थसहाय्य' (सन २०२५-२६) योजना राबविण्यात येत आहे. पात्र उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी १० हजार रुपये व मुलाखतीच्या पूर्वतयारीसाठी पाच हजार रुपये इतके प्रोत्साहनात्मक अर्थसहाय्य देण्यात येणार असल्याचे कळविण्यात येते. ऑनलाईन किंवा संकेतस्थळावर अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक २७ एप्रिल असल्याचे कळविण्यात आले आहे.

सन २०२५-२६ मध्ये महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२५ उत्तीर्ण झालेल्या आणि आर्थिक सहाय्याचा लाभ घेण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. यासाठी संबंधितांनी www.mahaamrut.org.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरावा, अर्ज सादर करण्यापूर्वी सुचनांचे पालन करावे. योजनेविषयी भविष्यात कोणतीही माहिती/सूचना केवळ अमृतच्या संकेतस्थळावरच प्रसिद्ध करण्यात येतील. योजनेच्या अधिक माहितीसाठी व ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी काही शंका असल्यास संबंधित जिल्हा अमृत कार्यालयाशी संपर्क साधावा. महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) तर्फे राज्यातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील, अमृतच्या लक्षित गटातील, (ब्राह्मण, कायस्थ, कोमटी, मारवाडी, पटेल, राजपूत, यलमार, अय्यंगार, राजपुरोहित, पाटीदार, वैश्य, नायर, नायडू इत्यादी) उमेदवारांना अर्थसहाय्य देण्यात येते

## थोडक्यात

### वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**नागपूर:** वर्धा रोडवरील शुअरटेक हॉस्पिटलसमोरील पुलाजवळ एका अज्ञात भरधाव वाहनाने दुचाकीला दिलेल्या धडकेत ४५ वर्षीय व्यक्तीचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना ३० मार्च २०२६ रोजी संध्याकाळी ६:३० ते ७:०० वाजेच्या सुमारास घडली. अपघातानंतर वाहनचालक मदतीसाठी न थांबता घटनास्थळावरून पसार झाला आहे.

मृतक गंगाधर राजाराम दुधकावर (वय ४५ वर्षे, रा. धुती, पोस्ट-डोंगरगाव, हिंगणा) हे खापरी येथून काम संपवून आपल्या दुचाकीने घराकडे परतत होते. हिंगणा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शुअरटेक हॉस्पिटलसमोरील पुलाजवळ एका अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरात धडक दिली. अज्ञात वाहनचालकाने आपले वाहन अतिशय वेगात, निष्काळजीपणाने आणि धोकादायक पद्धतीने चालवून हा अपघात घडवला. धडक दिल्यानंतर जखमीला कोणतीही मदत न करता चालक तिथून पळून गेला. गंभीर जखमी झालेल्या गंगाधर यांना तातडीने उपचारासाठी एम्स हॉस्पिटल, नागपूर येथे नेण्यात आले. मात्र, तेथील डॉक्टरांनी तपासणी अंती त्यांना मृत घोषित केले.

### छत्रपती शिवाजी जयंती महोत्सव ५ एप्रिल रोजी

**नागपूर :** आपला माणूस फाउंडेशन नागपूर तर्फे यावर्षी पहिल्यांदाच छत्रपती शिवाजी महाराज जयंती महोत्सव आयोजित सोहळा २०२६ मोठ्या उत्साहात करण्यात येत आहे. यावेळी कार्यक्रमाला अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभणार असल्याची माहिती गगन रहांगडाले यांनी दिली. आपला माणूस फाउंडेशनच्या माध्यमातून ५ एप्रिल रोजी, सुभेदार ले आउट मधील गजानन हायस्कूल जवळ, छत्रपती शिवाजी महाराज जयंती महोत्सव सोहळ्याचे आयोजन केले आहे. केंद्रीयमंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आमदार मोहन मते, अभिनेत्री सई ताम्हणकर, सुप्रसिद्ध शिव व्याख्याते सुदर्शन शिंदे, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, संदीप जोशी, नवनीत राणा, आमदार विजय रहांगदळे, आमदार रवी राणा, राजे मुधोजी भोसले नागपूरचे महापौर व उपमहापौर व प्रभाग क्रमांक २९, ३२ व ३४ चे सर्व नगरसेवक व नागरिक उपस्थित राहतील. यावेळी गगन रहांगडाले, ओम प्रकाश झाडे, धनंजय जोशी, विजय रामगीरकर, कमलाकर कुमरे, अविनाश पांढूरकर, आशिष आमलीकवार आणि भूषण बोरकर परिश्रम घेत आहेत.

CAPTION अशीही निर्लज्जता......



**नागपूर : तंबाखू चघळणे, खर्रा खाणे या प्रकारामुळे शरीर आरोग्यावर काय परिणाम होतो, हे सर्वश्रुत आहे. मात्र, येथे थेट निर्लज्जताने कळस गाठून पार पलीकडील टोक गाठले आहे. रहाटे कॉलनी मेट्रो स्टेशन सिग्नलवर अजनी रेल्वेस्थानकाकडून येणारे वाहनधारक अशाप्रकारे आपल्या तोंडातील घाण सार्वजनिक ठिकाणी टाकत आहे.**

### महानुभाव पंथातील स्त्री जीवनावर चर्चासत्र

नागपूर,दि.३१: राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील 'भगवान श्री चक्रधर स्वामी अध्यासना'तर्फे बुधवार, १ एप्रिल २०२६ रोजी एका विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. "महानुभाव पंथातील स्त्री जीवन: ऐतिहासिक, साहित्यिक, सामाजिक आणि आधुनिक संदर्भ" हा या चर्चासत्राचा मुख्य विषय आहे.हे चर्चासत्र सकाळी ११ वाजता गांधी भवन, एल.ए.डी. चौक येथील अध्यासनात पार पडेल. नांदेड येथील डॉ. संजय जगताप उपस्थित राहतील, प.पु.प.म. हंसराज बाबा खामणीकर उपस्थितांना उद्बोधित करतील.असे आवाहन कुलसचिव डॉ. राजू हिवसे व अध्यासनाचे प्रमुख डॉ. भारत मिसाळ यांनी केले आहे.

# खाण मंत्रालयाचे सचिव यांच्याकडून 'जीएसआय'च्या कार्याचा आढावा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ३१ :** भारत सरकारच्या खाण मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव संजय लोहिया यांनी नागपूर येथील भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण (GSI), मध्य क्षेत्राला भेट दिली. यावेळी त्यांनी सुरू असलेल्या विविध प्रकल्पांचा आढावा घेतला आणि देशाच्या आर्थिक सुरक्षेसाठी अत्यंत आवश्यक असलेल्या 'महत्त्वाच्या खनिजांच्या' (Critical Minerals) शोध मोहिमेला गती देण्याचे निर्देश दिले.



जीएसआय मध्य क्षेत्राचे अतिरिक्त महासंचालक आणि विभाग प्रमुख डी. व्ही. गणवीर व अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले. 'फर्मोर हॉल' येथे आयोजित बैठकीला मध्य क्षेत्र आणि राष्ट्रीय मिशन-II चे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत डी. व्ही. गणवीर यांनी जीएसआय मध्य क्षेत्राच्या अलीकडील यशाची माहिती दिली. त्यांनी सांगितले की: आतापर्यंत ७७ भूवैज्ञानिक अहवाल आणि १२२ भूवैज्ञानिक मेमोरँडम सुपूर्द करण्यात आले आहेत. यापैकी अनेक खनिज ब्लॉक्सचा यशस्वी लिलाव (Auction) पूर्ण झाला आहे. २०२५-२६ या वर्षातील बहुतांश क्षेत्रीय कामे (Field Activities) पूर्ण झाली असून, नवीन खनिज क्षेत्रांच्या शोधासाठी प्रयत्न सुरू आहेत. महत्त्वाच्या खनिजांवर विशेष लक्ष केंद्रित करून अनेक अहवाल तयार करण्यात आले आहेत.

# रातुम विद्यापीठांत पक्ष्यांसाठी जलपात्र



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ३१ :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसरात पक्ष्यांसाठी जलपात्र लावण्यात आले आहे. जमनालाल बजाज प्रशासकीय भवनाजवळ पदव्युत्तर भौतिकशास्त्र विभागातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांच्या शुभहस्ते या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.उन्हाळा प्रारंभ झाला असून पशुपक्षी तसेच इतर जीवांना तृष्णा भागविण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. उन्हाच्या तीव्रतेत तृष्णेने कासावीस होणाऱ्या पक्षांना पाणी मिळावे याकरिता भौतिकशास्त्र विभागातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दरवर्षी जलपात्र लावण्याचा उपक्रम राबविला जातो. कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. राजू हिवसे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. उमेश पलीकुंडवार, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख तथा रासेयो समन्वयक डॉ. संजय ढोबळे, डॉ. स्मिता आचार्य, डॉ. अभय देशमुख यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. जमनालाल बजाज प्रशासकीय भवनासह शैक्षणिक परिसरात विविध ठिकाणी पक्ष्यांसाठी जलपात्र लावण्यात आले आहे.

# नागपूरला अव्वल बनविण्यासाठी आयुक्तांचे कडक निर्देश

## स्वच्छता मानांकनासाठी मनपा ॲक्शन मोडमध्ये! आयुक्त डॉ. विपीन आक्रमक

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ३१ :** स्वच्छ सर्वेक्षण अभियान २०२५-२६ अंतर्गत 'स्ट्रॅटेजिक रोडमॅप फॉर सिटी एक्सलन्स' बाबत नागपूर महानगरपालिका आयुक्त डॉ. विपीन यांनी आढावा बैठक घेतली. स्वच्छतेत नागपुराला टॉप टेन मध्ये आणण्याबरोबर स्वच्छता मानांकन उंचावण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, मुख्य अभियंता मनोज तालेवार, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त राजेश भगत, उपायुक्त . मिलिंद मेश्राम, गणेश राठोड, अधीक्षक अभियंता डॉ. श्वेता बॅनर्जी, शिक्षणाधिकारी माधुरी काटकर, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले यांच्यासह सर्व झोनचे सहायक आयुक्त आणि स्वच्छता अधिकारी उपस्थित होते.बैठकीत मनपा आयुक्त डॉ. विपीन यांना कचरा स्रोत व विलगीकरण, संकलन व वाहतूक, कचरा हस्तांतरण केंद्रे, रस्ते सफाई, डम्पिंग यार्डवरील कचऱ्याचे शास्त्रोक्त निर्मूलन, सांडपाणी व्यवस्थापन आणि उपसा सेवांचे यांत्रिकीकरण, आरआरआर केंद्रे, जीव्हीपी पॉईंटस्, सार्वजनिक व स्मार्ट टॉयलेट्स, बॅकलेन सफाई आणि शहराचे ओडीएफ (ओडीएफ) व जीएफसी ( जीएफसी) मानांकन याबाबत माहिती देण्यात आली.यावेळी मनपा आयुक्त डॉ. विपीन यांनी मार्केट परिसरातील दुकाने आणि मोठ्या हॉटेल्सना कचरा विलगीकरण अनिवार्य करण्याचे निर्देश दिले. कोणतेही दुकानदार रस्त्यावर कचरा टाकणार नाहीत, कचऱ्यांचे योग्य विलगीकरण करणार यासाठी कडक परिपत्रक काढण्याच्या सूचना त्यांनी केल्या. गरज भासल्यास मार्केट असोसिएशनशी चर्चा करून '४ डस्टबीन' ची सक्ती करण्यात येईल. रस्त्यावरील विक्रेते आणि चायनीज गाड्यांनी घाण केल्यास त्यांच्यावर कडक कारवाई करून दुकाने लावण्यास मज्जाव करण्याचे आदेश त्यांनी दिले.शहरातील १९ स्मार्ट व ९२ सार्वजनिक शौचालयांच्या ठिकाणी बीओटी तत्त्वावर दुकाने सुरू करता येतील का, याची चाचपणी करण्याचे सांगितले.





तसेच यासाठी सर्व विभागांनी एकत्र आणि पोलिस विभागाची मदत घेऊन समन्वयाने कामे करण्याचे त्यांनी सांगितले. शहरात नागरिकांना अधिकाधिक सार्वजनिक शौचालयाची गरज असून, त्याची संख्या वाढविण्यात यावे, याकरिता जागा शोधण्याचे ही त्यांनी सूचना केल्या. तसेच विविध झोनमध्ये तयार होणाऱ्या ट्रान्सफर सेंटर्सला मोठे शेड लावून त्याचे सौंदर्यीकरण करून जाहिरातींच्या माध्यमातून उत्पन्न वाढवण्याचे मनपा आयुक्त यांनी सुचवले.याशिवाय शहरातील ४४६ कचरा पॉईंट्सचे (जीव्हीपी) वर्गीकरण करण्यात यावे. तसेच २१७ जीव्हीपी पॉईंट कायमस्वरूपी बंद करण्यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले. या ठिकाणी सौंदर्यीकरण करण्यासाठी आर्किटेक्ट विद्यार्थ्यांची तसेच नागरिकांची मदत घेण्याचे आणि झोननुसार स्पर्धा आयोजित करण्याचे सांगितले. नागरिकांचा सहभाग वाढवण्यासाठी आयईसी उपक्रम आणि पथनाट्ये आयोजित करून नागरिकांना स्वच्छतेबाबत समजविण्यात यावे याबाबत सूचनाही त्यांनी केल्या. आवश्यक पडल्यास विविध ठिकाणी मार्केट असोसिएशन, मोठे होटल, विविध कॉलोनीतील नागरिकांशी स्व:त चर्चा करणार असल्याचे त्यांनी सांगितले. सर्वाधिक कचरा टाकल्या जाणाऱ्या ठिकाणी मार्केट परिसरात 'सी-व्हिजिल'च्या धर्तीवर तक्रार करण्यासाठी नागरिकांना हजार ठिकाणी 'क्यूआर कोड' उपलब्ध करून देण्याचे निर्देशही त्यांनी दिले. तसेच महानगरपालिकेची रँकिंग सुधारण्यासाठी गंभीररित्या काम करण्याचे त्यांनी अधिकाऱ्यांना निर्देश दिले. यासोबतच, मनपाच्या सर्व स्वच्छता कर्मचाऱ्यांची व इतर कर्मचाऱ्यांची नियमित आरोग्य तपासणी करून त्यांचे 'हेल्थ कार्ड' तयार करण्याचे आदेश आयुक्त डॉ. विपीन यांनी दिले.

# ऊर्जेचा वनवा: सिलिंडरच्या टंचाईवर 'स्वदेशी पर्याय' हेच प्रभावी उत्तर!

**आपण सर्वांनी कोरोना महामारीचा दोन वर्षांचा काळ अनुभवला. तो आठवला, की अंगावर सर्रकन काटा येतोजवळ जवळ जगातील प्रत्येक कुटुंबाला त्याची झळ पोहोचली दुसरीकडे यातूनच काही त्रुट्या प्रकर्षाने दिसून आल्या जगातील कित्येक सरकारांची आरोग्यविषयक चुकीची धोरणे बाहेर आलीत आता कुठे त्यात सुधारणा होत आहेत नवनव्या आणि आधुनिक उपकरणांद्वारे आरोग्य योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचत आहेत.**

**विश्लेषण**
**संजय मुंदलकर**
**९५५२९८१५१४**

सध्याच्या दिवसांत अन्य एक समस्या जागतिकपातळीवर वेगाने पुढे आली आहे आणि ती म्हणजे या युद्धकाळात प्रामुख्याने स्वयंपाक गॅसचा (अर्थात सिलिंडर) तुटवडा निर्माण होणे. हा तुटवडा म्हणावा की युद्धकाळाचा परिणाम, उत्पादन कमी वा पर्यायी सुविधा नसणे. तज्ज्ञांच्या मते 'पर्यायी सुविधा' नसल्यानेच तुटवडा-टंचाई अशा अफवा पसरत आहेत कोरोना महामारी आणि इराण-अमेरिका यांच्यातील युद्धाच्या घटनांनी आपल्याला आरोग्य सुविधांमधील त्रुटी आणि ऊर्जा सुरक्षाचे महत्त्व या दोन सर्वांत मोठ्या धड्यांची जाणीव करून दिली आहे. कोरोना महामारीने जगातील प्रगत देशांच्या आरोग्य यंत्रणांचे वास्तव समोर आणले. अचानक वाढलेल्या रुग्णांच्या संख्येमुळे बेड, व्हेंटिलेटर आणि विशेषत: 'मेडिकल ऑक्सिजन'चा तुटवडा सर्वाधिक जाणवला. ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये तांत्रिक उपकरणांची, तज्ज्ञ डॉक्टरांची कमतरता प्रकर्षाने दिसून आली. औषधे आणि लसींसाठी एक देश अन्य देशांवर अवलंबून होता परिणामी ऐनवेळी तुटवडा निर्माण झाला. रिअल-टाईममध्ये किती रुग्ण आहेत आणि कोणत्या भागात मदत हवी आहे, याचा अचूक डेटा मिळवण्यात सुरुवातीला खूप अडचणी आल्या. अशीच काहीशी स्थिती आता उद्भवली आहे इराण-अमेरिका यांच्यातील युद्धामुळे जागतिक बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किमतींवर प्रचंड परिणाम झाला. इंधनावरील अति-अवलंबित्व हे घातक ठरले आहे भारत आपल्या गरजेच्या ८० टक्क्यांपेक्षा जास्त तेल आयात करतो. जेव्हा आखाती देशांत युद्ध होते, तेव्हा आपल्या देशात पेट्रोल-डिझेलचे दर वाढतात आणि परिणामी महागाई वाढते. एखाद्या विशिष्ट प्रदेशावर इंधनासाठी अवलंबून राहणे धोक्याचे आहे. यामुळे भारताने आता तेलसाठा करण्याची क्षमता वाढवण्यावर भर दिला आहे. तसेच, पर्यायी इंधनाची गरज निर्माण झाली असून, भारत, विद्युत वाहने, इथेनॉल मिश्रण, ग्रीन हायड्रोजन याकडे वेगाने वळत आहे,जेणेकरून भविष्यात अशा जागतिक युद्धांचा आपल्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होऊ नये. मुख्यत्वे स्वयंपाकाचा गॅस.असे असले तरी अन्न शिजवण्यासाठी अनेक पर्यायी सुविधा आहेत सर्व परिचित असताना त्याच्या वापराकडे कानाडोळा केल्याचे सर्रास जाणवते सौर चूल ही त्यापैकी एक सूर्यकिरणांचा वापर करून अन्न शिजवणारे पर्यावरणपूरक असे हे उपकरण आहे. यात इंधनाची गरज नसते. ते सूर्यकिरणे केंद्रित करून उष्णता निर्माण करते. यात तांदूळ, डाळी, भाज्या सहज शिजतात उपकरण प्रदूषणमुक्त असून, दीर्घकालीन बचतीसाठी अत्यंत फायदेशीर मानले जात आहे.यासोबतच निर्धूर चूल सुद्धा वापरण्याजोगी आहेजळणाच्या टंचाईमुळे परंपरागत चुलीमध्ये सुधारणा करून चुलींची कार्यक्षमता वाढवण्यासह निर्धूर चूल तयार करण्यात आली आहे ग्रामीण भागात घरगुती कामांसाठी लागणाऱ्या एकूण ऊर्जांपैकी की ८० टक्के ऊर्जा स्वयंपाकासाठी वापरली जाते, ही बाब लक्षात घेणे गरजेचे आहे निर्धूर चुलीमुळे इंधनाच्या वापरात बचत होते. शिवाय पर्यावरणाची हानी कमी! या चुलीमुळे स्वयंपाकघरात अजिबात धूर होत नाही. चुलीची धगही स्वयंपाक करणाऱ्याला लागत नाही. घरगुती वापरासाठी आणि सामुदायिक वापरासाठी अशा दोन प्रकारच्या निर्धूर चुली उपलब्ध असून, या चुलीत बायोमासचा वापर केला जाऊ शकतो. आपल्या राज्यातील वापराबद्दल काय अपडेट्स आहेत, यासंदर्भात माहिती उपलब्ध नाहीसोबतच बायोगॅस (गोबरगॅस) चूलही सुद्धा वापरण्यास अत्यंत सोपी आहे. कोळसा किंवा लाकडासारखा हा धूर होत नाही. म्हणूनच आपले स्वयंपाकघर स्वच्छ राहील आणि आपण चांगले आरोग्य राहील. स्वयंपाक गॅस सिलिंडरला कधी तरी पर्याय शोधावा लागणारच, ही सत्यता आहे तेव्हा त्याचा वापर आजपासूनच का नाही!

# आगामी सत्रात इंग्रजी शिक्षकांची भरती व सेमी-इंग्रजीचे वर्ग

**नागपूर, दि. ३१ :**आगामी २०२६-२७ शैक्षणिक सत्रात रिक्त पदांवर इंग्रजी शिक्षकांची भरती करण्याचा आणि जास्त पटसंख्या असलेल्या शाळांमध्ये सेमी-इंग्रजीचे वर्ग सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महानगरपालिका शिक्षण विभागाच्या वतीने घेण्यात आला आहे.

नागपूर महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सोयी-सुविधा आणि गुणवत्ता वाढवण्यासाठी शिक्षण विभागाने कंबर कसली आहे. शिक्षण विशेष समितीच्या सभापती संतोषदेवी दीपक लड्डा यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत शाळांच्या विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांची सुरक्षितता आणि शिस्तीसाठी सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे आणि बायोमेट्रिक मशीन तातडीने कार्यान्वित करण्याचे निर्देश दिले.महत्त्वाचे निर्णय : विद्यार्थ्यांना दिले जाणारे युनिफॉर्म, शूज आणि सॉक्स यांचा दर्जा तपासूनच खरेदी केली जाईल. इयत्ता ५ वी ते १२ वी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना व्याकरणाची पुस्तके उपलब्ध करून दिली जातील. शाळांची पटसंख्या वाढवण्यासाठी शिक्षकांनी पालकांची माहिती व मोबाईल क्रमांकासह विशेष नोंदणी रजिस्टर तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. बैठकीला उपसभापती भारती विकास बुंदे, सदस्य विनय विवेक दाणी, वैशाली विलास उदापूरकर, अंकित खुनंदन चौधरी, कांचन सतीश चव्हाण, वर्षा बंडू डोंगर, उपायुक्त (शिक्षण) डॉ. मेघना वासनकर, शिक्षणाधिकारी माधुरी काटकर, उपशिक्षणाधिकारी सीमा खोब्रागडे आणि इतर अधिकारी उपस्थित होते

अजिंक्य भारत
# आपलं अकोला
अकोला, बुधवार, दि.१ एप्रिल २०२६ www.ajinkyabharat.com

## जिल्ह्यातील ४३ खेळाडूंना शिष्यवृत्ती, २१ बॉक्सिंगपटूंची चमक

**अकोला:** राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या जिल्ह्यातील खेळाडूंना महाराष्ट्र शासनाकडून मोठा दिलासा मिळाला असून एकूण ४३ खेळाडूंना क्रीडा शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये विशेष म्हणजे २१ खेळाडू बॉक्सिंग या क्रीडा प्रकारातील असून जिल्ह्यातील बॉक्सिंग खेळाची वाढती ताकद अधोरेखित झाली आहे. राष्ट्रीय स्तरावर सहभाग नोंदवून प्राविण्य मिळवणाऱ्या या खेळाडूंना आर्थिक सहाय्य मिळणार असल्याने त्यांच्या पुढील प्रशिक्षणास मोठी चालना मिळणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत गुणवंत खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक मदत दिली जाते. या योजनेत राष्ट्रीय स्तरावरील सहभाग व प्राविण्यानुसार(सुवर्ण पदक ११२५०₹, रजत पदक ८९५०₹, कांस्य पदक ६७५०₹ तसेच सहभागी खेळाडूंना ३७५०₹)विविध रकमेची शिष्यवृत्ती दिली जाते, ज्यामुळे खेळाडूंच्या प्रशिक्षण, आहार व साहित्य खर्चास मदत होते. या यादीत विविध क्रीडा प्रकारांतील खेळाडूंचाही समावेश आहे. मात्र बॉक्सिंगमध्ये सर्वाधिक २१ खेळाडूंनी शिष्यवृत्ती मिळवत आघाडी घेतली आहे.

### महत्त्वाचे

## गारपीट नुकसानीचे पंचनामे करा

**अकोला :** पातूर व बाळापूर तालुक्यात ३० मार्च रोजी बरसलेल्या अवकाळी पावसामुळे फळबाग व इतर शेत पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. पातूर तालुक्यात अनेक भागात गारपीट झाल्याने शेतकरी पूर्णतः कोलमडून गेला असून पिक नुकसानीचा तातडीने पंचनामा करण्याची सूचना आमदार नितीन देशमुख यांनी जिल्हाधिकारी वर्षा मीना यांना पत्राद्वारे केली आहे.

पातूर व बाळापूर तालुक्यातील अनेक भागात अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. याचा शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांना मोठा फटका बसला आहे. विजांच्या कडकडाटात आणि वादळी वाऱ्यासह झालेल्या या पावसामुळे गहू, हरभरा, कांदा पिकांसह आंब्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी कापणीसाठी ठेवलेले धान्य भिजून खराब झाले, तर फळबागांमध्ये पडझड झाली. पातूर तालुक्यातील सस्ती व इतर भागांत बोराएवढी गारपीट झाली आहे. अवकाळी पावसामुळे या भागातील गहू, कांदा, लिंबू, आंबा, पपई, आदी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, या संकटामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. चतारी, सांगोला, सांगेफळ, पिंपळखुटा, दिग्रस, तुलंगा, मळसूर, शिरला, नांदखेड, बाबुळगाव, भंडारज, तांदळी, कोठारी, आलेगाव, आदी गावांमध्ये अवकाळी पावसाने मोठे नुकसान केले आहे. या नुकसानीचा तातडीने पंचनामा करावा, जेणेकरून शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान भरपाई मिळू शकेल, अशी सूचना आमदार नितीन देशमुख यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पत्राद्वारे केली आहे. अवकाळी पावसासह वादळी वाऱ्यामुळे बाळापूर तालुक्यातील विटभट्ट्यांवरील कच्च्या विटाचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. याचीही जिल्हाप्रशासनाने दखल घेण्याची मागणी पत्रात करण्यात आली आहे.

# अवकाळीमुळे ६६० हेक्टर क्षेत्रातील पिकांचे नुकसान

## वातावरण बदलाचा परिणाम: कांदा,पपई,चिया,गहु, लिंबू भाजीपाला पिकांची नासाडी

**अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ३१ :** गतवर्षीच्या खरीप, रब्बीनंतर यंदाच्या उन्हाळ्यातही निसर्गाच्या लहरीपणाचा फटका शेतकऱ्यांना बसत असल्याचे दिसून येत आहे. सोमवारी रात्री वादळी वाऱ्यासह पडलेल्या अवकाळी पावसामुळे पिकांचे झालेल्या नुकसानाचा प्राथमिक अहवाल ३१ मार्च रोजी पुढे आला. जिल्ह्यातील सुमारे ६५३.३ हेक्टर क्षेत्रातील पिकांची हानी झाली असून यात कांदा, चिया, गहु, लिंबू भाजीपाला पिकांची नासाडी झाली आहे.

पुढील चार दिवस जिल्ह्यात काही ठिकाणी पावसाचा अंदाज ३१ मार्च रोजी हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे शेतकरी पुन्हा धास्तावले आहेत. गतवर्षी सरासरी पेक्षा जास्त पाऊस जिल्ह्यात झाला होता. जिल्ह्यात वर्षात सरासरी




**सोमवारी दुपारी झालेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसामुळे अकोला तालुक्यातील सुकळी नंदापूर येथे पपई व कांद्याचे झालेले नुकसान.**

६९३ मि.मी. पाऊस पडणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात मात्र ७३२ मि.मी. पाऊस झाला होता. खरीप नंतर रब्बीमध्येही अवकाळी पऊस झाला. त्यामुळे यंदाचा उन्हाळा कमी जाणवेल, असा सामन्यांचा अंदाज होता. मात्र फेब्रुवारी महिन्यात अखेरच्या आठवठ्यात तापमान ३५ अंश सेल्सिअस पेक्षा जास्त नोंदवण्यात आले. मार्चमध्येही प्रचंड तापले. २ मार्च रोजी तर अकोल्यात भारतात सर्वाधिक ३८.५ सेल्सिअस तापमान नोंदवण्यात आले होते. मात्र गत काही दिवसांपासून अचानक वातावरणात बदल होत असून, पारा ४१ पेक्षा कमी झाला. अशातच सोमवारी वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. पिकांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांच्या डोक्यावरील आर्थिक कर्जाचा डोंगर आणखी वाढणार आहे.

जिल्ह्यात सोमवार ३१ मार्च रोजी रात्री वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पावसाने पिकांच्या नुकसानाची मंगळवारी सकाळी पाहणी करण्यात आली. नजर अंदाजाच्या प्राथमिक पाहणीनुसार एकूण ६५३ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले. ५.६ मि.मी. पाऊस पडला. मूर्तिजापूर तालुक्यातील ८ गावांमध्ये १८.३ हेक्टर क्षेत्रातील कांदा, चिया, गहु, लिंबू, भाजीपाला पिकांचे नुकसान झाले. अकोला तालुक्यातील ३६ गावांमध्ये ६३४ हेक्टर क्षेत्रावरील पिकांची हानी झाली. यात ज्वारी, कांदा, गहू, भाजीपाला उद्धस्त झाला. तेल्हारा तालुक्यतील चितलवाडी येथील सखाराम सोमा झिटे यांच्या मालकीच्या ५ मेंढ्या मृत्युमुखी पडल्या. शेतशिवारात वीज पडल्याने मेंढ्या दगावल्या.

# आयुक्तांची 'ब्ल्यू लाईन' प्रकरणावर चुप्पी

## नगरसेविका पूजा गावंडे आक्रमक, चौकशीची मागणी

**अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ३१ :** शहरातील खडकी परिसरातील 'ब्ल्यू लाईन' (निळ्या पूररेषेच्या) क्षेत्रात व्यावसायिक आणि निवासी बांधकामांना कायदेशीर बंदी असतानाही, त्या ठिकाणी खासगी शाळा आणि मोठी व्यावसायिक बांधकामे राजरोसपणे सुरू आहेत. या गंभीर विषयावर महापालिका सभागृहात वारंवार प्रश्न उपस्थित करूनही आयुक्त डॉ. सुनील लहाने यांनी अद्याप मौन न सोडल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला जात आहे. सोमवारी पार पडलेल्या अर्थसंकल्पीय सभेतही नगरसेविका तथा दक्षिण झोनच्या सभापती पूजा गावंडे यांनी यावर



उत्तर मागितले असता, आयुक्तांनी दिलेल्या उत्तरामुळे सत्ताधारी आणि प्रशासनातील सावळागोंधळ चव्हाट्यावर आला आहे.

खडकी परिसरात नियम धाब्यावर बसवून सुरू असलेल्या बांधकामांना नगररचना विभागाने परवानगी दिली कशी, असा खडा सवाल पूजा गावंडे यांनी उपस्थित केला होता. यावर स्पष्टीकरण देण्याऐवजी, नगररचना सहाय्यक संचालक साबळे यांच्याशी अद्याप बोलणे झाले नाही, असे मोघम उत्तर आयुक्तांनी सभेत दिले. विशेष म्हणजे, नगररचना विभागाचा प्रभार असलेले सहाय्यक संचालक आठवड्यातून केवळ एकदाच महापालिकेत येतात, असे सांगून आयुक्तांनी एकप्रकारे आपल्याच विभागाच्या बेजबाबदार कारभारावर पांघरूण घालण्याचा प्रयत्न केल्याची चर्चा सभागृहात रंगली होती.

दुसरीकडे, निळ्या पूररेषेचे कारण पुढे करून महापालिका प्रशासन सर्वसामान्य नागरिकांच्या घरांच्या नकाशांना परवानगी नाकारत आहे. मात्र, त्याच क्षेत्रात ठराविक बड्या बिल्डरांना आणि संस्थांना बांधकामाची मुभा कशी मिळते, असा थेट प्रश्न पूजा गावंडे यांनी उपस्थित केला. प्रशासनाचा हा दुजाभाव आणि नियमांची पायमल्ली करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीची सखोल चौकशी करण्याची मागणी त्यांनी या सभेत लावून धरली आहे. आयुक्तांच्या या टाळाटाळ करणाऱ्या भूमिकेमुळे आता 'ब्ल्यू लाईन' मधील बांधकामांचा मुद्दा अधिक तापण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## भव्य शोभायात्रा.....



**अकोला: भगवान महावीर जयंती निमित्त शहरातील गांधी रोड परिसरातील मोठे जैन मंदिर येथुन टिळक रोड मार्गे भव्य शोभायात्रा काढून जुना भाजी बाजार ते जैन मंदिर येथे समारोप करण्यात आला. या शोभायात्रेत जैन बांधव व महिला मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते. ( छाया: संजय ताथुरकर )**

# ८० लाखांची फसवणूक; दोन आरोपी अटकेत

**अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ३१ :** सायबर पोलीस स्टेशनने मोठी कारवाई करत तब्बल ८० लक्ष ५ हजार ८३० रुपयांच्या आर्थिक फसवणूक प्रकरणातील दोन आरोपींना मुंबईजवळील पालघर येथून अटक केली आहे. नोकरीच्या आमिषाने गुंतवणूक करून मोठा नफा मिळवून देण्याचे आश्वासन देत आरोपींनी ही फसवणूक केल्याचे तपासात उघड झाले आहे.

या प्रकरणी फिर्यादी हिरासिंग स्वरूपसिंग ठाकुर यांनी दिनांक १५ डिसेंबर २०२५ रोजी सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यांनी एका वृत्तपत्रातील छोट्या जाहिरातीवर विश्वास ठेवून दिलेल्या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधला. आरोपींनी सुरुवातीला पार्टटाईम/फुलटाईम जॉबचे आमिष दाखवून रजिस्ट्रेशन फी म्हणून १००० रुपये घेतले. त्यानंतर "हाय-प्रोफाईल महिला व मुलांसोबत मैत्री करून वेळ घालवणे" अशा स्वरूपाचे काम देण्याचे सांगत महिन्याला २० हजार हे मालिका रुपये मिळतील, असे आश्वासन दिले.

# लोकप्रतिनिधी सुस्त; अकोला-महान महामार्गाच्या निविदेला ग्रहण कुणाचे?

## श्रेयवादासाठी पुढे येणारे नेते आता गेले कुठे?

**अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ३१ :** शहरातून जाणाऱ्या अकोला ते महान या अत्यंत वर्दळीच्या मार्गावर अपघातांची मालिका थांबण्याचे नाव घेत नाही. मंगळवारी दुपारी पुन्हा एकदा एका जड वाहनाने वृद्धाला चिरडल्याची भीषण घटना घडली. या अपघातात तो वृद्ध रक्ताच्या थारोळ्यात पडला, त्याला आपला हात गमवावा लागण्याची भीती निर्माण झाली आहे.

रक्ताचे हे पाट पाहून कौलखेड परिसरातील नागरिकांचा संयम आता सुटला असून, लोकप्रतिनिधींना आमचा जीव गेल्यावरच जाग येणार का? असा जळजळीत सवाल विचारला जात आहे.

अकोला ते महान हा महामार्ग मंजूर झाला, तेव्हा त्याचे श्रेय घेण्यासाठी लोकप्रतिनिधींमध्ये जणू चढाओढ लागली होती. मात्र, मंजुरी मिळून वर्ष उलटले तरी हा मार्ग अजूनही कागदी घोडे आणि विविध परवानग्यांच्या गर्तेतच अडकला आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी वर्षभरापासून विविध विभागांच्या ना-हरकत प्रमाणपत्रासाठी हेलपाटे मारत आहेत, मात्र ज्या लोकप्रतिनिधींनी यासाठी पुढाकार घेणे अपेक्षित होते, ते केवळ मूकदर्शक बनून मजा पाहत असल्याची टीका होत आहे. धक्कादायक बाब म्हणजे, या मार्गाची निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन सहा महिने उलटले आहेत, तरीही ही निविदा उघडली का जात नाही? यात नेमकी कोणती मेख मारली आहे? याची साधी विचारणा करण्याची तसदीही एकाही लोकप्रतिनिधीने घेतलेली नाही, हे शहराचे दुर्दैव म्हणावे लागेल. शहरातील सर्वाधिक रहदारीचा हा मार्ग आजही अरुंद कसा, असा साधा प्रश्नही प्रशासनाला विचारण्याचे धाडस लोकप्रतिनिधी दाखवत नाहीत. अपघातात सामान्य नागरिक रक्तबंबाळ होत असताना आणि त्यांचे संसार उद्ध्वस्त होत असताना, लोकप्रतिनिधींची ही कमालीची उदासीनता म्हणजे त्यांच्या निष्क्रियतेवर पडलेली मोठी चपराक आहे. विकासाच्या गप्पा मारणारे हे नेते प्रत्यक्षात लोकांच्या जीवाशी खेळत आहेत, अशी संतप्त भावना कौलखेड परिसरातील रहिवाशांनी व्यक्त केली आहे. जर लोकांचे जीव जाऊनही या मार्गाचे काम मार्गी लागत नसेल, तर या लोकप्रतिनिधींच्या मानसिकतेवरच आता प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

## कौलखेड चौकात अपघात; दुचाकीस्वार गंभीर जखमी



कौलखेड येथील जुने स्टेट बँक परिसरातील मंगळवारी सायंकाळी सुमारे ५ वाजताच्या सुमारास भीषण अपघात घडला. या अपघातात ट्रक आणि दोन दुचाकींचा समावेश असून एका दुचाकीस्वाराला गंभीर दुखापत झाली आहे. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, समोरून येणाऱ्या दुचाकीला ट्रकने जोरदार धडक दिली. धडकेनंतर दुचाकीस्वार रस्त्यावर फेकला गेला आणि ट्रक त्याच्या उजव्या हातावरून पुढे गेल्याने तो गंभीर जखमी झाला. यानंतर ट्रकने बाजूला उभ्या असलेल्या दुसऱ्या दुचाकीलाही धडक दिल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. अपघाताची माहिती मिळताच नगरसेवक पंकज गावंडे हे आपल्या सहकाऱ्यांसह तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी जखमी जेतू नगर खदान येथील रहिवासी भारत उईके (६२) यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी हलवले. तसेच अपघातामुळे निर्माण झालेली वाहतूक कोंडी त्यांनी आणि स्थानिक नागरिकांनी मिळून सुरळीत केली. या घटनेमुळे काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा सुरू केला असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, कौलखेड चौकात वारंवार अपघात घडत असल्याने येथे वाहतूक नियंत्रणासाठी योग्य उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

### खडाजंगी | शिक्षण, आरोग्य आणि अग्निशमन दलासाठी निधी वाढवा

# अनावश्यक खर्चावरून प्रशासनाला धरले धारेवर

**अजिंक्य भारत । प्रतिनिधी**

**अकोला, दि. ३१ :** महानगरपालिकेच्या सोमवारी पार पडलेल्या अर्थसंकल्पीय सभेत विविध नागरी विषयांवरून सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या सदस्यांनी प्रशासनाला धारेवर धरले. शहराच्या मूलभूत गरजा असलेल्या शिक्षण, आरोग्य आणि अग्निशमन दलासाठी अर्थसंकल्पात भरीव तरतूद करण्याची मागणी सभेत करण्यात आली, तर दुसरीकडे अनावश्यक खर्चावरून तीव्र नाराजी व्यक्त केली.

सभेच्या सुरुवातीलाच शिक्षण विभागाच्या सक्षमीकरणाचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. मनपा शाळांची अवस्था आणि शिक्षकांची कमतरता यावर गिरीश गोखले यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले. शिक्षण विभागात सध्या १३ नवीन शिक्षकांची तातडीने गरज असल्याची कबुली शिक्षणाधिकारी इटकर यांनी दिली. शाळांमधील अपुऱ्या सोयीसुविधांबाबतही सदस्यांनी प्रशासनाला जाब विचारला. शिक्षणासोबतच सार्वजनिक आरोग्यासाठी प्रस्तावित करण्यात आलेली तरतूद अत्यंत तोकडी असल्याचे सांगत गोखले यांनी आरोग्यावरील निधी वाढवण्याची आग्रही मागणी केली. शहराच्या सुरक्षेसाठी अत्यंत महत्वाच्या असलेल्या अग्निशमन विभागाच्या निधीत कोणत्याही प्रकारची कपात न करता, उलट तिथे आधुनिक सामग्रीसाठी भरीव तरतूद करण्याची आवश्यकता असल्याचे गिरीश गोखले यांनी नमूद केले. याचवेळी दुर्धर आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांना महानगरपालिकेच्या वतीने विशेष अर्थसाहाय्य देण्यात यावे, असे मत वंचित बहुजन आघाडीचे पराग गवई आणि काँग्रेसचे आजाद खान यांनी सभागृहात मांडले.

प्रशासनाकडून होणाऱ्या काही खर्चांबाबत सदस्यांनी आक्रमक पवित्रा घेतला. मोटार वाहन विभागावर होणाऱ्या अवाढव्य खर्चावर भाजपच्या निकिता देशमुख आणि विरोधी पक्षनेते डॉ. जिशान हुसेन यांनी ताशेरे ओढले. तसेच, शहरात फोगिंग मशीन बसवताना झालेला अवाढव्य खर्च आणि त्याची प्रत्यक्ष उपयुक्तता किती, असा सवाल भाजपचे विनोद मापारी यांनी उपस्थित केला. कचरा संकलनावर सध्या प्रतिमहा २७ लाख ७५ हजार रुपये खर्च होत असून, दुसरीकडे नागरिकांकडून ५० रुपये वसुली केली जात आहे. ही वसुली त्वरित बंद करून ही रक्कम थेट टॅक्समध्ये समाविष्ट करावी, अशी मागणीही विनोद मापारी यांनी यावेळी केली.




### कामगारांच्या गणवेशाचा निधी जातो कुठे?

अकोला शहराच्या स्वच्छतेची धुरा सांभाळणाऱ्या सफाई कामगारांना अद्याप गणवेश देण्यात आलेले नाहीत, मात्र तरीही ३० लाख रुपयांची तरतूद नेमकी कशासाठी करण्यात आली आहे? असा प्रश्न नगरसेविका पूजा गावंडे यांनी उपस्थित केला. जर कामगारांना प्रत्यक्ष लाभ मिळत नसेल, तर हा निधी कोणाच्या खिशात जातोय, असा संशय त्यांनी व्यक्त केला. कचरा संकलनावर कंत्राटदार अधिक पैसे वसूल करीत असून वसुलीचे काम करणाऱ्या यंत्रणेवरही उबाठाचे विजय इंगळे यांनी आरोप लावले.

## जनता बाजार जागेचे हस्तांतरण रखडले

**अकोला:** गेल्या साडेसात वर्षांपासून रखडलेल्या जुने बसस्थानक आणि जनता भाजी बाजाराच्या जागा महापालिकेकडे हस्तांतरीत करण्याचा मार्ग मोकळा झाला असला, तरी प्रत्यक्ष प्रक्रिया अद्याप कागदावरच आहे. २३ सप्टेंबर २०२५ रोजी राज्य मंत्रिमंडळाने या हस्तांतरणाला मंजुरी दिली होती. या निर्णयाची प्रत प्राप्त होताच महापालिका प्रशासनाने जिल्हाधिकाऱ्यांकडे जागा ताब्यात देण्याची मागणी केली, मात्र सहा महिने उलटूनही हस्तांतरणाची कार्यवाही पूर्ण झालेली नाही. या प्रकल्पासाठी महापालिकेने यापूर्वीच २६ कोटी रुपयांचा भरणा महसूल विभागाकडे केला आहे. दरम्यानच्या काळात राजकीय घडामोडी आणि न्यायालयीन स्थगितीमुळे हा प्रश्न प्रलंबित होता. जागेचे पुनर्मूल्यांकन होऊन ती किंमत १४८ कोटींवर पोहोचली आहे. या दोन्ही मोक्याच्या जागांवर व्यापारी संकुल उभारण्याचे महापालिकेचे नियोजन आहे. मात्र, प्रशासकीय पातळीवरील दिरंगाईमुळे विकासाची पुढील पावले रखडली आहेत. आता जिल्हाधिकारी कार्यालय यावर कधी पाऊल उचलणार, याकडे अकोलेकरांचे लक्ष लागले आहे.



# डोंगरगावला वादळी वाऱ्याचा भीषण तडाखा

## घरांवरील टिनपत्रे उडाली, झाडे कोसळून मोठे नुकसान; एका व्यक्तीच्या हाताला गंभीर इजा





### निसर्गाचा हाहाकार

डोंगरगावात विजांच्या कडकडाटासह आलेल्या वादळाने जनजीवन विस्कळीत झाले. सुरेंद्र तायडे हे जखमी झाले असून प्रल्हाद इंगळे, उत्तम तायडे यांच्यासह अनेकांचे संसार उघड्यावर पडले आहेत. घरांची पडझड आणि झाडे कोसळल्याने झालेल्या या हानीचे तातडीने पंचनामे करून शासनाने आर्थिक आधार देण्याची गरज व्यक्त होत आहे.

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**डोंगरगाव , दि. ३१ :** बाळापूर तालुक्यातील डोंगरगाव परिसरात सोमवारी, ३० मार्च रोजी सायंकाळच्या सुमारास निसर्गाचा कोप पाहायला मिळाला. अचानक निर्माण झालेले ढगाळ वातावरण आणि त्यानंतर विजांच्या कडकडाटासह आलेल्या जोरदार वादळी वाऱ्याने गावाला अक्षरशः झोडपून काढले. या नैसर्गिक आपत्तीत अनेक घरांचे पत्रे उडून गेल्याने आणि झाडे उन्मळून पडल्याने ग्रामस्थांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.
सायंकाळी अचानक वातावरणात बदल झाला आणि वेगवान वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली. वाऱ्याचा वेग इतका प्रचंड होता की, गावातील अनेक कच्च्या घरांवरील टिनपत्रे कागदासारखी हवेत उडाली. काही ठिकाणी अजस्र झाडे घरांवर कोसळल्याने घरांच्या भिंतींना तडे गेले आहेत. या घटनेत सुरेंद्र श्रीराम तायडे यांच्या घरावर झाड आणि टीन कोसळल्याने त्यांच्या हाताला गंभीर जखम झाली आहे.
प्राथमिक माहितीनुसार, गावातील उत्तम तायडे, प्रल्हाद इंगळे, मुरलीधर वानखडे, गणेश इंगळे आणि मोहन भारसाकडे यांच्या कुटुंबांचे मोठे नुकसान झाले आहे. तर काहींच्या घरातील संसारोपयोगी वस्तूंचे पावसामुळे नुकसान झाले असून, हातावर पोट असलेल्या या कुटुंबांसमोर आता उघड्यावर राहण्याची वेळ आली आहे.
घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेऊन बाधितांना धीर दिला. निसर्गाच्या या प्रकोपाने हवालदील झालेल्या नागरिकांनी आता प्रशासनाकडे आर्त हाक दिली आहे. महसूल विभागाने तात्काळ गावात येऊन झालेल्या नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत आणि पीडित कुटुंबांना शासकीय मदत मिळवून द्यावी, अशी जोरदार मागणी डोंगरगावच्या स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.

# महान येथे जमिअत उलेमा-ए-हिंदच्या वतीने एसआयआर मॅपिंग शिबिर यशस्वी



अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**बार्शीटाकळी : दि. ३१ :** बार्शीटाकळी तालुक्यातील महान येथे जमिअत उलेमा-ए-हिंद ग्राम युनिटच्या वतीने शनिवार, २८ मार्च रोजी एकदिवसीय एसआयआर मॅपिंग शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. जिल्हा सदस्य अलहाज मास्टर शब्बीर खान यांच्या नेतृत्वाखाली डॉ. मोहम्मद अश्रफ यांच्या संकुलात पार पडलेल्या या शिबिराचा परिसरातील असंख्य नागरिकांनी लाभ घेतला.या शिबिरामध्ये प्रामुख्याने नाव दुरुस्ती, मॅपिंग आणि निवडणूक ओळखपत्राशी संबंधित तांत्रिक कामे पूर्ण करण्यात आली. याकामी महान सर्कलच्या सर्व बीएलओंचे मोलाचे सहकार्य लाभले. जमिअत उलेमा महान युनिटचे पदाधिकारी हाफिज इनायत खान साहेब, मुफ्ती मोहम्मद वसीम साहेब, डॉ. मोहम्मद अशरफ, तंटा मुक्ती अध्यक्ष शेख रशीद, हाफिज जावेद खान, अब्दुल हक उर्फ जावेद, शेख सादिक, शेख साजिद, हरमन खान आणि सोहेल खान यांनी हे शिबिर यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.यावेळी वसीम जहागीरदार सर, मोहम्मद आबिद, शेख महेमूद, नदीम जहागीरदार, एजाज खान यांच्यासह अनेक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागरिकांच्या प्रलंबित समस्या एकाच ठिकाणी सुटल्याने या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## महत्त्वाचे

### योगीराज महिला मंडळाकडून मतिमंद विद्यार्थ्यांना भोजनदान

**अकोला:** सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक क्षेत्रात सदैव अग्रेसर असणाऱ्या जुने शहरातील योगीराज महिला भजनी व पारायण मंडळाच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त एक स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. मंडळाच्या सदस्यांनी शेगाव येथील निवासी मतिमंद विद्यालयातील विद्यार्थ्यांना सुग्रास भोजन देऊन सामाजिक बांधिलकी जपली.या उपक्रमांतर्गत महिला पदाधिकाऱ्यांनी बाळापूर रोडवरील सिद्धपीठ महालक्ष्मी मंदिराला भेट देऊन दर्शन घेतले. त्यानंतर संत गजानन महाराज निवासी मतिमंद विद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रेमाने भोजन देण्यात आले. भोजनानंतर महिलांनी भक्तिमय वातावरणात संगीतमय भजने सादर करत आगळ्यावेगळ्या पद्धतीने आपली सेवा अर्पण केली. मंदिराचे अध्यक्ष गजानन वाघ यांनी यावेळी सर्व महिला पदाधिकाऱ्यांचे स्वागत केले.या उपक्रमात सुनंदा गावंडे, रुक्मिणी पुरी, ललिता खांडेकर, सुनीता गावंडे, गोलाईतबाई, रंजना पठाडे, सागळे, कमल कुकडे, भाकरेबाई, मनीषा गावंडे, संजीवनी पुरी, अर्चना मानेकर, प्रतिभा मेटांगे व छकुली ताथोड यांसह मंडळाच्या इतर सदस्यांनी उत्साहाने सहभाग घेतला.

### रामनगरात ४ एप्रिल रोजी नारदीय कीर्तन सोहळा



**अकोला:** गोरक्षण व गोसंवर्धनासाठी समर्पित असणाऱ्या येथील आदर्श गोसेवा व अनुसंधान प्रकल्पाच्या कीर्तन कुलाच्या वतीने, स्व. शालिनीताई नाईकवाडे यांच्या पाचव्या स्मृतिप्रीत्यर्थ एकदिवसीय नारदीय कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शनिवार, दि. ४ एप्रिल रोजी सायंकाळी ५:३० वाजता रामनगर येथील आदर्श गोसेवा धाममधील प्रा. भाऊसाहेब नाईकवाडे सभागृहात पार पडेल. याप्रसंगी नागपूर येथील ख्यातनाम राष्ट्रीय कीर्तनकार ह.भ.प. नंदिनी कडुस्कर आपली नारदीय कीर्तन सेवा सादर करणार आहेत. त्यांना हार्दिक दुबे (तबला) आणि डॉ. अभय कुलकर्णी (हार्मोनियम) साथसंगत करतील.या आध्यात्मिक मेजवानीचा लाभ अकोलेकर नागरिकांनी, महिला व पुरुषांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन आदर्श गोसेवा व अनुसंधान प्रकल्पाच्या वतीने करण्यात आले आहे.

# मंगरुळपीर तालुक्यात फळबाग अनुदानाचा पेच कायम

## बिलांवरील कथित खाडाखोडीचे गूढ वाढले!

अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**मंगरुळपीर : दि. ३१ :** तालुक्यातील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवड करणाऱ्या लाभार्थ्यांच्या अनुदानाचा प्रश्न दिवसेंदिवस गुंतागुंतीचा होत आहे. सन २०२५-२६ या वर्षातील पात्र लाभार्थ्यांच्या फळबागेच्या कुशल व सामुग्री अनुदानाचा प्रश्न मार्च महिन्याचा शेवटचा दिवस उजाडूनही सुटलेला नाही. विशेष म्हणजे, सुमारे ९० शेतकऱ्यांच्या मूळ देयकांवर आणि मापन पुस्तिकेवर (एम.बी.) खाडाखोड झाल्याची माहिती समोर येत असून, ही प्रक्रिया नक्की कोणामार्फत व का झाली, याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही.
संबंधित बिलांवरील ही कथित खाडाखोड तालुका कृषी कार्यालयातच झाल्याची परिसरात चर्चा आहे. मात्र, याबाबत प्रभारी तालुका कृषी अधिकाऱ्यांनी त्यांचे मत मांडताना, अशा प्रकारची कोणतीही खाडाखोड आमच्या कार्यालयामार्फत झाली नसल्याचे स्पष्ट केल्याचे समजते. शासकीय दस्तऐवजांवर अशा प्रकारे अनधिकृत बदल होणे आणि त्याबाबत विभागाला नेमकी माहिती नसणे, ही बाब प्रशासकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे.या प्रकरणी मार्ग काढण्यासाठी काही संबंधित कर्मचाऱ्यांनी तत्कालीन अधिकाऱ्यांशी संपर्क साधून स्वाक्षऱ्या मिळवण्याचे प्रयत्न केल्याचे व काही स्तरावर बैठका पार पडल्याचीही चर्चा आहे; तथापि, यातून अद्याप कोणताही ठोस तोडगा निघालेला नाही. या प्रकरणातील संदिग्धता वाढत असताना अद्याप कोणतीही अधिकृत चौकशी सुरू झालेली नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींचा शोध घ्यावा आणि पात्र शेतकऱ्यांना तातडीने अनुदान मिळवून द्यावे, अशी मागणी बाधित शेतकऱ्यांकडून होत आहे.

# मुंडगाव ग्रामपंचायतीसमोरचे उपोषण ४थ्या दिवशी मागे

## १५ दिवसांत कारवाईचे लेखी आश्वासन!

अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**मुंडगाव : दि. ३१ :** अकोट तालुक्यातील मुंडगाव ग्रामपंचायत कार्यालयासमोर अमीनपूर येथील ६ महिला व २ पुरुषांनी पुकारलेले आमरण उपोषण अखेर चौथ्या दिवशी मागे घेण्यात आले. प्रशासनाने येत्या १५ दिवसांत मागण्या पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर उपोषणकर्त्यांनी लिंबू सरबत प्राशन करून आंदोलन स्थगित केले. मात्र, या आंदोलनाकडे ग्रामपंचायत सरपंचांनी पाठ फिरवल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.
अमीनपूर येथील समाजमंदिराच्या मागील मोकळ्या जागेचा रीतसर ८-अ उतारा मिळावा, या मागणीसाठी मंगला पोहोरकर, सिंधू सोनोने, नीता गवई, मालता पिंपळे, कमला सरकटे, सपना पुंडकर, तोताराम सरकटे आणि सुरेश सरकटे यांनी २७ मार्चपासून आमरण उपोषण सुरू केले होते. या जागेबाबत सरपंच व ग्रामसेवक हेतुपुरस्सर दुर्लक्ष करत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला होता.अखेर अकोटचे गटविकास अधिकारी रमाकांत माळी, विस्तार अधिकारी मदनसिंग बहुरे, दिपाली महल्ले, अकोट ग्रामीणचे ठाणेदार किशोर जुनगरे, बीट जमादार निलेश खंडारे, शिवकुमार तोमर, सचिन कुलट, भास्कर सांगळे, ग्राम महसूल अधिकारी आशेर परमार्थ, वाळके, उपसरपंच अनिल गाढे, सदस्य तुषार पाचकोर, जुगलकिशोर चिंचोलकार, अरविंद फुसे, कविता पोहरकार, कमलकिशोर पिंपळे, ग्रामसेवक सय्यद नजाकत, रमेश सरकटे, मनीष सरकटे, पत्रकार स्वप्नील सरकटे, राजकुमार वानखडे, शेषराव सरकटे, सावतराम सरकटे आणि रमाकांत सरकटे यांच्या उपस्थितीत हे उपोषण सोडविण्यात आले.येत्या १५ दिवसांत मागण्या पूर्ण न झाल्यास १६ एप्रिल रोजी गटविकास अधिकारी अकोट यांच्या दालनात ठिय्या आंदोलन आणि पुन्हा आमरण उपोषण करण्याचा इशारा शांतीदूत बुद्धविहार चॅरिटेबल ट्रस्ट व सुकेशिनी महिला मंडळाच्या वतीने देण्यात आला आहे.

# टाकळी खुर्दमध्ये पाणीपुरवठा योजनेत कथित भ्रष्टाचार; सरपंचासह सचिवांची चौकशी करण्याची मागणी

## लोखंडी ऐवजी प्लास्टिक पाईप वापरल्याचा सदस्याचा आरोप; बीडीओंकडे निवेदनाद्वारे दाद

अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**अकोट , दि. ३१ :** तालुक्यातील टाकळी खुर्द येथे १५ व्या वित्त आयोगांतर्गत सुरू असलेल्या पाणीपुरवठा पाईपलाईनच्या कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्याचा खळबळजनक आरोप ग्रामपंचायत सदस्य दीपक पाटकर यांनी केला आहे. या संदर्भात त्यांनी ३० मार्च रोजी अकोटचे गटविकास अधिकारी (बीडीओ) यांच्याकडे निवेदनाद्वारे निष्पक्ष चौकशीची मागणी केली आहे.
सध्या अकोला जिल्ह्यात तापमानाचा पारा ४० अंश सेल्सिअसच्या पार गेल्याने ग्रामीण भागात पाणीटंचाईची तीव्रता वाढली आहे. अशा परिस्थितीत गावकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाकडून पाणीपुरवठा योजनेचे काम मंजूर करण्यात आले आहे. या कामासाठी नियमानुसार लोखंडी पाईप वापरणे आवश्यक असताना, प्रत्यक्षात मात्र निकृष्ट दर्जाचे प्लास्टिक पाईप वापरून शासनाची दिशाभूल केली जात असल्याचा दावा दीपक पाटकर यांनी केला आहे.पाटकर यांनी निवेदनात म्हटले आहे की, ''मी ग्रामपंचायत सदस्य असूनही याबाबत सरपंच आणि सचिवांना विचारणा केली असता, त्यांनी समाधानकारक उत्तरे न देता उडवाउडवीची उत्तरे दिली. या कामात आर्थिक अनियमितता झाल्याची शक्यता असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. आता गावात सध्या १५ व्या वित्त आयोगातून पाईपलाईनचे काम सुरू आहे. या कामात लोखंडी पाईपऐवजी प्लास्टिकचे पाईप वापरून कथित भ्रष्टाचार केला जात आहे. याबाबत मी गटविकास अधिकाऱ्यांकडे रीतसर तक्रार केली असून चौकशीची मागणी केली आहे.

**दीपक लक्ष्मण पाटकर, (ग्रामपंचायत सदस्य, टाकळी खुर्द)**

पंचायत समिति प्रशासन या तक्रारीवर काय पाऊल उचलते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# अकोटमध्ये 'भीमा तुझ्या जन्मामुळे' महानाट्याला हजारो भीम सैनिकांचा प्रतिसाद!

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट , दि. ३१ :** स्थानिक छत्रपती शिवबा, युवा व सम्यकदृष्टी प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने २९ मार्च रोजी श्री सरस्वती महाविद्यालयात भीमा तुझ्या जन्मामुळे महानाट्य सादर झाले. जय हो एंटरप्राइजेस प्रस्तुत व प्रा. प्रकाश वाघमारे निर्मित या प्रयोगाला प्रचंड प्रतिसाद मिळाला. यावेळी ॲड. संतोष खवले निर्मित आगामी चित्रपटाच्या शीर्षक गीताचे विमोचनही करण्यात आले.
कार्यक्रमाचे अध्यक्ष मंगेश चिखले, स्वागताध्यक्ष ॲड. संतोष खवले तर आयोजक निखिल वानखडे, वैभव जगताप, वंश दांदळे होते. यावेळी प्रा. विलास तायडे, प्रकाश गायकी, स्वप्निल सरकटे, दीपक रेळे, पवन बेलसरे, संभाजी थोरात, प्रज्वल डोंगरदिवे, अतुल अढाऊ, प्रा. प्रशांत सावळे, अजय घनबहादूर, लखन इंगळे, मंगला वानखडे, रोशन नितोने, आशिष वानखडे, सुशीला पचांग व सुनिता वानखडे यांचा सन्मान करण्यात आला.
सोहळ्याला प्रमोद देंडवे, मिलिंद इंगळे, दीपक गोरे, श्रीनिवास पोकळे (चेत्या), शेषराव चव्हाण, कटके, स्वाती चिखले, अमृता खवले, आशिष रायबोले व कलावंत श्रीवेश देशमुख, गौरव धांडे, उमेश गारोळे, अविनाश नाटेकर, स्टेफी प्यारेजी, सुशील ठाकरे उपस्थित होते.
यशस्वीतेसाठी अपेक्षा अवंडकर, प्रवीण इंगळे, मनोज देशमुख, पंकज जयस्वाल, स्वप्नील बोबडे, रेखा शिरसाठ, कामिनी बोडके, कविता कानेरकर, महेश व सागर वाघमारे, संतोष निमकर, राजेश व शिवराज हाडोळे, सागर तायडे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रकाश गायकी, आभार प्रा. प्रवीण बोंद्रे यांनी मानले.

**आधुनिक डिजिटल शिक्षणाचा नवा आदर्श** | **खाजगी शाळांनाही टक्कर देणारी सुविधा**

# बोर्डीच्या पीएम श्री जिल्हा परिषद शाळेची गरुडझेप

अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**अकोट , दि. ३१ :** तालुक्यातील बोर्डी येथील पीएम श्री जिल्हा परिषद सेमी इंग्रजी शाळेने शिक्षण क्षेत्रात आपली एक वेगळी ओळख निर्माण केली असून, आधुनिक सुविधा आणि प्रगत अध्यापनाच्या जोरावर ही शाळा आज तालुक्यात मॉडेल स्कूल म्हणून नावारूपास आली आहे. वाढती पटसंख्या, दर्जेदार शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविल्या जाणाऱ्या नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे पालक व ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. विशेष म्हणजे, महाराष्ट्र इंटरनॅशनल एज्युकेशन बोर्डाची संलग्नता आणि त्यानंतर पीएम श्री उपक्रमांतर्गत निवड झाल्याने शाळेचा लौकिक राज्याच्या पटलावर पोहोचला आहे.
मुख्याध्यापक उमेश चोरे यांच्या कल्पक मार्गदर्शनाखाली शालेय व्यवस्थापन समिती आणि ग्रामस्थांच्या सक्रिय लोकसहभागातून शाळेचा कायापालट झाला आहे. येथे बाला उपक्रमांतर्गत शाळेच्या भिंती व प्रत्येक कोपरा बोलका करण्यात आला असून, आकर्षक चित्रे व मॉडेल्सद्वारे विद्यार्थ्यांना हसत-खेळत शिक्षण दिले जाते. शाळेतील सर्व वर्गखोल्या डिजिटल असून अद्ययावत संगणक कक्ष व इंटरनेट सुविधेमुळे विद्यार्थी जागतिक ज्ञानाशी जोडले गेले आहेत.
केवळ अभ्यासच नव्हे, तर पुस्तकांची शाळा या उपक्रमातून वाचन संस्कृती आणि नवोदय, शिष्यवृत्ती परीक्षांसाठी विशेष मार्गदर्शनावर येथे भर दिला जातो. मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियानात विभागात सलग दोन वर्षे या शाळेने अव्वल क्रमांक पटकावला आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी इको क्लब, विद्यार्थी मंत्रिमंडळ, बचत बँक आणि मुलींसाठी लाठी-काठी, तायक्वांदो व जुडो-कराटे यांसारखी स्वसंरक्षण प्रशिक्षणे नियमित राबविली जातात.
या यशामागे व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, मुख्याध्यापक उमेश चोरे, शिक्षक सतीश धांडे, रामदास पंधरे, नितीन मासोदकर, विनोद तळोकार, योगशिक्षिका उज्वला देवानंद डोबाळे, कु. लता पुराम, कु. रागिनी खोटरे, कु. माया लायबर आणि चेतन वनकर या सर्व टीमचे अथक परिश्रम, जिद्द आणि चिकाटी कारणीभूत आहे.

### शाळेची वैशिष्ट्ये

बोर्डीची शाळा डिजिटल वर्गखोल्या, आयडियल लॅब आणि बाला उपक्रमाने सज्ज आहे. येथे नवोदय मार्गदर्शन, पुस्तकांची शाळा, मुलींसाठी मार्शल आर्ट्स आणि योगाचे धडे दिले जातात. सुंदर शाळा पुरस्कारप्राप्त या शाळेने लोकसहभागातून गुणवत्तेचा नवा आदर्श निर्माण केला आहे.

# निलेश भारसाकळे यांचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरव!



अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मूर्तिजापूर : दि. ३१ :** तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, दताळा येथील प्रभारी मुख्याध्यापक तथा तंत्रस्नेही शिक्षक निलेश नारायणराव भारसाकळे यांना त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल ध्येय एज्युकेशन फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य तर्फे राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. पुणे येथील ग.दि. माडगूळकर नाट्यगृहात २९ मार्च रोजी हा दिमाखदार सोहळा पार पडला.
''विद्यार्थीच माझे दैवत'' मानून भारसाकळे यांनी शाळेत कॉन्व्हेंटच्या तोडीचे शिक्षण उपलब्ध करून दिले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली राबविली जाणारी चिल्ड्रेन बचत बँक, एक तास वाचन, सुंदर अक्षर आणि ध्वनिक्षेपकावरून इंग्रजीतून घेतला जाणारा परिपाठ हे उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मैलाचा दगड ठरत आहेत.
आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, डिजिटल अध्यापन आणि नाविन्यपूर्ण शैक्षणिक साहित्य निर्मितीमुळे त्यांनी विद्यार्थी व पालकांमध्ये आदराचे स्थान निर्माण केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल केंद्रप्रमुख, गटशिक्षणाधिकारी व सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

## महत्त्वाचे

### समृद्धी महामार्गावर चालकाला डुलकी लागल्याने ट्रकचा अपघात

**कारंजा :** समृद्धी महामार्गावर चॅनेल क्रमांक १७९ जवळ आज पहाटे एका ट्रकचा अपघात झाला. हा ट्रक जालन्यावरून रायपूरकडे जात असताना ३१ मार्च २०२६ रोजी सकाळी ४:१० वाजेच्या सुमारास ही घटना घडली. ट्रक चालक अमित कुमार यादव (वय २५, राहणार उत्तर प्रदेश) याला अचानक डुलकी लागल्यामुळे त्याचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि हा अपघात झाला. सुदैवाने, या अपघातात चालक अमित कुमार हा किरकोळ जखमी झाला आहे. अपघाताची माहिती मिळताच समृद्धी महामार्गावरील '१०८' रुग्णवाहिकेचे पायलट आतीश चव्हाण व डॉक्टर गणेश यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी जखमी चालकावर प्राथमिक उपचार करून त्याला पुढील उपचारासाठी कारंजा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. या मदतकार्यात समृद्धी महामार्ग अग्निशामक दल आणि कारंजा हायवे पोलीस प्रामुख्याने उपस्थित होते. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून महामार्गावरील वाहतूक सुरळीत केली आहे.

### शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी गजानन जाधव



**वाशीम :** जिल्हा परिषद शाळा उमरा शम ची शाळा व्यवस्थापन समितीची निवडणूक आज सरपंच अविरोध साधना सुभाष कव्हर यांच्या अध्यक्षतेखाली झाली असून शाळा समितीच्या अध्यक्षपदी गजानन जाधव तर उपाध्यक्षपदी सितल गायकवाड यांची निवड झाली आहे, यावेळी पोलीस पाटील देवराव चौतमाल, तंटामुक्ती अध्यक्ष माधवराव इंगळे उपसरपंच चेतन भगत, ग्रामपंचायत सदस्य अमोल भगत, रवी श्रृंगारे, माजी उपसरपंच दगडू शृंगारे. पालकांसह गावकरी मंडळी उपस्थित होती ,शाळा व्यवस्थापन समिती च्या सदस्या मध्ये रंजनाताई शंकर रणबावळे, प्रगतीताई उमेश मापारी, त्रिवेणीताई नारायण कदम, भागवत धोंडोजी श्रृंगारे, गजानन महादेव जाधव, शितल भागवत गायकवाड, संगीताताई दत्ता कव्हर शामराव संभाजी श्रृंगारे, संदिप श्रीराम कोल्हे, ग्यानुजी केशव श्रृंगारे यांची निवड करण्यात आली आहे. सभेचे सूत्रसंचालन महल्ले यांनी केले असून आभार प्रदर्शन पवार यांनी केले. मुख्याध्यापक सुरडकर यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रम पार पडला.

# प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे पोहरादेवीत गोधनाचा बळी

## यात्रेनंतरच्या प्लास्टिक कचऱ्याने घेतला गायींचा जीव

**अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**मानोरा, दि. ३१ :** बंजारा समाजाचे श्रद्धास्थान असलेल्या पोहरादेवी येथे दोन दिवसांपूर्वी पार पडलेल्या यात्रोत्सवानंतर भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. प्रशासनाने यात्रेनंतर कचरा व्यवस्थापनाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्यामुळे, परिसरात पडलेला प्लास्टिकचा कचरा खाऊन अनेक गायींचा मृत्यू झाला आहे. या मृत जनावरांमुळे मंदिर परिसरात दुर्गंधी पसरली असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे.

पोहरादेवी येथील जगदंबा माता मंदिर, संत सेवालाल महाराज आणि बापू रामराव महाराज यांच्या दर्शनासाठी देशभरातून लाखो भाविक येतात. रामनवमी आणि संत सेवालाल महाराज जयंतीनिमित्त भरणाऱ्या यात्रेत मोठ्या प्रमाणात दुकाने थाटली जातात. यात्रा संपल्यानंतर विक्रेते आणि भाविकांनी टाकलेला प्लास्टिकचा कचरा



आणि उरलेले अन्न परिसरात अस्ताव्यस्त पडलेले असते. हाच कचरा खाल्ल्यामुळे गेल्या दोन दिवसांत ३ ते ४ गायींचा मृत्यू झाला आहे.

कचरा वेळेवर न उचलल्यामुळे गायींचा तडफडून मृत्यू झाला, तरीही प्रशासकीय यंत्रणेने याकडे लक्ष दिले नाही. अखेर स्थानिक सामाजिक कार्यकर्ते अश्वत्थामा रामकृष्ण चव्हाण यांनी पुढाकार घेतला. त्यांनी स्वतः जेसीबी बोलावून खड्डे खोडले आणि मृत गायींवर अंत्यसंस्कार केले. काही जनावरे उघड्यावर कुजल्यामुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली आहे, ज्यामुळे रोगराई पसरण्याची भीती व्यक्त होत आहे.

ही समस्या केवळ यावर्षीची नसून दरवर्षी यात्रेनंतर असेच चित्र पाहायला मिळते, असा आरोप अश्वत्थामा चव्हाण यांनी केला आहे. प्रशासनाला वारंवार सूचना देऊनही स्वच्छतेबाबत ठोस उपाययोजना केल्या जात नाहीत. लाखो भाविक येत असलेल्या या तीर्थक्षेत्रावर साधे कचरा व्यवस्थापनही प्रशासनाला करता येत नसल्याने स्थानिक नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

प्रशासनाच्या या निष्काळजीपणामुळे मुक्या प्राण्यांना आपला जीव गमवावा लागला असून, भविष्यात असे प्रकार रोखण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

> ■ प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे आज गायींचा मृत्यू झाला आहे. वारंवार सांगूनही स्वच्छता केली जात नाही. जर प्रशासनाने तातडीने हालचाल केली नाही, तर आम्ही तीव्र आंदोलन करू.
>
> **-अश्वत्थामा रामकृष्ण चव्हाण**, सामाजिक कार्यकर्ते, पोहरादेवी.

**ग्रामस्थांच्या मागण्या:**
यात्रेनंतर तातडीने संपूर्ण परिसराची स्वच्छता करण्यात यावी. प्लास्टिक कचरा टाकणाऱ्या विक्रेत्यांवर कठोर कारवाई व्हावी. मृत जनावरांच्या विल्हेवाटीसाठी कायमस्वरूपी यंत्रणा उभी करावी. हलगर्जीपणा करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी.

## यशाचा आनंद साजरा केल्याने मिळते उर्जा; मान्यवरांचा सूर

**अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ३१ :** जिद्द, मेहनत अनब हिंमतीने मिळिवलेल्या यशाचा आनंदोत्सव साजरा केलाच पाहिजे. त्यामुळे स्वत:मधील उर्जा वाढते, असा सूर 'यशाचा आनंदोत्सव' या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांचा राहिला. हा कार्यक्रम येथील माँ गंगा नर्सिंग कॉलेजमधील सिताराम सभागृहात (ता.२९) रविवारी सायंकाळी ४ वाजता पार पडला. जनस्वप्नपूर्ती माध्यम समूह अनब सकारात्मक साहित्य परिवाराच्या वतीने उपरोक्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी विविध क्षेत्रात कर्तृत्त्व गाजविर्णायांना 'प्रेरणादिप', 'ॲक्टिव्ह पर्सनॅलिटी' अनब उर्जादायी व्यक्तिमत्त्व पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजर्षी शाहू परिवाराचे संस्थापक अध्यक्ष रा.ल.उपाख्य भाऊसाहेब शेळके, तर प्रमुख उपस्थितीमध्ये निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, वारकरी नारायण बोरे, गोदावरी बोरे, चिखलीचे नगराध्यक्ष पंडीतराव देशमुख, डॉ. उज्वला मापारी, उपविभागिय अधिकारी वैशाली देवकर, रिसोडचे पोलिस निरिक्षक रामेश्वर चव्हाण, रिसोडचे डॉ. दिलिपराव धोपे, मेहकरचे वैद्यकिय अधिकारी डॉ. धैर्यशिल रहाटे, सुप्रसिद्ध विधिज्ञ ॲड. रवी तनपुरे, सप्रसिद्ध त्वचारोगतज्ज्ञ डॉ. श्रद्धा बाहेती, रिसोडचे माजी कुउबास संचालक नामदेवराव सदार, बोरीचे सरपंचपती अनंतराव चनखोरे होते. या कार्यक्रमासाठी सामाजिक कार्यकर्ते गजानन धामणे, अर्जून इढोळे, अरुण बोरे, प्रमोद बोरे, प्रकाश नवघरे आदींनी मेहनत घेतली. संचालन विनोद बोरे, तर आभार अर्चना बोरे यांनी मानले. कार्यक्रमात डॉ. उज्वला मापारी, डॉ. श्रद्धा बाहेती यांना उर्जादायी व्यक्तिमत्त्व पुरस्कार देण्यात आला, तर प्रेरणादिप पुरस्काराने राजर्षी शाहू परिवाराचे संस्थापक अध्यक्ष रामराव ल. उपाख्य भाऊसाहेब शेळके, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, मानस फाऊंडेशनचे अध्यक्ष दत्तात्रय लहाने, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. दिलिपराव धोपे, डॉ. धैर्यशील रहाटे, उपविभागिय अधिकारी वैशाली देवकर, चिखलीचे नगराध्यक्ष पंडीतराव देशमुख, सेवानिवृत्त शिक्षक अनिल काळे, कापड व्यावसायिक बालाजी सोळंके, भगवानराव चेके, सरपंचपती अनंतराव चनखोरे, गणेशराव तुपे, संदीप बाजड यांना सन्मानित करण्यात आले. ॲक्टिव्ह पर्सनॅलिटी पुरस्काराने दिनकरराव बोडखे, अशोक पाटोळे यांना सन्मानित करण्यात आले.

## गर्भलिंग चाचणीची माहिती द्या अन मिळवा १ लाखांचे बक्षिस

**अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ३१ :** जिल्ह्यातील कन्याभ्रूणहत्या रोखण्यासाठी आणि बिघडते लिंग गुणोत्तर सुधारण्यासाठी वाशिम जिल्हा प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. 'पी-सी-पी-एन-डी-टी' आणि 'एम-टी-पी' कायद्यांतर्गत बेकायदेशीर गर्भलिंग तपासणी करणाऱ्यांची खात्रीशीर माहिती देणाऱ्या नागरिकाला आता १ लाख रुपयांचे बक्षीस देण्यात येणार आहे. ३० मार्च रोजी जिल्हा रुग्णालयात पार पडलेल्या जिल्हास्तरीय सल्लागार समितीच्या बैठकीत या महत्त्वपूर्ण मोहिमेचा आढावा घेण्यात आला. सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या या योजनेत माहिती देणाऱ्याची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवली जाणार



असून, त्याचे नाव सुरक्षित राहील याची ग्वाही प्रशासनाने दिली आहे.

या मोहिमेला गती देण्यासाठी नागरिक, आरोग्य कर्मचारी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी पुढाकार घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले आहे. बेकायदेशीर कृत्य उघडकीस आल्यास संबंधित माहितीदाराला बक्षीस दिले जाईल. या प्रकरणांची नोंदणी करण्यासाठी 'आमची मुलगी महा डॉट इन' या संकेतस्थळावर अर्ज करता येईल. तसेच, अधिक माहिती किंवा तक्रारीसाठी राज्य स्तरावरील टोल फ्री क्रमांक १०४ किंवा १८००२३३४४७५ वर संपर्क साधता येईल. 'कन्याभ्रूणहत्या ही केवळ कायद्याची बाब नसून ती सामाजिक जबाबदारी आहे, नागरिकांच्या सतर्कतेमुळे एका मुलीचा जीव वाचू शकतो,' असे मत जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी व्यक्त केले.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे यांनी सांगितले की, लिंग निवड चाचण्या ही एक गंभीर सामाजिक समस्या असून प्रशासन अशा प्रकरणांवर तातडीने कारवाई करण्यासाठी सज्ज आहे. या बैठकीला जिल्हास्तरीय सल्लागार समितीच्या अध्यक्षा डॉ. अलका मकासरे, ॲड. डॉ. शिवनंदा आम्ले, ॲड. जी. डी. गंगावणे, डॉ. जया बिबेकर, डॉ. जे. एस. बाहेती, डॉ. गोपाल हेंबाडे आणि विधी सल्लागार ॲड. राधा नरवलिया यांची प्रमुख उपस्थिती होती. या योजनेमुळे जिल्ह्यात स्त्री भ्रूण संरक्षणासाठी एक प्रभावी वातावरण निर्माण होईल, अशी आशा प्रशासनाने व्यक्त केली आहे.

## कारंजातील नागरी समस्यांवरून 'ब्लू पँथर' आक्रमक

**अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**कारंजा, दि. ३१ :** शहरातील गौतम नगर आणि महात्मा फुले नगर परिसरातील प्रलंबित नागरी समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी 'ब्लू पँथर' संघटना आक्रमक झाली आहे. या भागातील रस्त्यांची दुरवस्था, पथदिव्यांचा अभाव आणि नाल्यांच्या दुरवस्थेमुळे नागरिक त्रस्त असून, या मागण्या तातडीने मार्गी न लावल्यास तीव्र जनआंदोलन उभारण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

या संदर्भात माजी नगराध्यक्ष हाजी मोहम्मद युसुफ सेठ पुंजानी यांना संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आले.

निवेदनानुसार, गौतम नगर ते



नागवाणी शाळा मार्गे सिंधी कॅम्पकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली आहे. या मार्गावरून प्रवास करताना नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असून, अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. या रस्त्याचे तात्काळ 'री-कॉँक्रीटिंग' करावे, अशी प्रमुख मागणी संघटनेने केली आहे. तसेच, या मार्गावर रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात अंधार असल्याने तातडीने नवीन पथदिवे बसवण्याची गरजही व्यक्त करण्यात आली.

पंचायत समितीपासून महात्मा फुले नगरकडे जाणारा नाला मोठ्या प्रमाणात तुंबला आहे. यामुळे परिसरात सतत दुर्गंधी पसरलेली असते, परिणामी नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या नाल्याची तातडीने स्वच्छता व दुरुस्ती करण्याची मागणीही निवेदनातून करण्यात आली. याशिवाय, गौतम नगरमधील खुल्या जागेत युवकांसाठी आधुनिक व्यायामशाळा उभारण्याचा प्रस्ताव नगर परिषदेने मंजूर करावा, असेही संघटनेने नमूद केले.

यावेळी 'ब्लू पँथर'चे अध्यक्ष ॲड. निलेश खंडारे, उपाध्यक्ष ॲड. पंकज सावळे, सचिव सुरज गणराज, मीडिया प्रभारी महादेव तायडे, संघटक रंगराव गोपनारायण, रॉबिन आठवले, बाळासाहेब ठोबरे, अंकुश ठोबरे, प्रदीप हरियर, भुपेंद्र हरियर, मिथुन खरात, गोपाल ढवळे यांच्यासह संघटनेचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## गायिका वनिता भगत राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्काराने सन्मानित

**अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ३१ :** समाजातील व्यसनमुक्तीसाठी सातत्याने कार्य करर्णाया सामाजसेविका व सुप्रसिध्द गायीका सौ. वनिता उध्दव भगत यांना महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत देण्यात येर्णाया राज्यस्तरीय व्यसन मुक्ती सेवा पुरस्काराने विधानसभा अध्यक्ष . राहुल नार्वेकर, केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री ना. रामदास आठवले, सामाजीक न्याय मंत्री विशेष सहाय्य विभाग ना. संजय सिरसाट प्रधान सचिव हर्षदिप कांबळे, आयुक्त सौ. दिपा मुधोळकर मुंडे , सप्त खंजेरी वादक सत्यपाल महाराज व सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभागाचे अधिकारी यांच्या हस्ते, यशवंतराव चव्हाण सभागृहात मुंबई येथे सन्मानित करण्यात



आले. व्यसन मुक्तीच्या क्षेत्रात जनजागृती घडवून आणण्यासाठी त्यांनी गायन, सांस्कृतिक कार्यक्रम व विविध समाज प्रबोधनात्मक उपक्रमांच्या माध्यमातून मोठे योगदान दिले आहे. ग्रामीण भागात जाऊन युवकांना व्यसनापासून दूर ठेवण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले असून त्यांच्या कार्याचा समाजावर सकारात्मक परिणाम दिसून येत आहे. या पुरस्कारामुळे त्यांच्या कार्याची दखल राज्यस्तरावर घेण्यात आली असून त्यांच्या कार्याला नवी प्रेरणा मिळाली आहे. पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. गायीका वनिता उध्दव भगत यांनी हा सन्मान समाजातील सर्व सहर्कायांचा व व्यसन मुक्तीसाठी कार्य करर्णाया प्रत्येक व्यक्तीचा असल्याचे नमूद करत, पुढील काळातही हे कार्य अधिक जोमाने सुरु ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

**संस्कृतीचा वारसा** | **३०० वर्षांनंतरही ओसाड गावात भक्तीचा 'संगम'**

# गावाचे अस्तित्व मिटले, पण दैवत राहिले!

**अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ३१ :** काळाच्या ओघात मानवी वस्त्या पुसल्या जातात, पिढ्या बदलतात आणि गावेच्या गावे नकाशावरून अदृश्य होतात. मात्र, श्रद्धा आणि संस्कृतीचा वारसा किती अढळ असतो, याचे जिवंत उदाहरण म्हणजे वाशीम तालुक्यातील 'संगमेश्वर' हे उजाड गाव. तब्बल तीनशे वर्षांपूर्वी हे गाव ओसाड झाले असले, तरी येथील प्राचीन संगमेश्वर महादेव मंदिरातील भक्तीचा झरा आजही तितक्याच प्रबळतेने वाहत आहे. नुकत्याच पार पडलेल्या आमली बारस उत्सवानिमित्त या निर्जनस्थळी हजारो भाविकांची मांदियाळी पाहायला मिळाली.

इतिहास सांगतो की, १८ व्या शतकाच्या सुरुवातीला संगमेश्वर हे एक समृद्ध गाव होते. प्रामुख्याने गवळी



समाजाची मोठी वस्ती असलेले हे गाव निसर्गरम्य परिसरात गुण्यागोविंदाने नांदत होते. आजही शासकीय महसूल दप्तरात या गावाची नोंद 'संगमेश्वर' अशीच आहे. मात्र, सुमारे ३०० वर्षांपूर्वी काही अनाकलनीय आणि अपरिहार्य कारणांमुळे ग्रामस्थांना आपली घरेदारे सोडून स्थलांतर करावे लागले. गाव पूर्णपणे उजाड झाले, घरे पडली, पण उरले ते फक्त पुरातन हेमाडपंती संगमेश्वर महादेव मंदिर, एक प्राचीन बारव आणि एक रहस्यमय गुफा.

गाव सोडून गेलेले लोक आजूबाजूच्या परिसरात विखुरले गेले, मात्र त्यांचे मन या मंदिराशी जोडलेले राहिले. १८६२ मध्ये एका अज्ञात साधूने या पडक्या मंदिराचा प्राथमिक जीर्णोद्धार केला. त्यानंतर, १८९१ मध्ये वारा जहागीर येथील पोलीस पाटील धुळाजी ढगे यांनी या मंदिराच्या पूजेचा आणि देखभालीचा विडा उचलला. तेव्हापासून आजतागायत, धुळाजी ढगे यांच्या पाच पिढ्यांनीङ्घज्यात रामजी, विठोबा, भिकाजी, वामन, किसन आणि सध्याचे विश्वनाथराव, चिंतामण, विलासराव ढगे यांसारख्या अनेक वारसदारांनीही सेवा अखंडित चालू ठेवली आहे.

आज हे गाव नकाशावर 'उजाड' असले, तरी भाविकांच्या श्रद्धेमुळे या जागेला तीर्थक्षेत्राचे स्वरूप प्राप्त झाले आहे. वारा जहागीर येथील माळी समाज या महादेवाला आपले कुलदैवत मानतो. याच श्रद्धेतून आता मंदिराचा तिसऱ्यांदा भव्य जीर्णोद्धार केला जात आहे. माळी समाजातील दानशूर बांधवांनी एकत्र येत एका टोलेजंग मंदिराची उभारणी केली असून, याचे काम आता अंतिम टप्प्यात आहे.

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही आमली बारशीच्या निमित्ताने येथे भव्य यात्रा भरली होती. ज्या गावात आज एकही घर नाही, त्या गावात हजारो हातांनी महाप्रसादाचे वाटप केले आणि लाखो मुखांनी 'हर हर महादेव'चा जयघोष केला. संस्थानचे अध्यक्ष विलासराव ढगे यांच्या नियोजनाखाली यावर्षीही भाविकांच्या सोयीसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती.

संगमेश्वरची ही गाथा सांगते की, काळ कितीही बलवान असला तरी लोकसंस्कृती आणि दैवतावरील निष्ठा कधीही पुसली जाऊ शकत नाही. जिथे मानवी वस्ती संपते, तिथे ईश्वरी चैतन्य आजही उभे आहे, याची साक्ष म्हणजे हे संगमेश्वर मंदिर!

## कामरगावच्या कला व विज्ञान महाविद्यालयात पदवी वितरण समारंभ



**अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**कामरगाव, दि. ३१ :** येथील कला व विज्ञान महाविद्यालयात २०२४-२५ या शैक्षणिक सत्रातील पदवी प्राप्त विद्यार्थ्यांचा गौरव व प्रमाणपत्र वितरण समारंभ ३० मार्च रोजी उत्साहात पार पडला. या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ सदस्य प्रा. डॉ. संजय जगताप उपस्थित होते, तर अध्यक्षस्थान अविनाश भडांगे यांनी भूषविले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उद्धव जाने यांची प्रमुख उपस्थिती होती.

या शैक्षणिक सत्रात 'वायय स्नातक' (इ.अ.) पदवी परीक्षेत महाविद्यालयातून सर्वाधिक गुण प्राप्त केल्याबद्दल आकाश शंकरराव हटकर या विद्यार्थ्याचा गौरव करण्यात आला. यासह फैज रशीद खान, आचल सुरजुसे, अनुश्री आळे, धनश्री बन्सोड, ज्ञानेश्वरी मानके यांच्यासह एकूण २६ पदवीधर विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. सूत्रसंचालन डॉ. दिनेश तट्टे यांनी केले, तर आभार प्रा. डॉ. गजानन हिवराळे यांनी मानले. या प्रसंगी डॉ. अर्चना भांगडिया, डॉ. सिद्धार्थ वाठोरे, डॉ. राहुल गजभिये यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी व आजी-माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महत्त्वाचे

### सुमैया अली 'विश्वशक्ती' पुरस्काराने सन्मानित



**अकोला :** दि. २९ मार्च २०२६ रोजी अकोला येथील अण्णासाहेब रोकडे मिलन सभागृहात विश्वशक्ती पुरस्कार सोहळा पार पडला. या कार्यक्रमात नारीशक्ती सेवा फाउंडेशनच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुमैया अली यांना विश्वशक्ती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सुमैया अली अनेक वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात सक्रिय असून, त्यांच्या या कार्याची दखल घेऊनच त्यांना हा बहुमान प्रदान करण्यात आला. यावेळी त्यांना पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि पैठणी साडी देऊन गौरविण्यात आले. पुरस्कार प्रदान करताना त्यांच्या कार्याची विशेष प्रशंसा करण्यात आली.

लोकस्वतंत्र पत्रकार महासंघाच्या वतीने या पुरस्काराचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून देवकाताई देशमुख, सीमाताई झावरे, मायाताई इरतकर आणि संजय देशमुख सर उपस्थित होते. कार्यक्रमाला महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. या यशाबद्दल सुमैया अली यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

### दहीहांड्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त संविधान गौरव मिरवणूक

दहीहांडा : भारतीय संविधानाचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दहीहांडा येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही भव्य संविधान गौरव मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. सार्वजनिक भीमजयंती उत्सव समितीच्या पुढाकाराने आयोजित हा उपक्रम सामाजिक एकोप्याचा संदेश देणारा ठरणार आहे.

डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा जागर आणि संविधानातील मूल्यांचा प्रसार करणे, हा या रॅलीचा मुख्य हेतू आहे. १४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता स्थानिक आठवडी बाजार येथून मिरवणुकीला प्रारंभ होईल. गावातील प्रमुख मार्गांवरून ही मिरवणूक मार्गक्रमण करणार असून, जय भीम, जय संविधानच्या घोषणांनी परिसर दुमदुमणार आहे.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी किशोर शिरसाट, प्रा. विजय आठवले, शोभित आठवले, संजय खाडे, शत्रुघ्न आठवले, साहेबराव दांडगे यांच्यासह समितीचे सर्व पदाधिकारी परिश्रम घेत आहेत. या गौरव रॅलीत सर्वधर्मीय नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## नागरिकांमध्ये घबराट : जिल्हा प्रशासनाचा सतर्कतेचा इशारा

# अवकाळी पावसाचा तांडव; बाबुळगाव शिवारात झाडांवर वीज कोसळून अग्नितांडव!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. ३१ :** जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या कडाक्याच्या उन्हामुळे हैराण झालेल्या नागरिकांना गुरुवारी सायंकाळी अवकाळी पावसाने झोडपले. मात्र, हा पाऊस सुखावह ठरण्याऐवजी विजांच्या कडकडाटासह आल्याने नागरिकांची मोठी तारांबळ उडाली. अकोला शहराजवळील बाबुळगाव परिसरात विजेचा मोठा प्रपात होऊन चक्क झाडांनी पेट घेतल्याची धक्कादायक घटना घडली. यामुळे परिसरात काही काळ दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते.

दिवसभर असह्य उकाडा अनुभवल्यानंतर सायंकाळच्या सुमारास अचानक ढग दाटून आले आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. बाबुळगाव परिसरात विजांचा कडकडाट इतका भीषण होता की, वीज थेट झाडांवर कोसळली. विजेच्या प्रचंड प्रतापाने क्षणात ३ ते ४ झाडांनी पेट घेतला. आकाशातून आग कोसळल्याचा भास झाल्याने ग्रामस्थांमध्ये मोठी पळापळ झाली. सुदैवाने, स्थानिक नागरिकांनी प्रसंगावधान राखून तातडीने आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे मोठी जीवितहानी टळली. शहरासह ग्रामीण भागातही या अवकाळीचा फटका बसला असून, अनेक ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाला होता. वातावरणातील या अचानक बदलामुळे शेतकरी वर्गही चिंतेत सापडला आहे.



### सावधान! वीज कडकडताना झाडाचा आसरा नको

हवामान विभागाने पुढील दोन दिवस जिल्ह्याला यलो अलर्ट दिला आहे. विजांचा कडकडाट सुरू असताना विनाकारण घराबाहेर पडू नका. विशेषतः शेतात काम करणाऱ्यांनी झाडाखाली उभे राहणे टाळावे. वीज कोसळण्याची शक्यता असल्यास सुरक्षित इमारतीचा आधार घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## गोवंशाची अमानुष वाहतूक; पोलिसांकडून नराधम जेरबंद

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मूर्तिजापूर, दि. ३१ :** तालुक्यातील भटोरी रोडवर गोवंशाची अमानुषपणे वाहतूक करणाऱ्या एका आरोपीला मूर्तिजापूर शहर पोलिसांनी मंगळवारी (३१ मार्च) पहाटे साडेपाच वाजेच्या सुमारास रंगेहाथ पकडले. या कारवाईत पोलिसांनी दोन गोवंश आणि मालवाहू वाहनासह एकूण १ लाख ७३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अविन अग्रवाल यांच्या जिनिंगसमोर नाका क्रमांक ७ येथे पोलिसांनी संशयास्पद टाटा ए.सी.ई. मालवाहू वाहन (क्र. ०४ ९३६७) अडवले. वाहनाची झडती घेतली असता, त्यात एक गाय आणि एक कालवड पाय, गळा व तोंड बांधलेल्या अवस्थेत अत्यंत निर्दयीपणे कोंडलेली आढळली. याप्रकरणी पोलीस कर्मचारी योगेश लोणकर यांच्या तक्रारीवरून आरोपी वाजीद खान अन्सार खान (वय २८, रा. पठाणपुरा, जुनी वस्ती) याच्याविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम आणि प्राण्यांवरील क्रूरता प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ठाणेदार अजित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ योगेश लोणकर, हरिदास सोळंके, सचिन दुबे, पंढरीनाथ पोळे, योगेश दामधर व नामदेव आडे यांनी ही कारवाई केली. पुढील तपास शहर पोलीस करीत आहेत.

## भगवान गौतम बुद्ध मूर्ती प्रतिष्ठापना सोहळा संपन्न

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**जानोरी मेळ, दि. ३१ :** मोखा येथील त्रिमूर्ती बुद्ध विहारात ३१ मार्च रोजी तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या मूर्तीचा प्रतिष्ठापना सोहळा अत्यंत उत्साहात आणि धम्ममय वातावरणात संपन्न झाला.सकाळी ७ वाजता रॅलीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर पंचशील ध्वजारोहण व त्रिशरण ग्रहण करण्यात आले. सकाळी १० वाजता पूज्य भिक्खू धम्मपालजी महाथेरो (भिमटेकडी, हिंगणी) यांच्या हस्ते बुद्ध मूर्तीची विधीवत प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना बुद्धांच्या धम्म विचारांचा वारसा जपण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षपद सरपंच मयुरी श्रीहर्ष खरप यांनी भूषवले, तर रामदास शामराव अमझरे व त्यांच्या कुटुंबीयांनी मूर्ती दान केली. याप्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवे, बबलू शिरसाट, संजय बावणे, सुभाष शेगोकार, डॉ. पाटील, राहुल इंगळे, भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष सुभाष तायडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. वामनदादा कर्डक बहुउद्देशीय समिती, बौद्ध पंच मंडळ, जिव्हाळा मित्र मंडळ आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने हा सोहळा यशस्वी झाला. कार्यक्रमाच्या शेवटी सामूहिक भोजनदान करण्यात आले.

## अवकाळी पावसाचा तडाखा; पिकांचे नुकसान, वीज पडून ८ मेंढ्या ठार

### ऊदेगावात गहू आडवा, तर अकोट तालुक्यात पशुधनाची हानी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. ३१ : जिल्ह्यात सोमवारी झालेल्या वादळी वारा आणि विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाने जोरदार तडाखा दिला. या नैसर्गिक आपत्तीत हाता तोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने शेतकरी वर्ग पूर्णपणे खचला असून, अकोट तालुक्यात वीज कोसळून आठ मेंढ्या दगावल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे.**

ऊदेगाव परिसरातील शेतशिवारात काढणीला आलेल्या गहू पिकाचे अतोनात नुकसान झाले. शेतकरी संजय फाले यांच्या दोन एकर क्षेत्रातील गहू पीक पूर्णपणे आडवे पडल्याने त्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. केवळ गहूच नव्हे, तर परिसरातील वांगे, लिंबू, मका आणि बियांचा कांदा यांसारख्या उन्हाळी पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

दुसरीकडे, अकोट तालुक्यातील कावसा येथे सखाराम झिटे (रा. चितलवाडी) हे आपल्या मेंढ्या चारत असताना अचानक वीज कोसळली. या दुर्घटनेत सखाराम यांच्या तब्बल आठ मेंढ्या जागीच ठार झाल्या. बाबुळगाव परिसरातही झाडांवर वीज कोसळून चार झाडे जळाली आहेत. अस्मानी संकटामुळे बळीराजा आणि पशुपालक चिंतेत असून, प्रशासनाने तातडीने पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

### प्रशासनाचे सतर्कतेचे आवाहन

अवकाळी पावसासोबतच जिल्ह्यात वीज कोसळण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. हवामान विभागाने पुढील काही तास सतर्कतेचा इशारा दिला असून, नागरिकांनी आणि शेतकऱ्यांनी झाडाखाली आश्रय घेऊ नये. ढगांच्या गडगडाटासह पाऊस सुरू असताना उघड्यावर जाणे टाळावे आणि आपल्या पशुधनाची काळजी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.



## खा. वानखडेंकडून शिरसाट कुटुंबीयांची सांत्वन भेट

### केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांचा केला जाहीर निषेध

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**बोरगाव मंजू, दि. ३१ :** केंद्र आणि राज्य सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे सध्या सर्वत्र गॅसचा मोठा तुटवडा निर्माण झाला आहे. गॅस मिळवण्यासाठी सामान्य नागरिकांना तासनतास रांगेत उभे राहावे लागत असून, या धावपळीत जनसामान्यांचे बळी जात आहेत. सरकारच्या या ढिसाळ नियोजनाचा पहिला बळी अकोला जिल्ह्यातील अन्वी मिर्झापूर येथील शंकरराव शिरसाट यांच्या रूपाने गेला आहे, अशी घणाघाती टीका खासदार बळवंत वानखडे यांनी केली.

या दुर्दैवी घटनेनंतर खासदार वानखडे यांनी शिरसाट यांच्या निवासस्थानी भेट देऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले आणि सरकारचा तीव्र शब्दांत निषेध नोंदवला. यावेळी त्यांनी ग्रामस्थांच्या अडचणी सविस्तरपणे ऐकून घेतल्या. गॅस तुटवड्यामुळे निर्माण झालेली गंभीर परिस्थिती आणि प्रशासकीय अनास्थेमुळे एका निष्पाप व्यक्तीला जीव गमवावा लागला, ही अत्यंत क्लेशदायक बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.सामान्य जनतेच्या जीवाशी खेळणाऱ्या सरकारचे नियोजन पूर्णपणे कोलमडले आहे,असा आरोप करत त्यांनी या समस्येवर तातडीने तोडगा काढण्याची मागणी केली.

याप्रसंगी दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक भारतभाऊ आठवले, सामाजिक कार्यकर्ते संतोषभाऊ आठवले, शिरसाट कुटुंबातील सदस्य आणि अन्वी मिर्झापूर येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिरसाट यांच्या निधनामुळे संपूर्ण गावात हळहळ व्यक्त होत असून, प्रशासनाने या घटनेची गंभीर दखल घ्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## दु:खमुक्तीसाठी शिवमहात्म्य श्रवण हाच प्रभावी उपाय : हभप राजेंद्र महाराज वकटे

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. ३१ :** ''कलियुगात मानवी लालसा वाढल्याने दु:खाची उत्पत्ती होत आहे. यातून मुक्त होण्यासाठी शिवमहात्म्य श्रवण करणे हाच एकमेव उपाय आहे,असे प्रतिपादन पाळोदी येथील प्रसिद्ध कथाकार हभप राजेंद्र महाराज वकटे यांनी केले. दाबकी रोडवरील कर्ता हनुमान मंडळाच्या वतीने आयोजित संगीतमय शिवपुराण कथेत ते बोलत होते. कथेच्या सत्रात सती व पार्वती चरित्र साकारण्यात आले. याप्रसंगी शिव-पार्वती विवाहाची देखणी झाकी सादर करण्यात आली, ज्यामध्ये देवेंद्र महल्ले व आरती महल्ले यांनी शिव-पार्वतीची भूमिका साकारली. अवकाळी पावसाची तमा न बाळगता भक्तांनी या सोहळ्याला मोठी गर्दी केली होती. प्रारंभानिमित्त मंडळाचे अध्यक्ष सुभाष म्हैसने व माजी नगरसेविका मंगला म्हैसने यांनी महाराजांचे स्वागत केले. तसेच पप्पू देशमुख व गजानन धरमकर यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विठ्ठलराव चिकटे, वसंत जायदे, शरद कोकाटे, विलास आगरकर, गजानन धरमकर, अनिल गावंडे, चंद्रकांत ताठे, प्रभाकर ठाकरे, संजय व संतोष देशमुख, वसंत माळी, संजय वैद्य, संतोष जाधव, सचिन तायडे, संजय बहाळ, उजाडे, रमेश येरेकर, निखिल नहाटे, प्रल्हाद शेळके, महादेव खडसाडे यांच्यासह कर्ता हनुमान मंडळाच्या शेकडो कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. कथेची पूर्णाहुती गुरुवार, २ एप्रिल रोजी होणार असून भाविकांनी लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## शिक्षक भारसाकळे यांचा गौरव

**मूर्तिजापूर :** तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा, दताळा येथील प्रभारी मुख्याध्यापक निलेश नारायणराव भारसाकळे यांना त्यांच्या अतुलनीय शैक्षणिक व सामाजिक योगदानाबद्दल ध्येय एज्युकेशन फाउंडेशनतर्फे राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुणे येथील ग.दि. माडगूळकर नाट्यगृहात २९ मार्च रोजी हा दिमाखदार सोहळा पार पडला.

भारसाकळे यांनी विद्यार्थीच माझे दैवत मानून राबवलेल्या उपक्रमांमुळे जिल्हा परिषद शाळेत कॉन्व्हेंटच्या तोडीचे शिक्षण मिळत आहे. चिल्ड्रेन बचत बँक, एक तास वाचन, सुंदर अक्षर आणि ध्वनीक्षेपकाद्वारे इंग्रजी परिपाठ यांसारख्या नाविन्यपूर्ण प्रयोगांतून त्यांनी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला. त्यांच्या डिजिटल अध्यापन पद्धतीमुळे आणि शैक्षणिक साहित्याच्या वापरामुळे विद्यार्थी गुणवत्तेत मोठी भर पडली आहे.या यशाबद्दल शिक्षण विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख आणि ग्रामस्थांकडून भारसाकळे यांचे कौतुक होत आहे. या पुरस्कारामुळे त्यांच्या शैक्षणिक कार्याला नवी ऊर्जा मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

## चोख पोलीस बंदोबस्त | रोडग्यांच्या महाप्रसादाला भाविकांची अलोट गर्दी

# दोनद खुर्दमध्ये आसरा देवीचा जयघोष; भक्तिमय वातावरणात यात्रेची सांगता

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**बार्शीटाकळी, दि. ३१ :** तालुक्यातील दोनद खुर्द येथे ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या ग्रामदैवत आई आसरा देवीचा यात्रा महोत्सव मंगळवार, ३१ मार्च रोजी अत्यंत उत्साहात संपन्न झाला. २९ मार्चपासून सुरू झालेल्या या तीन दिवसीय महोत्सवात धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळाली. श्रद्धेचा जनसागर उसळलेल्या या यात्रेत अकोला जिल्ह्यासह पंचक्रोशीतील लाखो भाविकांनी आई आसरा देवीचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतला.

यात्रेच्या निमित्ताने गावात भक्तीचा मळा फुलला होता. दरवर्षीप्रमाणे यंदाही कीर्तन, श्रीमद भागवत कथा, भजन आणि प्रबोधनात्मक प्रवचनांचे भव्य आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्रभरातील ख्यातीप्राप्त कीर्तनकार व भागवतकारांनी आपल्या वाणीने भाविकांना मंत्रमुग्ध केले. यात्रेचे मुख्य आकर्षण असलेल्या रोडग्यांच्या महाप्रसादाचा लाभ हजारो भक्तांनी घेतला. घराघरांत पाहुण्यांची मांदियाळी आणि आसरा मातेचा जयघोष यामुळे संपूर्ण दोनद खुर्द परिसर भक्तिमय झाला होता.

''आसरा देवी मातेच्या यात्रेला मोठी ऐतिहासिक परंपरा आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिस्तीत दर्शन घेतले आणि धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घेतला,'' अशी माहिती सरपंच सागर पाटील कावरे यांनी दिली.

यात्रेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि शांतता राखली जावी, यासाठी पोलीस प्रशासनाकडून चोख नियोजन करण्यात आले होते. ठाणेदार गंगाधर दराडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने यात्रेत विशेष लक्ष दिले. सामाजिक सौहार्द जपत भाविकांनी या आध्यात्मिक सोहळ्याचा आनंद लुटला.

### पोलीस प्रशासनाचा खडा पहारा



यात्रेच्या काळात शिस्त आणि शांतता राखण्यासाठी पोलीस स्टेशनचे ठाणेदार गंगाधर दराडे, पीएसआय अभिषेक नवघरे, जमादार सुभाष उघडे, दत्तात्रेय चव्हाण, चंद्रशेखर गोरे, पंकज एकाडे, नागसेन वानखडे आणि राजेश सावळे यांच्या टीमने अहोरात्र परिश्रम घेतले. पोलिसांच्या सतर्कतेमुळे भाविकांना निर्विघ्नपणे दर्शन घेता आले.

## कृषी पुरस्कारांसाठी ऑनलाईन अर्जाची सुविधा; १५ एप्रिलपर्यंत मुदत!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. ३१ :** महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या विविध मानाच्या कृषी पुरस्कारांसाठी आता शेतकरी बांधवांना ऑनलाईन प्रणालीद्वारे घरबसल्या अर्ज सादर करता येणार आहे. इच्छुकांनी १५ एप्रिल २०२६ पूर्वी आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी डॉ. मुरली इंगळे यांनी केले आहे. यापूर्वी हे प्रस्ताव चार प्रतींमध्ये ऑफलाईन पद्धतीने सादर करावे लागत होते, ज्यामुळे शेतकऱ्यांचा वेळ आणि पैसा खर्च होत असे. आता ही प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि वेगवान करण्यासाठी कृषी विभागाने स्वतंत्र संगणकीय प्रणाली विकसित केली असून, ती विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, उद्यानपंडित आणि युवा शेतकरी यांसह अनेक पुरस्कारांचा समावेश आहे. ऑनलाईन पद्धतीमुळे कागदपत्रांची छपाई, झेरॉक्स आणि प्रवासाचा खर्च वाचणार असून, अर्जाची सद्यस्थिती शेतकऱ्यांना सहज कळू शकणार आहे. अकोला जिल्ह्यातील जास्तीत जास्त प्रगतशील शेतकऱ्यांनी या सुविधेचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी आपल्या क्षेत्रातील कृषी सहाय्यक, तालुका कृषी अधिकारी किंवा आत्मा कार्यालयाशी संपर्क साधावा, असे डॉ. मुरली इंगळे यांनी नमूद केले आहे.

अजिंक्य भारत
# आपलं बुलडाणा
बुलडाणा, बुधवार, दि.१ एप्रिल २०२६ www.ajinkyabharat.com


## महत्त्वाचे

### महिलेस मारहाण; गुन्हा दाखल

**मोताळा :** बोराखेडी पोस्टे. अंतर्गत असलेल्या निमखेड येथे रत्यावरुन जाणारे पाणी का अडविले? असे विचारले असता महिलेच्या डोक्यात वीट मारुन जखमी केल्याची घटना आज रविवार २९ मार्च रोजी घडली. याप्रकरणी पोलिसांनी एकावर गुन्हा दाखल केला आहे. मलकापूर तालुक्यातील निमखेड येथील सौ. शितल शंकर दोडे (वय २९) यांनी बोराखेडी पोलिसात फिर्याद दिली की, २९ मार्च रोजी फिर्यादी त्यांच्या घरासमोर धुणे धुत असतांना धुण्याचे पाणी दिनकर दोडे याने वळण टाकून अडविले. त्यास फिर्यादी म्हणण्यास गेली असता दिनकर दोडेने फिर्यादीच्या डोक्यात वीट मारली व शिविगाळ करीत चापटा बुक्क्यांनी मारहाण केली. याप्रकरणी बोराखेडी पोलिसांनी दिनकर रामचंद्र दोडे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### तरुणावर हल्ला, तिघांवर गुन्हा दाखल

**नांदुरा :** पोलीस ठाणे हद्दीत जुन्या वादाच्या कारणावरून तरुणावर मारहाण व वाहनाची तोडफोड केल्याची घटना समोर आली आहे. ही घटना ३० मार्च २०२६ रोजी सकाळी साडेदहा वाजताच्या सुमारास नारखेड येथील विटभट्टी रोड परिसरात घडली. फिर्यादी आकाश खंडेराव (वय २५) हा जेसीबी ऑपरेटर असून, तो आपल्या कामानिमित्त जात असताना आरोपी अभिजीत खंडेराव याने त्याला थांबवून शिवीगाळ केली. त्यानंतर फावड्याच्या दांड्याने उजव्या खांद्यावर व कमरेवर मारहाण केल्याचा आरोप आहे. दरम्यान, आरोपी अमरजित खंडेराव व प्रसेनजित खंडेराव हेही घटनास्थळी येऊन तिघांनी मिळून फिर्यादीस शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच फिर्यादीची रोडलगत उभी असलेली प्लॅटीना (एम.एच.२८ बीई ८५४३) दुचाकीची तोडफोड करून नुकसान केल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी नांदुरा पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

### मल्टीमीडिया प्रदर्शनाची सांगता

**बुलडाणा :** शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी शेगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय मल्टीमीडिया प्रदर्शनाचा आज उत्साहात समारोप झाला. शासनाच्या योजना केवळ कागदावर न राहता त्या सर्वसामान्यांपर्यंत दृकश्राव्य माध्यमातून पोहोचवण्याचा हा प्रयत्न अत्यंत स्तुथ्य आहे, अशी भावना शेगाव नगरपालिकेच्या मुख्याधिकारी जयश्री काटकर यांनी यावेळी व्यक्त केली. जिल्हा माहिती कार्यालय आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शेगाव येथील नगर परिषदेच्या श्यामाप्रसाद मुखर्जी नगर भवनात २८ ते ३० मार्च दरम्यान हे प्रदर्शन भरवण्यात आले होते. या प्रदर्शनाला विद्यार्थी व नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिला.

**कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव**

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | २००० - २१२५ |
| गहू | १६०० - २२०० |
| तुर | ६१०० - ८९५० |
| हरभरा | ३९०० - ५२२५ |
| सोयाबीन | ४५०० - ५४०० |
| उडीद | ५६०० - ६७०० |
| मुग | ४८०० - ४८०० |
| मका | ११०० - १६०० |

# करवंड महोत्सव लोकोत्सव व्हावा - विद्याधर महाले

## राज्य सरकारकडून ३७० वर्षांपूर्वीच्या ऐतिहासिक सोहळ्याच्या स्मृतींना उजाळा!

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी





**बुलडाणा दि.३१ :** छत्रपती शिवाजी महाराजांचा विवाह बुलढाणा जिल्ह्यातील करवंड येथील इंगळे सरदार घराण्यातली गुणवंता बाई यांच्याशी झाला, या विवाह सोहळ्याला ३७० वर्ष पूर्ण होत आहेत हेच औचित्या साधून शासनातर्फे करवंड येथे भव्य महोत्सव आयोजित केला आहे. मुख्यमंत्री यांचे सचिव विद्याधर महाले यांनी करवं ड ला भेट देत कार्यक्रम स्थळाची पाहणी केली. यासाठी एक कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज आणि गुणवंताबाई इंगळे यांच्या ऐतिहासिक विवाह सोहळ्याला यंदा ३७० वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर चिखली तालुक्यातील करवंड येथे १५ व १६ एप्रिल रोजी भव्य करवंड महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाच्या पूर्वतयारीची पाहणी करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे खासगी सचिव विद्याधर महाले यांनी नुकताच दौरा केला. यावेळी हा केवळ सरकारी कार्यक्रम न राहता जनसामान्यांचा लोकोत्सव व्हावा, अशी भूमिका त्यांनी मांडली. महोत्सवाच्या अनुषंगाने ऐतिहासिक आणि परिसरात रोजी सकाळी साडेआठ वाजता महा-श्रमदान मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. करवंड महोत्सव समितीचे अध्यक्ष अरविंद देशमुख यांनी जिल्ह्यातील सर्व युवक, शिवभक्त, धारकरी तसेच विविध सामाजिक मंडळांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. या उपक्रमात शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान या संघटनेची संपूर्ण जिल्हा टीम सक्रिय सहभाग घेणार असून, ऐतिहासिक वारशाचे जतन आणि स्वच्छता हे आपले परम कर्तव्य म्हणून पार पाडले जाणार आहे. दरम्यान, या महोत्सवाच्या आयोजनासाठी चिखली विधानसभा मतदारसंघाच्या आमदार श्वेताताई महाले यांनी सांस्कृतिक मंत्रालयाकडून १ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणला आहे. स्थानिक युवकांनी आधीच केलेल्या श्रमदानाचे विद्याधर महाले यांनी विशेष कौतुक करीत या उपक्रमामुळे महोत्सवाला लोकसहभागाचे बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. ३७० वर्षांपूर्वी ज्या विवाह सोहळ्यात आपल्या पूर्वजांनी सहभाग घेतला होता, त्याच परंपरेचे वारसदार म्हणून आजच्या पिढीनेही मोठ्या संख्येने उपस्थित राहून या ऐतिहासिक स्थळाची सेवा करावी, असे विद्याधर महाले म्हणाले. याप्रसंगी करवंड महोत्सव समितीचे अध्यक्ष अरविंद देशमुख, भाजपा तालुकाध्यक्ष अमोल साठे, प्राचार्य अण्णासाहेब म्हळसणे, प्रा. विजय घ्याळ, भास्करराव अडाळकर, सचिन गरड, अनिल सपकाळ, गजानन पवार आणि असंख्य गावकरी व शिवप्रेमी मंडळी उपस्थित होते.

# अक्षरदेहतर्फे जागतिक रंगभूमी दिन उत्साहात

## जागतिक रंगभूमीने युध्दाच्या विरोधात भूमिका घ्यावी - लक्ष्मीकांत गोंदकर

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.३१ :** नाटकांमधून सातत्याने समाजातील ज्वलंत समस्यांवर भाष्य करण्यात आले आहे. जागतिक पातळीवर पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाच्या काळात रंगभूमीने युद्धविरोधी भूमिका मांडण्याचे काम केले. आज जगात सर्वत्र युध्दाचे वातावरण निर्माण झाल्याने पुन्हा एकदा नाट्यकलावंतांनी युध्दविरोधी जनजागृती करणाऱ्या कलाकृती निर्माण कराव्यात, असे आवाहन सुप्रसिद्ध नाट्य प्रकाशयोजनाकार लक्ष्मीकांत गोंदकर यांनी केले.

जागतिक रंगभूमी दिनानिमित्त शुक्रवार २७ मार्च रोजी स्थानिक इंटक सोसायटी सभागृह बुलढाणा येथे अक्षरदेह नाट्यकला संस्थेतर्पे आयोजित महायुद्धाची पार्श्वभूमी व जागतिक रंगभूमी या विषयावरील व्याख्यान आयोजीत करण्यात आले होते, त्यावेळी गोंदकर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ रंगकर्मी इंजि. गणेश बंगाळे तर ज्येष्ठ रंगकर्मी उद्धवराव जतकर यांची प्रमुख उपस्थिती होती.मान्यवरांच्या हस्ते नटराज पूजन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. जगभरातील थोर नाटककारांची माहिती दर्शवणाऱ्या चित्र प्रदर्शनीचे उद्‌घाटनही यावेळी करण्यात आले. अक्षरदेहच्यावतीने ॲड.सतीशचंद्र रोठे, चंद्रशेखर जोशी व तुषार काचकुरे यांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांचा शाल, सन्मानचिन्ह, मोत्याची माळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. पुढे बोलताना गोंदकर यांनी दुसऱ्या महायुद्धाच्या काळात वेटिंग फॉर गोदो, डायरी ऑफ अँन फ्रेंक या नाटकांनी मांडलेल्या युध्दविरोधी इतिहासाची माहिती देऊन जगाला युध्दाची नव्हे तर शांतता, बंधुता सांगणाऱ्या बुध्दाची गरज असल्याचे मत व्यक्त केले.तर उद्धवराव जतकर यांनी बुलढाणा रंगभूमीची माहिती दिली व कलावंतांच्या अंगी समयसूचकता आणि समर्पणाची भावना असली तरच कलावंत मोठा होऊ शकतो, असे मत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणातून गणेश बंगाळे यांनी जागतिक रंगभूमी स्वयंप्रज्ञेने तेवत राहिली पाहिजे असे सांगून सत्तापिपासू, साम्राज्यवादी व भांडवलशाही व्यवस्थेला अधीन झालेली रंगभूमी जागतिक न राहता अगतिक होऊन राहील व तिचे महत्व संपुष्टात येईल, असे मत व्यक्त केले.

# शासकीय योजनांची माहिती आता एकाच छताखाली

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.३१ :** नागरिकांना सामाजिक न्याय विभागाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती आधुनिक स्वरूपात मिळावी, यासाठी जिल्हा माहिती कार्यालयाने आयोजित केलेल्या मल्टीमीडिया प्रदर्शनाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. शेगाव येथील डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी नगर भवनात सुरू असलेल्या या उपक्रमाचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

माहिती एका क्लिकवर जिल्हा वार्षिक अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि जिल्हा माहिती कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने हे प्रदर्शन भरवण्यात आले आहे. एकाच ठिकाणी सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांची चित्रमय माहिती प्रदर्शित करण्यात आली आहे. यामध्ये योजनेचे स्वरूप, लाभाचे स्वरूप, लाभार्थी पात्रता, अर्ज कुठे करावा, संपर्क कुठे साधावा आदी माहिती प्रत्येक पॅनलवर सविस्तर मांडण्यात आली आहे.

# राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत विजेत्या संघाचे बुलडाण्यात स्वागत

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.३१ :** फिट इंडिया मोहिमेअंतर्गत चंदीगड(पंजाब)येथे झालेल्या ५ व्या खेलो मास्टर्स राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र व्हॉलीबॉल संघाने उत्कृष्ट कामगिरी करत रजत पदक पटकावले आहे. राज्याला हा मान मिळवून देणारे राज्य समन्वयक गोवर्धन राठोड आणि हॉलीबॉल संघाचे कर्णधार किशोर वाघ यांच्यासह सर्व खेळाडूंचे बुलढाणा येथे शिक्षक भारतीचे अध्यक्ष सुरेश देवकरआणि करिअर कौन्सिलर शिशिर उर्फ अण्णासाहेब पाटील यांच्या वतीने स्वागत आणि यथोचित सन्मान करण्यात आला.

फिटनेसचा मंत्रा:आपल्या मनोगतात कर्णधार किशोर वाघ यांनीचलो चले फिटनेस की ओर ही संकल्पना मांडतांना सर्वसामान्यांनी खेळ आणि व्यायामाला आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनवावे. खेलकूद अपनाओ,स्वस्थ मस्त जीवन पाओहाच निरोगी आयुष्याचा मंत्र अंगिकारावा,असे आवाहन केले.या गौरव सोहळ्याला खेळाडू मनोहर म्हळसने, विठ्ठल घारोड, सिद्धार्थ जाधव,देवानंद शिंदे, किरण आखाडे, आसाराम सुसर, अंबादास खरात, कृष्णा पिसे,गजानन वखरे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी शिक्षक भारतीचे सुरेश देवकर यांनी शिक्षक खेळाडूंच्या जिद्दीचे कौतुक करताना म्हटले की, क्रीडा क्षेत्रात अशा यशाने राज्याचा नावलौकिक वाढतो,जो शिक्षक बांधव आणि तरुण पिढीसाठी प्रेरणादायी आहे. या कार्यक्रमामुळे बुलढाणा परिसरात क्रीडाप्रेमींमध्ये उत्साहाचे आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले असून,विजेत्या संघावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.सत्कार समारंभाचे प्रास्ताविक आसाराम सुसर तर आभार प्रदर्शन अंबादास खरात यांनी केले.

# संग्रामपुरात सात मेडिकलचे परवाने निलंबित

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**संग्रामपूर दि.३१:** तालुक्यात बेकायदेशीररीत्या औषध विक्री होत असल्याच्या तक्रारीनंतर अन्न व औषध प्रशासनाने कारवाई करीत सात औषधी केंद्रांचे परवाने निलंबित केले आहेत. या कारवाईमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

स्वप्निल देशमुख यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन सादर करून बेकायदेशीर औषध विक्रीबाबत तक्रार केली होती. तसेच, संबंधितांवर कारवाई न झाल्यास १६ एप्रिलपासून बेमुदत उपोषणाचा इशाराही देण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाने दि. २७ मार्च रोजी संग्रामपूर तालुक्यातील वरवट बकाल, संग्रामपूर आणि वानखेड या गावांतील एकूण १२ औषधी केंद्रांची तपासणी केली. तपासणीदरम्यान झोपेच्या गोळ्या, गर्भपातासाठी वापरले जाणारे एमटीपी किट्स किंवा गुंगी आणणारी औषधे आढळून आली नसली, तरी इतर नियमभंग आढळल्याने सात केंद्रांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. नोटीसनंतर पशुसेवा मेडिकल (संग्रामपूर), मदनलाल पालीवाल (वानखेड), जनता मेडिकल अँड जनरल स्टोअर (संग्रामपूर), महाराष्ट्र मेडिकल अँड जनरल स्टोअर (संग्रामपूर), श्री रामदेव बाबा मेडिकल (संग्रामपूर), श्री मेडिकल अँड जनरल स्टोअर (वानखेड) व श्री सद्गुरू मेडिकल स्टोअर (संग्रामपूर) या सात औषधी केंद्रांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत.

# पं. दीनदयाळ उपाध्याय महाप्रशिक्षण अभियान उत्साहात

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**दुसरबिड दि.३१:** भारतीय जनता पक्षाच्या वतीने आयोजित 'पं. दीनदयाळ उपाध्याय महाप्रशिक्षण अभियान' अंतर्गत सिंदखेड राजा मंडळातील प्रमुख कार्यकर्त्यांसाठी दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण शिबिर उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. २८ व २९ मार्च रोजी जीवन विकास विद्यालय, दुसरबिड येथे हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिराचे उद्‌घाटन माजी जिल्हाध्यक्ष गणेश मांटे, प्रदेश प्रवक्ते विनोदभाऊ वाघ, जिल्हा उपाध्यक्ष सुभाष घिके, विष्णू मेहेत्रे, गजानन घुले, महामंत्री श्रीराम मुंढे, जिल्हा सचिव नितीन देशमुख, ज्येष्ठ नेते प्रभाकरराव ताठे, गणेशराव राजे जाधव, माऊली मुंढे, तसेच सिंदखेड राजा मंडलाध्यक्ष आनंद देशमुख, साखरखेर्डा मंडलाध्यक्ष शिवाजी वाघ व दे.राजा मंडलाध्यक्ष प्रभाकर नागरे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. या शिबिरात केंद्रापासून मंडळापर्यंतच्या सर्व स्तरांतील कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. एकूण ९ सत्रांमधून संघटनात्मक बळकटी, पक्षाची विचारधारा, इतिहास तसेच विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. शिबिराचा समारोप २९ मार्च रोजी जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार विजयराजजी शिंदे, माजी आमदार तोतारामजी कायंदे, प्रदेश सदस्य उल्हासराव देशपांडे, गणेशजी मांटे, जिल्हा संघटन महामंत्री दत्ता पाटील, सुनिल कायंदे, अंकुर देशपांडे, दसरे सर, सुरेश बुलकुडे, नाना तौर.शेख जावेद, गजानन सोनुने यांच्यासह यांच्या उपस्थितीत पार पडला. या शिबिराचे आयोजन मंडलाध्यक्ष आनंद देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

# संघटनेची ताकद ही सभासदांच्या संख्येवर नव्हे तर प्रामाणिकपणावर अवलंबून - खाजेकर

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.३१ :** संघटनेची ताकद ही सभासदांच्या संख्येवर नव्हे तर प्रामाणिकपणा,एकनिष्ठता आणि शिस्त पालनावर अवलंबून आहे. असे स्पष्ट प्रतिपादन कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाचे केंद्रीय अध्यक्ष राजेंद्र कुमार खाजेकर यांनी केले. ते कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाचे दिवंगत अध्यक्ष ॲड. प्रा.व्हि.के.क्षिरसागर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ अभिवादन कार्यक्रमाचे औचित्य साधून केंद्रीय कार्यकारी समितीच्या बैठकीत अध्यक्षपदावरून बोलतांना केले.

कार्यक्रमाची सुरुवात प्रथमतः दिवंगत ॲड.प्रा.व्हि.के. क्षिरसागर यांच्या फोटोला माल्यार्पण व दीप प्रज्वलनाने झाली. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी शील, सत्य व प्रामाणिकपणा ह्या गुणांची जोपासना आपल्या अंगी केली पाहिजे असे ते पुढे म्हणाले. जिजामाता महाविद्यालयाच्या सभागृहात झालेल्या ह्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान राजेंद्र कुमार खाजेकर यांनी भूषविले होते. कास्ट्राईब राज्य आरोग्य कर्मचारी संघ या नव्या संलग्न शाखेच्या अध्यक्षपदी दत्तात्रय कौटकर, केंद्रीय उपाध्यक्षपदी आर.टी.बागुल, दिपक भालेराव यांची केंद्रीय सहमहासचिव, नाशिक विभागीय अध्यक्षपदी, गिरीश गावीत, विवेकानंद शेळके यांची विभागीय अध्यक्ष छ.संभाजीनगर तर गहिनदास गावित यांची धुळे जिल्हाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली. यावेळी काही ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला आर.के.हिवाळे, डी.एस.वानखेडे आर.एम. सुर्यवंशी, जनाबाई अंभोरे, एल.के.खोडके, तुकाराम रोकडे यांचा कृतज्ञता सन्मा-२०२६ सन्मानचिन्ह, बुके व शाल देऊन गौरविण्यात. ह्यावेळी विचार पिठावर राजेंद्र कुमार खाजेकर, बापूसाहेब ससाणे, निवृत्ती सरकटे, विजय क्षीरसागर, तुकाराम रोकडे व अंजली देशमुख इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन अस्मिता क्षिरसागर व आभार प्रदर्शन केंद्रीय महा सचिव बापूसाहेब ससाने यांनी केले.

**कौतुक** सिंदखेड राजा तहसीलचा डिजिटल स्ट्राईक!

# तांत्रिक बिघाडानंतरही एकाच दिवसात विद्यार्थ्यांच्या हाती प्रमाणपत्रे

अजिंक्य भारत/ गोपाल तोष्णीवाल




**सिंदखेडराजा दि. ३१ :** आर्थिक वर्षाचा शेवटचा दिवस (३१ मार्च) जवळ आलेला असताना आणि त्या दिवशी सुट्टी असल्याने, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी सिंदखेड राजा तहसील कार्यालयाने मिशन मोडवर काम करत एक नवा आदर्श निर्माण केला आहे.

पोर्टलवरील तांत्रिक अडचणींमुळे प्रमाणपत्रे रखडली होती, मात्र प्रशासकीय चिकाटीमुळे आज ३० मार्च रोजी एकाच दिवसात १९७ विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. बुलढाणा ते मुंबई... तांत्रिक अडथळ्यांची भिंत अशी पाडली! प्रमाणपत्र मिळवण्यासाठी पोर्टलवर मोठी तांत्रिक अडचण निर्माण झाली होती. ३१ मार्चला आर्थिक वर्ष संपत असल्याने व त्या दिवशी सुट्टी असल्याने, ३० मार्च रोजीच ही प्रमाणपत्रे मिळणे विद्यार्थ्यांसाठी अनिवार्य होते. ही निकड ओळखून तहसीलदार अजित दिवटे यांनी तातडीने जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधला. जिल्हा प्रशासनाने थेट मुंबई येथील मुख्य कार्यालयाशी समन्वय साधून तांत्रिक बिघाड दुरुस्त करून घेतला आणि सिंदखेड राजाची साईड पुन्हा कार्यान्वित केली. अधिकारी व कर्मचाऱ्यांची ओव्हरटाईम कामगिरी या मोहिमेत वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचाऱ्यांनी अहोरात्र मेहनत घेतली. यामध्ये प्रामुख्याने खालील अधिकाऱ्यांचा सहभाग राहिला: निवासी उपजिल्हाधिकारी: सन्माननीय कवळे , उपविभागीय अधिकारी संजय खडसे, तहसीलदार: अजित दिवटे , निवासी नायब तहसीलदार: प्रांजल पवार मॅडम, ग्राउंड लेव्हल ला अथक परिश्रम महसूल सहाय्यक: संजय सोनुने यांनी अथक परिश्रम घेतले व बोरकर साहेब (सेतू लिपीक) यांनी सहकार्य केले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटले समाधान उत्पन्न, अधिवास (डोमिसाईल), वय, राष्ट्रीयत्व आणि रहिवासी प्रमाणपत्रांसाठी विद्यार्थी चिंतेत होते. मात्र, ३० मार्चच्या या डिजिटल स्ट्राईकमुळे त्यांचे शैक्षणिक वर्ष वाचले आहे. ''तांत्रिक अडचण असूनही जिल्हा प्रशासन आणि मुंबई कार्यालयाशी समन्वय साधून आमचे काम मार्गी लावले, यासाठी आम्ही प्रशासनाचे ऋणी आहोत,'' अशी भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली आहे. प्रशासकीय संवेदनशीलतेचे हे उदाहरण इतर तालुक्यांसाठीही नक्कीच प्रेरणादायी ठरेल.

# केशव शिवणी येथे श्रीराम जन्मोत्सव उत्साहात

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**मलकापूर दि.३१ :** मातृतिर्थ सिंदखेडराजा तालुक्यातील श्री क्षेत्र केशव शिवणी येथे भगवान श्रीराम जन्मोत्सव (श्रीराम नवमी) अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात मोठ्या दिमाखात साजरा करण्यात आला. संपूर्ण गाव धार्मिक रंगात न्हाऊन निघाले होते. केशवराज मंदिर परिसरात दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळाली.

या उत्सवानिमित्त कीर्तन, भजन, धार्मिक प्रवचन आणि महाप्रसाद यांसारख्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. २५ नोव्हेंबर रोजी रात्री ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज झगरे गुरुजी यांच्या प्रभावी कीर्तनाने भक्तिरसाची सुरुवात झाली. त्यानंतर ह. भ. प. रमेश महाराज जायभाये यांच्या सुमधुर वाणीतील काल्याचे कीर्तन रंगून गेले. त्यांनी भगवान श्रीकृष्णाचे जीवनचरित्र सांगत गोमातेच्या सेवेसाठी प्रेरणादायी संदेश दिला. उत्सवाचा मुख्य सोहळा ह. भ. प. प्रेमानंद महाराज देशमुख यांच्या ओजस्वी कीर्तनाने पार पडला. आपल्या कीर्तनातून त्यांनी भगवान श्रीरामांच्या आदर्श जीवनमूल्यांचा उल्लेख करत माता-पिता, देश आणि धर्म यांच्या रक्षणासाठी प्रत्येकाने सदैव सज्ज राहावे, असे प्रभावी आवाहन केले. त्यांच्या विचारांनी उपस्थित भाविकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. कीर्तनानंतर उपस्थित हजारो भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रमात ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. या धार्मिक सोहळ्याचे आयोजन मुर्डेश्वर संस्थानचे अध्यक्ष तथा केशवराज संस्थानचे विश्वस्त वसंतराव उदवंत बंधू तसेच केशव शिवणी ग्रामस्थांच्या सहकार्याने करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनेक स्वयंसेवकांनी मोलाचे योगदान दिले. या प्रसंगी उपविभागीय पोलिस अधिकारी मनीषा कदम, सिंदखेडराजा तहसीलदार अजित दिवटे किनगाव राजा ठाणेदार, भाजपा प्रदेश प्रवक्ते विनोद वाघ, वैद्यकीय क्षेत्रात राज्यपाल पुरस्कार प्राप्त डॉ. डॉ. डी. एस. शिंदे, डॉक्टर विजयराव नागरे तसेच लोकजागर परिवाराचे विश्वस्त प्रविण गिते यांच्यासह धार्मिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने भाविकांची उपस्थिती लाभल्याने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला.

## महत्त्वाचे

### भरधाव दुचाकीची धडक; दोघे जखमी

**मलकापूर :** शहरात भरधाव व निष्काळजीपणे चालवलेल्या दुचाकीच्या धडकेत दोन जण जखमी झाल्याची घटना घडली आहे. ही घटना २९ मार्च २०२६ रोजी रात्री सुमारे ११.३० वाजता मलकापूर बुलढाणा रोडवरील तुलसी ज्वेलर्ससमोर घडली. फिर्यादी वैभव वाशीमकर (वय २९) हे त्यांच्या हिरो स्प्लेंडर दुचाकीवर साला भूषण बानाईत यांच्यासह रेल्वे स्टेशनकडून महाकाली नगरकडे जात असताना, मागून आलेल्या अज्ञात दुचाकी चालकाने भरधाव वेगात धडक दिली. या अपघातात दोघेही रस्त्यावर पडून जखमी झाले. जखमींना तात्काळ उपजिल्हा रुग्णालय मलकापूर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. अपघातात दुचाकीचेही नुकसान झाले आहे. दरम्यान, धडक देणारा अज्ञात चालक घटनास्थळावरून फरार झाला. ङ्मा प्रकरणी मलकापूर शहर पोलीस ठाण्यात अप क्र. २३२/२०२६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहे.

### शिवशाही बसचे ब्रेक फेल; अनर्थ टळला

**चिखली :** येथील बस आगारातून मेहकरकडे निघालेल्या शिवशाही बसचे ब्रेक लव्हाळा फाट्यावर अचानक फेल झाले. चालकाने प्रसंगावधान राखल्याने मोठा अनर्थ टळला. या बसमधून ४० प्रवाशी प्रवास करीत होते. ही घटना ३० मार्च रोजी दुपारी एक वाजता घडली. चिखली आगाराची चिखली- माहूर बस क्रमांक एम. एच. २८ इ. एम. १७१३ ही वातानुकूलित शिवशाही बस दुपारी सुमारे साडेबारा वाजता चिखली येथून प्रवाशांना घेऊन निघाली होती. दरम्यान लव्हाळा फाटा येथे काही प्रवाशांना उतरुन दिल्यानंतर थोड्याच अंतरावर चालकाने ब्रेक दाबण्याचा प्रयत केला; मात्र कोणताच ब्रेक लागले नाही. सुदैवाने बसचा वेग कमी असल्याने चालकाने शिताफीने बस नियंत्रित करून रस्त्याच्या बाजूला उभी केली. बस थोडी जरी वेगात असती किंवा गर्दीत असती तर फार मोठा अनर्थ घडला असता.

### शेतातील ७ मोटारींची चोरी

**नांदुरा :** तालुक्यातील शेत परिसरात अज्ञात चोरट्यांनी पाण्याच्या मोटारी चोरी केल्याची घटना समोर आली आहे. फिर्यादी शेतकरी पिकाला पाणी देण्यासाठी गेले असता मोटारीला पाणी येत नसल्याने त्यांनी नदीकाठी तपासणी केली. यावेळी मोटारीची केबल तुटलेली आढळली आणि मोटार गायब असल्याचे लक्षात आले. तपासादरम्यान शेजारील शेतकऱ्यांच्या देखील मोटारी चोरीला गेल्याचे उघड झाले. यात कैलास सुलताने, देवानंद रावणचवरे, भागवत बावस्कार, वासुदेव घोगे, रामराव बोरसे आणि अर्जुन लोणकर यांच्या प्रत्येकी सुमारे ५ हजार रुपये किंमतीच्या ॲक्वा टॅक कंपनीच्या ७.५ हॉर्सपॉवरच्या मोटारींचा समावेश आहे. एकूण ७ मोटारी, अंदाजे ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल अज्ञात इसमाने चोरून नेल्याची नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

### महिलेचा विनयभंग, दोन आरोपींवर गुन्हा

**मलकापूर :** ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीत महिलेचा विनयभंग व शिवीगाळ केल्याची घटना उघडकीस आली आहे. दाताळा गावातील धोबी वाडा परिसस २९ मार्च २०२६ रोजी रात्री सुमारे ८ वाजताच्या सुमारास ही घटना घडली. फिर्यादी महिला व तिची । नातेवाईक गोदरीत गेल्या असताना आरोपी समाधान भोलनकर हा मद्यधुंद अवस्थेत तेथे आला. त्याने फिर्यादीला रस्त्यात अडवून गैरवर्तन करत विनयभंग केल्याचा आरोप आहे. फिर्यादीने विरोध केल्यानंतरही तो तेथेच थांबला. या प्रकरणी मलकापूर ग्रामीण पोलिसांनी आरोपीविरुद्ध कलम ७४, ७५, ३५२, ३(५) भा.न्या.सं. अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

# अधिकाऱ्यांना धारेवर धरत आमदार खरातांचा सज्जड इशारा

## मेहकर पंचायत समिती आमसभा गाजली

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मेहकर दि. ३१ :** मेहकर येथील कृषी वैभव लॉन्स येथे पंचायत समिती मेहकर व जिल्हा परिषद बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने वार्षिक कामकाज आढावा सभा व सरपंच मेळावा उत्साहात पार पडला. या आमसभेत विविध विभागांनी वर्षभरातील कामांचा सविस्तर आढावा सादर करत विकासकामांची माहिती मांडली.

सभेमध्ये शिक्षण, पाणीटंचाई, ग्रामीण पाणीपुरवठा, आरोग्य, बांधकाम, घरकुल, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, स्वच्छ भारत मिशन, पंचायत, वित्त, कृषी, पशुसंवर्धन, एकात्मिक बालविकास, राष्ट्रीय ग्रामीण जीवन्नोती व सामान्य प्रशासन विभागांनी आपले अहवाल सादर केले. अनेक तक्रारींवर तातडीने कारवाईचे आदेश सभेदरम्यान एकूण १२ तक्रारी प्राप्त झाल्या. या सर्व तक्रारींचे तात्काळ निवारण करण्यासाठी संबंधित विभागांना निर्देश देण्यात आले. आमदार सिद्धार्थ खरात यांची आक्रमक भूमिका




या वार्षिक आमसभेमध्ये आमदार सिद्धार्थ खरात यांनी प्रत्येक नागरिकांची समस्या स्वतः ऐकून घेतली. अधिकाऱ्यांना धारेवर धरत त्यांनी प्रलंबित प्रश्नांवर त्वरित तोडगा काढण्याचे आदेश दिले. नागरिकांच्या प्रश्नांबाबत त्यांची ठाम आणि आक्रमक भूमिका विशेष लक्षवेधी ठरली. जलजीवन योजनेवरून संताप, सिंचन प्रकल्प गाजला तालुक्यातील जलजीवन योजनेची कामे रखडल्यामुळे नागरिक व सरपंच आक्रमक झाले. कळपविहीर येथील लघु सिंचन प्रकल्पाचा मुद्दा सभेत विशेष गाजला, यावेळी आमदार खरात यांनी संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारला. गावांच्या समस्यांवर जोरदार चर्चा उकळी-सुकळी येथील ग्रामसेवक, राजगड येथील ग्रामरोजगार सेवक यांच्या निलंबनाची मागणी करण्यात आली. तसेच कणका बुद्रुक येथील सरपंच अनुपस्थितीबाबतही तक्रारी मांडण्यात आल्या. 'वंदनीय बाळासाहेब ठाकरे रत पुरस्कार' जाहीर उत्कृष्ट कामगिरीबद्दल डॉ.राम गायकवाड, डॉ. सूरज ठाकरे, डॉ. ओमप्रकाश इंगळे, डॉ.मुकेश परिहार, संजय पवार, डॉ. सुजाता हिवसे, डॉ.सुनील सुलताने, प्रशासन अधिकारी, अशोक झाल्टे, अनिल तुरुक माने व साहेबराव अंभोरे यांचा शंभर टक्के उद्दिष्टपूर्तीसाठी सत्कार करण्यात आला. आदर्श ग्रामपंचायत पुरस्कार प्रदान पांगरखेड ग्रामपंचायतीला 'आदर्श ग्रामपंचायत' पुरस्कार देण्यात आला. तसेच उत्कृष्ट काम करणाऱ्या सरपंचांचा गौरव करण्यात आला. मान्यवरांची उपस्थिती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार सिद्धार्थ खरात होते. यावेळी उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी, गटविकास अधिकारी दिनकर खरात, तहसीलदार निलेश मडके, नगराध्यक्ष किशोर गारोळे, आशिष रहाटे, निंबाजी पांडव, धनराज राठोड, राम निकम, दत्ता धनवट, प्रदीप देशमुख, सागर पाटील, महेश रिंडे, संदीप गवई यांच्यासह सर्व विभागांचे अधिकारी, कर्मचारी व सरपंच मोठ्या संख्येने उपस्थित होते. मेहकर पंचायत समितीची ही वार्षिक आमसभा विकासकामांचा आढावा घेत असतानाच प्रलंबित प्रश्नांवर कठोर भूमिका घेणारी ठरली. विशेषतः आमदार सिद्धार्थ खरात यांच्या आक्रमक भूमिकेमुळे नागरिकांच्या समस्यांना न्याय मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# तळणी परिसरात उन्हाचा तडाखा

## पपईची कोवळी रोपे वाचविण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मोताळा दि.३१ :** तालुक्यातील तळणी आणि परिसरात सध्या उन्हाची तीव्रता प्रचंड वाढली असून तापमानाचा पारा ४० अंशांपर्यंत पोहोचला आहे. या वाढत्याा उष्णतेने सर्वसामान्य जनजीवनासह शेती पिकांवरही विपरीत परिणाम होत असल्याने शेतकऱ्यांची चिंता कमालीची वाढली आहे. वाढत्या उन्हामुळे पिके कोमेजून जात असून, विशेषतः तळणी परिसरात गेल्या महिन्यात अनेक शेतकऱ्यांनी पपई पिकाची लागवड केली असुन वाढत्या उन्हाच्या तीव्रतेने लागवड केलेली पपईची कोवळी रोपे जगवणे शेतकऱ्यांसमोर मोठे आव्हान ठरत आहे.

तळणी येथील शेतकरी अनंत तुकाराम नाफडे यांनी आपल्या तीन एकर क्षेत्रावर पपईची लागवड केली आहे. मात्र, कडक उन्हामुळे ही रोपे सुकू लागल्याने त्यांनी बचावासाठी अनोखी शक्कल लढवली आहे. उन्हाच्या तडाख्यापासून कोवळ्या रोपांचे संरक्षण करण्यासाठी त्याांनी प्रत्योक रोपाभोवती मिल्की



बॅगचे विशेष आवरण (कव्हर) लावले आहे. या आवरणाद्वारे उष्णतेची तीव्रता कमी करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. यासोबतच, जमिनीतील ओलावा आणि थंडावा टिकवून ठेवण्यासाठी ठिबक सिंचनाद्वारे पिकांना सतत पाणी दिले जात आहे. या परिस्थितीबाबत बोलताना अनंत नाफडे म्हणाले की, ''उन्हाची तीव्रता इतकी जास्त आहे की पपईची पाने कोमेजून रोपे जळण्याचे प्रमाण वाढले आहे. रोपे वाचवण्यासाठी आम्ही रोपांना मिल्की बॅगचे संरक्षण कवच लावले खरे, पण हे तंत्र अत्यंत खर्चिक आहे. एका रोपामागे साधारण पाच ते सहा रुपये अतिरिक्त खर्च येत आहे. एवढा मोठा खर्च करूनही निसर्गाच्या कोपापुढे रोपे वाचवणे कठीण होत आहे. अशा खर्चिक उपाययोजनांमुळे शेतीचे संपूर्ण अर्थकारण कोलमडून पडले आहे.'' सध्याच्या या भीषण उष्णतेमुळे पिकांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शेतकरी आपल्या स्तरावर सर्वतोपरी प्रयत करत असले तरी, निसर्गाच्या या तडाख्यापुढे मानवी उपाययोजनांना मर्यादा येत असल्याचे चित्र आहे. हवामानातील या टोकाच्या बदलांमुळे आणि वाढत्या खर्चामुळे शेती व्यवसाय संकटात सापडला असून, वाढत्या उन्हात पिके कशी वाचवायची, असा प्रश्न तळणी परिसरातील शेतकऱ्यां समोर उभा ठाकला आहे.

# दोन ठिकाणी मटका पकडला

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**शेगाव दि.३१ :** शहरात विविध ठिकाणी सुरु असलेल्या वरली मटक्याच्या जुगारावर पोलिसांनी छापा टाकून वरली मटक्याच्या चिठ्ठ्या व रोख रक्कम जप्त केली आहे. काल ३० मार्च रोजी ही कारवाई करण्यात आली आहे.

शेगाव येथील गाडगे महाराज चौकात काल ३० मार्च रोजी दुपारी ५.३० ते ६ वाजेदरम्यान दोन ठिकाणी पोलिसांनी मटका पकडला. श्री हरी गेस्ट हाऊस जवळ सुरेश आत्माराम बावस्कार वय ६१ रा. माळीपुरा व नितेश सोनाजी पहुरकर वय ३६ रा. रेल्वे कॉलनी हे दोघे वरली मटका खेळतांना व खेळवितांना मिळुन आले. त्यांचे जवळुन नगदी ३५५० रु. व मोबाईल (किं. १० हजार रू.) असा एकुण १३ हजार १५० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी पोहेकॉ गणेश वाकेकर यांनी शेगाव शहर पोस्टेला फिर्याद दिली. फिर्यादीवरून पोस्टेमध्ये उपरोक्त दोघांविरूध्द मजुका कलम १२ (अ) नुसार गुन्हा दाखल केला आहे. तर इंद्रायणी गेस्ट हाऊसजवळ पुंजाजी शालीकराम खंडागळे वय ४५, रा. सवर्णा) हा वरली मटका खेळतांना व खेळवितांना मिळून आला, त्याचेजवळून नगदी २८०० रु. व मोबाईल (किं. १० हजार) असा एकुण १२ हजार ८०० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी पीएसआय कुणाल जाधव यांनी शेगाव शहर पोस्टेला फिर्याद दिली. फिर्यादीवरून पोस्टेमध्ये उपरोक्त आरोपीविरूध्द मजुका कलम १२ (अ) नुसार गुन्हा दाखल केला. शेगाव शहरात वरली मटक्यासह इतरही अवैध व्यवसाय सुरु असून या व्यवसायावरही पोलीस प्रशासनाने छापे टा-

# अण्णाभाऊ साठेंच्या स्मारकाबाबत दुर्लक्ष होणे ही दुर्दैवी बाब- पाटील

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**संग्रामपूर दि.३१:** लोकशाहीर डा. अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या लेखनातून आणि कार्यातून वंचित , शोषित समाजाला आवाज दिला. त्यांच्या स्मारकाबाबत दुर्लक्ष होणे ही दुर्दैवी बाब आहे. त्यामुळे शासनाने तात्काळ दखल घेऊन सकारात्मक निर्णय घ्यावा. ही ठाम अपेक्षा असून जनतेच्या हक्कासाठी सुरू असलेल्या लढ्यात आम्ही खंबीरपणे सोबत आहोत. असा विश्वास मातंग समाज बांधवांना राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) जिल्हाध्यक्ष तथा पणन महासंघाचे संचालक प्रसन्नजीत पाटील यांनी दिला.

साहित्यारत लोकशाहीर डा. अण्णाभाऊ साठे समिती आणि समस्त मातंग समाजाच्या वतीने खामगाव येथे सुरू असलेल्या साखळी उपोषणाला



प्रसन्नजीत पाटील यांनी २९/ मार्च रोजी भेट देऊन आंदोलनकर्त्यांच्या न्याय मागण्यांना जाहीर पाठिंबा दिला. खामगाव रेल्वे स्टेशन परिसरातील साहित्यरत्न लोकशाही डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याचे नियमितिकरण तसेच रेल्वे स्टेशन परिसरातील व्यापारी संकुलाला त्यांचे नाव देण्याची मागणी ही मातंग समाजाच्या स्वाभिमानाशी आणि अस्मितेशी जोडलेली आहे, असेही बोलतांना ते म्हणाले यावेळी त्यांचे सोबत संग्रामपूर तालुक्यातील (पळशी झांशी) राष्ट्रवादीच्या जि.प. सर्कल प्रमुख सौ. सरस्वती संजय बापट, बाळू पाटील राजू पाटील, कृष्णा नाटेकर ,देविदास वाकोडे, सोमेश सोनोने, सोपान वानखडे ,आशिष बाभूळकर, बबलू कांबळे आदी पदाधिकारी,कार्यकर्ते उपस्थित होते.

# वरवट बकाल येथे स्व. राजेंद्र ठाकरे यांना श्रध्दांजली



**संग्रापूर दि.३१ :** तालुक्यातील वडगाव वान येथील भाजपचे ज्येष्ठ नेते, कृषी बाजार समितीचे संचालक, सहकार क्षेत्रातील सक्रिय नेतृत्व तथा माजी जिल्हा परिषद सदस्य,माजी सरपंच स्व. राजेंद्र किसनराव ठाकरे यांचे दिनांक २८ मार्च रोजी हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने राजकीय, सामाजिक आणि सहकार क्षेत्रात हळहळ होत आहे. ३० मार्च रोजी वरवट बकाल येथील कृषी बाजार समितीच्या सभागृहात सर्वपक्षीय श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या शोकसभेत सर्वप्रथम ठाकरे यांच्या प्रतिमेसमोर दीप लावून सर्वांनी पुष्प विनम्र अभिवादन केले. या कार्यक्रमाला विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सहकार क्षेत्रातील प्रतिनिधी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संत गाडगेबाबा विषयी अपशब्द वापरणाऱ्या विरोधात कारवाईची मागणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मलकापूर ३१ :** संत गाडगेबाबा यांच्याबद्दल अपशब्द वापरणाऱ्या कीर्तनकार ह.भ.प. माधव महाराज घुले यांनी समस्त परीट समाज व वारकरी संप्रदायाची जाहीर माफी मागावी व त्यांच्यावर कायदेशीर कारवाई व्हावी, या करिता तहसीलदार मार्फत मुख्यमंत्री देवेंद्रे फडणवीस यांना निवेदनातून मागणी

मलकापूर शहर व तालुक्यातील समस्त नागरिक व विविध सामाजिक संघटना कडून माधव घुले याचा निषेध करत निवेदनाद्वारे नुकतेच भरविरे खुर्द (ता. इगतपुरी) येथे बाल भैरवनाथ मंदिराच्या कलशारोहण सोहळ्यानिमित्त आयोजित



अखंड हरिनाम सप्ताहामध्ये कीर्तनकार ह.भ.प. माधव महाराज घुले यांनी राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्याबद्दल अत्यांत हीन आणि संतापजनक विधान केले आहे. गाडगेबाबांनी आयुष्यभर समता, स्वच्छता आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचा संदेश देऊन समाजाला नवी दिशा दिली. अशा थोर संतांचा अपमान करणे आणि त्यांना नास्तिक संबोधणे हे केवळ गाडगेबाबांचा अपमान नसून, संपूर्ण वारकरी संप्रदायाचा आणि त्यांच्या विचारांचा अपमान आहे. या विधानामुळे लोकांच्या भावना तीव्रपणे दुखावल्या गेल्या असून, भविष्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी आपण या विषयाचे गांभीर्य ओळखून संबंधितांवर त्वरित कठोर कारवाई करावी अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा यावेळी करण्यात आला

# नागापूर येथे माजी आ.सानंदा यांच्या हस्ते १० लक्ष रुपयांच्या रस्ता कामाचे भूमिपूजन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.३१ :** महाराष्ट्र राज्याचे मदत व पुर्नवसन मंत्री तथा बुलढाणा जिल्हयाचे पालकमंत्री मकरंद आबा पाटील यांनी माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांच्या शिफारशीनुसार खामगाव विधानसभा मतदार संघातील विविध विकास कामांकरीता जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून विविध शिर्षकाखाली कोट्यावधी रुपयांचा निधी मंजुर केला असुन त्या निधीतून मौजे नागापूर येथे १० लक्ष रुपये खर्च करुन बांधण्यात येणाऱ्या सिमेंट रस्ता कामाचे शनिवार दि.२८ मार्च २०२६ रोजी खामगाव विधानसभा मतदार संघाचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांच्या



हस्ते भुमिपुजन करण्यात आले.

या कार्यक्रमाला हभप प्रमोद महाराज राहणे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते पंजाबराव दादा देशमुख, तालुका अध्यक्ष मनोज वानखडे,खामगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती सुभाष पेसोडे, बाजार समितीचे संचालक विलाससिंग इंगळे, नागापूर ग्राम पंचायतचे सरपंच कैलास वासनकार, उपसरपंच प्रकाश सोळंके, भिकाजी धानोरे, सहदेव धानोरे, विठठ्ल धानोरे आदींची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांचे नागापूर गावात आगमन झाले असता ग्रामस्थांच्या वतीने उत्स्फुर्त स्वागत करण्यात आले. याप्रसंगी माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाचे पुजन करुन माल्यार्पण केले. तद्नंतर हभप प्रमोद महाराज राहणे यांच्या हस्ते नारळ फोडून, फीत कापून व कुदळ मारुन जिल्हा वार्षिक ग्रामीण योजना २०२५-२६ अंतर्गत १० लक्ष रुपये खर्च करुन बांधण्यात येणाऱ्या सिमेंट रस्ता काँक्रींट कामाचे भुमिपुजन करण्यात आले. याप्रसंगी नागापूर ग्रामस्थांच्या वतीने गावाच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन दिल्याबदद्ल माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांचा शाल व पुष्पहार घालुन सत्कार करण्यात आला व ग्रामस्थांनी त्यांचे आभार मानले.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा विजय असो, आम्ही सर्व सुनेत्राताई पर्व अश्या गगनभेदी घोषणा देण्यात आल्या. या कार्यक्रमाला अशोक सोळंके, योगेश घोराळे, वैभव धानोरे,भागवत सोळंके, वैभव टाले, दिपक टाले, आत्माराम लाहुडकार, सचिन चव्हाण,गणेश होन्हाळे, अवधुत ढगे, डिगांबर वासनकार,शंभु मुऱ्हेकर,दिपक निवल,कुणाल सुळोकार,भागवत धानोरे यांच्यासह नागापूर येथील ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

**सन्मान**

## अकोला येथे राज्यभरातील विविध क्षेत्रातील महिलांचा गौरव

# डॉ. शारदा अग्रवाल व डॉ. प्रतिक्षा देशमुख यांना राज्यस्तरीय 'लोकस्वातंत्र्य विश्वशक्ती गौरव' पुरस्कार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

खामगाव दि.३१ : मानवतेची सेवा, आरोग्य क्षेत्रातील निःस्वार्थ योगदान आणि समाजासाठी केलेल्या अथक परिश्रमांना मानाचा मुजरा देत, डॉ. शारदा नितीश अग्रवाल (स्त्रीरोग विशेषज्ञ, अग्रवाल हॉस्पिटल, खामगांव) आणि डॉ. प्रतिक्षा सागर देशमुख (ॲडव्हांन्स होमिओपॅथी तज्ञ, अथर्व मल्टिकेअर क्लिनिक,खामगांव) यांना प्रतिष्ठित 'लोकस्वातंत्य विश्वशक्ती गौरव' हा राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. लोकस्वातंत्र पत्रकार महासंघ यांच्या वतीने आयोजित भव्य महिला सन्मान सोहळ्यात हा सन्मान देण्यात आला.

रविवार, २९ मार्च २०२६ रोजी अण्णासाहेब रोकडे मिलन सभागृह, अकोला येथे पार पडलेल्या या सोहळ्यात राज्यभरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा गौरव करण्यात आला. अनेक मान्य-



वर, अधिकारी, पत्रकार व सामाजिक क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तींच्या उपस्थितीत हा सोहळा अत्यंत प्रेरणादायी, भावनिक आणि अभिमानास्पद वातावरणात संपन्न झाला. या सन्मानाचे खरे मानकरी ठरलेल्या दोन्ही डॉक्टरांनी आपल्या कार्यातून समाजाला नवी दिशा दिली आहे. ''डॉ. शारदा अग्रवाल'' यांनी अग्रवाल हॉस्पिटल, खामगांवच्या माध्यमातून स्त्रीरोग उपचारांची सुविधा उपलब्ध करून देत, हजारो रुग्णांना गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा दिली आहे. त्यांच्या सेवेमुळे अनेक महिलांना सुरक्षित, विश्वासार्ह आणि संपूर्ण उपचार मिळून नवजीवन लाभले आहे. त्यांनी केवळ उपचारच नाही, तर रुग्णांप्रती मायेची व समर्पणाची भावना जपत अनेक मोफत आरोग्य शिबिरे आयोजित करून गरजू महिलांना व रुग्णांना मोठा आधार दिला आहे तर ''डॉ. प्रतिक्षा देशमुख'' यांनी अथर्व मल्टिकेअर क्लिनिक, खामगांवच्या माध्यमातून ॲडव्हांन्स होमिओपॅथीच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत अनेक रुग्णांच्या आयुष्यात सकारात्मक परिवर्तन घडवले आहे. मोफत आरोग्य शिबिरे, साइड-इफेक्ट फ्री उपचार आणि प्रत्येक रुग्णाकडे माणुसकीने पाहण्याची त्यांची वृत्ती; यामुळे त्यांच्या सेवेला केवळ वैद्यकीय मर्यादा न राहता ती एक विश्वास, एक आधार आणि नवजीवन देणारी शक्ती बनली आहे. त्यांच्या कार्यामुळे असंख्य रुग्णांच्या चेहऱ्यावर परत आलेले हास्य हेच त्यांच्या यशाचे खरे प्रतीक ठरले आहे.

या उल्लेखनीय कार्याची दखल घेत लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाने या दोन्ही डॉक्टरांची निवड करून समाजातील खऱ्या सेवाभावी व्यक्तींना सन्मानित करण्याची आपली परंपरा अधिक दृढ केली आहे. संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष संजय एम. देशमुख यांच्या दूरदृष्टीपूर्ण आणि प्रेरणादायी नेतृत्वाखाली ही संस्था समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींना ओळख, प्रेरणा आणि सन्मान देण्याचे महान कार्य सातत्याने करत आहे. हा पुरस्कार केवळ सन्मान नसून, वर्षानुवर्षे केलेल्या त्याग, समर्पण आणि निःस्वार्थ सेवेला मिळालेली खरी ओळख आहे.

# बंजारा समाजाच्या सतीमातेच्या मंदिराचा जीर्णोद्धार उत्साहात

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**साखरखेर्डा दि.३१ :** येथून थोड्याच अंतरावर असलेल्या मौजे नागझरी खुर्द येथे डॉ.भागवतराव सुरूशे यांच्या शेतात असलेल्या सतराव्या शतकातील बंजारा समाजाच्या सतीमातेच्या मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचा निर्णय ग्रामस्थांनी घेतला आहे.

नागझरी गावातील जगदंबा मातेला जसे ग्रामदैवत मानले जाते तसेच सतिमाता हि सुध्दा ग्रामदेवता आहे. विदर्भामध्ये एकमेव या गावात आहे. जेमतेम ४०० लोकसंख्या असलेल्या नागझरी हे खेडेवजा हे गाव कोराडी नदिच्या तिरावर वसलेले आहे. ही नदी १२ महिने वाहणारी नदी पुर्वीपार असुन पुराच्या पात्रात नदीच्या तिरावर गावाच्या लागुन नदीच्या दोन्ही बाजुने जवळपास ५०/६० एकर डॉ सुरूशे यांची जमीन पडीत होती आणि मेहकर, चिखली बुलडाणा मलकापूर हा रस्ता त्याकाळात गावाला लागुनच होता. त्या काळी मलकापूर हे एकमेव रेल्वे स्टेशन होते ही गोष्ट जवळपास सतराव्या (१७ व्या)



शतकातली असावी त्याकाळी गावात पुसद, यवतमाळ, वाशिम, दिग्रस हया भागातील बंजारा समाजाचे लोक व्यापार व काही काम धंदयासाठी येथे यायचे आणि त्यांचा कुटुंबासहीत पूर्ण काफिला ४ महिने नदीकाठी दाट वणराई, भव्य वृक्ष आणि जनावरासाठी पडीक जमीन व शिवाय मुबलक पाणी हया सर्व गोष्टीमुळे गावाला लागुन दरवर्षी त्यांचा काफिला येत असे. मुल, महिला येथे रोडला लागुल व गावालगत असल्याने ती येथे समुह करून राहत असत. पुरुष मंडळी व्यापार व कामानिमित्त आमचे भागात, सतत फिरत असत आणि त्यांचा चरितार्थ चालत असे. परंतु एकदा अस घडल कि, त्या काफिलामधले व्यापारानिमित्त फिरत असलेला तरूण व्यापारी अपघाती मरण पावला त्यांनी ते प्रेत गावात काफिला असणाऱ्या ठिकाणी आणल आणि नागझरी गावातच गावकऱ्याच्या सहमतिने येथे त्याचा अंत्यविधी करण्याचे ठरले. व तो कार्यक्रम ठरला परंतु ही गोष्ट १७ व्या शतकातील असावी आणि त्याची तरूण पती त्याकाळी पतिसोबत सतिजाण्यास तयार झाली आणि रिती जिवाजाप्रमाणे ती तरूणमाता पतिसोबत येथे सती गेली आहे. त्यानंतर त्या बंजारा समाज बांधवानी हया ठिकाणी दगडाची मुर्ति मांडुन पुजाअर्चा सुरू केली. आणि त्यामध्ये आमचे ग्रामस्थही सहभागी झाले कारण त्यांनी तो प्रसंग अनुभवला होता तेव्हा पासुन आजपर्यंत आम्ही त्या देविची मनोभावे सर्व ग्रामस्थ पुजाअर्चा करीत आहेत. कारण ते तेव्हापासुन ग्रामदैवत झाले आहे. सुरूवातीला त्या भागातील बंजारी मंडळी वर्षातुन एकदा दर्शनासाठी येत असत परंतु जसजसे जुनी पिढी संपली आणि अंतर वाढल बंजारा मंडळीच येणं जाण बंद झाल. आम्ही मात्र सर्व सण नवरात्र, दसरा, दिवाळी सर्व हया देवतांचे मंदिरात नियमित साजरे करीत आहोत.

# शेतकऱ्याच्या डोक्यात कुऱ्हाडीचा घाव घालूनही आरोपींना वाचविण्याचा प्रयत्न

**देवकाते यांचे पोलिस महानिरीक्षकासह जिल्हा पोलिस अधीक्षकांना निवेदन**

। सुशीलकुमार वाठोरे ।

**जालना, दि. ३१ :** गावातील दोन तरुणांनी माझ्यावर केलेला हल्ला हेतुपरस्पर जाणीवपूर्वक व जीवे मारण्याच्या उद्देशाने होता. यामध्ये आरोपींचा मला जीवे मारण्याचा उद्देश स्पष्ट दिसून येत आहे. त्यांनी लोखंडी रॉड व कुऱ्हाडीने गंभीर स्वरुपाचा प्राणघातक हल्ला केला. या घटनेची बदनापूर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्र.००५७/२०२६ मध्ये भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०९ ची वाढ करण्यात यावी, अशी मागणी करत मला न्याय न मिळाल्यास आमरण उपोषण करण्याचा इशारा अन्यायग्रस्त जखमीपिडित शेतकरी घनशाम पिराजी देवकाते (रा.काजळा ता.बदनापुर) यांनी दिला आहे.

दि.१७ मार्च २०२६ रोजी पोलिस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर, पोलिस अधीक्षक जालना, उपविभागीय पोलिस अधिकारी जालना व पोलिस निरीक्षक बदनापूर पोलिस ठाणे यांना दिलेल्या निवेदनात देवकाते यांनी असे म्हटले आहे की, माझ्यावर दि.११ फेब्रुवारी २०२६ रोजी गावातील श्रीकांत बाबासाहेब खांडेकर व सुरज भाऊसाहेब पांढरे(दोघेही रा.काजळा,ता.बदनापूर) या दोन तरुणांनी जीवघेणा हल्ला करून मला जीवे मारण्याचा प्रयत्न केला. ज्यामुळे मला गंभीर अवस्थेत जालना येथील एका खाजगी रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले. रुग्णालयात उपचार घेत असतांना १२ फेब्रुवारी २०२६ रोजी मी स्वतः बदनापुर पोलिस स्टेशनचे पो.हे.कॉ. अंकुश दासर यांना जबाब देऊन फिर्याद दिली होती; परंतु संबंधित फिर्याद बघता असे दिसून येत आहे की, संबंधित फिर्याद व मला लागलेला मार आणि वैद्यकीय प्रमाणपत्र या तिन्ही गोष्टीचे अवलोकन केले असता, असे दिसून येत आहे की, माझ्यावर केलेला हल्ला हेतुपरस्पर जाणीवपूर्वक व जीवे मारण्याच्या उद्देशाने होता. यामध्ये आरोपींचा मला जीवे मारण्याचा उद्देश स्पष्ट दिसून येत आहे; परंतु प्राणघातक हल्ला करून जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याबाबतच्या कलमांचा समावेश केलेला नाही. त्यांचा हेतूच मला जीवे मारण्याचा होता हे स्पष्ट दिसून येत आहे. त्यासाठी कलम वाढ करण्यात यावी. भविष्यातही हे आरोपी मला, माझ्या मुलाला किंवा परिवारातील अन्य सदस्याला जीवे मारण्याचा प्रयत्न करू शकतात. कृपया याची दखल घ्यावी, अशी विनंती घनशाम देवकाते यांनी निवेदनात केली आहे.



माझ्यावर झालेल्या जीवघेणा हल्ल्याबाबत बदनापूर पोलिसांनी आरोपींना पाठीशी घालून अन्याय केला होता; परंतु पाठपुराव्यामुळे एक महिन्यापासून आरोपी जेलमध्ये आहेत. मात्र ज्या कलमान्वये गुन्हा नोंद करायला हवा होता तसा झालेला नाही. मी केलेल्या पाठपुराव्यामुळे व तत्कालिन तपास अधिकारी पोहेकॉ.दासर यांच्या निदर्शनास माझे मेडिकल सर्टिफिकेट आणून दिल्यानंतर त्यांनी कलम वाढ केली. मात्र मोघम ११८(२) अशी कलम लावली. त्यात भा.न्या.सं.चे कलम १०९ दाखल करणे अपेक्षित होते. मात्र बदनापूर पोलिसांनी तसे केले नाही.अजुनही त्यांना तसा कोर्टात चार्जशीट दाखल करण्याचा अधिकार आहे. त्यामध्ये ती कलम वाढवू शकतात. मात्र ते तसे का करत नाहीत ही बाब अनुत्तरीत आहे. मी दुसऱ्यांदा याबाबत निवेदन दिले आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, मी आशा करतो की, आपण बदनापूर पोलीस ठाण्यातील गुन्हा रजिस्टर क्र.००५७/२०२६ मध्ये भा.न्या.सं.चे कलम १०९ ची वाढ करून दोषींवर कठोर कलमान्वे कारवाई कराल. ज्यावेळी गुन्हा दाखल केला होता तो ११८ (१) अन्वये होता; परंतु मी पाठपुरावा केल्यानंतर व तपास अधिकारी यांच्या निदर्शनास माझे मेडिकल सर्टिफिकेट आणून दिल्यानंतर त्यांनी मोघम ११८ (२) असा गुन्हा दाखल केला; परंतु त्यात भा.न्या.सं. चे कलम १०९ दाखल करणे अपेक्षित होते. असे न करता मोघम ११८ (२) दाखल केला. याच्या अगोदर कलम वाढ झालेली आहे पण अपेक्षित कलम वाढ झालेली नाही. त्यामुळे मोघम कलमातुन त्यांच्या गुन्ह्याचे गांभीर्य बघता गंभीर कलमेचा गुन्हा नोंद करून न्याय देण्यात यावा, ही विनंती.

शेवटी निवेदनात देवकाते यांनी आपण माझ्या विनंती अर्जावर विचार करून मला न्याय द्याल अशी अपेक्षा करतो असे म्हटले आहे.

दरम्यान, मला न्याय न दिल्यास मी संविधानाच्या अधिकारानुसार लोकशाही मार्गाने आमरण उपोषण करेल. असा इशारा देत यादरम्यान तब्येतीमुळे माझ्या जीवाला काही धोका निर्माण झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी पोलिस प्रशासनावर राहील, याची गांभीर्याने नोंद आपण घ्यावी. मला डॉक्टरांनी दोन महिन्यांपर्यंत बेडरेस्ट सांगितला असून ऊन, जास्त बोलणं, मोठा आवाज, प्रवास मला सहन होत नाही, असेही निवेदनात नमूद आहे.

या निवेदनासोबत देवकाते यांनी यापुर्वी वरील कार्यालयास दिलेल्या निवेदनाची रिसीव्हड प्रत तसेच कुऱ्हाडीने डोक्यात गंभीर घाव केल्याचे छायाचित्र, रुग्णालयात दाखल केल्यानंतर ऊपचार सुरू असतानाचे छायाचित्र, रुग्णालयात दाखल केल्यापासूनचे वैद्यकीय प्रमाणपत्र, डिस्चार्ज रिपोर्ट, डिस्चार्ज घेतल्यानंतर दर दोन-तीन दिवसाआड रुग्णालयात उपचार घेतल्याचे पेपर, फोटो, संबंधित गुन्हा नोंद, फिर्याद प्रत, विविध दैनिकात प्रकाशित झालेल्या बातम्यांची कात्रणे ही कागदपत्रे जोडलेली आहेत.

## महत्त्वाचे



### दलित वस्त्यांसाठी निधी वाढविण्याची दर्शना झोल यांची मागणी

**जालना :** महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पीय सभेत शहरातील दलित वस्त्यांच्या विकासासाठी अपुरा निधी दिल्याचा मुद्दा उपस्थित करत नगरसेविका दर्शना झोल-खोतकर यांनी प्रशासनावर निशाणा साधला. दलित वस्त्यांमधील प्रभागांचा विकास साधायचा असेल तर त्या भागांसाठी स्वतंत्र आणि पुरेसा निधी राखीव ठेवणे अत्यावश्यक आहे, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली. सभागृहात बोलताना त्या म्हणाल्या की, दलित वस्त्यांच्या विकासाचा प्रश्न हा केवळ आर्थिक तरतुदींचा विषय नसून तो सामाजिक न्याय, समान संधी आणि मूलभूत हक्कांशी थेट जोडलेला आहे. शहरातील अनेक दलित वस्त्यांमध्ये आजही रस्ते, पिण्याचे पाणी, गटारे, स्वच्छता, वीज, आरोग्य सुविधा आणि इतर मूलभूत नागरी सुविधा अपुऱ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. अशा परिस्थितीत अर्थसंकल्पात करण्यात आलेली निधीची तरतूद अत्यंत अपुरी असून, त्यामुळे या भागांचा विकास खुंटत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महानगरपालिकेने दलित वस्त्यांकडे केवळ कागदोपत्री विकासाच्या दृष्टीने न पाहता प्रत्यक्षात ठोस कामे करण्यासाठी निधी वाढवणे गरजेचे आहे. शहराचा सर्वसमावेशक विकास करायचा असेल तर वंचित आणि दुर्लक्षित घटकांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. दलित वस्त्यांचा विकास झाला तरच शहराचा खऱ्या अर्थाने सर्वांगीण विकास साध्य होईल, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. या वेळी त्यांनी पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत मंजूर झालेला; परंतु थांबलेला निधी हाही गंभीर विषय सभागृहात मांडला. शहरातील अनेक गरजू कुटुंबे आजही स्वतःच्या घराच्या प्रतीक्षेत असून निधी वितरणात होणाऱ्या विलंबामुळे अनेकांची घरे अपूर्ण अवस्थेतच अडकून पडली आहेत.



### वादळी वाऱ्यामुळे सौर ऊर्जा प्रकल्पांचे मोठे नुकसान

**जाफ्राबाद :** जाफ्राबाद तालुक्यातील देऊळझरी, सिपोरा निमखेडा परिसरात सोमवार, दि. ३०. राजे रोजी झालेल्या जोरदार वादळी वाऱ्यामुळे अनेक शेतकऱ्यांचे सौर ऊर्जा पॅनलच्या साहित्यांचे मोठे नुकसान झाले असून, याचा फटका शेतकऱ्यांना बसला आहे. जाफ्राबाद पट्ट्यात अवकाळी पावसाचा फटका अचानक आलेल्या वादळामुळे अनेक ठिकाणी सोलर पॅनेल उखडून पडले आहे. काही ठिकाणी पॅनेल तुटल्याने मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. विशेषतः ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी उभारलेल्या सौर पंप आणि लहान सौर प्रकल्पांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. वाऱ्याचा वेग जास्त असल्यामुळे पॅनेलचे स्टैंड वाकले, तर काही ठिकाणी संपूर्ण संरचना कोसळल्याची माहिती मिळत आहे. या नुकसानीमुळे शेतकऱ्यांवर दुहेरी संकट ओढवले आहे. एकीकडे उन्हाळ्याच्या तोंडावर पाण्याची गरज वाढत असताना सौर पंप बंद पडल्याने सिंचनावर परिणाम होत आहे. दुसरीकडे दुरुस्तीचा खर्च परवडत नसल्याने शेतकरी चिंतेत आहेत.

## पत्रकारांना महानगरपालिका सभागृहात प्रवेश मिळण्यासाठी नगरसेवक काठोठीवाले आक्रमक

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



मनपाच्या सभागृहात पत्रकार प्रवेशाचा मुद्दा तापला

**जालना, दि. ३१ :** जालना महानगरपालिका सभागृहात होणाऱ्या बैठकीदरम्यान पत्रकारांना प्रवेश देण्यात यावा, अशी मागणी नगरसेवक दुर्गेश काठोठीवाले यांनी केली. या मागणीवरून ते सभागृहात आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले.

सभागृहात नगरसेवक कोणते प्रश्न मांडतात, कोणत्या विषयांवर चर्चा होते आणि जनतेशी संबंधित मुद्द्यांवर काय भूमिका घेतली जाते, हे सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचणे आवश्यक असल्याचे मत काठोठीवाले यांनी व्यक्त केले. महानगरपालिका म्हणजे आंधळं दळतं आणि कुत्रं पीठ खातं अशी परिस्थिती होऊ नये. जनतेला सभागृहातील घडामोडी समजल्या पाहिजेत, त्यासाठी पत्रकारांना प्रवेश मिळालाच पाहिजे,'' अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली.

या दरम्यान महानगरपालिकेत पत्रकार प्रवेशाचा मुद्दा चांगलाच तापल्याचे दिसून आले.

यावेळी नगरसेवक अक्षय गोरट्याल यांनीही पत्रकारांसाठी सभागृहाच्या वरच्या भागात बसण्याची व्यवस्था करण्यात यावे असे मत व्यक्त केले. मात्र, पत्रकारांना थेट सभागृहात प्रवेश मिळणे आवश्यक असल्याचा मुद्दा पुन्हा ठळकपणे मांडण्यात आला.

पत्रकार हे लोकशाहीतील चौथा स्तंभ मानले जातात. सभागृहातील घडामोडी, जनतेचे प्रश्न आणि लोकप्रतिनिधींच्या भूमिका नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण काम पत्रकार करत असतात. त्यामुळे पत्रकारांना महानगरपालिका सभागृहात प्रवेश देण्यात यावा, अशी ठाम मागणी दुर्गेश काठोठीवाले यांनी केली.

या मुद्द्यावरून काही काळ सभागृहात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाल्याचेही दिसून आले.

## रेल्वे गाड्या व स्थानकांवर अनधिकृत विक्रेत्यांविरोधात विशेष मोहीम



**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. ३१ :** दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागामार्फत मुख्यालयाच्या सूचनांनुसार दिनांक २२ मार्च ते २८ मार्च २०२६ या कालावधीत रेल्वे गाड्या व स्थानकांवर अनधिकृत विक्रीविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेचा उद्देश अनधिकृत विक्रीला आळा घालणे तसेच प्रवाशांना सुरक्षित, स्वच्छ व नियमानुसार सेवा उपलब्ध करून देणे हा होता. या मोहिमेदरम्यान वाणिज्य निरीक्षक व तिकीट तपासणी कर्मचारी यांनी विभागातील विविध मार्गांवर सघन तपासणी केली. त्यामध्ये वाशीम अकोला, परभणी परतूर, परभणीपरळी, जालना छत्रपती संभाजीनगर, नांदेड आदिलाबाद, नांदेड वाशीम तसेच छत्रपती संभाजीनगरमनमाड या विभागांचा समावेश होता. या संयुक्त कारवाईदरम्यान एकूण ३५ अनधिकृत विक्रेते/फेरीवाले आढळून आले असून त्यांच्यावर रेल्वे नियमांनुसार कारवाई करण्यात आली. या कारवाईत द्वारे एकूण ₹१३,८६० इतका दंड वसूल करण्यात आला.

## डोलखेडा बु.तलावातील पाणी उपसावरून तणाव

### मोटारी बंद न झाल्यास आंदोलनाचा इशारा

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**जाफ्राबाद, दि. ३१ :** तालुक्यातील डोलखेडा बु. येथील लघु पाटबंधारे विभागाच्या तलावातील पाणी उपसावरून ग्रामस्थ व मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थेमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. तलावातील पाणी साठा झपाट्याने कमी होत असून अद्यापही मोठ्या प्रमाणात विद्युत मोटारीद्वारे पाणी उपसा सुरू असल्याने परिस्थिती गंभीर बनली आहे.

डोलखेडा बु.मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थेचे चेअरमन मधुकर नारायणराव नवले यांनी तहसीलदारांकडे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, तलावामध्ये सध्या केवळ १५ दिवस पुरेल इतकाच पाणीसाठा शिल्लक आहे. हे पाणी ग्रामस्थ, जनावरे व मत्स्य उत्पादनासाठी अत्यावश्यक असताना सुमारे २०० मोटारींद्वारे पाणी उपसा सुरू असल्याने मत्स्य व्यवसाय धोक्यात आला आहे.

संस्थेच्या माध्यमातून सुमारे ३५ ते ४० कुटुंबांची उपजीविका सुरू असून, मोटारी बंद न केल्यास अंदाजे १५० क्विंटल मासळी नष्ट होण्याचा धोका व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे तातडीने सर्व मोटारी जप्त करून तलावावरील वीजपुरवठा खंडित करण्याची मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, यापूर्वीही १६ मार्च रोजी ग्रामस्थांनी तहसीलदारांकडे अर्ज करून तलावातील पाणी उपसा थांबविण्याची मागणी केली होती. शासनाने २८ फ ेब्रुवारीपासून पाणी उपसा बंद करण्याचे आदेश दिले असतानाही काही शेतकऱ्यांकडून २४ तास पाणी उपसा सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

**आंदोलनाचा इशारा**

दोन दिवसांत मोटारी बंद न केल्यास तलावातील मृत मासळी तहसील कार्यालयासमोर आणून तीव्र आंदोलन करण्यात येईल, तसेच सर्व सभासद आत्मदहनाचा इशाराही देण्यात आला आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

**प्रशासनाचे दुर्लक्ष?**

ग्रामस्थांच्या वारंवार निवेदनांनंतरही अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने प्रशासनाच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. आता प्रशासन काय निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**आपुलकी** ३८ वर्षांची ज्ञानसेवा पूर्ण झाल्याबद्दल आत्मीय सोहळा

## शेख नईम सरांना सहकारी शिक्षक व विद्यार्थ्यांचा अश्रुपूर्ण निरोप

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**जाफ्राबाद, दि. ३१ :** पी.एम. श्री जि.प.प्रशाला, जाफ्राबाद येथे ज्येष्ठ शिक्षक शेख नईम शेख इब्राहीम यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित करण्यात आलेला निरोप समारंभ अत्यंत साधा पण भावनिक वातावरणात पार पडला. तब्बल ३८ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर शिक्षण क्षेत्राला समर्पित आयुष्य जगलेल्या शेख नईम सरांना सहकारी शिक्षक व विद्यार्थ्यांनी अश्रुपूर्ण निरोप दिला.

आपल्या मनोगतात शेख नईम सरांनी सेवाकाळातील अनेक आठवणींना उजाळा देत आयुष्यातील चढ-उतार, संघर्ष आणि विद्यार्थ्यांशी जुळलेले आत्मीय नाते याबद्दल भावनिक शब्दांत मांडणी केली. ''विद्यार्थी हाच माझा खरा ठेवा आहे,'' असे सांगताना त्यांचा कंठ दाटून आला.


निरोप प्रसंगी सहकारी शिक्षकांनी शेख नईम सरांच्या कर्तव्यनिष्ठा, शिस्तप्रियता आणि विद्यार्थ्यांप्रती असलेल्या अपार प्रेमाचा उल्लेख करत त्यांच्या कार्याचे कौतुक केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेक विद्यार्थ्यांचे जीवन घडल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमाला मुख्याध्यापक उमेश दुनगहू यांच्यासह शेख सफिया, शेख शकील, शेख जफर,शेख रईस , शेख मुस्तफा, अकबर शेख, मोहम्मद शेख, शेख यास्मीन, शेख शाहीन, हेख फरहा, शेख बदरुन्नीसा तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

समारंभाच्या शेवटी उपस्थितांनी शेख नईम सरांना पुढील आयुष्यासाठी निरोगी व आनंदी जीवनाच्या शुभेच्छा दिल्या.

## भास्करराव अंबेकर यांची परभणी लोकसभा संपर्कप्रमुखपदी नियुक्ती

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**जालना, दि. ३१ :** जालना शहराचे माजी नगराध्यक्ष तथा जालना जिल्हा शिवसेना संपर्कप्रमुख भास्करराव अंबेकर यांची शिवसेना पक्षाच्यावतीने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशावरून परभणी लोकसभा संपर्कप्रमुख पदावर नियुक्ती करण्यात आली. शिवसेनेच्यावतीने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकान्वये राज्यातील लोकसभा संपर्क प्रमुखांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या.

अंबेकर हे जालना जिल्ह्यातील शिवसेना पक्षाचे अनुभवी व ज्येष्ठ पदाधिकारी आहेत. यापूर्वी त्यांना नगरसेवक, नगराध्यक्ष, कृ.उ.बा. समितीचे संचालक, उपसभापती तर पक्षात शहरप्रमुख, उपजिल्हाप्रमुख, जिल्हाप्रमुख, संपर्कप्रमुख असा पक्षीय कार्याचा दांडगा अनुभव आहे.

त्यांच्या या नियुक्तीबद्दल जालना व परभणी जिल्ह्यातील पदाधिकारी व शिवसैनिकांत उत्साह संचारला असून त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
अमरावती, बुधवार, १ एप्रिल २०२६

## थोडक्यात

### वृद्धाने केला महिलेचा विनयभंग

दर्यापूर : पतीसह ५३ वर्षीय महिला शेतात काम करीत होती. त्यावेळी तेथे एक परिचित वृद्ध आला. त्याने तिच्या पतीला मारहाण करीत तिचा विनयभंग करीत लज्जास्पद वर्तन केले. महिलेने घरी येवून ही बाब मोठ्या मुलाला सांगीतली. ही घटना दर्यापूर पोलीस ठाण्यांतर्गत घडली. महिलेच्या तक्रारीवरून दर्यापूर पोलिसांनी उस्मान शाह मुकद्दर शाह (६५) याच्याविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल केला.

### भिंत पडून मजुराचा मृत्यू

अंजनगाव सुर्जी : तालुक्यातील एकलारा येथे गजानन देविदास काकड (४२) यांच्या घराचे बांधकाम सुरू आहे. दरम्यान २८ मार्च रोजी प्रफुल श्रीकृष्ण शेवाणे (३५) हे बांधकाम मजूर म्हणून काम करीत होते. सकाळी दहाच्या सुमारास कॉलमसंह भिंत त्यांच्या अंगावर पडली. त्यातच त्यांचा मृत्यू झाला. या संदर्भात मृतकाचा भाऊ अनिल श्रीकृष्ण शेवाणे (३०) यांनी रहिमापूर पोलिसात बांधकाम मालक गजानन काकड यांच्याविरुद्ध तक्रार नोंदवली. पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

### वाळूची तस्करी करणाऱ्यावर गुन्हा दाखल

चांदूर बाजार : वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर चालकासह मालकावर चांदूर बाजार पोलिसांनी कारवाई केली. ही कारवाई माधान ते काजळी मार्गावरील कॅनलजवळ करण्यात आली. पोलिसांनी एक ब्रास वाळूसह ट्रॅक्टर व ट्रॉली असे अंदाजे ५ लाख ५ हजारांचे साहित्य जप्त केले. चालक सुनील शिवरामजी तायडे (३५) व मालक अतुल शांतारामजी वासनकर (३५) दोघेही रा. शिरजगाव कसबा अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

### बोरज येथून चार गाई लंपास

चांदूर बाजार : अज्ञात चोरट्याने दोन गाईंसह दोन कालवडी चोरून नेल्यात. ही घटना बोरज येथे घडली. त्यांची अंदाजे किंमत २९ हजार रुपये आहे. या प्रकरणी पशुपालक गजानन भानुदास पवार (४४, रा. बोरज) यांनी चांदूर बाजार पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. या घटनेमुळे पशुपालकाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे.

### क्षुल्लक कारणावरून मारहाण

मोर्शी : क्षुल्लक कारणावरून दोन युवकांना दुखापती केल्याच्या घटनांची नोंद मोर्शी पोलीस ठाण्यात २८ मार्च रोजी करण्यात आली. त्यापैकी एक घटना तालुक्यातील चिंचोली गवळी, तर दुसरी शहरात घडली. चिंचोली गवळी येथे क्षुल्लक कारणावरूप ब्रह्मानंद पाटील (४२) याने गौतम राजकुमार बागेड (३८) याला शिवीगाळ करीत लाकडी पाटलीने मारहाण केली. इतकेच नव्हे, तर तक्रार देण्यास गेला, तर पाहून घेईन, अशी धमकीही दिली. पोलिसांनी ब्रह्मानंद पाटील याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला, तर रामजीबाबा नगर येथे किसना माणिकराव सोनारे (२७) याने मोठा भाऊ प्रवीण माणिकराव सोनारे (३८) याला क्षुल्लक कारणावरून शिवीगाळ करीत काठीने मारहाण केली. माझे आधार कार्ड पाहून ठेव, नाही तर तुला पाहून घेईन, अशी धमकी दिली.

### वाहनाच्या धकडकेत दोघे जखमी

चांदूर रेल्वे : दोन मित्र चिरोडी ते चांदूर रेल्वे मार्गाने सायंकाळच्या सुमारास नेहमीप्रमाणे रनिंगसाठी गेले. त्यांना मागून आलेल्या भरधाव चारचाकीने धडक दिली. त्यात रोशन दुर्गादास जाधव (२०) व त्याचा मित्र महेश रामचरण जाधव (२०) दोघेही रा. चिरोडी हे जखमी झाले.

# अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेत सागवान व भंगार घोटाळा?

■ दुरुस्तीच्या नावाखाली दोन लाख रुपायाचे शासकीय साहित्य लंपास ■ प्रहारचे शंभु मालठाणे यांचा हल्लाबोल!

अजिंक्य भारत | प्रतिनिधी




**अंजनगाव सुर्जी, दि.३१ :** अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेतील प्रशासकीय राजवटीच्या काळात सुरू असलेल्या विकासकामांवर आधीच प्रश्नचिन्ह उपस्थित होत असताना आता शासकीय साहित्य चोरीचा गंभीर प्रकार उघडकीस आल्याने शहरात मोठी खळबळ उडाली आहे. मुख्याधिकारी कार्यालयाच्या दुरुस्तीच्या कामादरम्यान मौल्यवान सागवान लाकडाचे कपाट, खिडक्या व गेट परस्पर कंत्राटदाराने लंपास केल्याचा आरोप पुढे आला असून, या प्रकरणामुळे नगरपरिषद प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर पुन्हा एकदा संशयाचे सावट दाटले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नगरपरिषदेत गेल्या चार वर्षांपासून प्रशासकीय राजवट लागू आहे. या काळात विविध विकासकामे हाती घेण्यात आली असली तरी त्यातील अनेक कामांच्या दर्जाबाबत नागरिकांनी सातत्याने नाराजी व्यक्त केली आहे. निकृष्ट दर्जा, अपूर्ण कामे आणि पारदर्शकतेचा अभाव यामुळे नागरिकांचा रोष वाढत असतानाच आता थेट शासकीय मालमत्ता चोरीचा आरोप समोर आल्याने परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे.

मुख्याधिकारी यांच्या कार्यालयाच्या दुरुस्तीचे काम सुरू असताना इमारतीतील सागवान लाकडापासून तयार केलेले कपाट, खिडक्या तसेच लोखंडी गेट यांसारखे मौल्यवान साहित्य नियमानुसार शासकीय नोंदीत जमा करणे अपेक्षित होते. मात्र, संबंधित कंत्राटदाराने हे साहित्य कोणतीही अधिकृत नोंद न करता परस्पर स्वत:च्या ताब्यात घेतल्याचा आरोप प्रहार संघटनेचे उपजिल्हाप्रमुख शंभू मालठाणे यांनी केला आहे. या साहित्याची विल्हेवाट लावण्यात आल्याचीही शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.या संदर्भात शंभु मालठाणे यांनी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना लेखी निवेदन देत तातडीने कारवाईची मागणी केली आहे.

त्यांनी स्पष्टपणे नमूद केले की, कार्यालयातील सीसीटीव्ही फुटेजची सखोल तपासणी करून संबंधित कंत्राटदारावर शासकीय मालमत्ता चोरीप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात यावा. तसेच या प्रकारात सहकार्य करणाऱ्या किंवा दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवरही कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी.दरम्यान, या आरोपांमुळे नगरपरिषद वर्तुळात खळबळ उडाली असून, संबंधित अधिकाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दुरुस्तीच्या नावाखाली साहित्य गायब होणे ही अत्यंत गंभीर बाब असून, यात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याची शक्यता नाकारता येत नाही, असे स्थानिक नागरिकांकडून बोलले जात आहे. विशेष म्हणजे, अशा प्रकारच्या घटना यापूर्वीही घडल्याच्या चर्चाही रंगू लागल्या आहेत. नगरपरिषद प्रशासनाने मात्र या प्रकरणावर अधिकृत प्रतिक्रिया देण्यास अद्याप टाळाटाळ केली आहे. त्यामुळे संशय अधिकच बळावला असून, नागरिकांमध्ये संतापाची भावना तीव्र होत आहे. पारदर्शक कारभाराची अपेक्षा असताना अशा प्रकारचे आरोप समोर येणे हे प्रशासनासाठी लाजिरवाणे असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.या प्रकरणात पुढील काही दिवसांत चौकशी सुरू होण्याची शक्यता असून, सीसीटीव्ही फुटेज आणि संबंधित कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर वास्तव समोर येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मात्र, जर आरोप खरे ठरले तर संबंधित कंत्राटदारासह जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई होण्याची मागणी जोर धरत आहे.

सदर विषय हा प्रशासन कार्य काळामध्ये झालेला असल्यामुळे मी या बाबीची गंभीरतिने माहिती घेऊन तसेच चौकशी करण्याचे आदेश देतो व दोषी ठेकेदारावर कारवाई निश्चित केला जाईल

**अविनाश गायगोले,**
**नगराध्यक्ष अंजनगाव सुर्जी**

एकूणच, अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेतील हा कथित 'सागवान / भंगार ..घोटाळा' केवळ चोरीपुरता मर्यादित नसून, प्रशासनातील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा ठरत आहे. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी होणे गरजेचे असल्याचे मत नागरिकांतून व्यक्त होत आहे.

## अपहरणकर्ते पोलिसांच्या ताब्यात

दोघांना भंडाऱ्यातून अटक



अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि.३१ :** कर्जाची परतफेड न केल्यामुळे एका तरुणाच्या अपहरणाची घटना २९ मार्च रोजी रात्री १० वाजता घडली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन, पोलिसांनी आरोपींचा शोध घेण्यासाठी दोन पथके पाठवली. पोलीस पथकांनी अपहरण झालेल्या तरुणाला भंडारा येथून सुखरूप परत आणले आणि दोन अपहरणकर्त्यांना अटक केली, तर इतरांचा शोध सुरू आहे. ही घटना राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जेवड नगर गोंडबाबा मंदिराच्या जवळ घडली. अटक करण्यात आलेल्या दोन अपहरणकर्त्यांची नावे अखिलेश विलास वैद्य (३२) आणि कपिल महेश वडवाणी (२७) अशी आहेत. दोन्ही आरोपी भंडारा येथील रहिवासी असल्याचे सांगण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जेवडनगरचे रहिवासी अशोक देवराव उंबारकर (७५) यांनी सोमवार, ३० मार्च रोजी राजापेठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यांनी आरोप केला की, २९ मार्चच्या रात्री कर्ज फेडण्यात अयशस्वी झाल्यामुळे, गौडबाबा मंदिराजवळ अखिलेश वैद्य आणि त्याच्या साथीदारांनी त्यांचा मुलगा भरत उंबारकर याचे त्यांच्या डोळ्यांदेखत अपहरण केले. तेव्हापासून तो बेपत्ता आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन, पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल केला. या घटनेमुळे जेवडनगर परिसरात घबराट पसरली. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून तपास सुरू केला.

त्यानंतर भरत उंबारकरचा शोध सुरू झाला. तांत्रिक तपासाअंती, भरतच्या मोबाईल फोनचे लोकेशन भंडारा येथे असल्याचे आढळले. या लोकेशनच्या आधारे, स्टेशन हाऊस ऑफिसर पुनीत कुलत यांच्या मार्गदर्शनाखाली राजापेठ पोलिसांचे एक पथक भंडाराकडे रवाना झाले. भंडारा पोलिसांच्या मदतीने, पोलीस पथकाने मोबाईल लोकेशनच्या आधारे सापळा रचला आणि अपहरणकर्ते, भंडारा येथील आंबेडकर वॉर्डमधील गणेशपूरचा रहिवासी अखिलेश विलास वैद्य (३२) आणि नेहरू वॉर्डचा रहिवासी कपिल महेश वडवाणी (२७) यांना अटक करून भरत उंबारकरला सुखरूप ताब्यात घेतले. राजापेठ पोलिसांचे एक पथक भरत आणि दोन्ही आरोपींना घेऊन अमरावतीकडे रवाना झाले आहे.

## इर्विन रुग्णालयातील वॉटर कुलर बंद

अजिंक्य भारत| प्रतिनिधी



**अमरावती,दि.३१ :** जिल्हा सामान्य रुग्णालयातील पेइग वॉर्डमध्ये लावलेला वॉटर कूलर गत अनेक महिन्यापासून बंद अवस्थेत असून रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना पिण्याच्या पाण्यासाठी अक्षरश: भटकंती करावी लागत आहे. इर्विन रुग्णालयातील मूलभूत सुविधा ठप्प झाल्याने संताप व्यक्त केला जात आहे. वॉर्डमध्ये दाखल असलेल्या रुग्णाच्या नातेवाईकांची पाण्यासाठी तीव्र गैरसोय होत आहे. उष्णतेचा पारा वाढत असताना थंड पाणी तर दूरच, साधे पिण्याचे पाणीही उपलब्ध नसल्याची परिस्थिती आहे. संबंधित वॉटर कूलरवर एएमसी अंतर्गत देखभाल अशी नोंद असतानाही दुरुस्तीबाबत कोणतीही हालचाल दिसत नाही. जिल्हा सामान्य रुग्णालयातील पेईंग वार्डमध्ये ही अवस्था असेल तर रुग्णालयातील अन्य वार्डांचे कशी दुर्दशा असेल तर सामान्य नागरिकांनी अपेक्षा कोणाकडून ठेवायची? असा सवाल संतप्त रुग्णांच्या नातेवाईकाकडून उपस्थित केला जात आहे. रुग्णालय प्रशासनाची निष्क्रियता आणि दुर्लक्ष यामुळे रुग्ण व रुग्णांच्या नातेवाईकांमध्ये रोष वाढत असून तात्काळ दुरुस्ती करून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था सुरळीत करण्याची मागणी जोर धरत आहे. प्रशासन झोपेतून कधी जागे होते आणि रुग्णांची तहान कधी भागवते याकडे लक्ष लागले आहे.

# पीडित युवतीचा अत्याचाऱ्यांसमोर आक्रोश

अजिंक्य भारत |प्रतिनिधी

### फोनमधून २० हजार घ्या पण मला सोडा



**अमरावती, दि.३१ :** माझ्या गूगल पे मध्ये १५,००० ते २०,००० रुपये आहेत. तुम्ही ते सर्व पैसे घेऊ शकता, पण मला आणि माझ्या मित्राला एकटे सोडा. आपला जीव वाचवण्यासाठी एका 18 वर्षीय मुलीची ही आर्त विनवणी ऐकूनही, त्या पाच नराधमांनी माघार घेतली नाही आणि त्यांची विकृती पैशांपेक्षा कितीतरी मोठी ठरली. ज्यामुळे एका निष्पाप तरुणीवर अन्याय आणि अत्याचाराचा डोंगर कोसळला आणि ती सामूहिक बलात्काराची बळी ठरली. ही घटना शनिवारी रात्री चंदूर रेल्वे भानखेडा रोडवरील वनक्षेत्रात घडली. याबाबत माहिती मिळताच, शहर पोलिसांनी पुढील १२ तासात पाचही आरोपींना ताब्यात घेऊन न्यायालयात हजर केले, जिथून न्यायालयाने त्यांना २ एप्रिलपर्यंत फ्रेजरपुरा पोलिसांच्या पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. आम्ही तुम्हाला सांगतो की, गेल्या शनिवारी रात्री सुमारे ८ वाजता, पीडित मुलगी तिच्याच वयाच्या मैत्रिणीसोबत दुचाकीवरून अमरावतीला परत येत होती.

याचवेळी, भानखेडा फाट्याजवळ शिकारीच्या शोधात बसलेल्या पाच आरोपींनी त्यांची दुचाकी थांबवली आणि त्या दोघींना जबरदस्तीने जंगलात घेऊन गेले, जिथे त्या पाचही जणांनी त्या तरुणीला बेदम मारहाण केली आणि दोरीने बांधले. यावेळी, आपला जीव वाचवण्यासाठी, त्या मुलीने तिच्या पर्समधील १२० रुपये रोख आरोपींना दिले आणि तिच्या मोबाईलच्या ऑनलाइन खात्यातील संपूर्ण रक्कम आरोपींना देण्याची तयारीही दर्शवली. परंतु, ऑनलाइन पैसे घेतल्यास अडचणीत येण्याची शक्यता लक्षात घेऊन, आरोपींनी आपापसात विचारविनिमय करून ऑनलाइन पैसे घेण्यास नकार दिला आणि त्यानंतर क्रुरतेच्या सर्व मर्यादा ओलांडल्या. अहवालानुसार, अटक केलेले पाचही आरोपी सराईत गुन्हेगार असून त्यांच्यावर यापूर्वी दरोड्याचे पाच गुन्हे दाखल आहेत. त्यांना वाटले की, त्यांच्या धमक्यांमुळे आणि प्रतिष्ठेच्या भीतीमुळे पीडित महिला पोलिसांकडे जाणार नाही.

गुन्हा केल्यानंतर, पाचही आरोपी पहाटे सुमारे दीड वाजता आपापल्या घरी गेले. पोलिसांनी त्यांना त्यांच्या घरातून अटक केली. त्यांनी तिला जंगलात ओढून नेले आणि..तक्रारीनुसार, पाच आरोपींपैकी एका ३४ वर्षीय व्यक्तीने १८ वर्षीय महिलेला जंगलात ओढून नेले आणि धमकी दिली की, जर ती ओरडली तर तिच्या मित्राला ठार मारून तिथेच गाडले जाईल. त्याने तिचा एक आक्षेपार्ह व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकीही दिली. या धमकीसोबतच, आरोपींनी पीडित महिलेचा शारीरिक छळ व मारहाण केली, ज्यामुळे ती जमिनीवर उभी राहू शकत नव्हती.

त्या अवस्थेतही आरोपींनी पीडित मुलीचे व्हिडिओ चित्रित केले, त्यानंतर तिचा मोबाईल फोन आणि दुचाकी तिला परत देण्यात आली. न्यायालयाने पोलिसांच्या गोपनीयतेचीही दखल घेतली.पाचही आरोपींना ताब्यात घेतल्यानंतर, फ्रेजरपुरा पोलिसांनी न्यायालयात एक लेखी विनंती सादर करून, त्यांचे चेहरे झाकून त्यांना न्यायालयात हजर करण्याची परवानगी मागितली. न्यायालयाने ही विनंती स्वीकारली आणि एक पाऊल पुढे टाकत असेही सांगितले की, हजर केले जात असतानासुद्धा आरोपींचे चेहरे उघड करू नयेत, जेणेकरून चौकशी पूर्ण होईपर्यंत त्यांची ओळख उघड होणार नाही. अशाप्रकारे, न्यायालयाने या प्रकरणात पोलिसांच्या गोपनीयतेला मान्यता दिली.

लवादा गावाजवळील अलई नदी पुलासमोरील घटना

# पिकअप गाडी दरीत कोसळून दोन मजुरांचा मृत्यू; सहा गंभीर

अजिंक्य भारत |भारत वरठे



**धरणी, दि.३१ :** परतवाडा रस्त्यावर आणखी एक भीषण अपघात घडला. दोन मजुरांचा जागीच मृत्यू झाला, तर चालकासह इतर सहा जण गंभीर जखमी झाले. लवादा गावाजवळ अलाई नदीच्या पुलाजवळ हा अपघात घडला, जेव्हा मजुरांना घेऊन जाणाऱ्या पिकअप ट्रकवरील नियंत्रण सुटले आणि तो एका खोल खड्ड्यात कोसळला. मृतांची ओळख समय चुनीलाल सावळकर (४०) आणि मालती मिठाराम भिलावेकर (१८), दोघेही लवादा येथील रहिवासी, अशी पटली आहे. एकाच गावातील दोन व्यक्तींच्या मृत्यूमुळे गावावर शोककळा पसरली आहे. पिकअपचा चालक या अपघातात गंभीर जखमी झाला.

त्याला सुरुवातीला धरणी उप-जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, जिथे प्रथमोपचारा नंतर पुढील उपचारांसाठी त्याला अमरावतीला पाठवण्यात आले. इतर जखमींमध्ये सुष्मिता रामचरण जांभेकर (२०), अस्मिता रामेश्वर जांभेकर (१६), ममता राजेश कासदेकर (२६) आणि इतर मजुरांचा समावेश आहे, ज्यांच्यावर धारणी उप-जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, हे मजूर टरबूज आणि खरबूज भरण्यासाठी पिकअप ट्रकमधून शेताकडे जात होते. अलाई नदीच्या पुलाजवळ वाहनाचा तोल गेल्याने ते खड्ड्यात कोसळले. एक महिला आणि एक तरुणी यांचा जागीच मृत्यू झाला. इतर सहा पुरुष आणि महिला मजूर जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच, गावकरी घटनास्थळी धावून आले आणि त्यांनी तात्काळ बचावकार्य सुरू केले. जखमींना रुग्णवाहिकेने बाहेर काढून रुग्णालयात नेण्यात आले.दरम्यान, परिसरातील आमदार केवलराम काळे यांनी जखमींच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी उप-जिल्हा रुग्णालयाला भेट दिली आणि त्यांना सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले.

वारंवार होणाऱ्या रस्ते अपघातांमुळे मेळघाट परिसरात रस्ते सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा गंभीर बनला आहे. हे लक्षात घेतले पाहिजे की, सुमारे महिन्याभरापूर्वी राणी गाव-कांजोली रस्त्यावर एक पिकअप ट्रक खड्ड्यात कोसळल्याने पाच जणांचा मृत्यू झाला होता. भविष्यात असे अपघात टाळण्यासाठी प्रशासनाने डोंगराळ आणि धोकादायक रस्त्यांवर योग्य सुरक्षा उपाययोजना सुनिश्चित कराव्यात, अशी मागणी स्थानिकांनी केली आहे.

## रेतीची चोरटी वाहतूक करणाऱ्यावर कारवाई



अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**धामणगाव रेल्वे, दि.३१ :** मौजा नारगावंडी येथे समृद्धी महामार्ग पुलाच्या खाली तहसीलदार धामणगाव रेल्वे मा , अभय घोरपडे यांच्या गौण खनिज पथकाच्या कारवाईमध्ये गौण खनिज वाहतूक करताना 16 चाकी ट्रक क्रमांकरू॥ 49ज्ञ 9777, आढळून आला सदर ट्रक थांबविला असता ट्रक चालक सचिन नांदेकर रा,कवठा ता, देवळी, जिल्हा वर्धा यास अवैध रेती वाहतुकीचा परवाना विचारला असता त्यांच्याकडे कुठलाही परवाना आढळून आला नाही सदर ट्रक हा फिरोज खान राहणार वर्धा यांच्या मालकीचा असून सदर ट्रक मध्ये अंदाजे 12, ब्रॉस रेती अवैद्य रित्या उत्खनन करून विनापरवाना सदर रेती ही धामणगाव रेल्वे येथे घेऊन जात असल्याचे ट्रक चालक यांनी सांगितले ट्रक व रेतीचा पंचसमक्ष पंचनामा करण्यात आलेला असून दंडात्मक कारवाई करिता ट्रक तहसील कार्यालय येथे जमा करण्यात आलेला आहे सदर गौण खनिज पथकाच्या कारवाईमध्ये तहसीलदार धामणगाव रेल्वे अभय घोरपडे , तसेच ग्राम महसूल अधिकारी गोपाल नागरिकर , दिनेश ठाकरे, अनिल धुळे, व विनोद जायभाये हजर होते.

## थोडक्यात

### दारूच्या नशेत मुलाला आपटले

अमरावती : दारुच्या नशेत वडिलांनी मुलाला पलंगावर आपटले. त्यात तो बेशुद्ध झाला. त्याला पत्नी उपचारार्थ दवाखान्यात नेत असताना पतीने मज्जाव केला. पतीच्या या कृतीने त्रस्त पत्नीने गाडगेनगर पालीस ठाण्यात तक्रार दिली. ही घटना स्वावलंबी नगर, कठोरा नाका येथे घडली.

### जामगावातून बकऱ्या लंपास

वरुड : जामगावे येथे अज्ञाताने बांधून ठेवलेल्या ८ बकऱ्यांपैकी एक पिल्लू, पाच बकऱ्या व एक बोकड चोरून नेला. त्यांची अंदाजे किंमत २८ हजार आहे. याबाबत पशुपाल सुरेश सुदाम डोंगरे (५३) यांनी शेंदूरजनाघाट पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी अज्ञात बकरी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### वसतीगृह पाहणीच्या नावावर काढले फोटो

अमरावती : वसतीगृहाची पाहणी करण्याच्या नावावर चौघांनी तेथील विद्यार्थिनींचे जबरदस्तीने फोटो काढले. त्यांना प्राचार्यांनी असे करण्यास मनाई केली असता, त्यांनी वाद घालत धमकी दिली. ही घटना नवसारी परिसरातील एका वसतीगृहात घडली. प्राचार्यांच्या तक्रारीवरून गाडगे नगर पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हे दाखल केलेत.

### टिप्परच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

अमरावती : येथील एमआयडीसीमध्ये नोकरी करणारे गजानन पिंगळे (५८) हे २८ मार्च रोजी सायंकाळी साडे सहाच्या सुमारास दुचाकीने (एमएच २७-एएन ६५१५) ड्युटीवर जात होते. त्याच वेळी समोरून भरधाव टिप्पर (एमएच ३४-बीझेड २२२३) आला. त्याने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. त्यात डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. ही घटना नवीन बायपास मार्गावर घडली. याबाबत मृतकाचा मुलगा कार्तिक गजानन पिंगळे (२९, रा. चंदननगर, जुनी वस्ती, बडनेरा) यांच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी टिप्पर चालक लक्ष्मण किशोरी भगत (३४, रा. कन्हान, जि. नागपूर) याच्यावर गुन्हा नोंदवला.

### वाहतूकीस अडथळा केल्याने कारवाई

अमरावती : ताब्यातील वाहन, लोडिंग ऑटो, खाद्य पदार्थांची हातगाडी रस्त्याच्या मधोमध उभी करीत रहदारीला अडथळा निर्माण केला. अशा एकूण चौघांवर खोलापुरी गेट पोलिसांनी गुन्हे नोंदवलेत. या कारवाई सराफा रोड, शनि मंदिर मार्ग व हैदरपुरा येथे केल्यात. या संदर्भात जाकीर शाह अब्बास शाह (५५), कलीम खान भुरे खान (३५), प्रथमेश मनीष हिवसे (२६) व जितेंद्र राधेश्याम श्रीवास्तव (४८) यांच्यावर गुन्हे दाखल केलेत.

### पोलीसांची जुगार अड्डयावर धाड

अमरावती : बडनेरा पोलिसांनी जुगारावर कारवाई करीत ७८० रुपयांचे साहित्य जप्त केले. या संदर्भात युसूफ खान युनूस खान (६८) याच्यावर जुगार बंदी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला.

### विलास नगरात दारू अड्डयावर धाड

अमरावती : गाडगे नगर पोलिसांनी विलास नगरात एका अवैध देशी दारू विक्रेत्यावर कारवाई केली. त्याच्या ताब्यातून दीड हजारांची दारू जप्त केली. गाडगे नगर पोलिसांनी या संदर्भात दशरथ दादाराव काळे (४२) याच्यावर गुन्हा नोंदवला.

### पिकअपच्या धडकेत वृद्धाचा मृत्यू

लोणी भरधाव पिकअप वाहनाने दिलेल्या धडकेत दुचाकीवरील वृद्धाचा गंभीर दुखापत झाल्याने मृत्यू झाला, तर दुसरा गंभीर जखमी झाला.

# हमीभावासाठी कृषीमंत्र्यांच्या घरावर धडकणार!

■ ९ ऑगस्टला माजी मंत्री बच्चु कडूंचा एल्गार ■ हजारो शेतकऱ्यांची उपस्थिती राहणार

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**चांदूर बाजार, दि.३१ :** शेतकरी कर्जमाफीच्या लढ्याला नवा आणि सकारात्मक अर्थ देत प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू यांच्या एकदिवसीय लाक्षणिक उपोषणाची सुरुवात आज रक्तदानासारख्या समाजोपयोगी उपक्रमाने करण्यात आली. या उपोषणाच्या निमित्ताने कर्जमाफीच्या आंदोलनात सहभागी झालेल्या शेतकरी व सहकाऱ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. आंदोलनातून उभ्या राहिलेल्या शेतकरी ऐक्याला यावेळी मानाचा मुजरा करण्यात आला.




या कार्यक्रमाला महादेव जानकर, विजय जावंधीया आणि वामनराव चटप यांची प्रमुख उपस्थिती लाभली. आंदोलनाच्या काळातील संघर्षमय आठवणींना उजाळा देत, शेतकरी प्रश्नांवर पुढील लढ्याची दिशा देखील स्पष्ट करण्यात आली. यावेळी कर्जमाफीच्या प्रत्येक आंदोलनात सहभागी असणारे परभणी जिल्ह्यातील दिव्यांग बांधव सूर्यभान मारोती ढगे यांची रक्ततुला करण्यात आली. तसेच आंदोलनांमध्ये सातत्याने कार्यकर्त्यांची सेवा करणारे, थकलेल्या आंदोलकांची काळजी घेणारे संजय गोमकाळे यांची बिजतुला करून सन्मान करण्यात आला. या सन्मान सोहळयामुळे आंदोलनातील निस्वार्थी कार्यकर्त्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. महादेव जानकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, शेतकऱ्यांच्या एकजुटीच्या ताकदीमुळेच सरकारला नमावे लागले. आपण पूर्णपणे विजयी झालो नसून सुमारे ८० टक्के यश मिळाले आहे. लोक जाती-धर्मासाठी एकत्र येतात, मात्र शेतकऱ्यांसाठी एकत्र येणे अधिक गरजेचे आहे. नागपूर आंदोलनावेळी अनेक आरोप-प्रत्यारोप झाले, पण एकही शेतकरी मागे हटला नाही, त्यामुळेच सरकारला निर्णय घ्यावा लागला, असे त्यांनी नमूद केले.विजय जावंधीया यांनी आपल्या भाषणात शेतकरी परिस्थितीवर तीव्र भाष्य केले. आपण अत्यंत कठीण काळातून जात आहोत. दोन लाखांची कर्जमाफी झाली, पण आम्हाला माफी नको, कर्ज फेडण्याची ताकद हवी आहे. ती ताकद शेतमालाला योग्य भाव मिळाल्याशिवाय येणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या आश्वासनांची आठवण करून देत, एमएसपी प्रत्यक्ष बाजारात मिळत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू यांनी ऑगस्ट महिन्यात ९ तारखेला मोठं आंदोलन उभारण्याचा इशारा दिला आहे. आगामी काळात शेतकरी प्रश्नांवर अधिक आक्रमक भूमिका घेत लढा तीव्र केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.यावेळी त्यांनी सांगितले की, आता पुढील लढा थेट केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांना घेरून लढला जाईल. कार्यकर्त्यांसमोर बोलताना त्यांनी आंदोलनाची दिशा स्पष्ट करत, या लढ्यात प्रतीकात्मक स्वरूपात प्रभू श्रीरामांचा धनुष्यबाण आणि छत्रपती शिवाजी महाराज यांची तलवार सोबत घेऊन जाणार असल्याचेही सांगितले.९ तारखेला उभारण्यात येणारा हा लढा शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव मिळवून देण्यासाठी निर्णायक ठरणार असल्याचा विश्वासही बच्चू कडू यांनी व्यक्त केला.

रामराज्याच्या आदर्शांचा उल्लेख करत, दिलेल्या वचनांची पूर्तता होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. वामनराव चटप यांनी सांगितले की, कर्जमाफीसाठी आम्ही रस्त्यावर उतरलो तेव्हा टीका झाली, पण शेतकऱ्यांच्या पाठिंब्यामुळेच हा निर्णय शक्य झाला. या आंदोलनात बच्चू कडू यांचा पुढाकार महत्त्वाचा होता, असे त्यांनी नमूद केले. बच्चू कडू यांनी आपल्या भाषणात सांगितले की, शेतकऱ्यांचे जीवन आणि कष्ट अत्यंत महत्त्वाचे आहेत. अनेक वर्षांपासून सुरू असलेली ही लढाई आजही तितक्याच ताकदीने सुरू आहे. आंदोलनात रक्त सांडले, पण लढा थांबला नाही. समाजाला जाती-धर्मात अडकवले जात असताना शेतकरी म्हणून एकत्र येणे गरजेचे आहे, असे त्यांनी ठामपणे सांगितले.ते पुढे म्हणाले, ही कर्जमाफी हा संघर्षाचा परिणाम आहे. आम्ही गांधीगिरीने लढायचे ठरवले आहे, पण गरज पडल्यास भगतसिंगगिरीनेही पुढे जाऊ. स्वत:चे घर नसले तरी ज्यांचे घर जळाले त्यांचे घर उभारण्याची भावना या लढयात आहे. या संघर्षामुळे दिव्यांग, घरकुल आणि शेतमजूर योजनांमध्येही सकारात्मक बदल झाल्याचे त्यांनी नमूद केले.

## डफरिन व सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये रूग्णांना फळवाटप

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.३१ :** जय जैनम परिषद परिवाराच्या वतीने, डफरिन हॉस्पिटल (सुपर स्पेशालिटी) येथे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांसाठी अल्पोपाहाराचे आयोजन करण्यात आले होते. जय जैनम परिषदेच्या सर्व सदस्यांनी सेवाभावी संत गजानन महाराज संस्थानचे प्रेमकुमार बोकाडिया आणि रावसाहेब सिरसाट यांचा सत्कार केला. त्याचप्रमाणे, अजय मुनोथ, पंकज मुथा आणि पंकज मुनोथ यांनी उत्कृष्ट अल्पोपाहाराची व्यवस्था केली आणि याबद्दल सर्वांनी त्यांचे अभिनंदन करून प्रशंसा केली. त्याचप्रमाणे, एका मुक्या प्राण्याच्या शस्त्रक्रियेसाठी निधी दान करण्याकरिता वासा संस्थानला भेट देण्याचा कार्यक्रम सोमवार, ३० मार्च, २०२६ रोजी



नियोजित होता. तथापि, परिषदेचे एक तरुण, उत्सुक आणि उत्साही सदस्य, राजेश कटारिया यांनी आज रविवार असून सर्वजण उपलब्ध असतील असा प्रस्ताव मांडला. परिषदेच्या प्रत्येक सदस्याने या प्रस्तावाचे कौतुक करून तो स्वीकारला. आज दुपारी ३.३० वाजता एकत्र जमण्याचे ठरले, जेणेकरून आपण बरोबर ४.०० वाजता वासा संस्थानला पोहोचू शकू. आश्वासक सदस्य राजेशजी, धन्यवाद. तुमच्या बुद्धिमत्तेमुळे आणि सतर्कतेमुळे कामाला गती मिळाली.

सर्व सदस्यांनी या कार्यक्रमाचे मुख्य लाभार्थी, हैदराबादचे श्री. सुशीलजी सेठिया यांचे अभिनंदन केले आणि त्यांचे आभार मानले.भगवान महावीर जनकल्याणक यांच्या शुभप्रसंगी, ३१ मार्च रोजी, जय जैनम परिषदेच्या वतीने सकाळी ८ वाजता प्रभात फेरी दरम्यान राजकमल चौकात प्रसादाचे वाटप केले जाईल.

## नि:शुल्क आरोग्य शिबिराचे यशस्वी आयोजन

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.३१ :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या १०० वर्षपूर्तीनिमित्त सेवा, त्याग, समर्पण आणि देशभक्तीच्या भावनेतून आयोजित भव्य मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या शिबिराचा एकूण १६९ नागरिकांनी लाभ घेतला. हे शिबिर कॅन्सर रिलिफ सोसायटी, दीप हॉस्पिटल समोर, बेलपुरा रोड, मरीमाता मंदिराजवळ आयोजित करण्यात आले होते. या ठिकाणी मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहून आपली आरोग्य तपासणी करून घेतली तसेच तज्ञ डॉक्टरांकडून मार्गदर्शन घेतले.शिबिरामध्ये उपस्थित तज्ञ डॉक्टरांनी विविध आजारांची तपासणी करून योग्य उपचार व सल्ला दिला. यामध्ये डॉ. साक्षी जिंतुरकर ( जनरल फिजिशियन),




डॉ. जयनित मालवीय (ऑर्थोपेडिक्स), डॉ. सुभाषचंद्र वासनिक (हेल्थ स्पेशालिस्ट), डॉ. यश पाठक ( नेत्रतज्ज्ञ) तसेच डॉ. पल्लवी कटई यांनी आपली सेवा दिली.या शिबिरात शेकडो रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली व आवश्यकतेनुसार औषधांचे वितरण करण्यात आले. नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक करत आयोजकांचे आभार मानले.हा उपक्रम विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, भारतीय जनता युवा मोर्चा, भारतीय जनता पार्टी आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून देवदत्तजी शर्मा, दिलीपभाई पोपट, बंटी पारवानी, विक्की शर्मा, नावंदर, सुमित कलंत्री, अनिल साहू, गौरव लूणावत, चेतन वाटणकर, संदेश उरखडे, कीर्तिदीप सराफ आणि दिनेश शिंग उपस्थित होते.कार्यक्रमाचे मुख्य आयोजक चंद्रकुमार उर्फ लप्पीभैया जाजोदिया (लप्पीभैया टीम) तसेच प्रोजेक्ट चेअरमन राजन आडतिया आणि डॉ. साक्षी जिंतुरकर यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम पार पडला. यशस्वीतेसाठी सौ. माधुरी काडासर्पे, सौ. सीमा गुर्दे, सौ. वंदना बोबडे, जोरौना सावडे, सूरज वर्मा, हिमांशू अटाले, आकाश पाटील, संतोष पुंडेकर, विशाल राऊत, रोशन गुप्ता, उत्कर्ष लांडे, प्रथमेश आडऊ आणि अंजली दाभाडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.शेवटी आयोजकांनी सर्व डॉक्टर, सहकारी आणि उपस्थित नागरिकांचे आभार मानत भविष्यातही अशा समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्याचा संकल्प व्यक्त केला.

शिबिरादरम्यान एक गंभीर जखमी रुग्ण आपत्कालीन स्थितीत आणण्यात आला. त्याच्या डोक्याला खोल जखम होऊन मोठ्या प्रमाणात रक्तस्राव होत होता. उपस्थित डॉक्टरांनी तत्काळ प्राथमिक उपचार करून जखमेची स्वच्छता केली, डोक्यावर टाके घातले आणि आवश्यक औषधे दिली.

## पापळ येथे संगीतमय श्रीमद् भागवत सप्ताह प्रारंभ

**पापळ, दि.३१ :** डॉक्टर पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या जन्म गावी पुरातन प्रसिद्ध असलेले स्वयंभू भवानी माता संस्थान पापळ येथे गेल्या पाच-सहा दिवसापासून चैत्र नवरात्र महोत्सव महापर्वावर सात दिवसीय संगीतमय श्रीमद् भागवत कथा व भक्तिमय कार्यक्रम मोठ्या उत्साहात चालू असून श्रीमद् भागवत कथा वाचक भागवताचार्य परम श्रद्धेय हभप श्री पंकज कृष्णाजी महाराज श्रीधाम वृंदावन पुसणेर यांच्या अमृततुल्य वाणीतून दररोज रात्री साडे सात ते दहा या दरम्यान कथा सांगितली जात असून



भाविक भक्तिरसात तल्लीन झाले आहे. याच कार्यक्रमाच्या अनुषंगाने दिनांक २ एप्रिल ला रात्री आठ वाजता पापळ नगरी मधून भव्य दिंड्या पताका सह ग्रंथाची मिरवणूक निघणार आहे तसेच शुक्रवार दिनांक ३ एप्रिलला सकाळी दहा ते बारा या वेळेत हभप पंकजकृष्ण महाराज काजे यांचे काल्याचे किर्तन आयोजित केले आहे. व सायंकाळी सात वाजता भवानी मातेची गाडे ओढण्याचा कार्यक्रम भक्त श्री पंढरीनाथ चौधरी यांच्या हस्ते होणार आहे तर रात्री आठ वाजता भव्य महाप्रसाद आयोजित केला.

## आदिलाबादला कराटे 'ब्लॅक व कलर बेल्ट' परीक्षा

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**धामणगाव रेल्वे, दि.३१ :** आदिलाबाद व महाराष्ट्र धामणगाव स्थानिक तालुक्यात कराटे संस्कृती रुजवून तरुणांमध्ये आत्मरक्षण व नवीन ऊर्जा निर्माण करण्यासाठी मास्टर मुकेश कुमार सर, आकाश पवार सर, मास्टर रामू सर, मास्टर राहुल सर व मास्टर सचिन मुन सह कराटे प्रशिक्षक सुद्धा प्रयत्न करीत आहेत. बोधी बुडोकान कराटे इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने.२९ मार्च २०२६ रोजी आदिलाबाद येते सकाळी ८ वाजता पासून




ब्लॅक बेल्ट व कलर बेल्ट २७५ विदयार्थी या मध्ये कलर बेल्ट २४० मुले व मुली व ब्लॅक बेल्ट मध्ये ३५ मुले व मुली या कराटे परीक्षामध्ये उत्तीर्ण झाले परीक्षा आदिलाबाद येते आयोजित करण्यात आली. या परीक्षेसाठी मुख्य परीक्षक मुकेश कुमार कांबळे ब्लॅक बेल्ट आठ दान सह आकाश पवार ब्लॅक बेल्ट पाच दान, मास्टर रामू, मास्टर राहुल सर व व महाराष्ट्रचे मास्टर सचिन मून हे सुद्धा परीक्षक म्हणून उपस्थित होते. तब्बल ४ ते ५ तास चाललेल्या या परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांनी आपले कराटे कला व प्रात्यक्षिक सादरीकरण केले. व त्या मध्ये महाराष्ट्र धामणगाव रेल्वे तील सम्यक दहाट , सोनाली गुप्ता, यांना ब्लॅक बेल्ट २ दान व परी लांबट,आराध्या देऊळकर, स्वरा डुबे, निर्मिती सयाम, निधी राऊत, रुकीया बोहरा यांना ब्लॅक बेल्ट परीक्षा उत्तीर्ण केली व कलर बेल्ट मध्ये येलो बेल्ट साहिल तिरमारे, ऑरेंज बेल्ट कनक राठी, नंदिनी भेंडे, अंश समर्थ, श्री हरी कडू, ग्रीन बेल्ट वीर गजबी, ब्लु ब्लेट पृथ्वीका ढबाले, व प्राची सूर्यदय, हिला परल बेल्ट देण्यात आले ,व सर्व विद्यार्थी आपले श्रेय बोधी बुडोकान कराटे महाराष्ट्र चीफ भंते धम्मसार व मास्टर्स व आई-वडील यांना दिले.

गुणगौरव

## विद्यार्थ्यांनी शाळेचे व शिक्षकांचे नाव उंचाविले

# निमखेड बाजार जि.प.शाळेतील आठ विद्यार्थ्यांची नवोदयसाठी निवड

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी, दि.३१ :** जिल्हा परिषद शाळा, निमखेड बाजार येथील विद्यार्थ्यांनी यंदाच्या नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शाळेचा लौकिक उंचावला आहे. या परीक्षेत शाळेतील विद्यार्थी प्रेम राहुल गवईवर्ग ५ वा याची नवोदय विद्यालयासाठी निवड झाली असून, तो तालुक्यातून पहिल्या यादीत निवड झालेला जिल्हा परिषद शाळेचा एकमेव विद्यार्थी आहे. त्याला ८७.५० टक्के असे गुण मिळाले असुन तो जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत २५ व्या क्रमांकावर आहे.

याच शाळेतील श्रद्धा गजानन गवई, रिया विकास शिंदे, उन्नती अनिल उकळकार, अंश धर्मेश गवई, शाश्वत नरेंद्र मेश्राम, परिदी सुनील मेश्राम, तन्मय अनिल मेश्राम,प्रणव चेतन गंद्रे हे ८ विद्यार्थी चांगले गुण मिळवत गुणवत्ता यादीत स्थान मिळविण्यात यशस्वी ठरले आहेत. तर



आरुष अजय गवई व पुनम विजय गजभिये यांना सुद्धा चांगले गुण मिळाले आहेत. त्यांच्या वर्गशिक्षिका वैशाली सरोदे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करत विशेष सराव सत्रे घेतली होती.विशेष सराव पेपर सोडवून घेतले त्यांच्या मेहनतीचेच हे फळ आहे.पालकांनीही मुलांना प्रोत्साहन देत अभ्यासासाठी अनुकूल वातावरण निर्माण केले. या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांचे हे यश असल्याची भावना मुख्याध्यापकांनी व्यक्त केली. या यशामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, विद्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे. अत्यंत गरीब कुटुंबातील या विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, नियमित अभ्यास आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाच्या बळावर हे यश मिळवले आहे.

प्रेम राहुल गवईच्या निवडीबरोबरच गुणवत्ता यादीत स्थान मिळवणाऱ्या ८ विद्यार्थ्यांचेही विशेष कौतुक करण्यात येत आहे. या यशामुळे इतर विद्यार्थ्यांना देखील प्रेरणा मिळणार असून, ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळाही गुणवत्तेच्या बाबतीत कुठेही कमी नसल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

जिल्हा परिषद शाळा निमखेड बाजार ही एक गुणवत्तापुर्ण शाळा असुन याआधी सुद्धा सन्माननीय सीईओ मॅडम यांच्या उपक्रमांतर्गत कु.श्रद्धा गजानन गवई वर्ग 5वा हिची बेंगलोर कर्नाटक येथे विमानवारीसाठी जिल्ह्यातुन निवड झाली आहे.शाळेच्या या यशाबद्दल पं समितीच्या गटविकास अधिकारी कल्पना जायभाये मॅडम, गटशिक्षणाधिकारी शिला आठवले मॅडम, केंद्रप्रमुख प्रमोद दखणे सर,शाळेच्या मुख्याध्यापिका माला देशमुख मॅडम , शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष धर्मेश गवई उपाध्यक्ष वनितातांई मेश्राम व सर्व सदस्य शा. व्य. समिती शाळेतील शिक्षक वृंद गणेश टिपरे सर,वंदना घाटोळ मॅडम, नम्रता लाडोळे मॅडम, ज्योत्स्ना नवलकर मॅडम, ग्रामस्थ, पालक व शिक्षणप्रेमींनी आनंद व्यक्त करत विद्यार्थ्यांचे व वर्गशिक्षिका वैशाली सरोदे मॅडम यांचे अभिनंदन व भरभरुन कौतुक केले आहे.

## शंकर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची प्लॅस्टिक निर्मूलन नाटिका



अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**तळवेल, दि.३१ :** गांधीतीर्थ स्वच्छ शाळा स्पर्धेअंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन शंकर विद्यालय येथे करण्यात येत आहे.यामध्ये विविध तीस उपक्रम आयोजित केले जात आहेत.यामध्यें नुकतीच प्लॅस्टिक चा वापर कमीत कमी व्हावा या दृष्टीने जागृती पर नाटिका नुकतीच शंकर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शंकर विद्यालय येथे तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तळवेल येथे सादर केली.

यामध्ये एक महिला प्लॅस्टिक ची पिशवी घेऊन बाजार करायला नकार देते व मग ती प्लॅस्टिक चे तोटे सांगते असा प्रसंग त्यात आहे.त्यातून प्लॅस्टिक चा कमीत कमी वापर करावा व पर्यावरण रक्षण करावे असा संदेश दिला जातो. या नाटीकेच्या सादरीकरनात वर्ग सहावीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. याला जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे सहकार्य मिळाले. यावेळी शंकर विद्यालयाच्या प्रभारी मुख्याध्यापिका सुचिता फुटाणे, स्पर्धा समन्वयक डॉ तुषार देशमुख व अन्य शिक्षक, कर्मचारी,विद्यार्थी व गावकरी ग्रामपंचायत कार्यालय यांच्या सहकार्याने हे उपक्रम राबविले जात आहेत.

## थोडक्यात



### महाद्वीप परीक्षेत यश मिळवून विद्यार्थिनींनी अनुभवली विमानवारी

**उमरखेड :** तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या श्रेया प्रशांत कदम आणि दिव्या दीपक नरवाडे या विद्यार्थिनींनी महाद्वीप परीक्षेत यश मिळवून विमानवारीचे स्वप्न पूर्ण केले. या यशाबद्दल शाळेच्यावतीने आणि संपूर्ण गावकऱ्यांनी ढोल-ताशांच्या गजरात त्यांची ट्रॅक्टरवरून भव्य मिरवणूक काढून जंगी सत्कार केला. या ऐतिहासिक विजयामुळे शाळेच्या आणि गावाच्या नावलौकीकात मोठी भर पडली आहे. मिरवणुकीमध्ये इयत्ता पहिली ते आठवीचे विद्यार्थी आणि गावातील शिक्षणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. संपूर्ण गावात ठिकठिकाणी ग्रामस्थांनी या दोन्ही गुणवंत विद्यार्थिनींचे जंगी स्वागत केले. या विद्यार्थिनींच्या यशात मोलाचा वाटा असलेले शाळेचे मुख्याध्यापक कदम, विणकरे, कवडे, शिंदे, तांदळे, टिपराळे, रोळे आणि चिकने या सर्व शिक्षकांचाही गावातील प्रतिष्ठित नागरिकांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला रामेश्वर पाटील कदम, त्र्यंबक पाटील थोटे, बाबाराव पाटील, विनोद कदम, दिगांबर थोटे, नामदेव थोटे, संदीप विणकरे यांच्यासह शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य आणि ग्रामस्थ उपस्थित होते. सध्याच्या काळात पालक खाजगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे वळत असताना, जिल्हा परिषद शाळेने गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या जोरावर खाजगी शाळांना मागे टाकले आहे. केवळ जिद्द आणि शिक्षकांच्या धडपडीमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी स्पर्धा परीक्षेत चमकत आहेत. मुख्याध्यापक आणि शिक्षक सातत्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करत असल्याने या शाळेचा नावलौकीक सर्वदूर पसरला आहे. महाद्वीप परीक्षेतील या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळाली असून, सरकारी शाळेतील शिक्षणाचा दर्जा सिद्ध झाला आहे. या उपक्रमातून शिक्षणाचे महत्व अधोरेखित करत गावकऱ्यांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. श्रेया आणि दिव्या यांच्या या विमानवारीच्या अनुभवामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, पालकांचा कल आता पुन्हा जिल्हा परिषद शाळेकडे वाढताना दिसत आहे.



### अमोलकचंद महाविद्यालयात संशोधन कार्यशाळा संपन्न

**यवतमाळ :** येथील अमोलकचंद महाविद्यालयात अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्यावतीने बुधवारी (दि. २५) वसंतराव नाईक सभागृहात 'संशोधन पद्धती' विषयावर एकदिवसीय कार्यशाळा पार पडली. प्राचार्य डॉ. प्रवीण जोशी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या उपक्रमात उच्च शिक्षणातील संशोधनाचे महत्व आणि कौशल्ये विकसित करण्याच्या उद्देशाने ५५० विद्यार्थी व ५० प्राध्यापकांनी सहभाग नोंदविला. कार्यशाळेत भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. कैलास नेमाडे यांनी डेटा संकलन, सॅम्पलिंग तंत्रे व विश्लेषण पद्धतीवर मार्गदर्शन केले. इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. कविता तातेड यांनी संशोधन नैतिकता, प्लॅजिअरिझम आणि संदर्भ लेखनावर सखोल माहिती दिली. प्राचार्य डॉ. प्रवीण जोशी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात संशोधनामुळे शैक्षणिक प्रगतीसह समाजविकास आणि धोरणनिर्मितीला चालना मिळते, असे प्रतिपादन केले. या बहुविषयक कार्यशाळेत विज्ञान, सामाजिक शास्त्रे व मानविकी शाखांतील विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेत आपल्या शंकांचे निरसन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रिया तुमराम यांनी केले, तर आभार डॉ. प्रवीण जाधव यांनी मानले. यशस्वी आयोजनासाठी डॉ. पी. एन. मुस्कावार, डॉ. बी. एस. पाहुणे, प्रा. वाय. व्ही. वानखेडे, प्रा. डी. एस. चव्हाण, प्रा. डी. एस. धारणे आणि प्रा. डॉ. कावलकर यांनी परिश्रम घेतले. या उपक्रमामुळे सहभागींना भविष्यातील संशोधन कार्यासाठी मोठी प्रेरणा मिळाली असून तांत्रिक ज्ञानाची महत्त्वाची देवाणघेवाण झाली आहे.

### शिवमहापुराण कथेसाठी बसफेरी सुरू

**घाटंजी :** आर्णी येथे आयोजित शिवमहापुराण कथेसाठी भाविकांची गर्दी लक्षात घेता, ३० मार्च २०२६ ते ५ एप्रिल २०२६ या कालावधीत घाटंजी ते आर्णी मार्गावर विशेष बसफेरी सुरू करण्यात आली आहे. प्रवाशांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी प्रशासनाकडे केलेल्या मागणीनंतर ही मुदतवाढ आणि नवीन बस सेवा तातडीने मंजूर करण्यात आली. घाटंजी आणि आर्णी विधानसभा क्षेत्र एकत्रित असताना या मार्गावर बस सेवेचा अभाव होता. सध्या आर्णी येथे महाशिवपुराण कथेचे आयोजन असल्याने भाविकांची संख्या मोठी आहे. घाटंजीतील जनतेला आर्णीला जाण्यासाठी यवतमाळमार्गे लांबचा प्रवास करावा लागत होता, तसेच उपलब्ध बस फेऱ्या अपुऱ्या पडत होत्या. भाविकांचे हाल होऊ नयेत म्हणून विविध मार्गांवर बस सुरू करण्याची आग्रही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली होती. प्रशासनाने यावर सकारात्मक निर्णय घेत प्रवाशांच्या सोयीसाठी एक आठवड्याकरीता ही विशेष बस सेवा उपलब्ध करून दिली आहे. यामुळे भाविकांना थेट आणि स्वस्त प्रवासाचा पर्याय उपलब्ध झाला असून प्रवाशांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. तालुक्यातील इतर मार्गांवरही अशाच प्रकारे फेऱ्या वाढवण्याची मागणी नागरिकांकडून सातत्याने केली जात आहे.


# 'लाडकी बहीण' आता पेटविणार चूल !

## जागतिक युद्धाचा धूर थेट स्वयंपाकघरात; गृहिणींचे बजेट कोलमडले; गॅससाठी १५-२० दिवसांची प्रतीक्षा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ संजीव भीतकर

**यवतमाळ, दि. ३१ : अमेरिका आणि इस्त्रायलमधील युद्धाच्या ठिणगीने आता थेट महाराष्ट्रातील गरिबांच्या घरी चुली पेटवल्या जात आहेत. जागतिक स्तरावरील या संघर्षामुळे गॅस सिलिंडरचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला असून, गृहिणींचे आर्थिक नियोजन पूर्णपणे कोलमडले आहे. आज गॅस नोंदणी केली तर तो मिळण्यासाठी किमान १५ ते २० दिवस वाट पाहावी लागत असल्याने, महिलांना पुन्हा एकदा 'चुलीकडे'वळावे लागत आहे. महागाईच्या या धुराने सणासुदीचा आणि रोजच्या जेवणाचा आनंद हिरावून घेतला असून, लाडक्या बहिणींच्या डोळ्यांत पाणी आले आहे.**



गेल्या काही आठवड्यांपासून जागतिक राजकारणात युद्धजन्य परिस्थिती आहे. मात्र, 'सातासमुद्रापार लागलेली आग' आता इथल्या स्वयंपाकघरात शिरली आहे. गॅस सिलिंडरच्या दराने अशी काही उसळी मारली आहे की, सामान्य कुटुंबांना गॅस शेगडी वापरणे कठीण झाले आहे. 'स्मार्ट किचन'ची स्वप्नें पाहणाऱ्या महिलांना आता पुन्हा एकदा 'चूल आणि मूल' या जुन्या संस्कृतीकडे परतावे लागत आहे. ज्या हातांनी कालपर्यंत गॅसचे नॉब फिरवले, ते हात आता जंगलात सरपण आणि गोवऱ्या गोळा करण्यासाठी सरसावले आहेत. 'आगीतून फुफाट्यात'पडल्यासारखी परिस्थिती सध्या ग्रामीण भागातील बहिणींची झालेली आहे. अमेरिका-इस्त्रायल संघर्षामुळे तेल आणि गॅस पुरवठा साखळी विस्कळित झाली आहे.

नोंदणी केल्यानंतर १५ ते २० दिवसांनी सिलिंडर घरपोच मिळत आहे. आंतरराष्ट्रीय घडामोडींमुळे घरगुती गॅसचे दर आवाक्याबाहेर गेले आहेत. मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी असल्याने गॅस एजन्सीबाहेर रांगा लागल्या आहेत. देशाला धूरमुक्त करण्याचा संकल्प एकीकडे केला जात असताना, प्रत्यक्ष परिस्थिती मात्र 'उलटी गंगा' वाहताना दिसत आहे. गॅसचा निळा प्रकाश दिसेनासा झाला असून, घराघरांतून लाकडाच्या धुराचे लोट बाहेर पडत आहेत. 'आम्हाला वाटलं होतं प्रगती होईल, पण गॅससाठी नंबर लावल्यावरही २० दिवस वाट पाहावी लागते, हे कसले डिजिटल इंडिया?' असा संतप्त सवाल गृहिणी विचारत आहेत. बाभळीच्या फांद्या शोधण्यासाठी बहिणींची सुरू असलेली धावपळ ही व्यवस्थेवर पडलेली मोठी चपराक आहे. थोडक्यात सांगायचे तर, आंतरराष्ट्रीय स्तरावरील युद्धाच्या ठिणग्यांनी महाराष्ट्रातील चुलीवरचा तवा तापण्याऐवजी, महागाईने गरिबांच्या पोटाला 'चिमटा' काढला आहे. गॅसचा पुरवठा कधी सुरळीत होईल, याकडेच आता सर्वांचे डोळे लागले आहेत.

### 'लाडकी बहीण' आणि चुलीचा धूर

**राज्य सरकारने महिलांच्या मदतीसाठी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना सुरू केली. बहिणींच्या खात्यात पैसे तर जमा होत आहेत, मात्र दुसरीकडे महागाईने या आनंदावर 'विरजण घातले' आहे. 'भावाने दिलेले पैसे गॅस एजन्सीला देण्यातच संपून जात आहेत,' अशी चर्चा सध्या गावगाड्यात रंगत आहे. गॅस संपल्यानंतर तो पुन्हा भरून घेण्याची ताकद सामान्यांमध्ये उरली नसल्याने, गॅस सिलिंडर आता केवळ घराच्या कोपऱ्यात शोभेची वस्तू बनत चालला आहे.**

# बाल उपवासधारकांचा गौरव सोहळा

## जिया मेमोरियल ट्रस्टचा उपक्रम, धार्मिक संस्कारांची जोपासना प्रभावी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**फुलसावंगी, दि. ३१ :** येथील जामा मस्जिदमध्ये रमजान महिना संपल्यानंतर जिया मेमोरियल ट्रस्टच्यावतीने १३ वर्षांखालील ४३ चिमुकल्या उपवासधारकांचा सत्कार करण्यात आला. लहान वयात धार्मिक शिस्त आणि आत्मसंयम जोपासणाऱ्या या बालकांचा उत्साह वाढवण्यासाठी ट्रस्टने मागील तीन वर्षांपासून हा प्रेरणादायी उपक्रम सातत्याने राबवून त्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविले आहे.

मुस्लिम समाजातील पवित्र रमजान महिन्यात नियमित रोजे पूर्ण करणाऱ्या बालकांसाठी या विशेष गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. रोजा हा इस्लाममधील महत्वाचा स्तंभ असून, प्रौढांसाठी अनिवार्य असतानाही लहान मुलांनी स्वेच्छेणे हे कठीण व्रत पूर्ण केले. त्यांच्या या जिद्दीचे कौतुक करण्यासाठी जिया मेमोरियल ट्रस्टने पुढाकार घेतला. यंदा एकूण ४३ बालकांनी महिनाभर रोजे पाळून उल्लेखनीय उदाहरण सादर केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ नागरिक शमिमोदिन नवाब यांनी भूषविले. यावेळी उपस्थित पालकांनी आणि स्थानिक नागरिकांनी मुलांच्या धार्मिक व नैतिक मूल्यांच्या जपणुकीबद्दल आनंद व्यक्त केला. कार्यक्रमाचे संपूर्ण सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन जिया मेमोरियल ट्रस्टचे अध्यक्ष मौलाना मुसद्दीक यांनी केले. या अभिनव उपक्रमामुळे चिमुकल्यांमध्ये सामाजिक आणि धार्मिक संस्कारांची अधिक चांगल्या प्रकारे रुजवण होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# शिवशंभो गर्जना कार्यक्रम उत्साहात

## यवतमाळ महोत्सवात सांस्कृतिक रंग, नागरिक मंत्रमुग्ध

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ,दि. ३१ :** यवतमाळ महोत्सवांतर्गत वाघापूर येथील कृषी विज्ञान केंद्र मैदानावर प्रसिद्ध कलाकार अभिजित आणि अमू जाधव यांचा 'शिवशंभो गर्जना' हा गीतगायनाचा कार्यक्रम पार पडला. नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शनी उईके आणि जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या या सोहळ्यात संत व राष्ट्रपुरुषांच्या जयघोषाने वातावरण भक्तिमय झाले.



या सांस्कृतिक कार्यक्रमात शिव-गणेश आराधना आणि देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण करण्यात आले. 'दैवत छत्रपती' व 'स्वराज्याचं धनी' या गीतांतून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या इतिहासाला उजाळा दिला. शिवशंकर डमरू वादन, विठ्ठल भक्तीगीत, स्वामी समर्थ आणि संत गजानन महाराज यांच्या गीतांना संभळ व दिमडी या पारंपरिक वाद्यांची साथ लाभली. व्यासपीठावर निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे, माविम जिल्हा समन्वयक अधिकारी सुनील सोसे, तहसीलदार डॉ. योगेश देशमुख आणि मुख्याधिकारी शुभम क्यातमवार उपस्थित होते. कुणाल गायकवाड व गणेश यांनी सूत्रसंचालन केले.

# वणी-बैलमपूर येथे मुक्कामी बस सेवा सुरू करा

## प्रवाशांची वणी आगाराकडे मागणी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**झरी, दि. ३१ :** तालुक्यातील बैलमपूर येथील नागरिकांनी वणी-बैलमपूर मुक्कामी बस सेवा पुन्हा सुरू करण्याची मागणी वणी आगाराकडे केली आहे. कोरोना काळात बंद झालेली ही सायंकाळची बस फेरी अद्याप पूर्ववत न झाल्याने मुकुटबन, पिंपरड आणि बैलमपूर मार्गावरील शालेय विद्यार्थी तसेच नोकरीनिमित्त प्रवास करणाऱ्या प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे.

वणी आगाराची ही बस सेवा सायंकाळी ५ वाजता वणी येथून सुटायची. वणी, मुकुटबन, पिंपरड मार्गे बैलमपूर मुक्कामी जाणारी ही बस प्रवाशांसाठी मोठा दिलासा होती. सकाळी ही बस पुन्हा बैलमपूरवरून निघून मुकुटबन मार्गे वणीला पोहोचत असे. यामुळे शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना वेळेवर पोहोचणे सोपे जायचे. तसेच वणी आणि चंद्रपूर येथे कामासाठी जाणाऱ्या नागरिकांसाठी ही मुक्कामी बस अत्यंत महत्वाची ठरत होती. मात्र, कोरोना संकटकाळात प्रशासनाने ही बस फेरी बंद केली, ती अद्याप सुरू करण्यात आलेली नाही. सध्या या भागातील नागरिकांना खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागत असून आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. त्यामुळे पिंपरड आणि बैलमपूर परिसरातील ग्रामस्थांनी ही बस सेवा तातडीने पूर्ववत करण्याची आग्रही मागणी केली आहे.

# यवतमाळ महोत्सवात उमेदची 'समृद्धी मिनी सरस प्रदर्शनी'

## जिल्हाधिकारी विकास मीना यांची भेट, महिला स्वयं-सहाय्यता गटांचे १२० स्टॉल्स

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ३१ :** महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अर्थात उमेदमार्फत या वर्षीची 'समृद्धी मिनी सरस प्रदर्शनी' ही यवतमाळ महोत्सवात भरविण्यात आली आहे. या प्रदर्शनीमध्ये महिला स्वयं-सहाय्यता गट, उत्पादक गट, शेतकरी उत्पादक कंपन्या, तसेच स्वेप आणि आरसेटीअंतर्गत घडलेल्या उद्योजकांचे तब्बल १२० स्टॉल्स उभारण्यात आले असून या स्टॉल्सना जिल्हाधिकारी विकास मीना यांनी भेट देवून पाहणी केली. तसेच काही गृहोपयोगी वस्तूंची खरेदी आणि खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला.



उमेदची ही 'समृद्धी मिनी सरस प्रदर्शनी' अधिक व्यापक, भव्य आणि समन्वयात्मक स्वरूपात उभी राहिली आहे. उमेद अभियानाच्या प्रभावी मार्गदर्शनाखाली विविध उपक्रमाअंतर्गत घडलेले उद्योजक हे सर्व एकाच व्यासपीठावर एकत्र आले आहेत. मागील वर्षी याच मिनी सरस प्रदर्शनीत महिला गटांनी तब्बल ५४ लाख रुपयांची उलाढाल केली होती. यंदा त्याहून अधिक विक्री व नवीन बाजारपेठ निर्माण करण्याचे उद्दिष्ट गाठण्याचा विश्वास या प्रदर्शनातील महिलांनी व्यक्त केला आहे. उमेदच्या माध्यमातून 'बचत गट ते उद्योजक' आणि 'गाव ते जागतिक बाजारपेठ' असा प्रवासाचा टप्पा गाठण्यासाठी महिलांना जिल्हा प्रशासन संपूर्ण सहकार्य करणार असून यवतमाळकरांनी देखील या 'समृद्धी मिनी सरस प्रदर्शनी'ला भेट देवून खरेदी करावी व महिलांना प्रोत्साहित करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विकास मीना यांनी केले. यवतमाळ महोत्सवात उमेदमार्फत २७ मार्चपासून भरविण्यात आलेल्या 'समृद्धी मिनी सरस प्रदर्शनी'ला यवतमाळकरांचा प्रतिसाद वाढतांना दिसत आहे. या प्रदर्शनीत विशेषतः महिला गृहिनींचा गृहोपयोगी वस्तू आणि मसाल्यांचे पदार्थ खरेदी करण्याकडे कल वाढत आहे.

# रस्त्यावर चालणे झाले जीवावर बेतणारे

## वाहतुकीचा बोजवारा; पुसदच्या मुख्य चौकांमध्ये अतिक्रमाचे 'साम्राज्य' आणि बेशिस्त वाहनांचा धुमाकूळ!

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**पुसद, दि.३१: पुसद शहरात सध्या वाहतूक व्यवस्थेचा पुरता बोजवारा उडाला असून, रस्त्यांवरील वाढत्या अतिक्रमणामुळे सामान्य नागरिकांना चालणेही कठीण झाले आहे. शहरात 'ज्यावे त्याचे घोडे' अशी अवस्था झाली असून, बेधुंद वेगाने धावणाऱ्या वाहनांमुळे पादचाऱ्यांचा जीव धोक्यात सापडला आहे. नगरपालिका आणि वाहतूक पोलिस विभागाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे पुसदची रस्ते वाहतूक आता मृत्यूचा सापळा बनत चालली आहे.**



शहरातील अनेक व्यावसायिक संकुले (कॉम्प्लेक्स) टाऊन प्लॅनिंगच्या नियमांना हरताळ फासून उभारली गेली आहेत. या इमारतींमध्ये पार्किंगची सोय नसल्याने ग्राहक आपली वाहने रस्त्याच्या मध्यभागी उभी करतात. आधीच अतिक्रमणाने व्यापलेले रस्ते यामुळे अधिकच अरूंद होतात. अशा परिस्थितीत एखादे वाहन समोरून येईल की पाठीमागून धडक देईल, याची शाश्वती राहिलेली नाही. जेव्हा कधी नगरपालिका प्रशासन किंवा वाहतूक पोलिस विभाग कारवाईचा बडगा उचलते, तेव्हा 'कुंपणानेच शेत खावे' या उक्तीप्रमाणे काही राजकीय नेते मध्यस्थी करतात. या राजकीय हस्तक्षेपामुळे प्रशासनाचे हात बांधले जातात आणि सामान्य नागरिक मात्र भरडला जातो. छोटे-मोठे अपघातांचे सत्र दररोज सुरू असून, घरून बाहेर पडलेला माणूस सुखरूप परत येईल की नाही, याची खात्री उरलेली नाही. 'प्रशासनाने आता तरी कुंभकर्णी झोप सोडावी आणि बेधुंद वाहनचालकांच्या मुसक्या आवळाव्या,' अशी मागणी जोर धरत आहे. जोपर्यंत लोकप्रतिनिधी आणि प्रशासन हातात हात घालून कडक पावले उचलत नाही, तोपर्यंत पुसदची ही 'बेधुंदशाही' थांबणार नाही, हे मात्र निश्चित!

### टवाळखोरांचा हैदोस आणि मानसिक छळ

**शहरातील तरुण-तरुणी कोणत्याही वेग मर्यादेचे पालन न करता सुसाट वाहने चालवत आहेत. विशेषतः महिला आणि मुली दिसताच वाहनाचा वेग वाढवून कर्कश हॉर्न वाजविण्याचे प्रकार वाढले आहेत. हा एक प्रकारचा 'मानसिक छळ'असून या टवाळखोर वाहनचालकांना पोलिसांचा कोणताही धाक राहिलेला नाही, अशी संतप्त भावना नागरिक व्यक्त करत आहेत.**

महत्वाचे

### अलकाश्रीजींचे 'संगीतमय सुंदरकांड'



**यवतमाळ :** हनुमान जन्मोत्सवाचे औचित्य साधून शहरातील रामायण प्रेमी भक्तगणांच्या वतीने भव्य 'संगीतमय सुंदरकांड' पठणाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार, दिनांक २ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ४ वाजता पिंपळगाव रोडवरील बालाजी मंगल कार्यालय येथे हा सोहळा संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण 'विदर्भ मीरा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या परमपूज्य संत सुश्री अलकाश्रीजी असणार आहेत. त्यांच्या सुमधुर आणि भक्तीमय वाणीतून सादर होणाऱ्या सुंदरकांड पठणामुळे यवतमाळनगरी भक्तीरसात न्हाऊन निघणार आहे. हनुमान जन्मोत्सवाच्या शुभमुहूर्तावर आयोजित या आध्यात्मिक कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. सर्व सुंदरकांड प्रेमी आणि भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या संगीतमय सोहळ्याचा आनंद द्विगुणित करावा, अशी विनंती समस्त रामायण प्रेमी भक्तगण, यवतमाळ यांच्या वतीने करण्यात आली आहे.

### शेलुडी फाट्यावर गतिरोधक बसवा

**दारव्हा :** यवतमाळ-दारव्हा मार्गावरील शेलुडी बसस्थानक परिसरात गतिरोधक बसवण्याच्या मागणीकडे संबंधित कंत्राटदार कंपनी आणि प्रशासनाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने आदेश देऊनही 'ईगल कन्स्ट्रक्शन' कंपनीकडून होत असलेल्या दिरंगाईमुळे शालेय विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांचा जीव धोक्यात आला आहे. शेलुडी येथील बसस्थानक परिसर ह चौफुलीचा भाग असून, येथून यवतमाळ आणि दारव्हाकडे जाणारी वाहने भरधाव वेगाने धावतात. शेलुडी, गहुलीपेठ, किन्ही वळगी येथील शेकडो विद्यार्थी दररोज शिक्षणासाठी याच मार्गावरून ये-जा करतात. हा मार्ग ओलांडताना विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून रस्ता पार करावा लागतो. या ठिकाणी यापूर्वीही अनेक छोटे-मोठे अपघात झाले असून, भविष्यात मोठा अनर्थ घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे, या रस्त्याची देखभाल दुरुस्ती पुढील १० वर्षांसाठी ईगल कन्स्ट्रक्शन कंपनीकडे आहे. सार्वजनिक बांधकाम उपविभागाने ९ डिसेंबर २०२५ रोजी संबंधित कंपनीला या ठिकाणी तत्काळ गतिरोधक बसवण्याचे लेखी आदेश दिले होते. मात्र, या आदेशाला तीन महिने उलटूनही कंपनीने कोणतीही कार्यवाही केलेली नाही. प्रशासनाच्या या ढिम्म कारभारामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

# जणूकाही 'लेकीच्या लग्नाचा' थाट...

## अभूतपूर्व नियोजन : आर्णीच्या शिवमहापुराण सोहळ्याचे सर्वत्र कौतुक; जणू घरचेच कार्य असल्याची भावना!

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ सचिन शिंदे/मनोज माघाडे

**आर्णी, दि.३१: सिद्धेश्वर नगरी आर्णी येथे आयोजित आंतरराष्ट्रीय कथावाचक पंडित प्रदीप मिश्रा यांच्या 'शिवमहापुराण'कथा महोत्सवाचा गाजावाजा आता संपूर्ण राज्यभर होत आहे. बहिरमदेव शिवमहापुराण सेवा समिती ट्रस्टने केलेले नियोजन इतके सरस आहे की, 'आपल्या स्वतःच्या मुलीच्या लग्नासाठी पाहुण्यांची जशी व्यवस्था केली जाते, तसाच पाहुणचार येथे शिवभक्तांना मिळत आहे,' अशी भावना भाविक व्यक्त करत आहेत.**





राज्याच्या कानाकोपऱ्यातून आणि परराज्यातून आलेल्या भाविकांच्या संख्येत दिवसेंदिवस भर पडत आहे. या अलोट गर्दीला सांभाळताना सेवा समितीचे गोपाळ कोठारी, एन. टी. जाधव, रणजित राठोड, पवन पनपालिया, राजू जयस्वाल, संतोष जयस्वाल, राजेश माहेश्वरी, मामा राठी, नंदू राठी, अनूप कोठारी यांसह असंख्य कार्यकर्ते अहोरात्र कष्ट घेत आहेत. वादळी पावसाचे सावट असतानाही या टीमने ढळू न देता अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने सोहळा सुरू ठेवला आहे.महोत्सवातील काही ठळक वैशिष्ट्ये :

**-सुसज्ज निवास व भोजन :** लाखो भाविकांसाठी दर्जेदार भोजनासह झोपण्यासाठी गादी, पांघरूण आणि प्रशस्त निवासाची सोय.

**-स्वच्छता व आरोग्य :** नगर परिषद कर्मचारी, घंटागाडी आणि सफाई कामगारांच्या माध्यमातून २४ तास परिसर चकाचक.

-पायाभूत सुविधा : भाविकांच्या सोयीसाठी अरुणावती नदीवर दोन तात्पुरते पूल, भव्य पार्किंग आणि मोबाईल शौचालये.

**-सहकार्य :** आर्णी सायकलिंग क्लब, गुडमॉर्निंग ग्रुप, महिला मंडळ आणि ग्रामीण भागातील विविध सेवाभावी संस्थांचे स्वयंसेवक सक्रिय. अग्निशमन दल, रुग्णवाहिका, क्रेन आणि जेसीबी यांसारख्या आपत्कालीन यंत्रणाही सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. भक्तीच्या या महाकुंभात प्रशासकीय आणि सामाजिक यंत्रणेच्या 'हातात हात' घालून केलेल्या कामामुळे आर्णीचे नाव भक्तीच्या नकाशावर ठळकपणे कोरले गेले आहे.

### अनोखा ' आर्णी पॅटर्न'

**या महोत्सवाचे सर्वां मोठे वैशिष्ट म्हणजे सामाजिक एकता. गोपाळ कोठारी यांनी शहरातील सर्व धर्मीय आणि समाजातील घटकांना या कार्यात सहभागी करून घेतले आहे. प्रत्येकावर जबाबदारी सोपवण्यात आल्याने आर्णी शहरात एकात्मतेचे वातावरण निर्माण झाले असून, सर्वत्र या 'आर्णी पॅटर्न'चे कौतुक होत आहे.**

CAPTION पारंपरिक वेशभूषा...



**यवतमाळ : यवतमाळ महोत्सव अंतर्गत 'उमेद' अभियानातील स्वयंसहाय्य बचत गटांच्या महिलांनी बंजारा समाजाच्या पारंपरिक वेशभूषेत साकारलेली आकर्षक सांस्कृतिक झलक.**

### जिल्हाधिकाऱ्यांची कृषी प्रदर्शनीला भेट

**यवतमाळ, दि. ३१ :** येथील कृषी विज्ञान केंद्र मैदानावर आयोजित 'यवतमाळ महोत्सवात' जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयामार्फत कृषी प्रदर्शन भरवण्यात आले आहे. जिल्हाधिकारी विकास मीना यांनी या प्रदर्शनाला भेट देऊन सेंद्रिय शेतीतून उत्पादित वस्तू, बियाणे, शेती अवजारे आणि खाद्यपदार्थांच्या स्टॉल्सची बारकाईने पाहणी केली. याप्रसंगी जिल्हाधिकारी यांच्या हस्ते शेतकऱ्यांना ट्रॅक्टरची प्रतिकात्मक किल्ली प्रदान करण्यात आली. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे व इतर मान्यवरांची यावेळी उपस्थिती होती. जास्तीत जास्त नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट देऊन शेतकऱ्यांना प्रोत्साहित करावे, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.

## शेतपिकांचे व मालमत्तेचे पंचनामे करा

### जिप्हाधिकारी विकास मीना यांचे आदेश; अवकाळीचा फटका

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ३१ : जिल्ह्यात मार्च महिन्यात बहुतांश तालुक्यात अवेळी पाऊस गारपीट व वादळी वाऱ्यामुळे शेतीपिकांचे व मालमत्तेचे (घरांचे) टिनपत्रे उडुन नुकसान झाल्याच्या घटनांची नोंद झालेली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी विकास मीना यांनी तातडीने नुकसानग्रस्त क्षेत्रांचे पंचनामे करण्याचे निर्देश दिले आहेत.**



संबंधित महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच, नुकसान झालेल्या क्षेत्राचे अ, ब, क, ड या निकषांनुसार निधी मागणी प्रस्ताव तयार करून तात्काळ सादर करावे. घरांसारख्या मालमत्तेच्या नुकसानीसाठीही स्वतंत्र पंचनामे करून मदतीचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी विकास मीना यांनी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी व तहसीलदारांना दिले आहेत. प्राथमिक माहितीनुसार दारव्हा तालुक्यांत अवेळी पावसामुळे शेतीपिके नजर अंदाजे ४२ हेक्टर वरील गहु, तीळ, ज्वारी या शेती पिकांचे नुकसान झाले असल्याची व बाभूळगाव तालुक्यात २हेक्टर वरील ज्वारी पिकाचे नुकसान झाल्याची नोंद झाली आहे. तसेच वणी तालुक्यांत वादळी वाऱ्यामुळे एका घराची अंशत; पडझड , पुसद तालुक्यात एका मोठ्या पशुधनाचा मृत्यू आणि वणी तालुक्यात एका घराची पडझड झाल्याची नोंद झाली आहे. या सर्व नुकसानग्रस्त क्षेत्रांचे पंचनामे करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले आहेत.

## कार्यकर्त्यांचे टॉवरवर चढून आमरण उपोषण

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**दिग्रस, दि. ३१ :** ग्रामपंचायतीच्या कारभारातील कथित अनियमितता आणि भ्रष्टाचाराच्या निषेधार्थ ईसापूर येथील सामाजिक कार्यकर्ते शाम मारोती गायकवाड यांनी चक्क बीएसएनएल टॉवरवर चढून आमरण उपोषण सुरू केले आहे. या खळबळजनक आंदोलनामुळे संपूर्ण दिग्रस परिसरात मोठी खळबळ उडाली असून प्रशासकीय यंत्रणेची धावपळ सुरू झाली आहे.

ग्रामपंचायतीच्या कारभारातील भ्रष्टाचार, नमुना ८ मधील विसंगती, दस्तऐवज चोरी प्रकरण आणि गावाचा अधिकृत नकाशा नसणे या मुद्द्यांवर गायकवाड यांनी यापूर्वीच आंदोलनाचा इशारा दिला होता. मात्र, प्रशासनाने



कोणतीही ठोस दखल न घेतल्याने त्यांनी हे आक्रमक पाऊल उचलले. गायकवाड यांनी याआधीही विविध प्रश्नांवर टॉवर आणि झाडावर चढून आंदोलने केली आहेत. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस आणि प्रशासन घटनास्थळी दाखल झाले असून त्यांना खाली उतरवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र, 'मागण्या मान्य होईपर्यंत खाली उतरणार नाही,' असा ठाम पवित्रा गायकवाड यांनी घेतला असून घटनास्थळी तणावपूर्ण

## भगवान महावीर जयंतीचा उत्साह

### शोभायात्रेने वेधले लक्ष; शोभायात्रेमध्ये जैन बांधव मोठ्या संख्येने सहभागी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. ३१ :** शहरात आज भगवान महावीर जयंती अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. या निमित्ताने काढण्यात आलेल्या भव्य शोभायात्रेमध्ये जैन बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. 'त्रिशला नंदन वीर की, जय बोलो महावीर की' अशा जयघोषाने संपूर्ण शहर दुमदुमून गेले होते.



शोभायात्रेची सुरुवात शहरातील मुख्य जैन मंदिरापासून झाली. आकर्षक सजावट केलेल्या रथात भगवान महावीरांची प्रतिमा विराजमान करण्यात आली होती. ही यात्रा जैन मंदिरापासून सुरू होऊन गणपती मंदिर, नाग चौक, बस स्थानक, माहेश्वरी चौक आणि छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे पुढे गेली. त्यानंतर खडकपुरा, तीन देऊळ मार्ग आणि सराफा लाईनवरून मार्गक्रमण करत पुन्हा जैन मंदिरात यात्रेची सांगता झाली. शहरातील प्रमुख चौकांमध्ये ठिकठिकाणी रांगोळ्या काढून आणि पुष्पवृष्टी करून शोभायात्रेचे जंगी स्वागत करण्यात आले. समाजातील आबालवृद्धांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून या सोहळ्यात सहभाग नोंदवला. मार्गावरील ठराविक ठिकाणी भाविकांसाठी अल्पोपहार आणि पाण्याची सोय करण्यात आली होती. शोभायात्रेच्या सांगता प्रसंगी जैन मंदिरात भगवान महावीरांची महाआरती करण्यात आली. यावेळी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यामुळे संपूर्ण उमरखेड शहरात चैतन्यदायी आणि भक्तिमय वातावरणाची अनुभूती भाविकांना आली.

## गणेरीत आंतरराज्य व्हॉलीबॉल स्पर्धेचा थरार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**घाटंजी, दि.३१:** नवयुवक क्रीडा मंडळ, गणेरीच्या वतीने आयोजित एकदिवसीय व्हॉलीबॉल सामने आणि गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे महाराष्ट्रासाह तेलंगणा राज्यातील खेळाडूंनीही यात सहभाग नोंदवून आपल्या क्रीडा कौशल्याने प्रेक्षकांची मने जिंकली.

मान्यवरांच्या हस्ते दिमाखदार उद्घाटन कार्यक्रमाचे उद्घाटन पारवा पोलिस स्टेशनचे ठाणेदार हेमंत चौधरी, विवस्वान संदीप धुर्वे, नितीन नारलवार आणि रुपेश कल्लमवार यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले. यावेळी बोलताना विवस्वान धुर्वे म्हणाले की, 'व्हॉलीबॉल हा केवळ खेळ नसून तो संघभावना आणि संयमाचे प्रतीक आहे.' या स्पर्धेत दोन्ही राज्यांतील नामांकित संघांनी चुरशीचा खेळ सादर केला. गुणवंतांचा गौरव क्रीडा स्पर्धांसोबतच शैक्षणिक वर्ष २०२५ मध्ये विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. दहावी, बारावीसह क्रीडा, सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रात चमकदार कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना गौरवचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेल्याची भावना पालकांनी व्यक्त केली. या सोहळ्याला परिसरातील राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते आणि गणेरी येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. क्रीडा मंडळाच्या या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ मिळाल्याची चर्चा परिसरात होत आहे.

# जामबाजार शाखेतील ५ कोटींचा घोटाळा 'थंड बस्त्यात'

## जिल्हा मध्यवर्ती बँकेतील गैरव्यवहार; राजकीय वरदहस्त लाभलेल्या बड्या माशांना अभय

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ महादेव गावंडे

**पुसद, दि. ३१ : यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पुसद तालुक्यातील जामबाजार शाखेत झालेला पाच कोटींचा अवाढव्य आर्थिक अपहार सध्या 'थंड बस्त्यात' पडला आहे. या प्रकरणाची प्राथमिक चौकशी झाली असली, तरी मुख्य सूत्रधारांना सोडून केवळ कंत्राटी कर्मचाऱ्यांना घरचा रस्ता दाखविण्यात आल्याने, 'चोर सोडून संन्यासाला फाशी' देण्याचा प्रकार प्रशासनाने केल्याची संतप्त चर्चा परिसरात सुरू आहे.**

### जिल्हाधिकाऱ्यांकडून कारवाईची अपेक्षा

**'अंधेरी नगरी आणि चौपट राजा' असा कारभार बँक प्रशासनात सुरू आहे. सामान्य खातेदार मात्र वाऱ्यावर सोडले गेले आहेत. जनतेच्या पैशाला 'चुना'लावणाऱ्या या अधिकाऱ्यांवर आणि त्यांना पाठबळ देणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची गरज आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः या विषयात लक्ष घालून सखोल चौकशीचे आदेश दिल्यास अनेक मोठे मासे जाळ्यात अडकतील. जामबाजार शाखेतील हा ५ कोटींचा आकडा केवळहिमनगाचे टोक असून, सत्य बाहेर आल्यास बँकेच्या प्रतिमेला मोठा तडा जाण्याची भीती व्यक्त होत आहे. सध्या तरी, 'खाई त्याला खवखवे' या म्हणीप्रमाणे दोषींमध्ये अस्वस्थता असली, तरी कारवाईच्या अभावामुळे ते निर्धास्त आहेत. आता प्रशासन खऱ्या दोषींना जेरबंद करणार की नेहमीप्रमाणे कंत्राटी कर्मचाऱ्यांचा बळी देणार, याकडे पुसद तालुक्याचे लक्ष लागले आहे.**

जिल्हा बँकेच्या विविध शाखांमध्ये गेल्या काही काळापासून आर्थिक अपहाराची वाळवी लागली आहे. पुसद मुख्य शाखेत मृत किंवा बंद असलेल्या खात्यांतून दीड लाख रुपये परस्पर लांबवल्याचे सिद्ध झाले. मात्र, तिथेही कायम कर्मचाऱ्यांना केवळ निलंबित करून वेळ मारून नेण्यात आली. जामबाजार शाखेत तर हा आकडा पाच कोटींच्या घरात आहे. येथेही मुख्य दोषी मोकाट असून, त्यांच्यावर 'राजकीय वरदहस्त' असल्याने चौकशीचा केवळ फार्स केला जात आहे. 'आंधळं दळतंय आणि कुत्रं पीठ खातंय' अशी अवस्था सध्या बँकेच्या कारभाराची झाली आहे. सर्वांत संतापजनक बाब म्हणजे, या घोटाळ्याचे धागेदोरे तहसील कार्यालयापर्यंत पोहोचले आहेत. निराधार योजनेच्या निधीमध्येही मोठी अफरातफर झाल्याची चर्चा आहे. तहसीलमधील एका लिपिकाच्या भावाच्या खात्यावर एकाच दिवसात २५ लाख रुपये जमा झाले असून, हा सर्व पैसा गरिबांच्या हक्काच्या निराधाराचा असल्याचे बोलले जात आहे. बँक प्रशासन आणि तहसील विभागातील काही 'बड्या माशांनी' संगनमताने जनतेच्या कष्टाच्या पैशावर 'डल्ला' मारला आहे. जर या प्रकरणाची सखोल चौकशी झाली, तर अनेक 'पांढरपेशी'चेहरे समोर येण्याची शक्यता आहे. ज्या कर्मचाऱ्यांनी यापूर्वी घाटंजी आणि बेलोरा शाखेत लाखो रुपयांचा चुराडा केला, त्यांनाच पुन्हा जामबाजार शाखेत संधी देण्यात आली. हे कर्मचारी आता उजळ माथ्याने फिरत असून 'मी तो नव्हेच' असा आव आणत आहेत. 'आमचे कोणी वाकडे करू शकत नाही, आमच्या पाठीशी मोठी राजकीय शक्ती आहे,' अशी मग्रुरी हे घोटाळेबाज उघडपणे करत असल्याची माहिती समोर येत आहे. जनतेचा पैसा हडप करायचा आणि चौकशी लागलीच तर 'वरून' दबाव आणून ती गुंडाळून ठेवायची, हा यांचा आता 'गोरखधंदा'झाला आहे.



## सेवानिवृत्त न्यायमूर्तींची जि.प.शाळेला भेट

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ३१ :** गोधनी रोड येथील जिल्हा परिषद शासकीय माध्यमिक शाळेचे माजी विद्यार्थी तथा बॉम्बे हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती एम. ए. गिलानी (१९६८ बॅच) यांनी ३० मार्च २०२६ रोजी आपल्या शाळेला सदिच्छा भेट दिली. आपल्या जुन्या आठवणींना उजाळा देण्यासाठी ते शाळेत आले होते.

याप्रसंगी शाळेच्या वतीने शाल आणि रोपटे देऊन न्यायमूर्ती गिलानी यांचा मुख्याध्यापक साहेबराव पवार यांच्याहस्ते यथोचित सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रामुख्याने जिल्हा परिषदेचे माजी शिक्षण व आरोग्य सभापती देवानंद पवार यांची उपस्थिती होती. एका उच्च पदावर कार्य केल्यानंतरही आपल्या प्राथमिक शाळेबद्दलची ओढ आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आलेल्या गिलानी यांचे मुख्याध्यापक साहेबराव पवार व शिक्षक वृंदाने स्वागत केले.